# वेश्याव्यवसाय

0155,6
KAR
0 13622

र. धों. कर्वे, एम्. ए.

0155,6-KAR
0 13622

राइट एजन्सी, नं. १३ … ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **आधुनिक आहारशास्त्र,** किं. १॥ रु., ट. ख. ५ आणे.

२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], दुसरी आवृत्ति
किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.

३. **संततिनियमन** [ सचित्र ], ७ वी आवृत्ति,
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

४. **गुप्त रोगांपासून बचाव** [ सचित्र ], ३ री आवृत्ति,
किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.

५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख.
भाग १ ला [पहिलीं तीन वर्षें], २–४–०, ट. ख. ६ आ.
भाग २ रा [वर्षें ४–५–६], २–०–०, ट. ख. ५ आ.
दोन्ही भाग घेणारांस किं. ४–०–०, ट. ख. ८ आ.

६. **त्वचेची निगा,** किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

७. **गुरुबाजी** ( नाटक ) किं. ८ आणे, ट. ख. ४ आणे.

# वेश्याव्यवसाय

19622

Aksharsparsh ~~020-25424915~~
Email : aksharsparshpune@gmail.com Mobile No.: 8007144040
To be returned on or before the last date stamped below

पुणे-411 004. Ph. 25424915
मो. 8007144040

: मुद्रक :
**जी. जी. पाठारे,**
पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
१०३, ताडदेव रोड,
मुंबई नं. ७.

13622
0155,6
KAR

13622
अक्षरस्पर्श ग्रंथालय
40/1 B, भोंडे कॉलनी, कर्वे रोड,
पुणे-411 004. Ph. 25424915
मो. 8007144040

: प्रकाशक :
**रघुनाथ धोंडो कर्वे,**
**राइट एजन्सी,**
नं. १३ नवी भटवाडी
गिरगांव, मुंबई.

# प्रस्तावना

प्रसिद्ध फ्रेंच लेखक रने गिय्याँ यांनीं जगाच्या इतिहासाचें समालोचन करून असा निकर्ष काढला आहे की एकंदर मानवी समाजांत कामविषयक चालीरीतींच्या दृष्टीने दोन परस्परविरुद्ध प्रकार असतात. एक प्रकार म्हणजे, स्त्रीपुरुषसमागम ही खाण्यापिण्याइतकीच नैसर्गिक गोष्ट आहे, आणि यामुळे त्यांत पापहि नाही आणि पुण्याहि नाही, कामतृप्ति जितक्या सुलभ रीतीने होईल तितका समाज अधिक सुखी होईल, हें ओळखून त्याप्रमाणे वागणारा; आणि दुसरा प्रकार म्हणजे, स्त्रीपुरुषसमागम ही एकंदरींत वाईट गोष्ट आहे, समाजाच्या अस्तित्वाकरितां त्याची जरूर आहे खरी, परंतु अशी जरूर राहूं देणें ही एकंदरींत ईश्वराची चूकच आहे; तेव्हा या अनिष्ट गोष्टीला शक्य तितके अड-थळे उत्पन्न केले पाहिजेत; वयाचे, जातीचे, नात्याचे, कायद्याचे, शक्य तितके निर्बंध घातले पाहिजेत; त्यांतील पाप नाहीसें करण्याकरतां भटांना मंत्र म्हणा-यला लावले पाहिजेत, किंवा एखाद्या कारकुनाकडून स्त्रीपुरुषांचीं नांवें एखाद्या वहीवर लिहवलीं पाहिजेत, व नंतरच समागमाला परवानगी दिली पाहिजे; अशी परवानगी दिल्यावर सुद्धां समागम शक्य तितका कमी व्हावा म्हणून तो फक्त प्रजोत्पत्तीपुरताच व्हावा असा दंडक घालून दिला पाहिजे; या नियमांचें कोणी उल्लंघन करितो की काय हें पाहण्याकरतां सर्वांनी डोळ्यांत तेल घालून पाहरा केला पाहिजे, आणि कोणीं उल्लंघन केल्यास त्याचा शक्य तितका छळ केला पाहिजे, वगैरे कल्पनांमुळे त्यांबरहुकूम वागण्याचा प्रयत्न करणारा समाज.

या दोन प्रकारांपैकी कोणत्या प्रकारचा समाज अधिक सुखी होईल हें कोणालाहि सहज समजण्यासारखें आहे. तथापि नीतीच्या खोट्या कल्पनांमुळे दुसऱ्या प्रकारचा समाज स्वतःला अधिक उच्च समजतो व आपल्याला सुखाची परवा नाही, फक्त नीतीची परवा आहे, अशी घमेंड मारतो. वास्तविक हा धादांत मूर्खपणा आहे. कारण नीतीला जर कांही अर्थ असेल तर समाजाचें सुख हेंच नीतीचें ध्येय असलें पाहिजे. आणि सुख म्हणजे ऐहिक सुख, धार्मिक

लोकांनी मानलेलें मरणोत्तरचें काल्पनिक सुख नव्हे, हें लक्षांत घेतल्यास याबद्दल कोणालाहि शंका राहण्याचें कारण नाही.

आणि प्रत्यक्ष अनुभवहि तेंच सांगतो. पहिल्या प्रकारच्या समाजांचीं उदाहरणें म्हणजे प्राचीन ग्रीस, ख्रिस्ती प्रचारापूर्वींचें चीन, जपान व पॅसिफिक महासागरांतील बेटें, श्वेतकेतूपूर्वीचा हिंदु समाज, वगैरे. अर्थात् ख्रिस्ती प्रवाशांनी अशा समाजांचीं जीं वर्णनें लिहिलीं आहेत, त्यांवरून अशा ठिकाणीं कामपूर्ति किती सहज होऊं शकते याचेंच या लेखकांना वैषम्य वाटतेंसें दिसतें. आणि तें केवळ ख्रिस्ती नपुंसकनीतीमुळे.* परंतु अशा देशांतील लोक सुखी असतात हेंहि त्यांच्याच वर्णनांवरून दिसतें. अशा देशांत जरी विवाहपद्धति असली तरी ती अतिशय सैल असते, म्हणजे घरचा मालक आपण होऊन आपली बायको किंवा मुली पाहुण्याकडे पाठवतो, तेथील मुली विवाहापूर्वी गरोदर झाल्या तरी चालतात, तेथे अनौरस मुलें नसतातच, किंवा निदान त्यांना कोणत्याहि प्रकारचा कमीपणा नसतो, आणि ते लोक सदा आनंदी असतात. अर्थात् याचें एक कारण म्हणजे तेथे अन्न विपुल असतें, परंतु दुसरें महत्वाचें कारण म्हणजे समागम सहजप्राप्य असतो. या दोन मनुष्याच्या मुख्य गरजा आहेत. वस्त्रप्रावरणाला तेथे महत्व नसतें, कारण तेथे नग्नता अश्लील नसते, समागम हें पाप नसल्यामुळे शरीराचे कोणतेहि भाग अश्लील मानीत नाहीत आणि ते झांकण्याचें कारण पडत नाही.

फ्रॉइडने जें गूढमनासंबंधी संशोधन केलें आहे तें अशा समाजाला लागू नाहीं. जेथे कामवासनेवर निर्बंध नाहीत आणि लहान मुलांना देखील पाहिजे ते खेळ खेळण्याची मोकळीक असते, तेथे कामवासना दडपून टाकण्याचें कारण पडत नाही आणि ती दडपल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या मानसिक विकृतिहि तेथे दिसत नाहीत. फ्रॉइडचें सर्व संशोधनकार्य यूरोपीय नीतिबाज समाजांतच केलेलें असल्यामुळे ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाही, आणि यामुळे त्याने सार्वत्रिक विधानें केलीं आहेत. परंतु नैसर्गिक समाजांत तशी स्थिति नसते. ( उदाहरणार्थ एलविन् यांचें ' बैगा ' लोकांवरील पुस्तक, किंवा मॅलिनौस्की यांचें ट्रोब्रिअंड

* नपुंसकांप्रमाणे वागणें हीच आदर्श नीति अशी समजूत.

बेटांतील लोकांसंबंधी पुस्तक पहा ). यूरोपांतहि अशीं उदाहरणें सांपडत नाहीत असें नाही. हॅवलॉक एलिसने दक्षिण रशियांतील एका माणसाने स्वतः सांगितलेली हकीकत पुढीलप्रमाणे दिली आहेः–"तरुणतरुणींवर कोणत्याहि प्रकारची देखरेख नसे. त्यांनी पाहिजे तितका वेळ एकत्र असावें, पाहिजे तिकडे हिंडावें, रात्रीं पाहिजे तेव्हा घरीं यावें, सारांश मोठ्या माणसांइतकेंच स्वातंत्र्य आम्हालाहि असे. यामुळे कामपूर्तीला कोणतीहि आडकाठी नसे. माझे कांही सोबती वेश्यांकडे जात असत, पण त्यांना रस्त्यांत पाहिल्याबरोबर मला त्यांचा किळस येई आणि शिवाय रोगांचीहि भीति वाटे, म्हणून मी जात नसें. परंतु मला विद्यार्थिनी आणि मोठ्या स्त्रिया देखील पाहिजे तितक्या मिळत. मी चवदा वर्षांचा असतांना माझ्या आईच्या एका मैत्रिणीजवळ असें ढोंग केलें की मला स्त्रीपुरुषांमधला फरक मुळीच माहीत नाही. त्या वेळीं घरांत कोणीच नव्हतें आणि तिचा नवरा त्या वेळीं घरीं येण्याचा संभव नव्हता, तेव्हा तिने मला तो फरक आणि त्याचा उपयोग प्रत्यक्षच दाखवला. मी इटलींत गेलों तेव्हा तेथे अविवाहित तरुणींशीं संबंध ठेवणें गैर समजतात हें पाहून मला आश्चर्य वाटलें, कारण रशियांत अविवाहित स्त्रीला मूल झालें तरी त्याचें कोणाला कांही वाटत नाही, आणि तिला त्याने कोणताहि कमीपणा येत नाही. अशा रीतीने एका अविवाहित स्त्रीला चार वेगवेगळ्या माणसांपासून चार मुलें झालेलीं मला माहीत आहेत. ती एका सरकारी शाळेंत शिक्षकीण होती आणि तेथील सर्व मुलींना तिची हकीकत माहीत होती, तरी तिचें कांही नुकसान झालें नाही. एखादी स्त्री नवऱ्याला सोडून दुसऱ्या मनुष्याजवळ उघडपणें रहात असली तरी तिला समाजांत कोठेहि मज्जाव होत नाही. आमचेकडील बायका इंग्रजांच्या नीतिबाजीची चेष्टा करतात. एका विधुराला दोन मुली होत्या, आणि त्या मुलींना त्याच्यापासूनच दोन मुलें झालीं होतीं, हें सर्वांना माहीत असूनहि त्याला प्रतिष्ठित समाजांत मान मिळत असे." नीतिबाज समाजांना या गोष्टी कितीहि भयंकर वाटल्या तरी त्या केवळ रूढ नीतीच्या कल्पनांमुळे तशा वाटतात आणि जेथे नीति अधिक शिथिल आहे अशा समाजांचें त्यामुळे कोणतेंहि नुकसान झालेलें दिसत नाही. अशा ठिकाणीं फ्रॉइडचे सिद्धांत कसे लागू होतील ?

दुसऱ्या प्रकारच्या समाजांत याच्या बरोबर उलट स्थिति असते. याचें एक उदाहरण म्हणजे यहुदी आणि ख्रिस्ती समाज. या दोन्ही धर्मांचा उगम एकच आहे, आणि त्यांतील मूळ कल्पना अशी की ईश्वराने प्रथम आदम नांवाचा एक पुरुष आणि ईव्ह नांवाची एक स्त्री निर्माण करून, त्यांना ईडन नांवाच्या एका बागेंत ठेवून, तेथे एक ज्ञानवृक्ष होता त्याचीं फळें न खाण्याची आज्ञा दिली होती. ती आज्ञा मोडून त्यांनी त्याचें फळ खाल्लें, त्यामुळे त्यांना समागमाचें ज्ञान झालें आणि आपल्या शरीराची लाज वाटूं लागली, आणि ईश्वराने शाप दिल्यामुळे त्यांची प्रजा म्हणजे सर्व मानवजाति दुःखी झाली. या अचरट कल्पनेवर हे दोन्ही धर्म उभारलेले आहेत. समागमासारखी नैसर्गिक गोष्ट पाप मानल्याचे परिणाम काय होतील हें सहजच दिसतें, आणि या दोन धर्मांच्या तावडींत सांपडलेल्या कोणत्याहि समाजांत हे परिणाम स्पष्ट दिसतात. विशेषतः ख्रिस्तधर्मीयांनी सर्व जगावर आक्रमण करून आपल्या धार्मिक कल्पना इतरांवर लादण्याचा प्रयत्न केला आणि जेत्यांचें सर्वच चांगलें समजण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे त्यांच्या नपुंसकनीतीचा सर्वत्र फैलाव होऊन या बावतींत पूर्वी सुखी असलेले देश आतां दुःखी होऊं पहात आहेत. जेथे त्यांचा प्रत्यक्ष अंमल नाही तेथे देखील त्यांचें अनुकरण होत आहे, मग हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांत देशाभिमानी म्हणवणारे परंतु अंतरीं ख्रिस्ताळलेले गांधींसारखे लोक तसा प्रयत्न करतात यांत नवल काय ? आपण म्हणूं ती नीति आणि ती लोकांवर लादण्याचा आपल्याला हक्क आहे, ही धार्मिक लोकांची अत्याचारी प्रवृत्ति गांधींचे अंगांत पूर्णपणें बाणलेली आहे. यामुळे ब्रह्मचर्य, उपोषण, दारूबंदी, विवाहबंदी या सर्वांचा पुरस्कार ते जारीने करीत आहेत. विवाहित लोकांना ब्रह्मचर्य पाळायला सांगणें ही कल्पना किती हास्यास्पद आहे, हें धर्माच्या डोळझांपण्यामुळे त्यांना समजत नाही. असे लोक सत्तेचा दुरुपयोग करणार हें ठरलेलेंच, तेव्हा समंजस माणसांनी या अत्याचारी प्रवृत्तींचा जोराने निषेध करणें जरूर आहे.

या बावतींत खिस्ती धर्मांतील रोमन कॅथोलिक पंथ त्यांतल्या त्यांत बरा आहे, कारण त्यांत कोणीहि आपलें पाप खाजगी रीतीने पाद्र्याजवळ कबूल केलें की तें धुवून जातें, आणि त्यामुळे समागम हें पाप समजलें असलें तरी त्यांतून

सुटका आहे. बहुतेक धर्मांत ही पापक्षालनाची योजना वेगवेगळ्या स्वरूपांत असते. यामुळे पाप करण्यास मोकळीक असते आणि ज्या धर्मांत नैसर्गिक गोष्टींनाच पाप मानतात, त्यांत अशी कांही सोय नसेल तर दुःखाला पारावार रहात नाही. ती सोय असली म्हणजे लौक नैसर्गिक रीतीने वागून नंतर पाप धुवून टाकतात. जुन्या रशियांत अशी स्थिति होती. परंतु इंग्लंडांत प्रॉटेस्टंट पंथाचें प्राबल्य असल्यामुळे तेथे ख्रिस्ती क्षीवनीति विशेष नडते.

या सर्व विवेचनाचा वेश्यावृत्तीशीं फार निकट संबंध आहे. जेथे समागमावर दोन माणसांच्या संमतीपलीकडे कोणताहि निर्बंध नसतो, तेथे अर्थातच वेश्या नसतात. तेथे समागम सहज मिळतो, आणि जें फुकट मिळतें तें विकत कोण घेईल ? जेव्हा कांही कारणाने समागमावर कोणताहि निर्बंध उत्पन्न होतो, तेव्हाच वेश्यांना मागणी उत्पन्न होते. ही मागणी नैसर्गिक असते, यामुळे ती व्याख्यानांनी बंद होत नाही. विवाह हा अशा प्रकारचा निर्बंध आहे. हा निर्बंध विशेष कडक असेल, तेथे फक्त विवाहित माणसानांच समागमाची परवानगी असते आणि तो फक्त परस्परांशींच झाला पाहिजे अशी अट असते. यामुळे ज्यांना कांही कारणाने विवाह शक्य नसतो त्यांची अडचण होते. परंतु ज्याला सरळ मार्गाने खायला मिळत नाही तो चोरून खाण्याचा प्रयत्न करणार, त्याचप्रमाणे ज्याला सरळ मार्गाने कामतृप्ति मिळत नाही तो चोरटे प्रयत्न करणार हें ठरलेलेंच. विवाहित स्त्रियांवर असे प्रयत्न यशस्वी होऊन ते नवऱ्याला कळल्यास त्याला दोघांचाहि खून करण्याची परवानगी असते, आणि अविवाहित स्त्रिया गरोदर झाल्यास त्यांचा समाजाकडून छळ होतो. अशा समाजाला वेश्यांचा उपयोग असतो, कारण त्यांचेमुळे निदान पैसे खर्च करणाराला तरी समागमाचा एक राजरोस मार्ग मोकळा होतो, आणि इतर स्त्रियांना तितका सामाजिक धोका कमी होतो. अर्थात् गरिबांना याचा फायदा घेतां येत नाही, परंतु वेश्या हा विवाहापेक्षा कमी खर्चाचा मार्ग आहे. तोहि ज्यांना शक्य नाही ते कायद्यालाहि न जुमानतां समाजनिर्बंधांचें उल्लंघन केल्याशिवाय रहात नाहीत, आणि कोणत्याहि नीतिबाज समाजांत व्यभिचार, बळजबरी वगैरे प्रकार थोड्याबहुत प्रमाणांत चालू असतातच; आणि त्यांतून सुटका नाही, कारण सर्वांच्या सोईकडे समाज

लक्ष पुरवीत नाही. तथापि जेथे ख्रिस्ती क्लीबनीतीचा फैलाव झालेला नाही, तेथे वेश्यांना समाजांत स्थान असतें आणि तें पुष्कळ वेळां मानाचें असतें.

परंतु वेश्यांचा हा उपयोग ज्यांना समजत नाही आणि जे केवळ नीतिबाजींतच दंग असतात, ते पुरुषांच्या गरजांनाच नांवें ठेवतात, त्यांना व्याख्यानें देवून त्या गरजा कमी करूं पाहतात, आणि वेश्यांचा नायनाट करूं पाहतात. अर्थात् त्यांना या प्रयत्नांत यश कधीच येत नाही असें इतिहास सांगतो. ऐहिक सुख हा जर नीतीचा उद्देश असेल तर तो या नीतिबाजीनें कधीच साधत नाही. परंतु हल्लीच्या यांत्रिक युगांत नैसर्गिक रीतीने सुख मिळवण्यांत पुष्कळ लोकांना कमीपणा वाटूं लागला आहे. अन्न खायचें तें देखील भूक लागेल तेव्हा नव्हे, तर कचेरीच्या किंवा धंद्याच्या कामांतून वेळ मिळेल तेव्हा; आणि तें कसें तरी पोटांत ढकलायचें, कारण तें चव घेऊन खाण्यास वेळ नसतो. या यांत्रिक युगांत आपणहि यंत्र बनणें हें उच्च दर्जाचें कर्तव्य ! अशा रीतीने काम करून थकल्यावर मनुष्याच्या सर्वच शक्ति क्षीण झाल्या तर नवल काय ? डॉ. रॉबिनसन यांनी असें लिहून ठेवलें आहे की यूरोपअमेरिकेंतील शेंकडा पाऊणशें पुरुष स्त्रियांचें समाधान करण्यास असमर्थ असतात. आणि स्त्रिया तरी काय ? त्याहि या नैसर्गिक सुखाची फारशी परवा न करतां, किंवा क्लीबनीतीमुळे समागमांत कांही सुख असेल हेंच न कळतां त्याला अश्लील आणि घाणेरडें कृत्य मानून, कपड्यांत आणि मोटारींतच सुख मानूं लागतात. अशी ज्या समाजाची स्थिति झाली तो किती दिवस जिवंत राहील ? हल्ली यूरोपांतील जन्ममान जें आपोआप कमी होत आहे, त्याचें मुख्य कारण म्हणजे नैसर्गिक सुखें सोडून कृत्रिम सुखांच्या मागें लागणें हें होय, असें कित्येक विचारवंतांचें मत आहे, आणि त्यांत बरेंच तथ्य दिसतें. जो शरीराची परवा न करतां काम करील त्यालाच कर्तव्याची खरी जाणीव ! अशा स्थितींत कामवासनेचा दर्जा कमी ठरला तर आश्चर्य काय ? हा ख्रिस्ती क्लीबनीतीचा विजय आहे, पण या विजयांतच समाजाचा नाश आहे हें समंजस माणसांनी लक्षांत घेतलें पाहिजे.

प्रस्तुत लेखकावर वेश्यावृत्तीचा पुरस्कार करण्याचा आरोप अनेकांनी केला आहे आणि त्यांत थोडेंबहुत तथ्यहि आहे. परंतु तो पुरस्कार केवळ समाजसुखाच्या दृष्टीने आहे, वेश्या ही एक उत्तम संस्था आहे अशा विश्वासाने नव्हे. पूर्वी सुखी असलेल्या समाजांनी आज नीतिबाजीच्या आहारीं जाऊन अनेकांना कामतृप्ति दुर्लभ केली आहे. ती सुलभ झाल्याशिवाय समाज सुखी होणें शक्य नाही. कृत्रिम कर्तव्यांपुढे अन्नाची परवा न ठेवणें हाच सद्गुण मानल्यावर कामतृप्तीला अजीबात फाटा देण्याचा प्रयत्न झाल्यास नवल नाही, परंतु ज्यांना निसर्गनियमांचें थोडेंबहुत ज्ञान आहे, त्यांना यांत भूषण वाटणार नाही, आणि ज्याप्रमाणे सर्वांना अन्न मिळालें पाहिजे आणि तें खायला वेळ मिळाला पाहिजे, हें आतां लोकांना हळूहळू कळूं लागलें आहे, आणि यामुळेच समाजवाद उत्पन्न झाला आहे, त्याचप्रमाणे कामतृप्तीचाहि हक्क सर्वांना असला पाहिजे हें जेव्हा लोकांना कळूं लागेल, त्या वेळीं समागमावरचे फालतू निर्बंध नाहीसे होतील आणि समागम सुलभ होऊन समाज सुखी होईल. परंतु ते निर्बंध जोंपर्यंत नाहीसे झाले नाहीत तोंपर्यंत समाजाला वेश्यांची गरज आहे. वेश्यांना मागणी नाहीशी झाली म्हणजे त्या आपोआपच नाहीशा होतील, परंतु तेथपर्यंत आणि नंतरहि त्यांना आपला धंदा करण्याचा पूर्ण हक्क आहे आणि तो त्यांना सरळपणें करूं न देऊन त्यांना छळण्याचा जो प्रयत्न नीतिबाज लोक करीत आहेत तो अत्यंत निंद्य आहे आणि त्यांत समाजाचें हित नाही. मात्र वेश्यांनाहि हें धडसें कळत नाही आणि त्यांना देखील आपण पाप करतों असेंच वाटतें. ही भावना ज्यांना आहे, आणि एकाच पुरुषाला चिकटून राहण्यांतच ज्यांना मोठेपणा वाटतो, त्या खऱ्या वेश्याच नव्हत. त्यांत कमीपणा न वाटतां मोकळ्या मनाने ज्या धंदा करतात त्याच खऱ्या वेश्या, आणि त्यांचेवर नीतिबाजांच्या प्रचाराचा बिलकुल परिणाम होत नाही. अशाच वेश्यांचा समाजाला उपयोग आहे आणि याच दृष्टीने येथे या प्रश्नाचा विचार केलेला आहे.

शेवटच्या प्रकरणांत दिलेली माहिती मुख्यतः श्री. मामा वरेरकर यांजकडून मिळालेली आहे आणि तीबद्दल मी अत्यंत आभारी आहें.

१ जून १९४०.

र. धों. कर्वे

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्राचीन हिंदुस्थान ... ... ... | १ |
| २. | यूरोप ... ... ... | १५ |
| ३. | नंतरची परिस्थिति ... ... ... | ३३ |
| ४. | वेश्याबंदीची मोहीम ... ... ... | ९६ |
| ५. | कायदेबंदीचा सविस्तर विचार ... ... | १०५ |
| ६. | कायदेबंदीचे प्रत्यक्ष परिणाम ... ... | १२८ |
| ७. | नियंत्रण कसें असावें ? ... ... | १३६ |
| ८. | वेश्यावृत्तीचा नैतिक विचार ... ... ... | १४१ |
| | संदर्भग्रंथांची यादी ... ... ... | १६२ |
| | पुरवणीः– खऱ्या आणि खोट्या वेश्या ... ... | १६३ |

# वेश्याव्यवसाय

## १

## प्राचीन हिंदुस्थान

अतिथींच्या सत्काराकरता त्याला स्त्री अर्पण करण्याच्या चालीपासून हिंदुस्थानांतील वेश्यावृत्तीचा उगम झाला असें पुष्कळांचें मत आहे, परंतु त्यांत मोबदल्याचा संबंध नसल्यामुळे ती वेश्यावृत्ति म्हणतां येणार नाही. तेव्हा वेश्यावृत्तीचा उगम देवदासींपासून झाला असला पाहिजे असें दिसतें. ' विश्वमित्र ' नामक हिंदी मासिकांत श्री. गोपीकृष्ण नांवाच्या लेखकाने लिहिलें आहे की वैदिक कालीं वेश्यावृत्ति यथेष्ट चालू होती. वास्तविक वेश्या हा शब्दच वैदिक भाषेंतील आहे. वैदिक भाषेंत ' विश् ' हा शब्द ' सामान्य जनता ' या अर्थाने वापरला आहे. यावरून सामान्य जनतेकडून भोग्या अशी जी, ती वेश्या. महाभारतांत 'विशांपति' हा शब्द ' राजा ' या अर्थाने वापरला आहे. रामायणकालांत अतिथींच्या सत्काराकरता वेश्या बोलावण्याची पद्धत होती. भरताच्या व त्याच्या अनुयायांच्या सेवेकरता भारद्वाजमुनीने आपल्या आश्रमांत पुष्कळ वेश्या आणल्या होत्या. महाभारतांतील युद्धांत छावणींत वेश्या असत व कौरवपांडवांच्या राजवाड्यांत शेंकडों वेश्या रहात असत. संस्कृतीला पूर्णता येण्याकरता प्राचीन पंडितांनी वेश्यांच्या संगतीची आवश्यकता दाखवली आहे. **'देशाटनं पंडितमित्रता च वारांगना राजसभाप्रवेशः'** अर्थात् त्या वेळच्या वेश्या सुशिक्षित व सभ्य होत्या. 'केल्याने देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार' या भाषांतरांत नीतिबाजीमुळे वारांगनांना स्थान मिळालें नाही.

देवदासींची प्रथा प्रथम दक्षिणेंत सुरू झाली व आजही तेथेच विशेष दिसते. वेश्यावृत्तीला धार्मिक स्वरूप देण्याचें कारण कांही लोकांना गीतेंत सांपडतें:- 'यज्जुहोसि यदश्नासि यत्करोषि ददासि यत्।...तत्कुरुष्व मदर्पणं'. देवळांत देवदासींचें काम म्हणजे देवासमोर गाणें व नाचणें. त्या देवाच्या बायका, तेव्हा त्या विधवा होणें शक्य नाही व विवाहादि कार्यांत सौभाग्यदायक म्हणून त्यांस मिरवणुकींत पुढे ठेवतात व त्यांचेकडून वधूचें मंगलसूत्र ओंवून घेतात. खंडोबाच्या देवळांतील मुरळ्या पुजाऱ्यांबरोबर आसपासच्या गांवांत हिंडतात आणि देवासंबंधी 'अश्लील' गाणीं गावून पैसे मिळवतात. त्या कधींकधी इतकें अश्लील नृत्य करतात की पोलिसास मधे पडावें लागतें. मारवाडांत देवदासी बनवण्याची एक रीत अशी आहे की प्रथम तिचें एखाद्या साधूशीं लग्न लावतात आणि नंतर तो एक रुपया घेऊन तिचा संबंध सोडतो. साधु न मिळाल्यास गणपतीशीं लग्न लावतात. तथापि इतर वेश्यांचे मानाने हल्ली देवदासींची संख्या फारच कमी आहे. कोणत्याहि कारणाने समाजाने टाकलेल्या स्त्रिया वेश्या बनतात. पुष्कळ ठिकाणीं अस्पृश्य जातींतील स्त्रिया वेश्या आहेत. मुंबई व कलकत्ता येथे बऱ्याच वेश्या भंगी जातीच्या आहेत. बिहार व संयुक्त प्रांतांत 'नायक' नांवाची एक जात आहे. तींतील मुलींस वेश्यावृत्तींत घालण्याची चाल आहे. या वेश्यांना विशेष कुलीन समजतात व त्या फक्त उच्च कुलांतील पुरुषांशींच संबंध ठेवतात. एखादीने खालच्या जातींतील किंवा अन्यधर्मी लोकांशीं संबंध ठेवल्यास नायक-समाज तिच्यावर बहिष्कार घालतो. यामुळे उच्च लोकांत त्यांस मागणी असते आणि त्या सुसंस्कृत व नृत्यगायनांत निपुण असतात. काश्मीर व पंजाबांतील कांही खालच्या जातींत स्वेच्छाचाराची चाल आहे. त्यांत सर्व स्त्रियांचा विवाह होतो, परंतु त्यांना व्यभिचार करण्याचा पूर्ण अधिकार असतो व त्या पुष्कळ वेळां पैशाकरता व्यभिचार करतात. याशिवाय दिवसा लोकांकडे घरकाम करून रात्री हा धंदा करणाऱ्या पुष्कळ असतात.

इतरांकडून पुत्रप्राप्ति करून घेण्यास कुंतीचें मन वळवण्याकरता पंडूने तिला महाभारतांत जें व्याख्यान दिलें आहे, त्यावरून असें दिसतें की श्वेतकेतूपूर्वी जरी विवाहसंस्था अस्तित्वांत होती, तरी व्यभिचारास बंदी नव्हती. तो तिला सांगतो की

पूर्वी स्त्रिया घरांत कोंडलेल्या नसत, त्या स्वैरसंचार व स्वैरसमागम करीत असत. विवाहापूर्वीपासून त्यांना अशीच संवय असे आणि हीच त्या वेळची चाल असल्यामुळे हें पाप समजत नसत. या चालीला असा पुरातन आधार असल्यामुळे ऋषींनी याची स्तुति केली आहे. परंतु नंतर उद्दालक ऋषीचा मुलगा श्वेतकेतु याने एकदा आपल्या बापासमक्ष आपल्या आईला एक ब्राह्मण समागमाकरता ओढून नेत आहे असें पाहिलें, त्यावरून तो संतापला. बापाने त्याला सांगितलें की यांत रागावण्याचें काय कारण ? हीच पुरातन चाल आहे. सर्व प्राण्यांतील माद्या स्वतंत्र असतात, तशाच स्त्रियाहि स्वतंत्र आहेत. परंतु श्वेतकेतूला हें पसंत न पडून त्याने व्यभिचार हें पाप ठरवलें, तथापि पतीच्या सांगण्यावरून दुसऱ्याकडून संतानोत्पत्ति करून घेण्यास हरकत नाही. यासंबंधी त्याने अनेक उदाहरणें सांगितल्यावर कुंती कबूल झाली आणि पांच जणांकडून तिने पांच पुत्र उत्पन्न करून घेतले. या पांच जणांना देव म्हटलें आहे, परंतु पंडूचें सांगणें देवांपुरतेंच नव्हतें. नंतरहि लोक श्वेतकेतूचा नियम पाळूं लागले असें दिसत नाही. कारण पूर्वी जे १२ प्रकारचे पुत्र असत त्यांत ‘ परिक्रीत ’ ( पैशाच्या मोबदल्याने परपुरुषापासून उत्पन्न झालेला ), कालीन ( विवाहापूर्वी पत्नीस झालेला ), स्वैरिणी पत्नीला झालेला (निदान चार पुरुषांशीं जिचा समागम झाला आहे ती ‘स्वैरिणी’), सहोढज ( विवाहाचे वेळीं गरोदर असलेल्या स्त्रीला झालेला ), या सर्वांना पुत्रच समजत असत, पण हक्क मात्र सारखे नसत. अशा स्थितींत स्वैरसमागमाला परवानगीच होती, तेव्हा वेश्यांना फारशी मागणीच असणें शक्य नाही.

परंतु जेव्हा विवाहसंस्था कायम झाली आणि विवाहित स्त्रियांचें समागमस्वातंत्र्य नष्ट झालें, तेव्हाच वेश्यांची गरज भासूं लागली. राजेरजवाड्यांच्या तैनातींत हजारों वेश्या असत, आणि कोणीं त्यांचें कांही काम केलें तर त्यांना यांपैकी कांही बक्षिस मिळत असत. राम विजयी होऊन परत आल्याची बातमी जेव्हा हनुमानाने भरताला सांगितली तेव्हा त्याने हनुमानाला उच्च कुळांतील १६ स्त्रिया बक्षिस दिल्या असें वर्णन रामायणांत आहे. उच्च कुळांतील स्त्रिया लोकांना बक्षिस कशा देतां येतात हें समजणें कठिण आहे आणि अशा स्त्रिया उच्च प्रतीच्या वेश्या असणेंच जास्त संभवतें. पहिल्या बाजीरावाला मस्ता-

नीही अशीच बक्षिस मिळाली होती. पांडवांच्या अनेक विवाहांच्या वेळीं आणि युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाचे वेळीं हजारों स्त्रिया बक्षिस म्हणून अनेकांना दिल्या व त्यांनाही पुष्कळ मिळाल्या. सारांश या वेळीं हत्तीघोड्यांप्रमाणेच स्त्री ही देवघेवीची वस्तु होती आणि अशा वर्णनांवरून वेश्यांची संख्या हल्लीपेक्षा पुष्कळच जास्त असली पाहिजे असें अनुमान निघतें. युद्धांत सैन्याबरोबर नेहमी वेश्या असत अशीं वर्णनें महाभारतांत सांपडतात. सैन्याला लागणाऱ्या इतर सामानांतच त्यांची गणना होत असे आणि युधिष्ठिरासारख्या धर्मात्म्यांना देखील ही काळजी वहावी लागत असे.

देव हे मनुष्यानेच उत्पन्न केलेले असल्यामुळे स्वर्गांतही वेश्या सांपडतात. यामुळे इंद्राजवळ अप्सरा असतात. त्यांपैकी कांही कश्यप ऋषीच्या मुली आहेत असें महाभारतावरून दिसतें. आणखी कांही कपिलमुनीच्या आहेत. ऊर्वशी, मेनका, तिलोत्तमा, रंभा, आणि घृताची या प्रमुख अप्सरांच्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. महाभारतांत एकंदर ४२ अप्सरांचीं नांवें आहेत. या अप्सरा इंद्राच्या ताब्यांत असून त्याची व त्याच्या शिष्टमंडळाची नृत्यगायनाने व कधी उपभोगानेही करमणूक करीत असत. तथापि या बाबतींत त्यांचेवर जुलूम करण्याची कोणाची ताकत नव्हती आणि समागम त्यांच्या इच्छेवर असे. प्रत्यक्ष इंद्राला देखील नकार देण्याची त्यांना मुभा असे. रावणाने रंभेला जबरदस्तीने आपलेकडे ठेवून तिजवर अनेक वेळां बलात्कार केल्यामुळे त्याला त्याचें प्रायश्चित जन्मभर भोगावें लागलें. कांही अप्सरा मानवी राजांशींही लग्नें करीत असत आणि कांहीं इंद्राच्या विनंतीवरून विश्वामित्रासारख्यांचा तपोभंग करण्याकरता पृथ्वीवर येत असत. या अप्सरांना सौंदर्याप्रमाणेच विद्वत्ताही असे आणि नारदऋषि देखील त्यांचे मताला किंमत देत असे. त्याने एकदा पंचसुधा नामक अप्सरेला स्त्रियांसंबंधीं मत विचारलें असतां तिने सांगितलें की स्त्रिया नेहमी चंचल असतात, पुरुषांना त्यांची तृप्ति करणें कठिण असतें आणि त्यांचें मन नेहमी सुंदर तरुणांमागे धांवत असतें. त्यांना सर्वांत प्रिय गोष्ट म्हणजे पुरुषाची संगति. त्या प्रेमळ पतीला सोडून एखाद्या हलकटाच्या मागे लागून सर्व लज्जा व शिष्टाचार सोडून देतील. त्यांनीं बाह्यतः सामाजिक निर्बंध मानले तरी त्या आंतून नेहमी बंडखोर असतात, इ.

इ. अर्जुन एकदा स्वर्गांत इंद्राकडे गेला असतां उर्वशी त्याच्यावर मोहित झाली, पण इंद्र हा अर्जुनाचा बाप असल्यामुळे आणि अप्सरा या इंद्राच्या तैनातींत असल्यामुळे त्याने तिला आईप्रमाणे समजून नकार दिला आणि तिने कितीही प्रयत्न केले तरी त्याने ऐकलें नाही अशी गोष्ट आहे. देवांचा राजा इंद्र याचें इतक्या अप्सरांनीही समाधान होत नसे आणि कोणीही सुंदर स्त्री दिसली की त्याचें तिच्यावर मन जात असे. दानवांशीं लढाई चालू असतांना त्याला एकदा शर्मिष्ठा आणि देवयानी स्नानाला चाललेल्या दिसल्या आणि त्यांना नग्न पाहण्याकरता त्याने वायूच्या रूपाने येऊन त्यांचीं वस्त्रें उडवलीं असें वर्णन आहे.

विवाहसंस्था अधिक कडक होऊन व्यभिचाराला बंदी झाल्यावर अर्थातच वेश्यांना ऊत आला आणि वेश्यावृत्ति बंद करणें फारसें शक्य नसल्यामुळे तेव्हाच्या कायदेपंडितांनी वेश्यांकडे जाणाराला प्रायश्चित सांगितलें आहे. कांही दिवस उपोषण करून, पुरोहिताला गाय अर्पण करून, स्वतः पंचगव्य घेतल्याने, असा मनुष्य शुद्ध होतो असें दिसतें. कामविषयक गुन्ह्यांना जबर दंड, खच्ची करणें, चवाठ्यावर फटके मारणें, काळें पाणी व मृत्युदंड कांहींनी सांगितला आहे. व्यभिचाराला मृत्युदंड उत्तर हिंदुस्थानांतील बऱ्याच राज्यांत चालू होता. मनूने देखील व्यभिचारी स्त्रीला सार्वजनिक जागीं कुत्र्यांकडून खाववावें आणि पुरुषाला जिवंत जाळावें असें सांगितलें आहे, परंतु याची अंमलबजावणी बहुधा होत नसे. उच्च जातींतील स्त्रीने शूद्राशीं व्यभिचार केल्यास मात्र जबर शिक्षा होई. परंतु उच्च वर्गांत आपापसांत व्यभिचार झाल्यास स्त्रीचे केस कापून तिला नीच समजण्यापलीकडे कांही होत नसे आणि पुरुषाला दंड होत असे. वैश्याने वरच्या वर्गांतील स्त्रीशीं संबंध केल्यास त्याची सर्व मालमत्ता जप्त होत असे आणि क्षत्रियाने ब्राह्मण स्त्रीशीं संबंध केल्यास त्याला दंड होऊन त्याची मूत्राने हजामत होत असे, वगैरे प्रकार कांही संहितांत सांगितलेले आहेत.

मनुसंहितेंत परंपरा राखण्याकरता जरी व्यभिचाराला मृत्युदंड सांगितला आहे तरी बलात्कारामुळे स्त्री पतित होते असें सांगितलेलें नाही. ऋतुस्रावाने स्त्रीचीं पापें धुवून जाऊन ती आपोआप पवित्र होते, तेव्हा पुढील ऋतुस्रावापर्यंत तिला दूर ठेवावी आणि जरी बलात्कारामुळे गर्भधारणा झाली तरी बाळंतपणानंतरच्या

पहिल्या ऋतुस्रावाने ती पूर्वीप्रमाणे शुद्ध होते असें सांगितलें आहे. या मनूच्या सांगण्याला सनातनी लोक जर मान देतील तर वेश्यांची संख्या थोडी तरी कमी होईल आणि स्वतःची कांही चूक नसतां अशा स्त्रियांना विनाकारण शिक्षाही होणार नाही.

ब्राह्मणांनी जरी स्वतःचा दर्जा सांभाळणारे फायदेशीर कायदे केले तरी सत्ताधारी राजे क्षत्रियच असल्यामुळे ते या कायद्यांना फारशी दाद देत नसत. यामुळे सामान्यतः जरी प्रतिलोम विवाह मान्य नव्हते तरी राजांना मात्र ब्राह्मण बायका असत. ब्राह्मणाची शूद्र बायको असल्यास तिला पत्नीचा मान मिळत नसे. **द्विजस्य भार्या शूद्रा तु भवेत् कचित् । रत्यर्थमेव सा तस्य रागान्धस्य प्रकीर्तिता ॥** विष्णुसंहिता.

वेश्यावृत्ति बंद करणें अशक्य असलें तरी ती नीच समजली जावी याची शक्य तितकी व्यवस्था त्या वेळच्या नियमकारांनी केली. वेश्यागमन पशुसमागमाचे ओळीला नेऊन बसवलें. गणिकेच्या हातचें अन्न कोणीं खाऊं नये, खाल्ल्यास सात दिवस दुधावर रहावें अशी शिक्षा सांगितली आहे. अर्थात् वेश्यांचे मिळकतीवर उपजीविका करणारांना सर्वत्र अतिनीच समजलेलें आहे. परंतु वेश्यांना मात्र कायद्याचें संरक्षण आहे. एखाद्या रखेलीच्या किंवा मोलकरणीच्या कोणी वाटेस गेल्यास त्याला याज्ञवल्क्यस्मृतींत ५० पण दंड सांगितला आहे. त्यांतच सांगितलें आहे की एकाद्या वेश्येने एखाद्या मनुष्याशीं करार करून त्याजकडून पैसे घेऊन नंतर नकार दिला तर तिने त्याचे पैसे परत देऊन शिवाय आणखी तितकेच पैसे नुकसानभरपाई म्हणून द्यावे. किंवा पैसे न घेतां नुसताच करार केला असल्यास फक्त नुकसान मात्र द्यावें. अर्थात् पुरुषानें प्रथम पैसे देऊन मग समागम न केल्यास त्याला पैसे परत मिळूं नये. अनैसर्गिक समागमास दंड सांगितला आहे.

पुराणांत अप्सरांचीं वर्णनें आलीं आहेत. गोपी व श्रीकृष्ण यांमधील संबंधाला आध्यात्मिक स्वरूप देण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी तो फोल आहे, कारण पुराणांतील वर्णनांवरून तसें दिसत नाहीं. **ता वार्यमाणाः पितृभिः पतिभिर्भ्रातृभिस्तथा । कृष्णं गोपांगना रात्रौ रमयंति रतिप्रियाः ॥**

( ब्रह्मपुराण ). श्री. सिंह आणि वसू यांनी ' हिस्टरी ऑफ् प्रॉस्टिट्यूशन् इन् इंडिया ' यांत असेंच मत दिलें आहे. नरकासुराला मारल्यानंतर त्याच्या १६००० बायका कृष्णाने हस्तगत केल्या. कृष्णाचा सांब नांवाचा एक मुलगा होता, त्यावर या सर्वांचें मन गेल्यामुळे कृष्णाने त्यांना शाप दिला की माझ्या मरणानंतर तुम्हांला चोर पकडून नेतील आणि त्यांच्या दासी म्हणून तुम्हांला जन्मभर रहावें लगेल. त्यांना भीति वाटून त्यांनी उःशाप मागितला, तेव्हा एका ऋषीच्या उपदेशाने तुम्ही मुक्त व्हाल असें सांगितलें. अर्थात् त्याप्रमाणे सर्व होऊन ऋषीने त्यांना पुढील गोष्ट सांगितली ( मत्स्यपुराण ):—' सुरासुरांच्या युद्धानंतर अनेक स्त्रियांचे पति मारले गेल्यामुळे त्या अनाथ झालेल्या पाहून त्यांना इंद्राने उपदेश केला की तुम्ही अतःपर वेश्यावृत्तीने रहावें, ब्राह्मणांना मान द्यावा व प्रसंगीं गाई, जमीन, धनधान्य वगैरे दानही करावें. नंतर त्याने त्यांना अनंगव्रत सांगितलें, तें असें. पुष्य किंवा पुनर्वसु नक्षत्रांतील आदित्यवारीं स्त्रीने स्नान करून मदनाची पूजा करावी, नंतर एका देखण्या ब्राह्मणाला बोलावून त्याची पुष्पादिकांनी पूजा करावी, तांदूळ, तूप वगैरे दान करावें व उत्तम भोजन घालावें, आणि त्याला मदनच मानून त्याशीं रतिक्रीडा करावी. अशा रीतीने १३ महिनेपर्यंत व्रत करून नंतर त्या ब्राह्मणाला अनेक प्रकारचें दान करावें. यानंतर कोणीही ब्राह्मण तुमच्याकडे रविवारीं आल्यास त्याला फुकट भोग द्यावा, पण इतरांना देऊं नये. असें १३ महिनेपर्यंत करावें.' ऋषीने नंतर पुढे सांगितलें की त्या वेळीं इंद्राने सांगितलेलें व्रत मी तुम्हास सांगतों. याने मृत्यूनंतर माधवाची प्राप्ति होते. अर्थात् पुराणें ब्राह्मणांनीच लिहिल्यामुळे त्यांनी स्वतःला फायदेशीर असें हें व्रत त्यांत सांगितलें आहे. वेश्यावृत्तीला हा पौराणिक आधार आहे. त्यांत मदनाच्या नग्न मूर्तीची पूजा आहे. त्यांत मूर्तीच्या जननेंद्रियाला हात लावून 'कंदर्पनिधये' असें म्हणायचें असतें.

महाभारतांत क्षत्रियांचा फन्ना उडाल्यामुळे ब्राह्मणांचें सहजच वर्चस्व स्थापन झालें. तरीपण क्षत्रियहि वर्चस्वाकरता झगडत होतेच. शेवटीं एका क्षत्रियकुलांत गौतमबुद्ध जन्माला येऊन बौद्धधर्माची स्थापना झाल्याने ब्राह्मणांचे सत्तेला मोठा धक्का बसला. त्यांनीही शत्रूचें महत्व ओळखून त्याविरुद्ध शक्य तितकी खटपट केली, पण त्यांचे सर्व प्रयत्न फुकट जाऊन बुद्धधर्माची एकसारखी वाढच होत

गेली. या दोन धर्मांची लढाई कित्येक शतकेंपर्यंत चालू राहिली आणि लोकांना हिंदु धर्माकडे ओढण्याकरता पूर्वींचे कडक नियम सौम्य झालें, नवीन आकर्षक व्रतें निर्माण झालीं, ब्राह्मणांना दक्षिणा देऊन पवित्र नदींत स्नान केल्याने पाहिजे त्या भयंकर पापांचें क्षालन होऊं लागलें, आणि हें सिद्ध करणाऱ्या अनेक गोष्टी पुराणांत सांगितल्या आहेत. मनूने जरी वेश्यांच्या हातचें अन्न अपवित्र म्हटलें आहे, तरी वर सांगितलेल्या अनंगव्रतांत स्त्रीने देखण्या ब्राह्मणांना उत्तम भोजन घालून त्याशीं रतिक्रीडा करावी असें सांगितलें आहे. ब्राह्मणाने वेश्येशीं समागम केल्यास त्याने तिला जितके पैसे दिले असतील तितकाच दंड त्याला करावा असेंहि एके ठिकाणीं सांगितलें आहे !

कोणत्या पापांबद्दल नरकांत कोणती शिक्षा होते याविषयीं पुराणांचें एकमत नाही, परंतु पातिव्रत्य मोडल्यास भयंकर शिक्षा सांगितल्या आहेत. पतीशिवाय आणखी एका पुरुषाशीं जी संबंध करील ती कुलटा, दोहोंशीं केल्यास धर्षिणी, तिर्हांशीं केल्यास पुंश्चली, आणि चारांशीं केल्यास मात्र ती वेश्या होते. त्यापेक्षा अधिकांशीं केल्यास ती महावेश्या होते.

स्वर्गांतील देवांस देखील अप्सरांची गरज भासते, तेव्हा मनुष्यास वेश्यांची गरज भासल्यास नवल नाही. राजे व सरदार यांचा त्यांना नेहमीच मोठ्या प्रमाणावर आश्रय असे. रामायणमहाभारतांत वेश्यांचा उल्लेख आहे. कौरवांचा पराभव झाल्यानंतर धृतराष्ट्र शोक करीत रणांगणाकडे गेला तेव्हा शहरांतील वेश्याही त्याच्याबरोबर गेल्या असें स्त्रीपर्वांत सांगितलें आहे. प्रत्यक्ष श्रीरामचंद्राने घोडे, हत्ती व गणिका यांचा क्रीडेकरता उपयोग करीत होतास की नाही, असें भरताला विचारलें आहे.

पुराणांच्या लेखकांनी स्वतःच्या प्रवृत्ति देवांवर लादण्यास मागेपुढे पाहिलें नाही. ब्रह्मदेवाने आपल्या मुलीचा अभिलाष केला असें वर्णन आहे. कूर्मपुराणांत शिव आणि स्त्रीवेषधारी विष्णु हीं दोघें एकदा नग्न स्थितींत देवदारुवनांत गेलीं आणि तेथील ऋषींचे मुलगे विष्णूच्या आणि मुली व सुना शिवाच्या मागे लागलेलीं पाहून ऋषींनी संतापून त्या दोघांवर हल्ला केला व शिवाचें इंद्रिय कापलें. तेव्हा त्या इंद्रियाने प्रचंड रूप धारण केलें आणि ब्रह्मा व विष्णु दोघेही

त्यांत शिरले, परंतु त्यांना त्याचा अंत लागेना. तेव्हापासून शिवाच्या मूर्तीऐवजी लिंगाचीच पूजा करण्याचा त्याने हुकूम सोडला. तथापि या पूजेचा प्रसार होण्याला बराच वेळ लागला व लिंगाचें स्वरूपही न ओळखण्यासारखें बदललें.

कोणत्याहि नवीन धर्माच्या प्रचाराला समाजांतील कनिष्ठ दर्जाचे लोक नेहमी उपयोगी पडतात. ख्रिस्ती धर्माप्रमाणेच बौद्ध धर्मालाहि वेश्यांचा उप-योग करून घ्यावा लागला. नवीन धर्मांत गेल्याने कनिष्ठांस नेहमी अधिक दर्जा मिळतो, यामुळे वेश्या भराभर बौद्धधर्मांत जाऊं लागल्या. तेव्हा त्यांना परत आणण्याकरता किंवा निदान हा ओघ थांबवण्याकरता त्यांना कांही लांच देणें हिंदु धर्माला भाग होतें, आणि विवाहित स्त्रियांपेक्षा त्यांचा दर्जा फारसा कमी ठेवणें शक्य नव्हतें. वेश्या वृद्ध झाल्यावर तिला राजगृहांत सुईण, दाई, स्वयंपाकीण किंवा नोकर नेमावी असें कौटिल्याने लिहिलें आहे. गणिकेला प्रदक्षिणा घातल्याने पुण्य लागतें असें विष्णुसंहितेंत सांगितलें आहे. कोणत्याही कामाला निघतांना वेश्या भेटल्यास तो शुभशकुन आहे असें मत्स्यपुराणांत सांगितलें आहे. मंगलसूत्र वेश्येने ओंवल्यास सौभाग्य कायम टिकतें, आणि कांही ठिकाणीं दुर्गेची प्रतिमा करण्याकरता वेश्येच्या उंबरठ्यांतली माती आणावी लागते.

बुद्धाच्या व भिक्षूंच्या प्रयत्नाने कित्येक प्रसिद्ध गणिका आपल्या परिवारा-सह बौद्धधर्मास मिळाल्या आणि याचा लोकांवर नेहमी परिणाम होतो. तरी देखील बौद्ध जातक ग्रंथांत वेश्यांची अतिशय निंदा केलेली आहे इतकेंच नव्हे, तर एकंदर स्त्रियांचीही निंदा केलेली आहे. त्यांचे आवडत्या पुरुषाला काम-वासना दर्शविण्याचे ४० मार्ग जातकांत वर्णिले आहेत. असंतुष्ट पत्नी किंवा व्यभिचारिणी ओळखण्याच्या २५ खुणा त्यांत दिल्या आहेत आणि स्त्रियांच्या बदफैलीपणाच्या अनेक गोष्टी आहेत. त्या वेळीं व्यभिचार इतका बोकाळला होता की सभ्य मनुष्याने पुढील पांच प्रकारच्या स्त्रियांपासून दूर रहावें असा उपदेश दिलेला आहे. १. फार हुशार, २. सुंदर, ३. शेजा-ऱ्याची बायको, ४. अनेकांना आवडणारी, ५. श्रीमंत पति धुंडणारी. स्त्रिया सार्वजनिक किंवा खाजगी बागांत, नदीकिनाऱ्यावर, किंवा नातेवाइकांकडे

गेल्यास तें वाईट समजत. परक्याच्या घरीं जाणें, स्तनांचा आकार दिसेल असे कपडे घालणें, दारू पिणें, पुरुषांकडे टक लावून पहाणें, आणि दरवाजांत किंवा खिडकींत उभें रहाणें, हीं मोठीं पापें आहेत. असंतुष्ट पत्नीला दहा मुलें असलीं तरीदेखील तिजवर विश्वास ठेवूं नये. इतकेंच नव्हे तर संधि मिळाल्यास व कोणाला कळणार नाही अशी खात्री असल्यास कोणतीही स्त्री व्यभिचार करील. अशी म्हणच आहे की समुद्र, राजे, ब्राह्मण, व स्त्रिया, यांची कशानेही तृप्ति होत नाही.

स्त्रियांना आपल्या गोटांत घेण्याचा प्रथम बुद्धाचा विचार नव्हता, पण त्याच्याच कुटुंबांतील स्त्रियांच्या आग्रहामुळे त्याला आपला विचार बदलावा लागला आणि त्याने भिक्षुणींकरता कांही नियम करून भिक्षुणीसंघ निर्माण केले. कोणतीही स्त्री एकदा भिक्षुणी झाली म्हणजे तिला सामान्य कायदे लागू नसत, यामुळे कायद्याच्या तावडींतून सुटण्यास हा एक उत्तम मार्ग होता. एकदा एक स्त्री प्रत्यक्ष व्यभिचार करतांना नवऱ्याला दिसल्यामुळे तो तिचा खून करण्याकरता तिच्या अंगावर धांवला, पण ती तेथून निसटून पळून जाऊन तावडतोब भिक्षुणी झाली. नवरा तिच्या मागोमाग तेथे आला, पण ती भिक्षुणी झाल्यामुळे त्याला कांही करतां येईना. त्याने कोसलाधिपतीकडे जाऊन तक्रार केली, पण भिक्षुणीला शिक्षा करण्याचा अधिकार राजालाही नाही, असें म्हणून त्याने त्याला घालवून दिला. यामुळे पुष्कळ दुराचारी स्त्रियांची भिक्षुणी-संघांत गर्दी झाली. बुद्धाने प्रथम भिक्षुणीसंघ स्थापन करतांना जे नियम केले होते, त्यांचे मुख्य उद्देश म्हणजे संघांत अनीति पसरूं नये व भिक्षुणी भिक्षूं-पेक्षा कधीही वरचढ होऊं नयेत, हे होते. याकरतां १०० वर्षांच्या भिक्षुणीने देखील तरुण भिक्षूस श्रेष्ठ समजून मान दिला पाहिजे असा नियम होता. आता भिक्षूंची व भिक्षुणींची कांही विशिष्ट प्रसंगांशिवाय गांठ पडूं नये अशी त्याने व्यवस्था केली. प्रत्येक भिक्षुणीने विशिष्ट वेळीं एखाद्या भिक्षूजवळ आपल्या कायिक, वाचिक व मानसिक पापांचा पाढा वाचला पाहिजे असा नियम केला. कोणाही भिक्षूने कोणत्याही भिक्षुणीकडे ( त्यांचें कांही नातें नसल्यास ) आपली छाटी धुण्यास देतां नये, तिला सूर्यास्तानंतर उपदेश करतां नये, ती

आजारी नसल्यास तिच्या खोलींत जातां नये, व तिजबरोबर प्रवास करतां नये, असे नियम केले. भिक्षुणीने कोणाही पुरुषाजवळ बंद खोलींत, किंवा अंधारांत, किंवा उघड्या जागेंत, चांदण्यांत बसतां किंवा बोलतां नये, तिने कोणाही पुरुषाबरोबर रस्त्याने जातां नये व कोणाही गृहस्थाशीं किंवा त्याच्या वयांत आलेल्या मुलाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवतां नये, कामुक मनाने कोणाही पुरुषाला स्पर्श करतां नये, दागिने घालतां नये, गायन, वादन, नृत्य करतां नये, एकटी किंवा इतर भिक्षुणींसह नग्न स्नान करतां नये, मऊ बिछान्यावर निजतां नये, दोन भिक्षुणींनी एका बिछान्यावर निजतां नये व अंगावर एक पांघरूण घेतां नये.

इतके कडक नियम करूनहि त्यांचा उपयोग झाला नाही आणि भिक्षुभिक्षुणींची 'नीति' बिघडत चालली. जनानखान्यांत ऐषआरामांत वाढलेल्या स्त्रिया भिक्षुणी झाल्यावरोबर त्यांच्या पूर्वीच्या संवयी सुटणार कशा ? त्यांनी आपल्या सर्व बऱ्यावाईट, नैसर्गिक व अनैसर्गिक सुखाच्या संवयी बरोबर आणल्या आणि भिक्षुणींना लवकरच त्यांत तरबेज केलें. एकदा एक भिक्षुणी वनांत एकटी रहात असल्यामुळे तिच्यावर लुब्ध असलेला तिच्याच नात्याचा एक तरुण तिच्या बिछान्याखाली लपून बसला व ती बाहेरून येऊन निजल्यावर त्याने तिच्यावर हल्ला केला. तिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण तिचे कांही चाललें नाही. तिने ही हकीकत बुद्धाला सांगिल्यावर त्याने भिक्षुणींना वनांत एकटें राहण्याची मनाई केली आणि स्वसंरक्षणाकरिता त्यांनी जवळ शस्त्रें बाळगावीं असा नियम केला.

एकदा एक भिक्षु भीक मागण्याकरता एका स्त्रीकडे गेला असतां तिजजवळ देण्याजोगें स्वतःच्या शरीराशिवाय कांहीच नव्हतें, तेव्हां तिने तेंच देऊं केलें. कधीकधी कामुक स्त्रिया भिक्षूंना मुद्दाम याच उद्देशाने बोलावीत असत आणि भिक्षूंनी बौद्धेतर स्त्रियांशी वागण्यासंबंधी नियम नसल्यामुळे तेही याचा फायदा घेत. अर्थात् सर्वच भिक्षु असे नसत. एकदा वासवदत्ता नामक वेश्येचें उपगुप्त नामक बुद्धशिष्यावर प्रेम बसलें व तिने त्याला बोलावणें पाटविलें. त्याने उत्तर पाटविलें की ' उपगुप्ताने वासवदत्तेला भेटण्याची वेळ अजून आली नाही. ' तिला याचा अर्थ न कळून, त्याने कदाचित् गरीबीमुळे आपलें प्रेम नाकारलें असेल

म्हणून पुनः निरोप पाठवला की वासवदत्तेजवळ सोनें, मोतीं वगैरे पुष्कळ आहेत, तिला फक्त प्रेम पाहिजे आहे.' त्याने पुनः उत्तर पाठवलें, 'अजून वेळ आली नाही.' पुढे एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या पैशाच्या लोभाने तिने आपल्या पूर्वीच्या आशकाचा खून करवला आणि याबद्दल तिचे हात, पाय, नाक, कान, कापून तिला स्मशानांत फेकून दिली. या वेळीं उपगुप्ताने तिला निरोप पाठवला की 'आता वेळ आली आहे.' नंतर त्याने तिला उपदेश केला व ती बुद्धावर विश्वास ठेवून मेली.

तथापि बुद्धाच्या मरणापूर्वीं देखील भिक्षुभिक्षुणींची नीति बरीच ढिली होऊन स्वैराचार बराच फैलावला होता आणि स्त्रियांना भिक्षुणी होण्याची परवानगी दिल्याबद्दल खुद्द बुद्धाला शेवटीं पश्चात्ताप झाला होता असें दिसतें.

खिस्ती शकापूर्वी सुमारें पांचव्या शतकांत पाटलिपुत्र नांवाचें शहर भरभराटीस आलें होतें आणि अर्थातच तेथे वेश्यांचीही भरभराटच होती. याच सुमाराला वेश्यांसंबंधी अनेक ग्रंथ झाले आणि वात्स्यायनाने आपल्या 'कामसूत्रां'त या सर्वांचें सार दिलें आहे. मौर्य घराण्याच्या वेळीं गणिकांवर कर बसवले आणि 'गणिकाध्यक्ष' नांवाचा एक अधिकारी नेमून त्याने त्यांचे दर ठरवावे आणि त्यांच्यांतल्या भांडणतंट्यांत निर्णय द्यावा अशी व्यवस्था झाली. नटनर्तकांप्रमाणेच गणिकांनीही महिन्यांतून दोन दिवसांची मिळकत कर म्हणून द्यावी असा कायदा मौर्यांच्या राज्यांत असे. चंद्रगुप्ताच्या वेळेपासून राजवाड्यांत अनेक कामें गणिकांकडे सोंपविण्यांत आलीं. कौटिलीय अर्थशास्त्रांत गणिकाध्यक्षाच्या कामाचें सविस्तर वर्णन आहे आणि राजवाड्यांतील गणिकांची व्यवस्थाही त्याच्याकडेच असे. अशा प्रकारची व्यवस्था कमीअधिक प्रमाणांत खिस्ती शकाच्या सातव्या शतकापर्यंत चालू राहिली.

वात्स्यायनाच्या कालासंबंधी बराच मतभेद आहे, परंतु तोही मौर्यांच्याच कालांत असावा. वेश्यांसंबंधी त्याच्या कामसूत्रांत माहिती सांपडते. सामान्य स्त्रियांना गणिकांच्या इतकें शिक्षण बहुधा मिळत नसे. यामुळेच 'मला गणिकेसारखी शिकलेली सून पाहिजे' असे शब्द एका लेखकाने एका राजाच्या तोंडीं घातले आहेत. या शिक्षणाकरता त्यांना बराच काल व पैसा खर्च करावा लागत असे, परंतु इतकें केल्यावर आणि अर्थात् थोड्याबहुत सौंदर्याची जोड

असल्यास त्यांना राजदरबारांतही मान मिळे. कोणत्याही उत्सवप्रसंगीं गणिकांना बोलावण्याची बऱ्या लोकांची पद्धतच होती. उद्यानयात्रा गणिकांशिवाय होतच नसत. शिवाय गणिकांचे संघ असत आणि त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास संघाचे द्वारें तक्रार करतां येत असे. एक सार्वजनिक निधि करून त्यांतून गरीब वेश्यांना मदतही करण्याची त्यांची रीत असे. वेश्या व गणिका नेहमी धार्मिक असत आणि त्यांचा बराच पैसा दान करण्यांत, देवळें, विहिरी, पूल वगैरे बांधण्यांत खर्च होत असे.

सैन्याच्या मध्यभागीं वेश्यांचें स्थान असे. वेश्या बरोबर असल्यास सैनिक अधिक चांगले लढतात असें ' कामंदकीय नीतिसारांत ' सांगितलें आहे. हल्लींच्या सैन्यांकरताही वेश्यांची व्यवस्था करावी लागते. गेल्या युद्धांत ' जॉर्ज क्लेमांसो ' हे फ्रान्सचे युद्धमंत्री होते. त्यांच्या हातचें सैन्यांतील अधिकाऱ्यांस लिहिलेलें पुढील पत्र अस्तित्वांत आहे.

" हें पत्र पोंचल्यापासून दहा दिवसांचे आंत पुढील माहिती पुरवाल अशी आशा आहे:—१. तुमच्या ताब्यांतील सैन्यांतील किती सैनिक कोणत्या ठिकाणीं राहतील ? २. त्या त्या ठिकाणीं हल्ली वेश्यागृहें किती आहेत ? शिवाय त्या त्या ठिकाणच्या स्थानिक अधिकाऱ्यांचें मत घेऊन पुढील माहितीही पुरवावी. १. जरूर पडल्यास आणखी वेश्यागृहें उघडतां येतील अशा जागा प्रत्येक ठिकाणीं किती आहेत ? अशा जागा नसल्यास वेश्यांकरतां तात्पुरत्या बराकी बांधण्याची व्यवस्था आतांपासूनच केली पाहिजे. २. या नवीन वेश्यागृहांची व्यवस्था कोणाच्या ताब्यांत देतां येईल तेंही पहावें." नीतीच्या कितीही गप्पा मारल्या तरी व्यावहारिक लोकांना या गोष्टी कराव्या लागतात. सैन्याच्या अन्नाची जशी व्यवस्था करावी लागते, तशीच ही दुसरी शारीरिक गरज ओळखून तिचीही करावी लागते. कारण सैनिक स्वतःचें भांडण भांडत नसतात, तेव्हा त्यांनी शरीराच्या गरजा विसरण्याचा संभव नसतो. मुत्सद्यांच्या लढाया लढायच्या, म्हणजे मुत्सद्यांनी सर्व प्रकारची व्यवस्था करणें रास्तच आहे.

पुढील हुकूम सेनापति ब्रिस्सो-देमाय्ये यांच्या सहीचा आहे. " सर्व वेश्यागृहें एकाच तुकडीच्या लोकांनी व्यापून टाकल्यामुळे व तेथून लवकर बाहेर

न पडल्यामुळें आमची गैरसोय होते, अशा अर्थाचीं पुष्कळ निनांवी पत्रें आमचे-कडे आलीं आहेत. म्युनिसिपालिटी व वरिष्ठ अधिकारी अधिक वेश्या मिळवण्याची शक्य तितकी खटपट करीत आहेत, परंतु त्या मिळेपर्यंत वरील तुकडीच्या लोकांनी आपलें काम शक्य तितकें लवकर आटपून इतरांस जागा दिली पाहिजे, असा त्यांना उपदेश करावा.'' सैन्याकरता आणलेल्या वेश्यांपैकी ८०० वेश्या शत्रूकडून मारल्या गेल्या व कांही फाजील कामामुळे मेल्या. आरोग्यविषयक अहवालांवरून दिसतें की कांही वेश्यांना दिवसांतून १०० पासून १३० लोकांच्या उपयोगी पडावें लागत असे आणि कांहींनी महिन्यांत २० पासून सत्तावीस हजार फ्रँक् मिळवले. अशा तऱ्हेने मरण्याची भीति असून देखील अधिकाऱ्यांना धंदेवाईक वेश्या पुरेशा मिळाल्या इतकेंच नाही तर कांही स्त्रिया तात्पुरत्या वेश्या बनून आल्या.

वात्स्यायनाने आपल्या पुस्तकांत 'वैशिक' नांवाचें एक प्रकरण घातलें आहे आणि वेश्यांचीं कर्तव्यें आणि धंदा चांगला चालण्यास काय करावें यासंबंधी उपदेश दिला आहे. पैसा कोणाकडून मिळेल, प्रेम कोणाकडून, प्रसिद्धि कोणाकडून, प्रेम कसें करावें, पैसे कसे उकळावे, वगैरे गोष्टींचा सविस्तर विचार त्याने केला आहे. वेश्यावृत्तीचा धंद्याच्या दृष्टीने विचार करून शक्य तितका पैसा कसा मिळवावा, धोका कशांत आहे, संकटें कशीं टाळावीं, वगैरे सांगोपांग विचार केलेला इतरत्र सांपडणें कठिण.

---

# २

# यूरोप

—:०:—

कालानुक्रमाने वेश्यावृत्तीच्या तीन पायऱ्या संशोधकांनी एकमताने नमूद केलेल्या आहेत. १. अतिथिसत्काराकरता घरांतील एखाद्या दासीने किंवा कित्येक ठिकाणीं स्वतः गृहिणीने देखील अतिथीची तात्पुरती स्त्री बनणें; २. देवदासीं-सारख्या धार्मिक वेश्या; आणि ३. केवळ पोटाकरता धंदा करणाऱ्या वेश्या.

पहिल्या प्रकाराला वेश्यावृत्ति म्हणतां येईल कीं नाही याची शंकाच आहे, कारण वेश्यावृत्तीच्या व्याख्येबद्दल कितीहि मतभेद असला तरी समागमाबद्दल मोबदला घेण्याची कल्पना त्यांत असली पाहिजे याबद्दल एकमत आहे. केवळ विवाहबाह्य समागमालाच वेश्यावृत्ति म्हणायचें असेल तरच पहिला प्रकार त्यांत येऊं शकेल. दुसरा प्रकार हाच वेश्यावृत्तीचा खरा प्रारंभ आहे, परंतु त्याला धार्मिक स्वरूप असल्यामुळे त्यासंबंधी कायदे करण्याची कल्पनाही प्रथम कोणाला येणें शक्य नव्हतें. अलीकडे ही कल्पना आली आहे, यावरून धर्माचें प्राबल्य किती कमी झालें आहे हें दिसतें.

प्राचीन कालीं धार्मिक वेश्यावृत्तीचा फैलाव अनेक देशांत झालेला होता. यहुदी लोकांचा धर्मप्रणेता **मोझेस्** हा जेव्हा आपल्या अनुयायांना घेऊन ईजि-प्तमधून पळून गेला, तेव्हा त्यांच्यांतही याचा बराच प्रसार असावा असें दिसतें, कारण यानंतर त्याने असा कायदा केला की यहुदी स्त्रीने वेश्यावृत्ति करतां नये. परंतु इतर स्त्रियांशी पुरुषांनी संबंध ठेवूं नये असें त्याने सांगितलें नव्हतें. या कायद्यानंतरही त्यांच्यांत संसर्गजन्य रोगांचा प्रसार इतका झाला की एकदा अशा सर्व रोग्यांना त्याने आपल्या छावणींतून हांकून दिलें आणि एकदां २३००० पुरुष व ३२००० स्त्री कैद्यांची कत्तल केली. यानंतर यहुदी लोकांत सर्व मुलांची सुंता करण्यासंबंधी कायदा झाला.

प्राचीन **ग्रीस** देशांतील वेश्यावृत्तीचा विचार केल्यास एक प्रथमदर्शनीं विलक्षण वाटणारी गोष्ट लक्षांत येते ती ही की ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांतील जगप्रसिद्ध विचारवान **सोलन्** याने आथेन्स येथे सरकारतर्फे वेश्यावृत्तीची स्थापना केली. ज्याच्या इतर संस्थांची सर्वत्र स्तुति होते, त्याने असें कां केलें हें विचारणीय आहे. आशिया व इजिप्तमधून ग्रीक लोकांनी लिंगपूजा घेतली होती. याकरता **प्रिएपस्** नांवाचा एक विशिष्ट देव कल्पून त्याची ते पूजा करीत, व त्याच्या मूर्तीचा विशेष म्हणजे अजस्र जननेंद्रिय असे. कुमारींचा कौमार्यभंग या मूर्तीकडून झाला तरच त्या देवाची कृपा होते, अशा समजुतीमुळे तशी चाल पडली. परंतु नंतर हें काम मूर्तीऐवजी तेथील पुजारी करूं लागले. यांतूनच धार्मिक वेश्यावृत्ति उगम पावली. देवाला वाहिलेल्या कांही कुमारींनी वेश्यावृत्तीचें उत्पन्न देवास द्यावें अशी चाल पडली, परंतु पुढे हें उत्पन्न देव आणि त्यांचें कुटुंब यांमधे विभागलें जात असे. यानंतर वेश्यावृत्तीचें धार्मिक स्वरूप बदललें आणि व्यभिचार व अनैसर्गिक समागम यांचाहि ग्रीस देशांत फैलाव झाला. अशा स्थितींत कुलीन कुमारिकांचें आणि विवाहित स्त्रियांचें शील कायम रहावें आणि अनैसर्गिक समागमाला आळा बसावा, या हेतूनेच सोलनने सरकारी रीतीनें वेश्यावृत्ति सुरू केली. याकरता त्याने सरकारी खर्चाने आशियांतील कांही स्त्रिया गुलाम म्हणून विकत घेतल्या आणि शहरांत बंदराच्या बाजूला कांही घरांत त्यांना ठेवल्या आणि त्यांनी गिऱ्हाइकांकडून किती पैसे घ्यावे हें ठरवून त्यांची व्यवस्था पाहण्याकरता अधिकारी नेमले. अशी सोय करून कुलीन स्त्रियांची अब्रू सुरक्षित राखल्याबद्दल एका ग्रीक कवीने सोलनची स्तुति केली आहे. पण सोलन इतकेंच करून थांबला नाही. त्याने व्यभिचारी स्त्रियांस मृत्यूची शिक्षा ठेवली आणि बदफैली पुरुषांना कोणताहि उच्च हुद्दा मिळू नये असें ठरवलें. सोलनच्या पूर्वी ख्रिस्तपूर्व नवव्या शतकांत **लायकर्गस्** नांवाचा जो प्रसिद्ध कायदेकार होऊन गेला, त्याचें मुख्य लक्ष शरीरसंपत्तीकडे असल्यामुळे त्याने व्यभिचार वगैरेकडे लक्ष दिलें नाही आणि याचा परिणाम असा झाला की **स्पार्टा** येथील पुरुष आपल्या स्त्रियांना उत्तम मुलें व्हावीं म्हणून सुदृढ तरुणांना घरीं आणून त्यांचेकडून प्रजोत्पत्ति करून घेत असत. सोलनच्या वेळीं

हा प्रकार बिलकुल चालला नसता आणि इतर स्त्रियांचें शील रक्षण करण्याकरतांच त्याला वेश्या आणून ठेवणें भाग पडलें. शिवाय खासगी वेश्यागृहांसहि परवानगी होतीच आणि इतर धंद्यांप्रमाणेच वेश्यांचे धंद्यावरहि कर असे. हल्लीं ज्याप्रमाणे दारूच्या गुत्त्यांचें जाहीर लिलांव होतें, तसें त्या वेळीं वेश्यागृहांचें होत असे. याशिवाय स्वतंत्र वेश्याहि असत, परंतु वेश्यागृहांप्रमाणेच त्यांनाही जागा नेमून दिलेल्या असत आणि त्यांना विशिष्ट प्रकारचा पोशाख करावा लागे, यामुळे त्यांना सहज ओळखतां येत असे. त्यांचेवर सक्त पहारा असे आणि सूर्यास्तापूर्वी शहराचे मध्यवस्तींत जाण्याची त्यांना परवानगी नसे. सोलनच्या मरणानंतर हे सर्व कायदे सैल पडले आणि पूर्वीप्रमाणेच अनीतीचा प्रसार पुनः झाला.

**रोमन** लोकांत ऐतिहासिक कालापूर्वीपासूनच वेश्या होत्या आणि रोमचा पहिला राजा **रॉम्युलस्** आणि त्याचा भाऊ **रेमस्** यांना ज्या दाईने दूध पाजून वाढवलें ती वेश्याच होती. यांना एका लांडगीने दूध पाजलें अशी दंतकथा इतिहासाच्या पुस्तकांत व कांही कोशांत (उदाहरणार्थ **रूटलेज्चा** नवीन ज्ञानकोश) देखील सांपडते, ती केवळ त्या वेळीं तेथील वेश्यांना 'लांडग्या' असें टोपणनांव असल्यामुळेच उत्पन्न झालेली आहे. लष्करा-बरोबर नेहमी वेश्या असत आणि **सिपिओ ॲफ्रिकॅनस्** नांवाच्या सेनापतीला ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत आपल्या सैन्याला शिस्त लावण्याकरता छावणींतून २००० वेश्यांना हांकून द्याव्या लागल्या. याशिवाय पानगृहें, स्नानगृहें, वगैरे इतर ठिकाणींहि नोकरिणी हा धंदा करीत असत. यानंतर त्यांचेसंबंधी कायदे केले. वेश्यांना नांवें नोंदावीं लागत. न नोंदल्यास त्यांना हाकून देत आणि वेश्यांचे धंद्यावर जगणाऱ्या सर्व लोकांचे कायदेशीर हक्क काढून घेतले होते. इत-केंहि करून वेश्यावृत्तीला आळा बसला नाही. संभोगस्वातंत्र्य मिळवण्याकरतां कांही उच्च कुटुंबांतील स्त्रियांनी नांवें नोंदवून वेश्यावृत्तीची परवानगी मिळवली, असें **टॅसिटस्** सारखे इतिहासकार सांगतात. यामुळे, उच्च कुटुंबांतील स्त्रियांस नांवें नोंदवतां येणार नाहीत असा कायदा केला, आणि तरी एका बाईने हा कायदा मोडल्यामुळे तिला हद्दपार केली. नंतर वेश्यांनी वेश्यागृहांचे बाहेर पडूं नये असा कायदा केला. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत वेश्यांना शहराच्या

कांही भागांतच परवानगी होती हें खरें, पण वाटेल त्याला वेश्यागृह उघडण्याची परवानगी मिळत असे आणि रोम शहरांत अशीं ४५ वेश्यागृहें होतीं. खिस्तपूर्व पहिल्या शतकांत रोमच्या बादशहांनी 'सीझर' ही पदवी धारण केली. या सर्वांनी वेश्यांविरुद्ध अत्यंत कडक कायदे केले, परंतु हे स्वतः अत्यंत बदफैली होते. **टायबीरियस सीझर्** याला बड्या लोकांचे घरीं मेजवान्या होत, तेथे नग्न नोकरिणी असत. **कॅलिग्यूला** याचा स्वतःच्या सर्व बहिणींशी संबंध होता, तो स्वतःची स्त्री आपल्या मित्रांस नग्नावस्थेंत दाखवीत असे आणि उच्च दर्जाच्या स्त्रियांची त्यांच्या नवऱ्यांसमोर अब्रू घेण्यांत त्याला मौज वाटत असे. वेश्यांवर आणि वेश्यावृत्तीवर जगणाऱ्या सर्वांवर त्याने प्रथम रोजच्या प्राप्तीच्या एक अष्टमांशाइतका कर ठेवला आणि स्वतःच्या राजवाड्यांत एक वेश्यागृह उघडलें. गिऱ्हाईक गांठण्याकरता त्याचे गुलाम रस्त्यांत हिंडत असत आणि एखाद्याजवळ पैसे नसल्यास त्यांना ते जबर व्याजाने उसने देत असत. **डॉमिशियन्** याने वेश्यांना पालखींतून जाण्याची बंदी केली, कारण त्या उद्दीपक हावभावांनी लोकांस भुलवण्याचा प्रयत्न करीत व इतर प्रकारही पालखींत होत. त्याने त्यांचा वारसाहक्कहि बंद केला. पण तो स्वतः मात्र अत्यंत नीच प्रतीच्या वेश्यांसह स्नानास जात असे. **नीरो, कॉमॉडस्** व **हेलिओगॅबॅलस्** हे सर्व याच प्रकारचे बादशहा झाले. नंतर **अलेक्झांडरनें** मात्र ही स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला, पण अनैसर्गिक वेश्यावृत्तीला आळा घालण्याचें काम त्यालाहि करतां आलें नाही. तें नंतर खिस्ती शकाच्या तिसऱ्या शतकांत **कॉन्स्टंटाइनने** केलें. यानेहि वेश्यावृत्ति अजीबात बंद करण्याचा प्रयत्न न करतां ती मर्यादित केली. या वेळीं स्त्रियांस गुलाम म्हणून विकीत असत, पण खिस्ती स्त्रियांस इतरधर्मीयांस विकूं नये असा कायदा याने केला.

**थिओडिसिअस्** याने वेश्यावृत्तीकरता स्त्रिया पुरवणारांस कडक शिक्षा फरमावली, आणि यानंतर रोमच्या राज्याचे जे दोन तुकडे झाले त्यांपैकी पूर्वेच्या राज्याचा बादशहा **जस्टिनिअन्** याने एक नवीन कायदा केला. त्याचीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांवरून वेश्यावृत्तीवर हल्ली जे आक्षेप घेतले जातात तेच त्या वेळीहि होते हें पाहून आश्चर्य वाटतें. तो म्हणतो की 'कांही लोभी लोक

राज्याच्या निरनिराळ्या प्रदेशांत हिंडून लहान मुलींस लालुच दाखवून फूस लावून **कॉन्स्टान्टिनोपल्** शहरीं आणतात, त्यांच्याशी केलेल्या कराराच्या जोरावर पाहिजे तितके दिवस त्यांना आपल्या घरीं ठेवतात, त्यांना धड अन्नवस्त्रहि पुरेसें न देतां वेश्यावृत्तीवर पैसे मिळवायला लावून तेहि लुबाडून घेतात, आणि करारानें त्यांना अशा रीतीने बांधून घेतात की त्यांची दया येऊन त्यांच्याशी विवाह करण्यास कोणी तयार झाल्यास तें अशक्य होतें किंवा निदान त्याकरता अतोनात पैसा ओतावा लागतो. दहा वर्षांचे आंतील मुलींनाही या धंद्यांत घालतात आणि हें सर्व वेश्यावृत्तीकरता नेमलेल्या शहराच्या सीमेच्या भागांतच नव्हे तर प्रत्यक्ष राजवाड्याजवळ व देवळांजवळहि चालतें.' ही कारणें दाखवून त्याने पुढील कायदा केला. 'कोणींही वेश्यांस थारा देतां नये. कोणत्याहि रीतीने मुलींस किंवा स्त्रियांस फूस लावून वेश्यावृत्ति करण्यास उद्युक्त करतां नये. जे लोक हा धंदा पूर्वी करीत होते त्या सर्वांना कायमचें हद्दपार केलें आहे. अशा लोकांशी वेश्यांनी केलेले करार रद्द समजावे. ज्या वेश्या अशा रीतीने स्वतंत्र होतील त्यांना त्यांची मिळकत परत द्यावी. मध्यस्थी करणारे लोक शहरांत किंवा आसपास कोठे सांपडल्यास त्यांना मृत्यूची शिक्षा होईल. वेश्यावृत्तीकरता घरें भाड्याने देणारांस दंड होईल किंवा घरें जप्त होतील.' **जस्टिनिअन्च्या** राणीची शीलाबद्दल प्रसिद्धि नव्हती, तरीपण तिने या कायद्यामुळे बेकार झालेल्या वेश्यांकरता एक आश्रम काढला, आणि त्यांत ५०० वेश्यांना कोंडून ठेवून त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोयी करून देण्याकरता सढळ हातानें खर्च केला. इतकें केल्यावरहि हा तुरुंगवास असह्य होऊन त्यांतील बहुतेकांनी रात्रीचे वेळीं समुद्रांत उड्या टाकून जीव दिला.

वेश्यावृत्तीला मर्यादित करण्याची **सोलनची** पद्धत आणि ती अजीबात बंद करण्याची **जस्टिनिअन्ची** इच्छा, याच दोन प्रवृत्ति आजहि दिसतात आणि या दोन मतांच्या लोकांत आजहि वाद सुरू आहे. त्याचा विचार योग्य ठिकाणीं होईल, परंतु गर्मीसारख्या सांसर्गिक रोगांचा प्रश्न रोमन लोकांच्या वेळीं नव्हता असें दिसतें, तो हल्लीं मात्र या वादांतला महत्त्वाचा मुद्दा झाला आहे.

यानंतर **गॉथ** लोकांनी रोमन लोकांचा पराभव केला आणि त्यांचा राजा **ॲलॅरिक्** याने वेश्यांसंबंधी नवीन कायदा केला की ' कोणत्याहि स्वतंत्र स्त्रीवर वेश्यावृत्तीचा आरोप सिद्ध झाल्यास तिला तीनशें फटके मारून हद्दपार करावी. ती परत येऊन तेंच करूं लागल्यास पुनः ३०० फटके मारून तिला एखाद्या गरिबाकडे नोकरी करण्यास लावून कोणाच्या नजरेस पडण्याची बंदी करावी. गुलाम स्त्रियांनी वेश्यावृत्ति केल्यास त्यांनाहि ३०० फटके मारून हद्दपार करावें व त्यांना परत न येऊं देण्याचा हुकूम मालकांस द्यावा, नपेक्षा मालकांस ५० फटके मारून गुलाम गरिबांस देऊन टाकावे. मालकाच्या फायद्याकरता गुलामांनी वेश्यावृत्ति केल्यास मालकांनाही त्यांच्याइतकेच फटके मारावे. एखाद्या जज्जाने कायद्याची अंमलबजावणी बरोबर न केल्यास त्यालाहि फटके मारावे आणि दंड करावा. ' वेश्यांना मरणानंतर धर्मसंस्कार मिळूं नये असें धर्मगुरूंनी ठरवलें. परंतु खुद्द राजे व धर्मगुरु यांनीच या कायद्यांविरुद्ध वर्तन केल्यामुळे त्यांचा बिलकुल परिणाम झाला नाही.

नंतर आठव्या शतकांतील प्रसिद्ध फ्रेंच राजा **शार्लमॅन्य्** याने हे कायदे जोराने अंमलांत आणण्याचे ठरवून तसा जाहिरनामा काढला. शिवाय ज्याच्या घरीं वेश्या सांपडेल त्याने स्वतः तिला खांद्यावरून फटक्यांची शिक्षा भोगण्याकरता बाजारचौकांत नेली पाहिजे असें फर्मावलें आणि त्याने तें न केल्यास त्यालाहि फटक्यांची शिक्षा फर्मावली. सामान्य लोकांवर याचा काय परिणाम झाला असेल तो असो, परंतु दरबारी लोकांची वर्तणूक सुधारली नाही, कारण या राजाचा मुलगा **लुई** गादीवर आल्यावर त्याने दरबारांतील घाण काढण्याचा प्रयत्न केला असा उल्लेख आहे. शिवाय त्याने असा कायदा केला की विशेष वाईट चालीच्या स्त्रियांना कमरेच्या वरचा भाग उघडा ठेवून आणि शिक्षा कशाबद्दल झाली तें लिहिलेली एक पाटी गळ्यांत बांधून ४० दिवसपर्यंत खेडोपाडीं हिंडायला लावावें. परंतु या कायद्याचीहि वाट इतरांप्रमाणेच झाली आणि लोकांचें वर्तन बिलकुल सुधारलें नाही. वेश्यावृत्ति वाढत गेली इतकेंच नाही तर वेश्यांनी एक संघ स्थापन केला आणि दरवर्षी एका विशिष्ट दिवशीं त्यांची एक थाटाची मिरवणूक निघूं लागली. नंतर आठव्या लुईने ' वेश्यांनी कांहीं

विशिष्ट प्रकारचीं वस्त्रें आणि विशेषतः सोन्याचा कमरपट्टा वापरतां नये' असा कायदा केला. पण याची अंमलबजावणी इतकी शिथिलतेनें झाली की 'सोन्याच्या पट्टयाने शील ठरत नसतें' अशी एक म्हण फ्रेंच भाषेंत त्यामुळे पडली. नंतर त्याचा मुलगा नववा लुई याने वेश्यांकरता एक आश्रम काढून शिवाय कडक कायदेहि केले ( १२५४ ). 'सर्व शहरांतून व खेड्यांतून वेश्यांना हांकून द्यावें, त्यांना अगोदर इषारा देऊन त्यांनी वर्तणूक न सुधारल्यास त्यांची मालमत्ता जप्त करावी आणि त्यांना कोणीं थारा देऊं नये, कोणीं दिल्यास त्यांचीं घरें जप्त करावीं.' या वेळीं फ्रान्सचे निरनिराळे प्रांत अनेक अधिकाऱ्यांच्या ताब्यांत असत, परंतु बहुतेक ठिकाणीं वेश्यांविरुद्ध कडक कायदे होते. **नारबॉन्** शहरीं मात्र वेश्यांकरता एक रस्ता राखून ठेवलेला होता. तसेंच **तूलूज्** शहरीं वेश्यांस परवानगी होती इतकेंच नव्हे तर वेश्यागृहांच्या उत्पन्नांतून शहराची डागडुजी आणि इस्पितळांचा खर्च चालत असे. हीं वेश्यागृहें म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत असत आणि दुसऱ्या कोणीं वेश्यागृह उघडल्यास त्याला जबर शिक्षा होई. अशा स्त्रीला एका लोखंडी पिंजऱ्यांत घालून तीनदा नदींत बुचकळून काढीत आणि नंतर कैदेंत ठेवीत. ही चाल सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत होती. **मार्सेल्स** येथे शहराच्या नेमलेल्या भागांतच वेश्यांनी राहिलें पाहिजे असा कायदा होता व तो मोडल्यास फटके व दंड अशी शिक्षा असे. आधुनिक पद्धतीप्रमाणे परवाना दिलेलें वेश्यागृह प्रथम मार्सेल्स् येथे १५४३ सालीं म्युनिसिपालिटीच्या परवानगीने निघालें. नवव्या लुईच्या कायद्याचा इतकाच परिणाम झाला की बऱ्याच वेश्या शहरें सोडून खेड्यांत जाऊन तेथील लोकांना बिघडवूं लागल्या, किंवा जेथे वेश्यांना परवानगी होती अशा शहरांत गेल्या. तथापि याच राजाने अखेर वेश्यांस परवानगी दिली इतकेंच नव्हे तर त्यांचे विरुद्ध केलेला कायदा त्याने त्याच वर्षी बदलला. रोमन कॅथोलिक धर्माने या राजाला 'संत' **लुई** म्हटलेलें आहे, तेव्हा अशा धार्मिक राजाने ही परवानगी कां दिली, याचें पुष्कळांना गूढ वाटेल. परंतु वेश्यागृहें स्थापन करण्यास **सोलनला** जीं कारणें झालीं तींच या वेळींहि होतीं. कारण कायदा करून वेश्यांकरता आश्रम बांधल्यामुळें इतकेंच झालें की केवळ गरीबीमुळें

धंद्यांत पडलेल्या वेश्यांनी मात्र त्याचा फायदा घेतला, पण बऱ्याच वेश्या शहरांतच राहून गुप्तपणें धंदा करूं लागल्या. यामुळे वेश्या कोणत्या व कुलीन स्त्रिया कोणत्या हें ओळखतां येईना आणि कुलीन स्त्रियांस बदफैली लोकांकडून अतिशय त्रास पोंचूं लागला. याच वेळच्या दुसऱ्या एका ख्रिस्ती संताने लिहिलें आहे की (सेंट् थॉमस्) 'राजकर्त्यांनी ईश्वराचें अनुकरण केलें पाहिजे. ईश्वर जरी सर्वशक्तिमान आहे आणि जनहितेच्छु आहे तरी त्याला सहज बंद करतां आले असते असे अत्याचार तो होऊं देतो, कारण ते बंद करूं गेल्यास कदाचित् कांही अधिक वाईट गोष्टी होतील किंवा कांही चांगल्या गोष्टी बंद होतील. त्याचप्रमाणे मानवी राजांनीही जनकल्याणाकरता कांहीं वाईट गोष्टींस परवानगी दिली पाहिजे. या उपदेशाप्रमाणे **संत लुई** याने शेवटीं असें फर्मावलें की वेश्यांनी शहराच्या विशिष्ट भागांत राहिलें पाहिजे, विशिष्ट प्रकारचा पोषाख केला पाहिजे आणि नेमलेल्या वेळाशिवाय बाहेर दिसतां नये. कांही उच्च अधिकाऱ्यांनी अशा ठिकाणीं जातां नये असाहि कायदा केला. तथापि १२७० सालच्या 'क्रूसेड' ( धार्मिक युद्ध ) चे वेळीं राजाच्या नोकरींतल्याच कांही लोकांनी छावणींत राजाच्या तंबूशेजारी एक वेश्यागृह उघडलें आणि त्याने बऱ्याच लोकांना या कारणाने हांकून दिलें. तें कांही असो, परंतु **सोलन** व **संत लुई** या दोघांत १८०० वर्षांचें अंतर होतें, दोघेहि अत्यंत नांवाजलेले कायदेकार होते आणि दोघांनाहि त्याच कारणाने, म्हणजे कुलीन स्त्रियांची अब्रू राखण्याकरता, वेश्यावृत्तीस परवानगी द्यावी लागली, आणि दोघेहि अत्यंत सदाचारी असल्यामुळे हें त्यांनी केवळ नाइलाज म्हणून मनाविरुद्ध केलेलें होतें. हल्ली जे लोक वेश्यावृत्तीविरुद्ध एकसारखी ओरड करीत असतात त्यांनी यावरून इतकें तरी समजलें पाहिजे की ही गोष्ट त्यांना वाटते तितकी सहज निकालांत काढण्यासारखी नाही.

लंडन येथे वेश्यांसंबंधी पहिला कायदा दुसऱ्या **हेनरी** च्या वेळीं पार्लमेंटने ११६१ सालीं केला. या वेळीं स्नानगृहांत वेश्या असत आणि हा कायदा असा होता की सबंध रात्र संपेपर्यंत जी वेश्या गिऱ्हाइकाजवळ राहणार नाहीं तिला पैसे घेण्याचा हक्क नाही, आणि स्नानगृहाच्या मालकांनी रोगी स्त्रियांस तेथे ठेवतां नये.

१३४७ सालीं फ्रान्समधे **ॲव्हिन्यॉं** हें शहर **जान्न** नांवाच्या राणीच्या ताब्यांत होतें आणि तिने तेथे एक वेश्यागृह स्थापन केलें व सर्व वेश्यांस तेथे रहायला लावलें. त्यांच्या डाव्या खांद्यावर धंद्याची खूण म्हणून एक तांबडी फीत लावण्याची सक्ती केली, व 'गुड्फ्रायडे' व पुढचे दोन दिवस तेथे कोणींही जाऊं नये आणि यहुदी लोकांनी मुळीच जाऊं नये असा कायदा केला. एखादा यहुदी चोरून गेल्यास त्याला शहरांतील सर्व चौकांत नेऊन फटके मारीत असत. परंतु तिच्या कायद्यांतील सर्वांत महत्वाचें कलम म्हणजे 'राणीसाहेबांचा असा हुकूम आहे की प्रत्येक शनवारीं वेश्यागृहावरील अधिकारीण व या कामावर नेमलेला डाक्तर यांनी प्रत्येक वेश्येला तपासून त्यांपैकीं कोणास संसर्गजन्य रोग आढळल्यास त्यांना वेगळ्या ठेवाव्या म्हणजे त्यांचेपासून इतरांस रोग लागणार नाही.' सक्तीच्या तपासणीचा हाच पहिला कायदा.

आधुनिक रोम शहरांत पोपच्या हुकुमाने १५१० सालीं वेश्यांस शहराच्या एका विशिष्ट भागांत राहण्याची परवानगी मिळाली. नंतर एका पोपने त्यांवर एक जबर कर बसवला आणि मरतेवेळीं त्यांनी अर्धी मालमत्ता एका मठास दिली पाहिजे असा कायदा केला. यूरोपांत मध्ययुगांत सर्वत्र सामान्यतः वेश्यांस शहराच्या विशिष्ट भागांत राहण्याची परवानगी असे. बर्लिन येथे हीच पद्धत असून शिवाय त्यांना ठरीव पोषाख करावा लागत असे. त्यांना सामान्य कायदे लागू नसत आणि मृत्युदंड देण्याकरता जो मनुष्य नेमलेला असे, तोच वेश्यांवरहि देखरेख करीत असे. नियमांचें उल्लंघन करणाऱ्या वेश्यांस फटके मारून शहरांतून हांकून देत, परंतु नोंदलेल्या वेश्यांस कायद्याचें पाठबळ होतें आणि त्यांना कोणीं निष्कारण त्रास दिल्यास त्याला शिक्षा होत असे. परंतु गुप्त वेश्या सांपडल्यास त्यांना मात्र दर्जाचा विचार न करतां जबर शिक्षा होत असे. या स्थायिक वेश्यांशिवाय आणखी फिरत्या वेश्याहि असत आणि जेथे जत्रा वगैरे असेल तेथे जाऊन त्या धंदा करीत असत. यांनाही कायद्याची परवानगी असे.

या वेळीं पोपच्या जागेकरता जीं भांडणें चाललेलीं होतीं त्यांचा निकाल

लावण्याकरता जर्मनींत **कॉन्स्टन्स** शहरीं धर्माधिकाऱ्यांची एक मोठी सभा १४१४ सालीं भरली होती, त्यावेळीं येथे आलेले सभासद व बरोबरचे लोक यांचेकरता ६०० वेश्या सरकारने मुद्दाम राखून ठेवल्या होत्या. याला हंसण्याचें कारण नाही, कारण अगदी अलीकडे **जिनीव्हा** येथे राष्ट्रसंघामार्फत भरलेल्या एका सभेकरता पॅरिसहून एक वेश्यागृह उचलून तेथे सरकारी परवानगीने नेलें होतें, अशी विश्वसनीय माहिती प्रसिद्ध झालेली आहे. **हांबुर्ग** शहरीं **बर्लिन** सारखीच व्यवस्था होती आणि तेथील म्युनिसिपालिटीने वेश्यांसंबंधी दोन कंत्राटदारांशी केलेल्या ठरावाचे कागद अस्तित्वांत आहेत.

सोळाव्या शतकाच्या आरंभी **ल्यूथर**च्या धार्मिक सुधारणेबरोबर पुनः कडक कायद्याची लाट आली आणि बर्लिनमधून वेश्यांस हांकून दिलें. याचा परिणाम असा झाला की व्यभिचार, गर्भपात, बालहत्या वगैरेंची संख्या अतोनात वाढली आणि अत्यंत नीतिबाज लोकांना देखील पुनः वेश्यांस परवानगी द्यावी असें वाटलें इतकेंच नव्हे तर वेश्यांची संख्या पुरेशी नसल्यामुळे ती वाढवली पाहिजे असें ठरलें.

स्वित्झर्लंडमधे मध्ययुगांत इंग्लंडप्रमाणेच स्नानगृहांत स्त्रीपुरुषांस एकत्र स्नान करण्यास परवानगी असे आणि तेथेच वेश्याही असत.

स्पेनमधें मध्ययुगांत **आलफॉंस** नांवाच्या राजाने १२६० साली वेश्यांच्या मध्यस्थांविरुद्ध कडक कायदे केले आणि मृत्युदंड फर्मावला, परंतु या कायद्यांचा बिलकुल उपयोग झाला नाही, आणि पुनः परवानगी देण्याची वेळ आली. नवीन कायद्याने वेश्यांस परवानगी मिळून त्यांनी मिळवलेल्या पैशावर त्यांचाच हक्क आहे असें ठरवलें, इतकेंच नव्हे तर एखाद्या गिऱ्हाइकाकडून अगोदर पैसे घेतल्या-नंतर वेश्येने सौदा मोडला तर त्याला पैसे परत मागण्याचा हक्क नव्हता. या विलक्षण कायद्यांतच याचें कारण असें सांगितलें होतें की अनीति गिऱ्हाइकाकडून होते, वेश्येकडून होत नाही. स्पेनमधील कॅथोलिक राजे तर आपल्या मर्जीतल्या एखाद्या सरदाराला एखादें वेश्यागृह बक्षिस देत, आणि ही एक उत्पन्नाची बाब होई. याप्रमाणे १४८७ सालीं राजवाड्यांत भोजनाची व्यवस्था पाहणाऱ्या

अधिकाऱ्याला अनेक शहरांतील वेश्यागृहें बक्षिस मिळालीं आणि आणखी पाहिजे तितकीं उघडण्याचीहि परवानगी मिळाली. वेश्यांकडून तो भाडें व कर वसूल करीत असे. अशा एका वेश्यागृहांत १०० वेश्या असल्याची नोंद आहे.

फ्रान्समधे १२५४ सालीं संत लुईने जरी वेश्यांस परवानगी दिली, तरी यानंतर तीन शतकेंपर्यंत वेश्यावृत्तीला आळा घालण्याचे प्रयत्न चालू होते. यांत तीन मुद्यांकडे लक्ष असे. वेश्यांना विशिष्ट भागांत ठेवणें, त्या रस्त्यांत ओळखू याव्या म्हणून त्यांना विशिष्ट पोषाख घालायला लावणें, आणि मध्यस्थांना कडक शिक्षा करणें. ठरलेल्या मोहल्ल्यांशिवाय त्यांस इतरत्र कोणीं जागा दिल्यास दंड होई व भाडें बुडे; वेश्यांनी दुसरीकडे घर विकत घेतल्यास घर जप्त होई व किंमतहि परत मिळत नसे; आणि दुसरीकडे वेश्यागृह काढल्यास शेजाऱ्यांच्या किंवा कोणत्याहि दोन सभ्य स्त्रियांच्या तक्रारीवरून तुरुंगाची शिक्षा होई. त्यांना पानगृहें चालवण्याची परवानगी नसे व त्यांच्या राहण्याच्या जागेंतहि धंदा करण्याची नसे. अशा रीतीने कांही विशिष्ट रस्ते हलकट ठरवल्यामुळे बरेच लोक दिवसा तिकडे जाण्यास कचरत व रात्रीं जात. हें बंद पाडण्याकरता या रस्त्यांत जाणाऱ्या गिऱ्हाइकांनी सायंकाळीं सहा वाजण्याचे आंत तेथून बाहेर पडलेंच पाहिजे असा कायदा केला. येथे वेश्या स्वतंत्रपणें धंदा करीत असत आणि त्यांचे-वर कोणाचाहि ताबा नसे, आणि त्या पोलिसाशिवाय कोणालाहि भीत नसत. अर्थात् कांही वेश्या पोलिसाच्या देखरेखींतून निसटण्याचा प्रयत्न करीत, परंतु त्यांनी दुसऱ्या कोठे धंदा सुरू केल्यास शेजारी तक्रार करीत आणि मग त्यांना शिक्षा होई. यामुळे स्मशानासारख्या जागेचा देखील वेश्यावृत्तीकरता उपयोग होई !

पोशाखाचे बाबतींत १४ व्या व १५ व्या शतकांत पॅरिसमधील वेश्यांनी पोषाखांत कोणत्याहि प्रकारचें नक्षीचें काम वापरतां नये असा कायदा होता. हा कायदा केवळ त्यांना कमीपणा आणण्याकरता होता, कारण गरीब स्त्रियांच्या पोषाखांतहि नक्षी नसल्यामुळे, वेश्या ओळखू याव्या हा उद्देश त्याने साधत नव्हता. **तूलूज** शहरीं तर अशा प्रकारच्या कायद्यांपासून त्यांना इतका त्रास झाला की त्यांनी सहावा **चार्लस** याजकडे अर्ज केल्यामुळे त्याने १३८९ सालीं

त्यांना पाहिजे तसा पोषाख करण्याची परवानगी दिली आणि पोषाख ज्या रंगाचा असेल त्यापेक्षा वेगळ्या रंगाची एक पट्टी त्यांच्या डाव्या बाहीवर असली पाहिजे, इतकीच अट ठेवली. अनेक ठिकाणीं अशाच प्रकारचे वेगवेगळे कायदे त्या वेळीं असत.

वेश्यावृत्तीकरता स्त्रियांस फूस लावून नेणारांस मात्र सर्वत्र फटके मारण्यापासून मृत्युदंडापर्यंत देखील शिक्षा असे. अशा रीतीने वेश्यावृत्ति मर्यादित करण्याची पद्धत फ्रान्समधे १५६० सालापर्यंत चालू होती. यानंतर मात्र पुनः वेश्यावृत्ति बंद करण्याचा प्रयत्न झाला आणि या वेळीं तो राजांकडून न होतां लोकांकडून झाला. याचें कारण असें की लोकांची अशी ठाम समजूत झालेली होती की अनीतीचा प्रसार लोकांकडून होत नसून राजे व दरबारी लोक यांच्या बदफैलीपणामुळेच होतो. आणि हें म्हणणें अगदीच खोटें होतें असें नाही. क्वचित् एखादा राजा अपवाद म्हणून वगळल्यास ११ व्या शतकापासून राजवाड्यांत गणिकांचा सुळसुळाट असे आणि त्यांचेवर एक अधिकारी किंवा अधिकारिणी असे. यांना त्यांची नोंद ठेवावी लागत असे आणि या गणिकांकरता विशेष नियम केलेले असत. **फिलिप्** नांवाच्या राजाच्या तिन्ही मुलांनी आपल्या बायकांच्या व्यभिचाराबद्दल तक्रार केली होती आणि एका राजकन्येची अशी कीर्ति झाली होती की ती आपल्या खिडकीखालून जाणाऱ्या युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांस बोलावून आपली वासना तृप्त झाल्यावर त्यांना नदींत फेकून देत असे. १५ व्या शतकाच्या आरंभीं **फ्रांस्वा** नामक राजाने राजवाड्यांतील गणिका खालच्या दर्जाच्या लष्करी अंमलदारांस वांटून दिल्या आणि तो स्वतःकरता फक्त कुलीन स्त्रिया राजवाड्यांत आणीत असे. याचें कारण **ब्रांतोम्** नांवाच्या लेखकाने असें दिलें आहे की गणिकांपासून आपल्याला रोग होतील अशी त्याला भीति होती. धर्माधिकाऱ्यांत देखील अशाच प्रकारची अनीति बोकाळली होती. १५ व्या शतकाच्या शेवटीं पॅरिसची लोकसंख्या सुमारे दीड लाखच होती आणि वेश्यांची संख्या अजमासे पांचसहा हजार होती. शिवाय याच शतकांत ल्यूथरने धार्मिक सुधारणा केली ही एक गोष्ट, आणि सांसर्गिक रोगांचा प्रसार झाल्यामुळे वेश्यांकडून कराच्या रूपाने उत्पन्न निघत असे त्यापेक्षा त्यांना उपचार करण्यांत खर्च अधिक होऊं लागला

ही दुसरी. यामुळे याला कांहीतरी आळा घातला पाहिजे असें सर्वांस वाटूं लागून शेवटीं **ऑर्लिआं** येथे बोलावल्या प्रतिनिधींच्या सभेंत वेश्यांचा नायनाट करण्याचा ठराव पास झाला आणि त्याप्रमाणे हुकूम निघाला की वेश्यावृत्ति हा गुन्हा आहे आणि त्याला जबर शिक्षा ठेवावी आणि कोणीं अधिकाऱ्यांनी तिकडे काणा डोळा केल्यास त्यांना बडतर्फ करावें. सैन्याबरोबर नेहमी वेश्या असत त्यांनाहि हा नियम लागू केला. परंतु कडक कायद्यांचा नेहमीचा परिणाम या वेळींहि झाला. वेश्यांना कोठेच राहण्याची परवानगी नसल्यामुळे त्या सर्वत्र पसरल्या आणि वेश्यागृहें लुप्त न होतां गुप्त झालीं. गुप्त रोगांवर उपचारांची फारशी माहितीच नसल्यामुळे, आणि हे रोग म्हणजे ईश्वराने दुराचाराबद्दल केलेली शिक्षा होय या समजुतीमुळे उपचारांची बिलकूल व्यवस्था नव्हती आणि रोग वाढतच गेले. या वेळीं रोग्यांना उपचाराऐवजी शिक्षा मात्र होत असे. इंग्लंडांत वेश्यागृहांत रोगी स्त्री सांपडल्यास मालकाला शिक्षा होई. **व्हेनिस्** येथे दुसऱ्यास संसर्ग होऊं देणें हा गुन्हा होता आणि त्याला दंड असे. **पॅरिस**मधे १४९३ सालीं रोग्यांना शहर सोडून जाण्याचा हुकूम मिळाला आणि ते इस्पितळांत गेल्यास त्यांना फटके मिळत असत. १५६० च्या कायद्याची अंमलबजावणी प्रथम कडक रीतीने झाली. कांही ठिकाणी वेश्यांना २४ तासांत शहर सोडून जाण्याचा हुकूम मिळाला व कांही ठिकाणीं तितक्याच अवधींत नोकरी धरण्याचा, व ती न मिळाल्यास त्यांना फटके मारून, हजामत करून कायमचें हद्दपार करण्यांत आलें. यामुळे वेश्या एका मोहल्यांतून दुसऱ्यांत जात किंवा दुसऱ्या शहरांत जात आणि कोणीकडून तरी पोलीसला चुकवीत असत. हा प्रकार बंद करण्याकरता १६८४ सालीं वेश्यांना तुरुंगांत टाकण्याची युक्ति निघाली. यापूर्वी त्यांच्या-करता आश्रम वगैरे काढणारे लोक झाले, परंतु तुरुंगाची युक्ति कोणाला सुचली नव्हती. १५ व्या शतकांत एका ख्रिस्ती बैराग्याने व्याख्यानांच्या जोरावर २०० वेश्यांचें मन वळवून एक आश्रम काढला होता आणि त्याला राजाकडूनहि मदत मिळाली होती. याचा परिणाम असा झाला की कांही दरिद्री स्त्रियांनी तेथे जागा मिळावी म्हणून वेश्यावृत्ति आरंभली, आणि दरिद्री आईबापांच्या मुली अक्षतयोनि असतांही त्यांच्या सांगण्यावरून वेश्या असल्याचा बहाणा

करून तेथे येऊं लागल्या. याकरता या संस्थेला कांही नवीन नियम करावे लागले ते असेः—खरोखर वेश्या असतील त्यांनाच आंत घेतलें जावें; आंत येऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक स्त्रीने अशी शपथ घ्यावी की मुद्दाम तेथे येण्याच्या उद्देशाने वेश्या-वृत्ति केली नाही; याशिवाय, खरें सांगण्याची शपथ घेतलेल्या पोक्त बायकांकडून तिला तपासावी व ती कुमारिका आढळल्यास तिला पुढे कधीहि तेथे घेऊं नये; आणि वेश्यांनी जन्मभर धंदा करून म्हातारपणीं आश्रमाचा उपयोग करूं नये म्हणून असाहि नियम केला की तीसपेक्षा जास्त वयाच्या वेश्यांस तेथे घेऊं नये. ही संस्था फार दिवस टिकली नाही, परंतु असे अनेक प्रयत्न झाले आणि यांतूनच पुढे १६८४ सालीं केलेल्या कायद्याची प्रेरणा निघाली. त्या कायद्याचीं मुख्य कलमें अशीं की कोणास व किती दिवस तुरुंगांत ठेवावें हें ठरवण्याचा हक्क पोलीसचे अधिकाऱ्यास दिलेला होता. त्यांचें अन्नवस्त्र तुरुंगांतील कैद्यांप्रमाणे साधें असावें, त्यांची शक्ति पाहून त्यांना शक्य तितकें कठिण आणि शक्य तितकें जास्त वेळ काम द्यावें, त्यांना रोग असल्यास त्यांवर उपचार करावा आणि सकाळ संध्याकाळ प्रार्थना करायला लावून शिवाय कामाचे वेळींहि त्यांना धार्मिक पुस्तकें वाचून दाखवावीं. त्यांनी कांही चूक केल्यास शिक्षा करावी, आणि ज्या चांगल्या वागतील त्यांना कांही दिवसांनी सौम्य प्रतीचें काम देऊन त्यांनी मिळवलेल्या पैशांतून त्यांना मांस किंवा इतर पदार्थ विकत घेऊं द्यावे.

यांत मुख्य गोष्ट ही आहे की या कायद्यानें वेश्यांस तुरुंगांत टाकण्याचा अधिकार पोलीसला दिला आणि त्यावर अपील नव्हतें. रोगांवर उपचार कर-ण्याची व्यवस्थाहि याच कायद्याने प्रथम केली. या वेळचा असाहि एक कायदा सांपडतो की सैन्यापासून ४ मैलांत कोणी वेश्या सांपडल्यास तिचे कान व नाक कापण्याची शिक्षा द्यावी, परंतु या कायद्याची अंमलबजावणी कोठे नमूद केलेली नाही. पोलिसाच्या हातांत हा फाजील अधिकार देण्याचा परिणाम असा झाला की खाजगी द्वेषामुळे सभ्य स्त्रियांना देखील त्रास होऊं लागला आणि हें इतकें जाचक झालें की विद्वान कायदेपंडितांनी त्याविरुद्ध कडक टीका केली. तेव्हा १७१३ मधे **चौदाव्या लुईने** एक नमुनेदार कायदा केला आणि या प्रकाराला आळा घातला. परंतु या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे

कांहीं दिवसांनी तो मागे पडला आणि यासंबंधी जी रूढि त्या वेळीं पडली तीच बहुतांशीं अजूनहि चालू आहे. ती म्हणजे पोलिसाने बऱ्याचशा वेश्या पकडून जज्जापुढे आणायच्या, त्यांची संक्षिप्त चौकशी होऊन त्यांना शिक्षा व्हायची, आणि नंतर त्यांना एका उघड्या खटाऱ्यांत घालून भर दिवसा गांवांतून तुरुंगांत न्यायचें. त्यांनी तुरुंगांत किती दिवस रहायचें हें ठरवण्याचा अधिकार अजूनहि पोलिसालाच होता. परंतु १८ व्या शतकाच्या आरंभीं अशी चाल पडली की भररस्त्यांत वेश्यांनी कांही गडबड केल्याशिवाय किंवा वेश्यांच्या आसपास राहणाऱ्या सभ्य लोकांनी तक्रार केल्याशिवाय पोलिसाने त्यांच्या वाटेस जाऊं नये. पण तक्रार झाल्यास वेश्येला २४ तासांत घर सोडायला लावल्याचें उदाहरण आहे. वेश्यागृहांच्या मालकांना मात्र जास्त शिक्षा होत असे, पण एकंदरींत विशेष बभ्रा न झाल्यास वेश्यावृत्तीला वस्तुतः बंदी नव्हती असेंच दिसतें. इतर देशांत मात्र व **फ्रान्स्**मधेहि पॅरिसशिवाय इतर शहरांत यापेक्षा कडक कायदे होते. कांहीं ठिकाणीं वेश्यांना फटके मारण्याची शिक्षा होती, कांही ठिकाणीं त्यांना आपल्या धंद्याची निशाणी म्हणून विशिष्ट प्रकारचा पोषाख करावा लागत असे. **व्हेनिस्** येथील लोकसत्ताक राज्यांतील अधिकाऱ्यांनी १८ व्या शतकाचे आरंभीं सर्व वेश्यांना आपल्या हद्दींतून घालवून दिल्या. त्याचा परिणाम असा झाला की सर्व दर्जाचे पुरुष बेफामपणें वागूं लागून सभ्य स्त्रियांचे अब्रूला मोटा धोका उत्पन्न झाला. शेवटीं नाइलाज म्हणून घालवून दिलेल्या वेश्यांना परत बोलावलें इतकेंच नव्हे तर त्यांना राहण्यास घरें आणि पुनः धंदा चालूं लागेपर्यंत मासिक वेतन द्यावें लागलें.

पॅरिसमधे १७७८ सालीं **लन्वार्** नांवाचा एक पोलिसचा अधिकारी होता त्याने वेश्यांसंबंधी एक नवीन कायदा तयार केला. त्यांत पुढील कलमें होतीं. १. वेश्यांनी कोणत्याहि सार्वजनिक ठिकाणीं किंवा आपल्या खिडक्यांतून खुणा करून गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करतां नये. केल्यास त्यांची हजामत करून त्यांना तुरुंगांत पाठवण्यांत येईल. २. वाईट चालीच्या माणसांना कोणींहि जागा भाड्याने देऊं नये. ३. दिल्यास ५०० पौंड दंड होईल. ४. असे भाडेकरी चुकून आल्यास त्याची वर्दी पोलिसास तावडतोब द्यावी. ५. घरांच्या

व होटेलांच्या मालकांनी आपल्याकडे राहणाऱ्या व नवीन येणाऱ्या सर्व माणसांची बिनचूक यादी पोलिसास दिली पाहिजे व त्यांत झालेले फरक कळवले पाहिजेत. हा कायदा राजाने केलेला नसून पोलीसचे अधिकाऱ्याने केलेला होता हें यांत विशेष आहे. कायदा जितका कडक, तितके त्याचे परिणाम वाईट व्हायचे हें ठरलेलेंच. वरील कायद्यांत वेश्यावृत्ति बंद करण्याची इच्छा दिसते, परंतु त्याचा परिणाम इतकाच झाला की वेश्यांना हुसकून लावल्यामुळे त्या सर्वत्र पसरल्या आणि यामुळे रोगांचा प्रसार मात्र जास्त झाला. १७८९ च्या राज्यक्रांतीच्या सुमाराला फ्रान्समधील इस्पितळें परमा व गर्मीच्या रोग्यांनी भरलीं होतीं. आणि इस्पितळांत जाण्याची इच्छा असलेल्या लोकांना पुष्कळ वेळां जागा मिळवण्याकरता एक एक वर्ष थांबावें लागत असे. सुमारें शेंकडा १५ रोगी मरत असत.

१७८९ चे राज्यक्रांतीचे वेळीं कायद्यांतहि क्रांति झाली. १७९१ सालीं वेश्यांसंबंधी असा कायदा झाला की वेश्यांनी दंगा केल्यास मात्र त्यांना पोलीसने पकडावें. यावरून वेश्यावृत्ति हा गुन्हा नसून इतरांस त्रास देणें हा गुन्हा आहे असें कायद्यानेच झालें. परंतु १७९३ सालीं वेश्यावृत्तीस पुनः बंदी केली, आणि याच्या पुढच्या वर्षी आणखी एका कायद्याने वेश्यांना हुडकून काढण्याकरता पोलिसाला लोकांच्या घरांत पाहिजे तेव्हा शिरण्याचा अधिकार मिळाला. कोणाही स्त्रीला उपजीविकेच्या साधनांबद्दल प्रश्न करावा आणि तिला धडसें उत्तर देतां आलें नाही की तिला वेश्या म्हणून पकडून न्यावें, अशा प्रकाराने सभ्य स्त्रियांवर असह्य जुलूम सुरू झाला, आणि तरी देखील बदफैली लोकांच्या वर्तनाला बिलकुल आळा बसला नाही.

यामुळे लोकांत असमाधान वाढलेलें पाहून १७९६ सालीं फ्रेंच सरकारच्या कार्यकारी मंडळाने कायदेमंडळास अशी सूचना केली की त्यांनी यासंबंधी एक तपशीलवार कायदा करावा. आणि तेव्हापासून आतापर्यंत वेळोवेळीं कायद्याचे अनेक मसुदे पुढें आलेले आहेत, परंतु त्यांतून कधीहि कांही निष्पन्न झालेलें नाही. १८०० सालीं सरकारनेच एक फर्मान काढून वेश्यागृहांवर व वेश्यांवर देखरेख ठेवण्याचें काम पोलीसाकडे दिलें व १८०५

सालीं कायदा मोडणाऱ्या वेश्यांना तुरुंगांत पाठवण्याचाहि अधिकार पोलिसासच मिळाला. परंतु १९ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच अशी प्रवृत्ति दिसूं लागली की वेश्यावृत्तीस बंदी करण्याऐवजी त्यांचेवर समाजाच्या हिताकरता देखरेख मात्र ठेवावी आणि सक्तीने तपासून उपचार करावे. हीच पद्धत हळूहळू सर्व यूरोपभर पसरली. **फ्रान्स्** मधे तर प्रत्येक शहरीं पोलीसचा परवाना असलेलीं वेश्यागृहें असत व आहेत. या संबंधी १८२३ सालीं **पॅरिस** येथील पोलीस कमिशनर **दलाव्हो** यांनी एक वाटोळें काढलें, तें महत्त्वाचें आहे. 'सामाजिक नीतीच्या दृष्टीने वेश्यागृहांची स्थापना अर्थातच कोणाला आवडण्यासारखी नाही, तेव्हा शहराच्या वेगवेगळया भागांतील पोलीसचे अधिकारी याचे विरुद्ध आहेत हें त्यांना भूषणावहच आहे, तथापि यांत आणखी एका गोष्टीचा विचार करणें जरूर आहे आणि या दृष्टीने त्यांनी यापुढे आपली वागणूक ठेवली पाहिजे. ती गोष्ट ही की वेश्यावृत्ति अजीबात नाहीशी करणें आपल्या आवांक्याबाहेरचें आहे आणि कायद्याचा उद्देश फक्त तिजपासून होणारें नुकसान शक्य तितकें कमी करण्याचा आहे. पोलीस वेश्यावृत्तीला संमति देत नाही, तें फक्त वेश्यांवर देखरेख ठेवतें. या दृष्टीने पाहतां त्यांना स्वच्छंदपणें धंदा करूं देणें बरें नाही, कारण प्रच्छन्न वेश्याच सर्व दृष्टींनी समाजाला जास्त बाधक होतात असा अनुभव आहे. आणि म्हणूनच पोलीसच्या माहितीच्या स्त्रियांच्या ताब्यांत असलेल्या वेश्यागृहांतच वेश्यांचे धंद्यास परवानगी देणें हा सर्वांत श्रेयस्कर मार्ग दिसतो, कारण अशा गृहांवर देखरेख ठेवणें सोपें असतें.'

१८३० सालीं एका पोलीस कमिशनरने याचेहि पुढे जाऊन असें फर्मावलें की 'फक्त वेश्यागृहांतच वेश्यावृत्तीला परवानगी आहे, इतरत्र नाही. ज्या वेश्या अशा गृहांत बाहेरून येत असतील, त्यांनी दिवे लागण्यापूर्वी तेथे जाता नये. त्यांनी साधा पोषाख करून सरळ, न रेंगाळतां, तेथे गेलें पाहिजे, आणि एकाच रात्रीं एका वेश्यागृहांतून दुसऱ्यांत जातां नये, दिवे लागण्यापूर्वी किंवा रात्रीं ११ वाजल्यानंतर त्यांनी रस्त्यांत दिसतां नये.' परंतु याच वर्षी या नियमांत फरक करून वेश्यांना रस्त्यांत फिरण्यास कांही अटींवर परवानगी दिली व हल्ली स्वतंत्र वेश्यांस लागू असणारे नियम प्रथम त्या वेळीं केले.

**सारांश.** वरील ऐतिहासिक हकीकतीवरून असें नक्की दिसतें की वेश्यावृत्तीला कायद्याने दडपून टाकण्याचें प्रयत्न कधीहि यशस्वी झालेले नाहीत आणि कायदे जितके कडक करावे तितके त्यांचे परिणाम अधिकाअधिक वाईट झालेले आहेत. याचें कारण हें आहे की उघड वेश्यावृत्तीपासून समाजाचें नेहमी जास्त नुकसान होतें आणि वेश्यावृत्तीच्या कट्टया विरोधकांनीहि हें मान्य केलेलें आहे. त्याबरोबरच आणखीहि कांही गोष्टी नजरेस येतात. एकतर गेल्या शतकापर्यंत वेश्यावृत्तीचा विचार फक्त पारंपारिक नीतीच्या दृष्टीने केलेला होता, म्हणजे वेश्यावृत्तीचा समाजावर खरोखर परिणाम काय होतो हें पाहण्याऐवजी प्रचलित नीति व धर्म यांच्या दृष्टीने वेश्यावृत्तीचें फक्त बाह्य स्वरूप विचारांत घेतलें होतें. तसेंच १९ व्या शतकाच्या आरंभापर्यंत वेश्यावृत्तीचा गुप्त रोगांशी संबंध काय व रोगांपासून समाजाचें संरक्षण करण्याच्या दृष्टीने वेश्यांवर कांही निर्बंध घातले पाहिजेत की काय, याचा कोणीं विचारच केला नव्हता. अर्थात् याचें हेंहि एक कारण असणें शक्य आहे की गुप्त रोगांवर त्यावेळीं फारसे यशस्वी उपाय माहीतच नसल्यामुळे वेश्यांवर उपचार करण्याचा कोणीं प्रयत्न केला नाही आणि वेश्यांना कोंडून ठेवण्याचाच मार्ग त्यावेळीं बरा वाटला असावा. वेश्यांना विशिष्ट रस्ते किंवा मोहल्ले राखून ठेवीत असत, पण कांही लोकांचे मतें यांत कांही विशेष नाही, कारण इतर धंद्यांचे लोकहि विशिष्ट रस्त्यांत रहात असत व अजूनहि राहतात.

इतिहासावरून असेंहि दिसतें की सोलन्च्या वेळेपासून आतापर्यंत वेश्यांना स्वतंत्रपणें पाहिजे तेथे राहूं देण्यापेक्षा त्यांना वेश्यागृहांतच रहायला लावण्यांत समाजाचा फायदा आहे असें अधिकाऱ्यांचें मत दिसतें. तसेंच वेश्यांसंबंधी नियम फक्त स्त्रियांनाच आजपर्यंत लावलेले आहेत आणि पुरुषांनी जरी हा धंदा उघडपणें केलेला आहे, तरी कायद्याने त्यांचा कधी विचार केलेला नाही. परंतु वेश्यांस बंदी असो की उघड परवानगी असो, कुंटणकीच्या धंद्यावर मात्र अगदी प्राचीन काळापासून कायद्याने करडी नजर ठेवलेली आहे आणि अजूनहि ती तशीच आहे.

---

# ३

# नंतरची परिस्थिति

## फ्रान्स

वेश्यावृत्तीचें नियमन करण्यांत यूरोपांतील पुष्कळ देशांनी फ्रान्सचेंच अनुकरण बरेच दिवसपर्यंत केलें होतें. तेव्हा या दृष्टीनें प्रथम फ्रान्स-मधील कायद्यांचाच विचार करणें इष्ट दिसतें. हिंदुस्थान इंग्रजांच्या ताब्यांत गेल्यावर इंग्लंदांतील कायद्यांचेंच येथें अनुकरण झालें, तेव्हा इंग्लंदबरोबरच हिंदुस्थानचाही विचार येईल.

ज्याप्रमाणे देवी किंवा पटकी झालेल्या मनुष्यापासून रोग दुसऱ्याला लागूं नये म्हणून अशा रोग्यांवर निर्बंध घालण्याचा हक्क समाजाला पोंचतो, तद्वतच गुप्त रोगांचा प्रसार मुख्यतः वेश्यांचे द्वारें होत असल्यामुळें वेश्यांवरही निर्बंध घालण्याचा हक्क पोंचतो. यावर कोणी असें म्हणतात की रोग कोणत्याही रोग्यापासून लागण्याचा संभव असतो, तेव्हा सर्व रोग्यांवर निर्बंध कां घालूं नये ? याचें उत्तर असें की सर्व रोग्यांवर निर्बंध घालणें अशक्य आहे. शिवाय वेश्या हा बाजारांत येणारा माल आहे. बाजारांत कोणताही माल आल्यास तो सुस्थितींत आहे की नाही, त्यापासून तो घेणारास कांही इजा होण्याचा संभव आहे कीं काय हें पाहणें, व खराब माल विकूं न देणें, हें समाजाचें कर्तव्य आहे व यावर कोणी हरकतही घेत नाही, कारण ही समाजहिताची गोष्ट आहे. त्याचप्रमाणे वेश्या हा बाजारी माल, तेव्हां त्यापासून कोणास इजा होऊं नये अशी व्यवस्था समाजाकडून झाली पाहिजे. इतरांकडूनही संसर्ग होतो हें खरें, पण वरील उदाहरण पुनः घेतलें तर जी भाजी उघड्या बाजारांत येते, ती सडकी आहे की काय हें पाहतां येईल, पण एखाद्याने कोणाच्या घरीं जाऊन सडकी भाजी दिल्यास त्यावर नजर ठेवतां येणार नाही. तसेंच पुरुष

किंवा प्रच्छन्न वेश्या हा माल बाजारांत आलेला नसल्यामुळे त्यावर नजर ठेवणें अशक्य आहे, परंतु यावरून कोणीही समंजस मनुष्य असें म्हणणार नाही की बाजारांतल्या मालावरही नजर ठेवूं न ये. भाजीवाल्यांवर जर निर्बंध घालतां येतो आणि ते व्यक्तिस्वातंत्र्य नाहीसें झाल्याची ओरड करीत नाहीत, तरमग वेश्यांवर निर्बंध घातल्यास अशी ओरड कां करावी? तशी करणें समंजस नाही, तथापि कांही लोक करतात. त्यांत त्यांचा अंतःस्थ हेतु काय असतो याचा विचार पुढे करूं.

वेश्यांवर नियंत्रण घालायचें म्हणजे त्यांचें एक नोंदणीपुस्तक ठेवून त्यांची वारंवार वैद्यकीय तपासणी करून कोणास रोग आहे असें आढळल्यास अशा रोग्यांस सक्तीने उपचार करणें व रोग बरा होईपर्यंत संसर्गाची संधि न देणें. ही पद्धत प्रथम फ्रान्समधे अमलांत आली. तथापि नीतिबाजीमुळे तींत बरेच दोष राहिले आणि तिचा परिणाम व्हावा तितका चांगला झाला नाही. तरीदेखील यावरून पद्धत वाईट ठरवतां येणार नाही आणि ती वाईट म्हणून पुकारणारे लोक समंजस नसून नीतिबाज असतात असें पुढे सिद्ध करूं. फ्रान्स-मधील पद्धत थोडक्यांत अशी.

**१. नोंदणी.** वेश्येला स्वखुशीने आपलें नांव नोंदवतां येतें; किंवा तें अधिकाऱ्यांना आपल्या अधिकारांत नोंदतां येतें. यांपैकी कोणत्याही रीतीने नांव नोंदलें म्हणजे विशिष्ट नियमांप्रमाणे सक्तीची वैद्यकीय तपासणी लागू झाली. नोंदणीची एक अट अशी आहे की समागमाकरता पैसे घेण्याची **संवय** असल्यासच ती वेश्या, एकदा पैसे घेऊन समागम केल्याने ती वेश्या होत नाही, व तिचें नांवही नोंदतां येत नाही. पॅरिस शहरांत हा नोंदणीचा अधिकार पोलिसाला दिलेला आहे, इतर ठिकाणीं म्युनिसिपालिट्यांना आहे. १९०८ सालापासून १८ वर्षे वयाचे आंत कोणत्याही स्त्रीची नोंदणी वेश्या म्हणून करतां येत नाही. ही नोंदणी केल्यावर त्या स्त्रीला तें कळवावें लागतें आणि तिने त्याविरुद्ध तक्रार केल्यास तिची चौकशी होते आणि तिच्याविरुद्ध वेश्यावृत्तीचा पुरावा मिळाल्यासच नोंदणी कायम होते. उदाहरणार्थ एका स्त्रीच्या खोलींत एकच मनुष्य रात्रीं वारंवार जातो असें सिद्ध झालें तरी ती वेश्या होत नाही, कारण रखेली म्हणजे वेश्या नव्हे असा कायदा आहे.

**२. नोंदणी रद्द करणें.** कोणत्याही नोंदलेल्या वेश्येने वेश्यावृत्ति सोडून दिल्याचें सिद्ध केल्यास तिचें नांव नोंदणीबुकावरून काढून टाकण्यांत येतें.

नोंदलेल्या वेश्यांच्या वागणुकीविषयी पोलिसाला किंवा म्युनिसिपालिट्यांना नियम करण्याचा अधिकार आहे. त्यांनी खिडकींत किंवा दरवाजांत उभें राहतां नये, रस्त्यांत किंवा इतर सार्वजनिक ठिकाणीं विशिष्ट कालमर्यादेंत जातां किंवा उभें राहतां नये, वगैरे नियम करतां येतात. अर्थात् रस्त्याने जाण्याचा हक्क कोणालाही असतो. कारणाशिवाय रेंगाळलें तरच तो गुन्हा होऊं शकेल. त्यांनी अमुक वेळीं बाहेर हिंडतां नये असा नियम असला तरीही त्या बाजारांतून कांही आणण्याकरता बाहेर गेल्यास तो गुन्हा होणार नाही. धंद्याकरता जायचें नाही इतकाच कायद्याचा अर्थ होईल. अर्थात् वेश्येच्या व्याख्येंत न येणारी स्त्री कितीही वाईट चालीची असली तरी जोंपर्यंत लोकांना तिजकडून कांही त्रास झाला नाही तोंपर्यंत तिला पोलीस कांही करूं शकत नाही. एखादी स्त्री अनेक पुरुषांशीं संबंध ठेवते एवढ्यावरूनच ती वेश्या ठरत नाही, तिने अनेक लोकांकडून समागमाकरता पैसे घेतले तरच ती वेश्या ठरेल. एकाजवळच पैसे घेऊन राहिली तर ती रखेली होईल, वेश्या नव्हे.

वेश्यागृहें परवानगीशिवाय उघडूं नये, किंवा मुळीच उघडूं नये, असा कायदा म्युनिसिपालिटीला करतां येतो. एखाद्या पानगृहांत वेश्यावृत्तीला सवड मिळते असें आढळल्यास तें बंद करतां येतें.

**३. वेश्यागृहें.** वस्तुतः वेश्यागृहें उघडण्यास परवानगी देण्याचा अधिकार कोणत्याही कायद्याने कोणालाही दिलेला नाही. पण ज्याला बंद करण्याचा अधिकार आहे त्याला परवानगी देण्याचाही आहे, या तत्वावर फ्रान्समधील वेश्यागृहांस परवानगी दिलेली असते आणि कायदेपंडित यासंबंधी भांडत असतात. परंतु एका शतकाचे वर ही पद्धत चालू आहे हें खरें. यामुळे कायद्याच्या दृष्टीने अशा गृहांस परवानगी आहे असें न समजतां त्यांकडे काणाडोळा केलेला आहे असें समजून त्यांना ‘ मेझाँ द् तॉलेरांस् ’ म्हणजे चालूं दिलेलीं गृहें असें म्हणतात. या गृहांसंबंधी सर्व नियम पोलिसाने किंवा म्युनिसिपालिटीनें केलेले अस-

तात. परवानगीशिवाय कोणासही वेश्यागृह उघडतां येत नाही आणि तीं कोणत्या रस्त्यांत आहेत वगैरे पाहूनच परवानगी देतात. ही परवानगी कार्यकारी अधिकाऱ्यांनी आपल्या सत्तेंत दिलेली असल्यामुळे कोर्टाला ती रद्द करतां येत नाही, किंवा अशा रीतीने उघडलेलें वेश्यागृह कोर्टाला बंदही करतां येत नाही.

वेश्यागृहांतील वेश्यांना रात्रीं बाहेर जाण्याची परवानगी नसते आणि केव्हाही सार्वजनिक ठिकाणीं जाण्याचीही नसते आणि यासंबंधी जबाबदारी केवळ वेश्येवरच नव्हे तर वेश्यागृहाच्या चालकांवर असते. वेश्यागृहामुळे शेजाऱ्यांस त्रास झाल्यास त्यांस तक्रार करतां येते, परंतु तीं ऐकण्याचा अधिकार पोलीसचे अधिकाऱ्यांसच आहे की इतर कोर्टांसही आहे, याबद्दल मतभेद आहे, कारण इतर कोर्टांस वेश्यागृह बंद करतां येत नाही. तथापि एका कोर्टाने नुकसानभरपाईचा हुकूम दिला आणि दुसऱ्या एका कोर्टाने तें आपल्या अधिकाराबाहेर ठरवलें !

वेश्यांची नोंद करण्याचा मुख्य उद्देश आरोग्य राखण्याचा असल्यामुळें वेश्यागृहांकरता केलेल्या नियमांत सक्तीच्या वैद्यकीय तपासणीचा उल्लेख नेहमी असतो. ही तपासणी बहुधा आठवड्यांतून दोनदा असते आणि तपासणीची नोंद वेश्येच्या बुकांत केलेली असते. तपासणीकरता विशिष्ट जागा आणि डाक्तर नेमलेले असतात. अर्थात् कोणत्याही वेश्येला रोग आहे असें दिसल्यास तिच्यावर सक्तीने उपचार करतात, कारण एरवी केवळ तपासणीचा कांहीच उपयोग नाही. याकरतां त्यांना सरकारी खर्चाने ठरलेल्या इस्पितळांत ठेवतात. ही सक्ती करण्याचा अधिकार विशिष्ट कायद्याने दिलेला नाही आणि एकंदर आरोग्यरक्षणांतच त्याचा समावेश करतांत, पण हें कायदेपंडितांना पसंत नाही. परंतु वेश्या आहेत हें उघडपणें कबूल करायचें नसल्यामुळे त्यांसंबंधी कायदे कायदेमंडळाला करतां येत नाहीत. पोलिशी नियमांवरच भागवावें लागतें. हा नीतिबाजीचा परिणाम आहे.

वेश्यांसंबंधी नियम मोडल्यास पॅरिस शहरीं त्याबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार पोलीसचे अधिकाऱ्यांस असतो. इतर ठिकाणीं मात्र तो कोर्टांसच

असतो. अशा रीतीने पॅरिसमधे वेश्यांस तीनपासून पंधरा दिवसपर्यंत पोलीसच्या हुकुमाने तुरुंगांत ठेवतां येतें, आणि कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या अरेरावीकडे काणाडोळा केल्याशिवाय पार्लमेंटलाही गत्यंतर नसतें, कारण वेश्यांसंबंधी कायदा करायचा नाही ! याला अपवाद म्हणून १९०८ सालीं मात्र १८ वर्षांचे आंतील मुलींची वेश्या म्हणून नोंद करतां येत नाही असा कायदा केला, आणि १९२१ सालीं वेश्यावृत्ति करणाऱ्या १८ वर्षांचे आंतील मुलींना भटक्या लोकांचा कायदा लावावा असा कायदा केला. हीही अरेरावीच आहे, कारण ज्यांना ठरलेली रहायचीं जागा नाही किंवा धंदा नाही ते भटके, अशी व्याख्या असल्यामुळे स्वतंत्र राहून वेश्यावृत्ति करणाऱ्या मुली त्या व्याख्येंत येत नाहीत. पण कायदेपंडितांस यांतून दुसरा मार्ग सांपडेना.

१९०८ च्या कायद्याप्रमाणे अशा मुलींना वयांत येईपर्यंत सक्तीने एखाद्या विशिष्ट संस्थेंत ठेवतां येतें. अशा प्रकारची व्यवस्था जर्मनींत १९०० सालींच केली होती आणि इंग्लंदांत फ्रान्सबरोबरच केली. परंतु मुलींना हा कायदा लावल्यापासून कोणताही फायदा झाला नाही. कारण त्यांना ज्या विशिष्ट संस्थांत ठेवायचें अशा संस्थाच अस्तित्वांत आल्या नाहीत. इंग्लंदांत व जर्मनींतही मुलांची वर्तणूक सुधारण्याकरता कांही खाजगी संस्थांचीच मदत घ्यावी लागली. अर्थातच याकरता त्या संस्थांना सरकारी मदतही मिळाली. पण फ्रान्समधे ही मदत अपुरी वाटल्यामुळे म्हणा, किंवा मदतीबरोबरच सरकारी देखरेखही आल्यामुळे म्हणा, अशा मुली घेण्यास खाजगी संस्था मुळीच पुढे येईनात. याचा निष्कर्ष इतकाच झाला की कायद्याचा उद्देश चांगला असूनही परिणाम मात्र वाईट झाला. कारण अशा मुलींना तुरुंगांतही ठेवतां येईना आणि त्यांना रोग उघड दिसत असतांही त्या नोंदलेल्या वेश्या नसल्यामुळे त्यांना इस्पितळांतही पाठवतां येईना, आणि त्यांना वाटेल तसें वागूं देण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाही, आणि त्यांना पोलिसच्या नाकावर टिच्चून उघडपणें बिनदिक्कत वेश्यावृत्ति करतां येऊं लागली. कारण त्यांना पकडल्या तरी त्यांची व्यवस्था लावण्याचा कायदेशीर मार्ग नाही. शेवटी हा परिणाम लक्षांत येऊन कार्यकारी मंत्र्यांनी १९१९ सालीं एक वाटोळें काढलें की अशा मुलींच्या पालकांकडून

शक्य तितकी खटपट करवून जर पोलिसला त्यांची वेश्यावृत्ति बंद करतां नच आली तर त्यांना खुशीने वैद्यकीय तपासणीस येऊन उपचार करून घेण्याचा तरी उपदेश करावा!

याचा उपयोग होत नाही असें पाहून १९२१ सालीं केलेल्या ज्या कायद्याचा उल्लेख वर आला आहे तोही असाच निरुपयोगी ठरला.

या बाबतींत फ्रान्समधील चालू व्यवस्था पुढीलप्रमाणे आहे. ज्या गृहांत वेश्या कायमच्या राहतात अशीं गृहें फ्रान्समधें ८४७ आहेत, पैकी २७ खुद्द पॅरिस शहरांत आहेत. याशिवाय फ्रान्सच्या वसाहतींत १५२ गृहें आहेत. वेश्यागृहांचा आणखी एक प्रकार म्हणजे तेथे वेश्या रहात नाहीत, परंतु कामापुरत्या ठराविक वेळीं तेथे असतात आणि नंतर घरीं जातात. अशीं गृहें फ्रान्समधें १९५ आहेत, पैकी १७५ पॅरिस शहरीं आहेत. याशिवाय आणखी एक प्रकार म्हणजे संकेतगृहें. येथे वेश्या रहातहि नाहीत आणि ठराविक वेळींहि येत नाहीत. त्या केवळ कोणाला जरूर असल्यास अगोदर संकेत ठरवल्यास येतात. या संकेतगृहांत येणाऱ्या स्त्रियांना वेश्यावृत्तीवरच पोट भरण्याची जरूर नसते. त्या कधीकधी विवाहितहि असतात व नवऱ्यांच्या संमतीनेहि येतात; किंवा त्यांना एखादी नोकरी असते, पण हा केवळ थोडेसे अधिक पैसे मिळवण्याचा मार्ग असतो. पहिल्या दोन प्रकारच्या वेश्यागृहांतील वेश्यांची पोलिसांत नोंद असते आणि त्यांना सक्तीची वैद्यकीय तपासणी असते. शेवटच्या प्रकारच्या स्त्रिया थोड्याशा वरच्या दर्जाच्या असतात आणि त्यांना कुटुंब किंवा नोकरी, किंवा दोन्हीहि असल्यामुळे त्या साहजिकच आपल्या प्रकृतीची स्वतःच काळजी घेतात. तेव्हा त्यांची नोंदहि नसते आणि त्यांना तपासणीहि नसते. तथापि संकेतगृहाची मालकीण त्यांना वेळोवेळीं डाक्तराकडून तपासवण्याची व्यवस्था करते. अर्थात् अशीं संकेतगृहें मोठ्या शहरांतच चालूं शकतात. लहान गांवांत सर्वच लोक एकमेकांना ओळखतात, तेथे अशीं गृहें चालणार नाहीत.

याशिवाय पॅरिस शहरांत सुमारें ६००० स्वतंत्र वेश्या आहेत. त्यांनाही परवाना व तपासणी असतात व त्यांना गिऱ्हाईक मिळाल्यास त्या त्याला एखाद्या संकेत-

गृहांत घेऊन जातात. याशिवाय चोरून धंदा करणाऱ्या अजमासें २००० असाव्या.

वेश्यांसंबंधी कायद्यांचे बाबतींत जरी फारसा फरक झालेला नसला, तरी अंमलबजावणींत पुष्कळच फरक झालेला आहे. उदाहरणार्थ असा एक फार जुना कायदा आहे की वेश्यागृहांतील वेश्यांनी गृहाच्या मालकिणीला किंवा व्यवस्थापिकेला बरोबर घेतल्याशिवाय गांवांत हिंडतां नये व त्या वेश्यागृह सोडून गेल्यास त्यांनी शहराच्या त्याच भागांत राहतां नये, किंवा जेथे त्या पूर्वी रहात असतील त्याच भागांतील वेश्यागृहांत रहायला जातां नये. अर्थात् या कायद्याचा उद्देश इतकाच होता की त्यांना ओळखीचें गिऱ्हाइक इतर ठिकाणी भेटल्यास त्यांनी सभ्यपणाने वागावें व त्या आपण होऊन तशा वागतील अशी खात्री पोलिसाला वाटत नव्हती. परंतु हा कायदा हळूहळू सैल सुटला आहे, कारण त्या आपण होऊनच सभ्यपणानें वागतात असा अनुभव आला आहे. स्वातंत्र्याचा दुरुपयोग होत नाही असें दिसून आल्यामुळे हल्ली वेश्यांना बरीच मोकळीक मिळते. कित्येक वेळां एखादा परका मनुष्य पॅरिसमध्यें आल्यास आपल्या बरोबर शहरांत हिंडण्याकरतां किंवा नाटकाला किंवा भोजनाला जाण्याकरतां एखादी सुंदर स्त्री पाहिजे, अशी मागणी एखाद्या संकेतगृहाकडे करतो आणि यापेक्षा जास्त त्याला कांही नको असतें. अशा मागण्या पुरवणारीं कांही संकेतगृहें आहेत. वेश्यांना केव्हाहि वेश्यागृह सोडणें झाल्यास त्यांना निघून जाण्याची पूर्ण मोकळीक असते आणि त्यांना कोणत्याहि कारणाकरतां कोणी अडवूं शकत नाहीं असा कायदा आहे. तेव्हा कोणालाहि आपल्या मर्जीविरुद्ध वेश्यावृत्ति करावी लागत नाही. कर्ज तर राहोच, पण जेवणाखाणाचा खर्च जरी द्यायचा बाकी राहिला असला, तरी तें कारण पुरत नाही. इतकें स्वातंत्र्य असल्याचा परिणाम असा होतो की एखादी वेश्या जायला निघाल्यास ती स्वतःची किंमत राखण्याकरतां अगोदर सर्व हिशोब चुकता केल्याशिवाय जात नाही. तथापि कोणी तशीं गेलीच तर तिच्यावर फिर्याद होत नाही. कित्येक वर्षांपूर्वी एका वेश्यागृहांतील बऱ्याच वेश्यांचें मालकिणीशीं भांडण होऊन त्या कांही कपड्यांनिशीं निघून गेल्या. ते कपडे त्यांना फक्त धंद्यापुरते वापरायला दिलेले होते अशा सबबीवर त्यांच्यावर मालकिणीने चोरीची फिर्याद केली,

परंतु कोर्टाने ती काढून टाकली. कोणत्याहि स्त्रीला कोणीं तिच्या मर्जीविरुद्ध ज़बरदस्तीने वेश्यावृत्ति करायला लावल्यास कायद्याने त्याला जबर शिक्षा सांगितलेली आहे. अशा स्थितींत ख़ुशीने वेश्यागृहांत आलेली वेश्या देखील केव्हा निघून जाईल याचा नियम नसल्यामुळे वेश्यांना खुष ठेवण्याची खबरदारी मालकांना घ्यावी लागते आणि वस्तुतः त्यांची व्यवस्था एखाद्या उत्तम वसतिगृहासारखी असते.

वेश्यांच्या वयासंबंधी हल्ली असा कायदा आहे की त्यांना वेश्यागृहांत राहणें असल्यास वयाला २१ वर्षें पुरीं झालेलीं असलीं पाहिजेत. एकवीसपेक्षा कमी आणि अठरापेक्षा जास्त वय असल्यास त्यांना वेश्यावृत्ति करण्याचा परवाना मिळतो, पण वेश्यागृहांत राहतां येत नाही, आणि त्यापेक्षा कमी वय असल्यास परवानाच मिळत नाही.

फ्रान्समधील वेश्यागृहांत फक्त फ्रेंच स्त्रियांनाच राहतां येतें, कारण परकी स्त्रियांना धंदा करूं देऊं नये असा राष्ट्रसंघाने नियम केला आहे. परंतु राष्ट्रसंघाचे हातांत सत्ता नसल्यामुळे बाकीचे देश हा नियम धाब्यावर बसवतात.

पगाराचे बाबतींत वेश्यागृहांत दोनतीन प्रकारची व्यवस्था असते. कांही गृहांत प्रत्येक गृहाचा ठरलेला दर मालकिणीला द्यायचा असतो, आणि शिवाय वेश्येला बक्षिस म्हणून कांही रकम द्यायची असते. ही खुषीवर असते, पण अर्थात् किमान रकम ठरलेली असते. तरी पण लोक बहुधा जास्तच देतात. ही रकम वेश्येची मिळकत झाली. कांही गृहांत वेश्यांना महिना पगार ठरलेला असतो आणि प्रत्येक गिऱ्हाइकामागे अमुक रकम मिळते.

ज्या वेश्या वेश्यागृहांत रहात नाहीत, फक्त कामापुरत्या येतात, त्यांनाही आठवड्यांतून दोनदां सक्तीची तपासणी असतेच, पण त्यांना राहण्याची जागा वेगळी असल्यामुळे त्यांना रोग आढळल्यास सक्तीने इस्पितळांत न पाठवतां स्वतःच्या घरीं उपचार करण्याची परवानगी असते, आणि कामाशिवाय इतर वेळीं या वेश्यांना पूर्ण स्वातंत्र्य असतें.

ज्यांत वेश्या राहतात अशा वेश्यागृहांना एक सबंध घर भाड्याने घ्यावें लागतें, पण जेथे त्या रहात नाहीत अशा गृहांनी एखादा सबंध मजला घेतल्यास चालतो. अशा वेळीं तीं गृहें दिवसांतून किती वेळ आणि केव्हां चालू रहायचीं हें घराच्या मालकावरहि अवलंबतें, कारण रात्रीचे वेळीं इतर भाडेकऱ्यांना त्रास होण्याचा संभव असतो.

वेश्यागृहांना बहुधा सौम्य प्रतीचें मद्य किंवा इतर पेयें विकण्याची परवानगी असते. अशा पेयांना अर्थातच इतर ठिकाणांपेक्षा किंमत जास्त पडते, यामुळे येथे कोणी फाजील पिण्याचा संभव नसतो. शिवाय मनुष्य झिंगलेला असल्यास त्याला कोणत्याहि ठिकाणीं आणखी मद्य मिळू नये असा कायदाच आहे.

वरच्या प्रतीच्या वेश्यागृहांत गिऱ्हाइकांनी एकमेकांना ओळखण्याचा प्रसंग येऊं नये अशी खबरदारी घेतात. प्रथम गिऱ्हाइक आल्याबरोबर त्याला एका दिवाणखान्यांत नेऊन सर्व वेश्यांना तेथे बोलावून त्यांतून निवड करण्याची संधि देतात. अर्थात् दिवाणखान्यांत दोन गिऱ्हाईकांना एकदम नेत नाहीत. (ते बरोबरच आले असल्यास गोष्ट वेगळी). निवड करतांना वाटल्यास स्त्रियांना नग्नही पाहतां येतें. निवड केल्यावर तीं दोघें एका खोलींत जातात व काम झाल्यावर बाहेर जातांना जिन्यांत दुसरें कोणी नाही असें पाहूनच गिऱ्हाईकाला बाहेर सोडतात. वेश्यांच्या खोल्यांत स्वच्छतेची सर्व योग्य व्यवस्था केलेली असते. वेश्येकरतां अगोदर व नंतर योनिमार्ग पिचकारीने धुण्याची व्यवस्था असते. धुण्याच्या पाण्यांत जंतुनाशक औषधें कोणतीं घालावीं हें सरकारी डाक्तरांनी ठरवलेलें असतें व पाण्यांत घालायचें औषध त्याबरहुकूम नेहमी तयार असतें. त्याचप्रमाणे गिऱ्हाइकालाहि धुण्याची सोय असते. याप्रमाणे एकमेकांच्या स्वच्छतेची खात्री करून घेतां येते. पुरुषांचे बाबतींत रोगचिन्हें काय असतात व तीं कशीं ओळखावीं हें हल्लीच्या वेश्यांना डाक्तरांनी शिकवलेलें असतें. ही चिन्हें नेहमीच ओळखतां येतील असें नाही, पण गिऱ्हाइकाला राग येऊं न देतां त्याच्याशीं लाडीगोडी करून निदान दृश्य रोगचिन्हें नाहीत अशी खात्री वेश्येला करून घेतां येते. तशीं चिन्हें दिसल्यास मात्र ती त्या गिऱ्हाइकाला स्पष्ट सांगते की हें रोगचिन्ह आहे आणि रोग

बरा झाल्याशिवाय येथे येतां नये. अशा गिऱ्हाइकाचे पैसे परत देऊन त्याला तेथून घालवून देतात. तो मुकाट्याने न जातां गडबड करूं लागल्यास पोलिसाच्या मदतीने त्याला धक्के मारून घालवून देण्याचीहि त्यांची तयारी असते. यामुळे त्याला रोगावर उपचार करून घेणें भाग पडतें, कारण एरवी कोणत्याही वेश्यागृहांत घेणार नाहीत. इतकी खबरदारी घेतल्यामुळे वेश्यागृहांत रोगसंसर्ग झाल्याचीं उदाहरणें फारच क्वचित् सांपडतात. वेश्यागृहांत नेहमी टेलिफोन असतो, यामुळे पोलिसाला तावडतोब बोलावतां येतें. कांही वर्षांपूर्वी फ्रान्सच्या दोस्त राष्ट्रांपैकी एकाचा प्रतिनिधि पॅरिस येथील सर्वांत उच्च दर्जाच्या वेश्यागृहांत जाऊन थोडी जास्त शँपेन घेऊन तर्र झाला आणि वेश्यांना धमक्या देऊन दंगा करूं लागला. तेव्हा गिऱ्हाइकाच्या उच्च दर्जाला न जुमानतां चालकांनी पोलिसाला बोलावलें आणि त्यांनी त्याला तावडतोब पकडून पोलीसचौकीवर नेलें, तेव्हा तो शुद्धीवर आला. अर्थांतच ही बातमी वर्तमानपत्रांत आली नाही, परंतु त्याला इतकी लाज वाटली की त्याने आपण होऊन एक मोठी रकम त्या वेश्यागृहाच्या मालकिणीला पाठवली (वेश्यागृह चालवण्याचा परवाना फ्रान्समधें फक्त स्त्रियांनाच मिळतो. अर्थात् ती विवाहित असल्यास नवरा तिला मदत करतो, पण तो केव्हाहि पुढे येत नाही.) प्रत्येक वेश्येच्या खोलींत विजेची घंटा असते, यामुळे गिऱ्हाइक दांडगाई करूं लागल्यास तिला तावडतोब मदत मिळते.

एकंदरींत वेश्यागृहांतील वेश्यांची इतकी सुस्थिति असते की सुशिक्षित स्त्रियांना देखील पैसे मिळवण्याची जरूर वाटल्यास त्या कांही दिवसांपुरत्या वेश्यागृहांत राहून वाटेल तेव्हा सोडून जातात. त्यांच्यावर कोणत्याहि प्रकारची जबाबदारी नसते. यामुळे वेश्यांची कधीच तूट पडत नाही आणि कोणाहि स्त्रीला जबरदस्तीने किंवा फसवून तेथे आणून ठेवण्याची जरूर पडत नाही.

वेश्यांच्या वैद्यकीय तपासणीची व्यवस्थाहि हल्ली उत्तम असते. एका प्रख्यात डाक्तराने असें विधान केलें आहे की मध्यम लोकसंख्येच्या एका शहरांतील वेश्यागृहावर गेलीं पंचवीस वर्षें तो देखरेख करीत असतां इतक्या अवधींत

त्याला फक्त दोनतीनच संसर्गांचीं उदाहरणें सांपडलीं आणि तींहि विशेष महत्वाचीं नव्हतीं. तपासणी आठवड्यांतून दोनदां असते आणि त्या गृहांतील पांचसहा वेश्या तपासण्यांत प्रत्येक वेळीं तो दीड तास खर्च करीत असे. अर्थात् हें काम जितकें काळजीने होईल तितका संसर्गाचा धोका कमी. हा डाक्तर तर कोणाच्या हुकुमाची वाट न पाहतां आपण होऊन वेश्यांना रोगांबद्दल शक्य तितकी माहिती देत असे, यामुळे रोग ओळखण्यांत त्या तरबेज झाल्या होत्या.

कायद्याच्या दृष्टीने फ्रान्समधील पद्धतींत दोष आहेत यांत शंका नाही. पॅरिस येथे वेश्यांची व्यवस्था पोलिसावर सोंपवलेली आहे आणि सर्व नियम पोलिसचे अधिकारी करतात. इतर शहरांत ही व्यवस्था म्युनिसिपालिटीच्या आरोग्यखात्यांत येते. यामुळेच राष्ट्रसंघापुढे फ्रान्सच्या प्रतिनिधीला असें सांगतां आलें की कायद्याने वेश्यांवर नियंत्रण फ्रान्समधें नाही. म्युनिसिपालिट्यांना वाटल्यास वेश्यागृहांना परवानगी देतां येते, त्याचप्रमाणें वाटल्यास तीं बंदहि करतां येतील. ही त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे आणि असे प्रयोग ठिकठिकाणी केलेलेहि आहेत. याचा अधिक विचार पुढे येईल.

## जर्मनी

महायुद्धानंतर जर्मनींत पुष्कळच फरक झालेला आहे, तेव्हा त्या पूर्वीची व्यवस्था काय होती हें प्रथम पाहूं. नांव नोंदवल्याशिवाय वेश्यावृत्ति करणें हा जर्मनींत गुन्हा असे आणि वेश्यांनी वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे असा कायदा असे. या गृहांना फक्त मोठ्या शहरांतच आणि तेंहि शहराच्या विशिष्ट भागांतच परवानगी मिळत असे. या गृहांत डाक्तर व मॅजिस्ट्रेट वारंवार जाऊन देखरेख करीत व वेश्यांची तपासणी करीत. अशा गृहांत मादक पेयें विकण्याची परवानगी नसे. गृहांच्या चालकांनी कोणत्याहि स्त्रीस फसवून धंदा करायला लावल्यास किंवा अज्ञान मुलींना आंत घेतल्यास त्यांना जबर शिक्षा होई, आणि पुनः कधीहि वेश्यागृह चालवण्याची परवानगी मिळत नसे. एखाद्या वेश्येस रोग झाल्यास तें पोलिसास कळवण्याची आणि सांगितल्याप्रमाणे उपचार करण्याची जबाबदारी गृहाच्या चालकावर असे आणि एखाद्या वेश्येने रोग लपवल्यास तिला

तुरुंगाची शिक्षा असे. अशा गृहांत गिऱ्हाइकाची चोरी झाल्यास मालकाला नुकसानभरपाई करावी लागे, आणि एखाद्या वेश्येस धंदा सोडून जाणें असल्यास तिला कर्जाच्या किंवा कोणत्याहि सबबीवर अडथळा करतां येत नसे. परवानगीशिवाय धंदा करणाऱ्या वेश्यांस सक्त मजुरीची शिक्षा असे.

रोगांसंबंधी सक्तीची तपासणी व उपचार वगैरेबद्दल फ्रान्सच्या धर्तीवर कायदा १९०५ सालीं झाला, परंतु जर्मनींत वेश्यांस प्रथम डाक्तरांकडून उपचार करून घेण्यास सांगत आणि त्यांनी चुकारपणा केला तरच त्यांना जबरदस्तीने इस्पितळांत पाठवीत. वेश्येची नोंद पोलिसाला आपल्या अधिकारांत करतां येत नसे. कोर्टांत वेश्यावृत्तीचा पुरावा झाल्यावरच नोंद करतां येई. अर्थात् एखाद्या वयांत आलेल्या स्त्रीस स्वखुषीने नोंद करून घेणें असल्यास कोर्टाची मध्यस्थी लागत नसे, ताबडतोब नोंद करतां येत असे. या व्यवस्थेमुळे पोलिसाच्या अरेरावीला जागा रहात नसे. कोणी म्हणेल की कोर्टांत पुरावा होईपर्यंत ती वेश्या रोगप्रसार करण्यास मोकळी राहील, पण जर्मनींत कोणाबद्दलहि रोगाची शंका आल्यास त्यावर कायद्याने देखरेख ठेवतां येत असे.

पोलीसच्या परवानगीशिवाय कोणींहि वेश्यांस भाड्याने जागा देतां नये असा कायदा होता, आणि घराच्या मालकाने त्यांजकडून भाड्याशिवाय कांहीहि घेतां नये, त्यांस अन्न पुरवतां नये, आणि सोडून जाण्यास आडकाठी करतां नये, असाहि कायदा होता.

अज्ञान मुलींसंबंधी जर्मनींत फ्रान्सचेहि अगोदर म्हणजे १९०० सालीं कायदा झाला होता. या कायद्याने १८ वर्षांचे आंतील मुली वेश्येचा धंदा करतांना आढळल्यास त्यांना अटक करतां येत असे आणि नंतर त्यांचेवर २१ वर्षांपर्यंत देखरेख ठेवतां येत असे. अशा मुलींस पालकांकडे परत पाठवीत, किंवा विशिष्ट संस्थांत ठेवीत, किंवा एखाद्या कुटुंबांत नोकरी लावून देत. १८ पेक्षा जास्त आणि २१ पेक्षा कमी वयाची स्त्री मात्र वेश्यावृत्ति करतांना आढळल्यास तिला शिक्षा होई व तरीपण तिने न ऐकल्यास तिची नोंद करीत. नोंदीचा कायदा वास्तविक असा होता की परवानगीशिवाय वेश्यावृत्ति केल्याबद्दल जिला शिक्षा झाली आहे,

अशाच स्त्रीची नोंद करावी. परंतु २१ पेक्षा जास्त वयाची स्त्री आपण होऊन नांव नोंदवण्यास आल्यास प्रथम तिला शिक्षा करून नंतर नांव नोंदण्याऐवजी एकदमच नोंदीत. ही कायद्याने चूक असली तरी समंजसपणा आहे.

शिस्तीच्या दृष्टीने पुढील कायदे केलेले होते. वेश्यांनी रस्त्यांत किंवा इतर सार्वजनिक ठिकाणीं असभ्य वर्तन करतां नये, रस्त्यांत गिऱ्हाईक गांठण्याचा प्रयत्न करतां नये, इतर वेश्यांबरोबर किंवा मध्यस्थांबरोबर दिसतां नये, विशेष कारणाशिवाय अमुक रस्त्यांतून हिंडतां नये, शाळा, देवळें, सार्वजनिक इमारती वगैरेंचे आसपास रेंगाळतां नये, अशा इमारतींजवळ असलेल्या नाटकगृह, सर्कस वगैरे ठिकाणीं जातां नये, अज्ञान मुलांशीं कोणताहि संबंध ठेवतां नये, त्यांनी कोणत्याही वेळीं पोलिसास घरांत येऊं दिलें पाहिजे आणि तेथे हजर असलेल्या सर्व माणसांची माहिती दिली पाहिजे, सार्वजनिक इमारतींजवळ त्यांनी राहतां नये, आणि पोलिसाने सांगितल्यास घर बदललें पाहिजे. यांपैकी कोणताहि नियम मोडल्यास सहा आठवडेपर्यंत तुरुंगाची शिक्षा होई आणि ती संपल्यावर पोलिसच्या मर्जीप्रमाणे एकाद्या कार्यगृहांत दोन वर्षेपर्यंत काम करावें लागे. ही पद्धत म्हणजे कायदेबाजीचा कडेलोट होता.

युद्धोत्तर जर्मनींत जो सर्व प्रकारचा गोंधळ माजला, त्याचा परिणाम या कायद्यांवरहि झाला. या कायद्यांचा उद्देश काय किंवा सरकारला काय करायचें होतें, हें त्यांचें त्यांना तरी धड माहीत होतें की नाही याबद्दल शंका वाटण्यासारखे फरक कायद्यांत होत गेले. कायदेबंदीबद्दल पुढे सविस्तर विचार येईल. तिचा परिणाम जर्मनीवर होऊन त्या अनुरोधाने कायदे झाले. हा सोंवळेपणा जर्मनींत या वेळीं प्रथमच आला असें मात्र नाही, त्यापूर्वीहि असे प्रयत्न झाले होते. उदाहरणार्थ अशीच एक सोंवळेपणाची लाट जर्मनींत १८४६ सालीं आली होती. त्यावेळीं सर्व वेश्यागृहें बंद केलीं होतीं आणि वेश्यावृत्ति हा गुन्हा समजून वेश्येला हद्दपारीची शिक्षा सांगितली होती. अर्थात् वेश्या चोरून धंदा करूं लागल्या आणि आपण पैसे मुळीच घेत नाही, केवळ प्रेमासुळे संबंध ठेवतों, असें ढोंग करूं लागल्या. या कायद्यामुळे १८४९ पर्यंत सैन्यांत गर्मीचा प्रसार इतका

झाला की त्यामुळे अधिकारी घाबरले. आणि हें अपरिहार्य होतें, कारण वेश्यांची तपासणी बंद होऊन वेश्यावृत्ति हा गुन्हा ठरवल्यामुळे, रोग झाला तरी पुरवला पण डाक्तराकडे जाणें म्हणजे संकट ओढवून घेणें होय असें वेश्यांस वाटूं लागलें. याच्या परिणामीं १८५० सालीं वेश्यागृहांना पुनः परवानगी मिळाली आणि नोंदणी व तपासणी फ्रान्सप्रमाणेच सुरू झाली. महायुद्धापूर्वी जर्मनींतलि वेश्यागृहें म्हणजे आरोग्याच्या आणि टापटिपीच्या दृष्टीने आदर्श समजण्यासारखीं होतीं. उदाहरणार्थ युद्धापूर्वी फ्रान्समधें, विशेषतः लष्कर असलेल्या शहरांत, वेश्यागृहांतील पानगृहांत आरडाओरडा बराच असे, पण जर्मनींत अशा प्रकारची अव्यवस्था बिलकुल दिसत नसे. जर्मनींतील विद्यार्थी दंगल करण्याबद्दल प्रसिद्ध असत, पण वेश्यागृहांत मात्र लोक अत्यंत सभ्यतेने वागत. अशा तऱ्हेने या दोन्ही पद्धतींची पूर्वी तुलना होऊन तपासणीची पद्धत निःसंशय श्रेयस्कर ठरली असूनहि पुनः सोंवळेपणाची आणखी एक लाट आल्याबरोबर हा अनुभव असून नसून सारखाच व्हावा, हें जर्मनीसारख्या शास्त्रीय प्रगतीची आणि बुद्धिवादाची ऐट मारणाऱ्या देशाला खरोखर लांछनास्पद आहे.

या नवीन लाटेचे वेळीं जो कायदा झाला त्याने कांही शहरांत फक्त वेश्यागृहें बंद झालीं आणि वेश्यागृहांतील वेश्या रस्त्यांत आल्या. वेश्यागृहांत ज्यांची खाणेंपिणें, कपडालत्ता, औषधपाणी वगैरे सर्व बाबतींत उत्तम व्यवस्था होती, त्यांना आतां ही सर्व व्यवस्था स्वतः पहावी लागल्यामुळे त्यांना हें स्वातंत्र्य नकोसें झालें. कित्येक शहरांत वेश्यागृहें बंद करण्याचा अर्थ इतकाच झाला की त्याच वेश्या खोल्यांत स्वतंत्र भाडेकरी म्हणून राहिल्या आणि अर्थात् स्वतंत्र नागरिक या दृष्टीने आपल्या खोलींत वाटेल त्याला आणण्याची त्यांना परवानगीच होती. वेश्यागृहाची मालकीण स्वतःला होटेलाची मालकीण म्हणवूं लागली इतकेंच. अशा गृहांत थोडक्या वेळापुरती म्हणजे १५ मिनिटें, अर्धा तास, एक तास, किंवा एक दिवस, एवढ्यापुरतीच भाड्याने खोली मिळते आणि वेश्या याचा उपयोग करतात आणि वेश्या तेथे रहात नसल्यामुळे त्यांना वेश्यागृहें म्हणतां येत नाही. वेश्यावृत्तीवर उपजीविका करण्याविरुद्ध जो कायदा सर्वत्र सांपडतो, त्यांतून त्यांतले दर्दी तेव्हाच निसटतात आणि कधीकधी निरपराधी लोक मात्र त्यांत

सांपडतात. उदाहरणार्थ एक वयांत आलेली मुलगी आपल्या आईजवळ राहून, ती घरीं नसेल तेव्हा आपल्या मित्रांना घरीं बोलावीत असे. ते तिला पैसे देत असले पाहिजेत, तेव्हा ती वेश्येचा धंदा करते, आणि आई त्या उत्पन्नावर राहते, अशी तक्रार कांही उपद्व्यापी शेजाऱ्यांनी केली आणि आईला नोकरी होती तरी-सुद्धां, आणि वयांत आलेली मुलगी तिच्या परवानगीशिवाय पाहिजे तें करूं शकते असें असून सुद्धां, त्या आईला मुलीच्या वेश्यावृत्तीवर उपजीविका करण्या-बद्दल शिक्षा झाली, आणि त्या मुलीला कांही झालें नाही, कारण मुलगी स्वतंत्र होती. आईने तिला घरांतून घालवून दिलें नाही ही आईची चूक!

वेश्यागृहें बंद केल्याचा एक परिणाम जर्मनींत असा झाला की वेश्या सर्वस्वी मवाल्यांच्या ताब्यांत गेल्या. यूरोपांत ज्याला 'खालचें जग' म्हणतात (अंडर वर्ल्ड) त्या मवाली जगांत सर्व प्रकारचे चोरटे धंदे करणारांचा समा-वेश होतो, आणि जेथे वेश्यांना कायद्याचा पाठिंबा नसतो तेथे त्यांना नेहमी या लोकांचा आश्रय पतकरावा लागतो, आणि त्यांचें न ऐकल्यास ते काय करतील याचा नियम नसतो. वेश्यांना त्यांच्या सल्ल्यानेच धंदा करावा लागतो आणि त्यांना कर द्यावा लागतो. हें मवाली जग सर्व देशांत सांपडतें आणि कोणत्याहि बेकायदा चळवळींत त्यांचें अंग असतें.

वेश्यागृहें बंद करतांना रोगांवर फुकट उपचारांचीहि व्यवस्था केली होती, निदान कायद्यांत असें सांगितलें होतें की कोणालाहि नांव न सांगतां फुकट औषधें मिळण्याची सोय तेथे होईल. पण हे दवाखाने स्वतंत्र निघायचे होते ते कधीं निघालेच नाहीत, आणि फुकट उपचारांची व्यवस्था इस्पितळांतच करण्यांत आली आणि याचा परिणाम असा झाला की तेथे नांव गुप्त राहण्याचा संभव फारच थोडा असल्यामुळे लोक तेथे जाईनात. तेव्हा फुकट उपचारांच्या व्यव-स्थेचा उपयोग झाला नाही आणि रोगांचें प्रमाण वाढतच गेलें. सक्तीच्या तपा-सणीचा एक परिणाम असा असतो की ती केवळ तपासणीच नसते, त्या तपा-सणीचे वेळीं वेश्यांस रोगप्रतिबंधाची तपशीलवार माहिती मिळते, आणि या बाबतींत औषधापेक्षा प्रतिबंधाचाच उपयोग जास्त होतो. याचे अभावीं जर्मन लोकांचें आरोग्य अधिकाधिक खालावत गेलें.

अशा वेळीं हिटलरच्या हातांत सत्ता आली. त्याने आपल्या भोंवतीं सगळे सोंवळे लोक जमा केले. त्याने कायद्यांत कोणताहि फरक न करतां आपल्या नेहमीच्या घमेंडखोर पद्धतीने कॅसेल येथील भाषणांत बढाई मारली की 'जर्मन स्त्रिया देहविक्रय करीत नाहीत!' पूर्वी जेव्हा वेश्यागृहें बंद झालीं होतीं, त्या वेळीं खुद्द वेश्याच हे शब्द आपल्या बचावाकरतां वापरीत असत. तो इतकेंच करून थांबला नाहीं, त्याने मवाली जगावरही हात उचलला आणि कॉम्युनिस्टांप्रमाणेच मवालीहि 'कॉनसेंट्रेशन कँप'ची हवा खाण्यास गेले. परंतु बहुतेक कॉम्युनिस्टांनी आणि मवाल्यांनीहि हिटलरच्या बाजूने बोलायला सुरवात केली, आणि हिटलरच्या अत्याचारांतून मवाल्यांचा फायदाच झाला, कारण हिटलरच्या लोकांनी कोटेहि लूट केली तरी त्यांत हे होतेच! डॉ. मॅग्नुस् हिर्शफेल्ट्‌च्या घरांत लूटमार करून त्याचा ग्रंथसंग्रह जाळून टाकण्यांत मवालीच जास्त होते. यामुळे लोकांचा मात्र समज असा झाला की हिटलरच्या बाजूला तावडतोब इतके लोक मिळाले, तेव्हा तो किती मोठा असला पाहिजे! पूर्वी धंद्याकरतां रस्त्यांत हिंडणाऱ्या वेश्या आतां हिटलरचें चित्र छातीवर लावून देशभक्त म्हणून मिरवूं लागल्या. म्हणून त्यांनी आपला धंदा सोडला नाही!

तरीपण १९३४ सालीं त्याने विशेष कुप्रसिद्ध झालेलीं पानगृहें वगैरे कायद्याने बंद केलीं, आणि आपल्या बाजूच्याहि कांही लोकांना लांच खाण्याच्या किंवा वाईट वर्तणुकीच्या सबबीवर मृत्युदंड दिला. अर्थात् त्याला ज्यांची राजकीय दृष्ट्या भीति वाटत होती असेच लोक त्यांत सांपडले, कारण सर्वच दुराचारी लोक ठार करायचें ठरवलें असतें तर त्याच्या बाजूला लोकच शिल्लक राहिले नसते. तेव्हा जे त्याचे खरोखर पुरस्कर्ते होते त्यांची वागणूक कशीहि असली तरी ती चालत असे. अर्थात् संकेतगृहें चालूच होतीं, पण त्यांना आपण होऊन हिटलरला पैशाची मदत करावी लागत असे. परंतु हीं संकेतगृहें फारच थोडीं असणार, आणि वेश्यागृहांची जागा त्यांनी भरून निघणें अशक्य आहे, कारण हीं संकेतगृहें गरिबांच्या उपयोगी नसतात. वेश्यागृहें बंद केलीं म्हणजे लोकांच्या गरजा बंद होत नाहींत आणि सामाजिक सुव्यवस्थेवर याचा परिणाम कधीच चांगला होत नाही. शिवाय क्रांतीच्या वेळीं

जेव्हा सर्वच अव्यवस्था माजलेली असते, अशा वेळीं वेश्यागृहें बंद केल्यानें लोक आपल्या गरजा भागवण्याचे वेगळे मार्ग काढतात, आणि इतर बंधनें शिथिल झाल्यामुळें सभ्य समजलेलीं स्त्रीपुरुषें आपआपसांत एकमेकांच्या गरजा भागवूं लागतात. यासंबंधी कांही माहिती रोमन कॅथोलिक भटांकडून कळूं लागली होती, कारण त्यांच्याजवळ सर्वांनी आपलीं पापें कबूल करायचीं असतात. पण या माहितीला लवकरच बंदी झाली, कारण हिटलरने काढलेल्या सक्तीच्या कार्यालयांत काम करणाऱ्या मुलांमुलींसंबंधीच ही माहिती विशेष भयप्रद वाटण्याचा संभव होता, आणि त्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या बाबतींत पुरुषच नेहमी पुढाकार घेत होते असें नाहीं. अशा कामावरून मुलगी गरोदर होऊन परत आली म्हणजे आईबापांनी तक्रार करावी, भटांनी धर्म बुडाल्याची ओरड करावी, पण एकंदर हिटलरी दंग्यांत त्याकडे लक्ष द्यायला कोणाला फुरसत होती ?

१९३५ सालीं हिटलरने व्हेर्सायचा तह गुंडाळून ठेऊन आपलें सैन्य पुनः तयार केलें, आणि लष्करी कामाची सर्वांवर सक्ती असल्यामुळे लष्करी अंमल सर्वत्र सुरू झाला. युद्धापूर्वी जेथेजेथे लष्कराची तुकडी, तेथेतेथे वेश्यागृह हें असायचेंच, त्याचप्रमाणें आतांहि लष्करावरोबरच वेश्यागृहांचेंहि पुनरुज्जीवन झालें, आणि वेश्यांना सरकारी परवाने मिळाले. आतां मात्र वेश्याबंदीच्या पुरस्कर्त्यांना जर्मनीचें उदाहरण दाखवतां येणार नाही. डॉ. गोएबेल्स् ने याला विरोध केला. पण जर्मनींत लष्करापुढे कोणाचीहि लटपट चालत नाही. बर्लिन शहरांत वेश्यागृहांची सर्व युद्धपूर्व व्यवस्था अंमलांत आली आहे, आणि हीं वेश्यागृहें फक्त लष्करी लोकांकरतांच नाहींत, तीं सर्वांना मोकळीं आहेत.

## इंग्लंड

ढोंगी सोंवळेपणांत इंग्लंडचा नंबर पहिला लागतो आणि अमेरिका ही मूळची इंग्लंडचीच वसाहत असल्यामुळे या बाबतींत फक्त अमेरिकाच इंग्लंडशीं स्पर्धा करूं शकते. इंग्रज मनुष्य नेहमी सभ्य ( जन्टल्मन् ) दिसण्याची खटपट करीत असतो आणि अर्थात् हा सभ्यपणा पुष्कळ वेळां केवळ दिखाऊ असतो.

वेश्यांसंबंधी कोणतेहि कायदे केले नाहीत म्हणजे वेश्याच नाहीत, अशी इंग्रज लोक आपली समजूत करून घेतात. व्हिक्टोरिआ राणी ही सोंवळ्यांतली सोंवळी होती. तिच्या राज्यांत १८६६ पर्यंत वेश्यांसंबंधी कायदे नव्हते. इंग्लंडांतील स्वातंत्र्याच्या कल्पनांमुळे वेश्यांवर नियंत्रण घातलेलें नाही असें इंग्रज लोक म्हणतात, परंतु हें खरें नाही. वर सांगितलेलें सोंवळेपणाचें ढोंग हें त्याचें खरें कारण आहे. परंतु कायदे न केल्याचा परिणाम असा झाला की इंग्लंडांत रोगांचें प्रमाण अतिशय वाढलें. लष्करांत हें प्रमाण शेंकडा ४० आणि आरमारांत शेंकडा २५ होतें. पण रोगांसंबंधीहि इंग्रजांची वृत्ति अशीच, की सभ्य माणसाने या रोगांचें नांव घेतां नये. आणि शिवाय लोकांना हे रोग होतात ते त्यांच्याच कर्मामुळे होतात, ती अनीतीबद्दल योग्य शिक्षा आहे, अशी धार्मिक शिकवणहि होतीच. गर्मीवर यशस्वी उपचार सांपडले तेव्हा या धार्मिक लोकांना मोठी भीति पडली की आतां दुराचाराला मोकळीकच होईल !

पण शेवटीं रोगांचें प्रमाण इतकें भयंकर झालें की रोगप्रतिबंधाचे मिषाने त्यांना वेश्यांसंबंधी कायदा करावा लागला, आणि १८६६ सालीं 'कॉंटेजिअस डिझीझेस ॲक्ट' नांवाचा कायदा पास झाला. हा फक्त लष्कर व आरमार असलेल्या तेरा शहरांना व बंदरांना लागू केला आणि लंडन शहरांत तो लागू नव्हता. या कायद्याने वेश्यांना सक्तीची तपासणी लागू केली आणि त्यांपैकी कोणाला रोग दिसल्यास सांसर्गिक स्थिति नाहीशी होईपर्यंत त्यांना सक्तीने इस्पितळांत जावें लागे. सांसर्गिक स्थितींत समागम करण्याबद्दल एक ते तीन महिने तुरुंगाची शिक्षा असे. हा कायदा विशेष कडक रीतीने अंमलांत आला नव्हता, तरी देखील तो वैयक्तिक स्वातंत्र्याच्या आड येतो या सबबीवर मिसेस जोजेफीन बटलर, फ्लॉरेन्स नायटिंगेल, प्रभृति बायांनी त्याविरुद्ध मोहीम सुरू केली आणि या दृष्टीने एक स्त्रियांची संस्था स्थापन केली. यांत ब्याच बड्या बायका होत्या. त्यांचें म्हणणें असें की या कायद्याने 'युनाइटेड किंग्डम' मधील सर्व स्त्रियांचा उपमर्द होतो. या बायांनी व्हिक्टोरिआ राणीवर सहज वजन पाडलें, आणि जेव्हा यानंतर मंत्रिमण्डळाने फ्रान्सच्या धर्तीवर सर्वत्र लागू होणारा कायदा तयार करून त्यावर राणीची सही मागितली, तेव्हा ज्यांत वेश्यांचें

नांव आहे अशा कायद्यावर माझी सही मागणें हा माझा उपमर्द आहे, म्हणून राणीसाहेब संतापल्या. अर्थात् हे मन्त्री अत्यंत सभ्य असल्यामुळे त्यांनी या विषयाची पार्लमेंटांत चर्चा होऊं देण्याऐवजी तो लांबणीवर टाकला. इतकेंच नव्हे तर या स्त्रियांच्या संस्थेने वरील तेरा शहरांतहि वैद्यकीय तपासणी १८८३ सालापासून बंद करायला लावली, आणि अशा अर्थाचा एक कायदा १८८६ सालीं कॉमन्सच्या सभेंत पास करून घेतला आणि वेश्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें. तथापि हें स्वातंत्र्य केवळ नांवाचें होतें, कारण रस्त्यांत कोणाशीं बोलून त्यांनी गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना ४० शिलिंग दंड ठेवला होता. कायदा असा होता की ' जी सामान्य वेश्या लोकांना अडवून, तेथील रहिवाश्यांना किंवा रस्त्याने जाणारांना अडथळा किंवा धोका उत्पन्न करील, किंवा त्रास देईल, तिला वारंटाशिवाय गिरफ्तार करण्याचा अधिकार पोलीसच्या शिपायांना आहे आणि तिला संक्षिप्त चौकशीनंतर ४० शिलिंग दंड किंवा १५ दिवस तुरुंगाची शिक्षा होईल. ' खुद्द लंडन शहरांत तिने गिऱ्हाईक मिळवलें असें सिद्ध न झालें तरी शिक्षा होऊं शकते. याशिवाय रस्त्यांत किंवा कोणत्याहि सार्वजनिक ठिकाणीं एखादी वेश्या आरडाओरडा करील किंवा असभ्य रीतीने वागेल तर तिला १८२४ चा भटक्यांचा कायदा लावतां येईल, असा कायदा १८९८ सालीं करून घेतला. पण तशाच तऱ्हेने एखादा पुरुष रस्त्यांत एखाद्या स्त्रीशीं बोलल्यास त्याला शिक्षा होत नाही. वरील कायद्याप्रमाणे पोलीसला वाटल्यास वेश्यांना रस्त्यावर फिरकूं न देण्याची व्यवस्था करतां येईल असें दिसतें. पण वास्तविक पाहिलें तर गिऱ्हाईक मिळवणें हा गुन्हा आहे असें कायद्यांत सांगितलेलें नाही. शिवाय ती वेश्या आहे हें सिद्ध करावें लागतें आणि वेश्यांची नोंद नसल्यामुळें तें कठिण जातें. ती गिऱ्हाईक मिळवण्याकरतां रस्त्यांत हिंडत होती आणि तिच्या वागणुकीमुळे लोकांना त्रास झाला, असेंहि सिद्ध करावें लागतें, तरच कायदा लागू होतो. हा पुरावा जवळजवळ अशक्य आहे, कारण मला त्रास झाला असें सांगणारा साक्षीदार मिळणें कठिण. त्रास झाला असला तरीहि कोर्टांत तशी साक्ष देण्यास लागणारें धैर्य फार थोड्यांना असतें, आणि जर का पोलीसाने एखाद्या बाईला चुकून पकडलें, तर पोलीसावर लोकांचा रोष होतो,

3622 अक्षरस्पर्श ग्रंथालय
40/1 B, भोंडे कॉलनी, कर्वे रोड,

वर्तमानपत्रांत ओरड होते, आणि त्याची दाद पार्लमेंटपर्यंत देखील पोंचते. शिवाय या कामाकरतां इतर देशांप्रमाणे वेगळें पोलीस नसतें आणि गणवेश घातलेल्या नेहमीच्याच शिपायांना हें काम करावें लागतें. या सर्वांचा परिणाम म्हणजे वरील कायद्याची अंमलबजावणी अशक्य होते आणि पोलिसाला वेश्यांकडे कानाडोळा करावा लागतो. फ्लेक्स्नरनें आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे की ' ट्रॅफाल्गार स्क्वेअर, ऑक्सफर्ड सर्कस, रिजन्ट सर्कस, आणि आगगाडीचीं टाणें, वगैरे ठिकाणीं वेश्यांची रहदारी भरपूर असते. '

तथापि सातवा एडवर्ड १९०१ सालीं गादीवर आल्यावर त्याने वैद्यकीय तपासणीसंबंधी हुकुमावर सही करण्यास हरकत घेतली नाही, आणि तेव्हापासून तपासणी सुरू झाली. ती वेश्यागृहांत व इतर वेश्यांसहि लागू होती पण ती विशेष कडक रीतीने अंमलांत आली नाही. वेश्यागृहांविरुद्ध १८८५ सालीं कायदा केल्यामुळें इंग्लंडांत वेश्यागृहें नसतील अशी कोणाची कल्पना होईल, पण सोंवळा फ्लेक्स्नर काय लिहितो पहा. " इंग्लंडांत वेश्यागृहांविरुद्ध कायदा आहे आणि वेश्यागृहाची व्याख्या अशी की जेथे पुरुष व स्त्रिया वेश्यावृत्तीच्या उद्देशाने जातात असें गृह. तें सबंध घरच असलें पाहिजे असें नाही, एखादी खोली देखील या व्याख्येंत येईल, पण जेथे एकच स्त्री राहून तिच्याकडे समागमाच्या उद्देशाने लोक येतात असें गृह, किंवा जेथे एकएक खोली एकएका वेश्येला वेगळी भाड्याने दिलेली आहे आणि जेथे मालक रहात नाही आणि त्यांच्यावर कोणाचीहि देखरेख नाही असें गृह, या व्याख्येंत येत नाही. यावरून हें उघड होतें की वेश्यागृह चालवून त्यांतून फायदा काढणारा तिसरा कोणीतरी असेल तर त्याला मात्र शिक्षा होते. वेश्येने आपल्या घरीं पाहिजे तितक्या लोकांना येऊं द्यावें, त्यांत कायद्याचा संबंध नाही. पण तिच्या देखरेखीखाली इतर वेश्या असल्यास तो मात्र गुन्हा आहे. तेव्हा वेश्यांच्या जिवावर उपजीविका करणारांस मात्र इंग्लंडांत शिक्षा आहे. वेश्यांना धंदा करण्यास पूर्ण मोकळीक आहे. " सर्वांत आश्चर्य हें की नीतिबाज फ्लेक्स्नरला ही पद्धत पसंत आहे. तरी तो स्वतःच म्हणतो की इंग्लंडांत बेकायदा गुप्त वेश्यागृहें नाहीत असे नाही, परंतु त्यांना नेहमी कायद्याचें भय असतें आणि तीं राजरोस व्यवहार करूं शकत नाहीत. वेस्ट एंड ( लंडनचा श्रीमंत भाग )

मध्यें श्रीमंत लोकांकरतां अशी कांही गृहें आहेत, पण तेथे कोणाला ओळखी-
शिवाय जातां येत नाही. हेमार्केटच्या बाजूला तर अशीं गृहें पुष्कळच आहेत.
तीं मर्दनगृहें, स्नानगृहें, परकी भाषा शिकवण्याचे वर्ग, वगैरे वेगवेगळ्या
मिषाने हा धंदा करतात, परंतु त्यांतल्या दर्दी लोकांना तीं तावडतोब ओळखूं
येतात. या गृहांच्या मालकिणी वर्तमानपत्रांत जाहिराती देखील देतात,
इतकेंच नव्हे तर सिनेमाच्या जाहिरातींप्रमाणे मोठमोठ्या पाट्या दोन बाजूला
घेऊन माणसेंहि रस्त्यांत हिंडतात. हें सर्व पोलिसालाहि चांगलें माहित
असतें, पण शिस्तीचा बिघाड झाला नाही तोंपर्यंत ते गप्प बसतात. वेश्यां-
संबंधी कायद्यांना विरोध करणाऱ्या देशांत बहुधा वेश्यागृहें बंद करतात
आणि वेश्यांना रस्त्यांत गिऱ्हाईक गांठूं देत नाहीत, पण इंग्लंडांत या दोन गोष्टी
केवळ नांवाला अंमलांत आणलेल्या आहेत. याचा परिणाम इतकाच होतो की
वेश्यांवर कोणत्याहि प्रकारची देखरेख न राहिल्यामुळे रोगसंसर्गाचा बिलकुल
प्रतिबंध होत नाही. हीं चोरटा धंदा करणारीं स्नानगृहें वगैरे फ्रान्समध्यें नाहीत
असें नाही, पण त्यांना अशी जाहिरातबाजी करण्याचें धाडस मात्र होणार नाही.

इंग्रज लोक कितीहि सोंवळे असले तरी त्यांना कामेच्छा नसते असें नाही.
गेल्या युद्धाच्या वेळीं इंग्रज सैन्याने जो प्रदेश व्यापला होता, तेथील वेश्यागृहांनी
घाईने आणखी कुमक मागवली असतांही तीं ब्रिटिश सैन्याला पुरणें कठिण झालें
आणि कांही लोकांनी आणखी वेश्यागृहें स्थापन करून खूप पैसे मिळवले, पण
तरी देखील तीं पुरलीं नाहीत. तेव्हा ब्रिटिश सैन्याधिकाऱ्यांना याची आणखी
व्यवस्था करावी लागली, आणि अखेर सैन्यांतील तीन दर्जाच्या अधिकाऱ्यांकरतां
तीन दर्जाचीं वेश्यागृहें त्यांनी प्रस्थापित केलीं व शिपायांकरतां आणखी वेगळीं
गृहें होतीं, अशी हकीकत फ्रेंच सरकारने युद्धाच्या इतिहासांत नमूद केलेली आहे.
याकरतां इंग्लंडांतून तरुण स्त्रिया मागवलेल्या होत्या, आणि त्याहि जायला उत्सुक
होत्या. त्यांना एक प्रकारचा गणवेश दिलेला होता. आणि त्यांतील ज्या गरोदर
होतील त्यांना परत पाठवीत असत. त्यांना मूल नको असलें तर त्याची सार्व-
जनिक व्यवस्था होत असे आणि तें स्वतःला वाढवायला पाहिजे असलें तर फ्रान्स-
मध्यें परत जावें लागत नसे आणि पेन्शन मिळत असे. तेव्हा इंग्रज वागणुकींत

सोंवळे नसतात, हें लक्षांत घेतां सोंवळे कायदे केल्याचा परिणाम काय होईल हें सहजच दिसतें.

१९३५ सालापर्यंत इंग्लंडमधील स्थिति याच सामान्य तत्वाला धरून होती की जें कायद्याला दिसत नाही तें नाहीच असें समजायला हरकत नाही. इंग्लंडांत हल्ली वेश्यागृहें नाहीत याला राष्ट्रसंघ साक्ष देईल, तरीपण कोणीहि परका मनुष्य इंग्लंडांतील कोणत्याहि बंदरांत उतरला असतां जगांतील इतर कोणत्याहि बंदराप्रमाणे वेश्यांचे बाबतींत त्याची सोय होते. बंदरांत गिऱ्हाइकांची विशेष गर्दी असल्यामुळे फ्रान्समध्यें अशा वेश्यागृहांची तपासणी आठवड्यांतून दोनदां कायद्याप्रमाणे करून न थांबतां, वेश्यागृहांचे चालक स्वतःच्या डॉक्टरा-कडून दररोज तपासणी करवतात, कारण एकएका गृहांत ५०–६० पर्यंत वेश्या असतात. पण इंग्लंडांत मात्र वेश्यागृहांत जातांना कोणींहि रोग होण्याचा संभव आहे असें समजूनच जावें. अर्थात् सोंवळे लोक म्हणतात की हे ठीकच आहे, पापी लोकांची आम्हीं कां फिकीर करावी ? पण पापी लोकांच्या कुटुंबांना त्यापा-सून त्रास होतो, आणि त्यांनी तरी निदान पाप केलेलें नसतें, हें त्यांच्या मठ्ठ डोक्यांत शिरत नाही. अर्थात् पुष्कळ लोकांची वृत्ति अशीच असते की रोगांची भीति असते खरी, पण ती इतर लोकांना. आपल्या स्वतःला रोग व्हायचा संभव नाही, असेंच ते रोग होईपर्यंत मानीत असतात. लोक मोटारीखाली सांपडून मरतात हें माहीत असूनहि जसे रस्त्यांत निष्काळजीपणाने चालणारे लोक पुष्कळ भेटतात, तसेंच हें ! इंग्लंडांतील बंदरांत वेश्यागृहें बहुधा पानगृहांना लागून असतात, आणि तेथे वेश्या राहतात हें पोलिसाला माहीत असतें इतकेंच नव्हे, तर पोलीसच्या अनुमतीनेच त्या तेथे राहतात आणि काय-द्याने सक्ती नसली तरी त्यांनी वैद्यकीय तपासणी स्वतः करून घेऊन आरोग्य राखलें तरच पोलीस त्यांकडे कानाडोळा करतें. सारांश पूर्वी कायद्याने जी व्यवस्था केलेली होती, तीच आतां कायद्याशिवाय आहे. मात्र ती फक्त लष्करी आणि आरमारी शहरांत आहे, इतर ठिकाणीं नाही. तेव्हा लंडनमधील पोलीसला असें जोराने सांगतां येतें की आम्ही कायदा कडक रीतीने अंमलांत आणतों. ज्या गृहांवर कोणतीहि देखरेख नाही, तीं आम्हाला माहीतच नाहीत असें सरळ

म्हणतां येतें. यांत ढोंग असेल, पण ढोंगी सोंवळेपणावरच ही एकंदर पद्धत आधारलेली आहे. अर्थात् कोणी शिस्त मोडली तर मात्र त्यावर खटला होतो, आणि अशा वेळीं भरपूर दंड आणि सक्त मजुरीची देखील शिक्षा होते, आणि ही आणखी एक बढाई मारण्यासारखी गोष्ट होते. परंतु अशा शिक्षा फारच थोड्यांना होतात, कारण कायदा कसा टाळावा हें त्यांतल्या दर्दी लोकांना उत्तम कळतें. पण शिष्ट इंग्रज याचा अर्थ असा करतात की इतक्या थोड्या लोकांना शिक्षा होतात यावरून कायदा उत्तम रीतीने पाळला जातो. आणि सामान्यतः अशा गोष्टी लोकांना न कळतील तितक्या बऱ्या, असेंच पोलिसाचें धोरण असतें. उदाहरणार्थ कांही वर्षांपूर्वी बड्या समाजांतील एका बाईने आपल्या घरीं खालच्या दर्जाच्या वेश्या बोलावून कांही देखावे दाखवण्यास सुरवात केली असतां कोर्टाने तिला फक्त दोन महिन्यांची साधी कैद दिली, आणि ती सुद्धां बड्या समाजांत खालच्या प्रतीच्या वेश्या आणल्याबद्दल. ज्यांना आपला हलका दर्जा कांही वेळ तरी लपवतां येईल अशा बाया तिने आणल्या असत्या तर तितकीहि शिक्षा झाली नसती ! वास्तविक ती आणि तिच्या बरोबरच लंडनमधील पोलीसचा बडा अधिकारी कायद्याच्या तावडींत सांपडण्याचें मुख्य कारण असें होतें की तेथे केवळ वेश्यांचाच धंदा चालत असे असें नाही. त्याशिवाय बेकायदा दारू विकून सरकारला फसवण्याचाहि धंदा त्यांतच होता, आणि अर्थातच इंग्रज सरकार पैशाचे बाबतींत फार कडक असतें. शिवाय या वेळीं जरी हा अधिकारी सांपडला, तरी अमेरिकेचे मानाने इंग्लंडमधील पोलीस खातें अधिक प्रामाणिक असतें यांत शंका नाही. अमेरिकेचें वर्णन पुढे येईल.

इंग्लंडांत पोलीस वेश्यांकडे कानाडोळा करतें हें कांहीच नव्हे. लंडन शहरांत हाइड पार्क नांवाची ३६० एकर विस्ताराची जी मोठी बाग आहे, तेथे अंधाराचे वेळीं प्रेमी जोडप्यांचे विलास कोणालाही दिसतात आणि हें पोलिसालाहि माहीत असतें. वेश्यावृत्ति कडक रीतीने बंद केल्यास काय प्रकार होतील याचा अंदाज यावरून करतां येतो. चोरट्या वेश्यागृहांबरोबरच इंग्लंडांत संकेतगृहेंहि आहेत व तेथे रात्रभर किंवा तासभर देखील खोली भाड्याने मिळूं शकते. फ्रान्समधें अशा गृहांत बहुधा स्त्रीपुरुषें एकदम किंवा एकामागून एक येतात आणि

पुरुषांना वेश्या पुरवण्याची वेळ बहुधा येत नाही. इंग्लंडांतील सोंवळेपणामुळे स्त्रीपुरुषांना बाहेर संकेत करणें कठिण जातें, आणि पुरुष एकटाच अशा संकेत-गृहांत आल्यास आणि त्याने तशी इच्छा दर्शवल्यास त्याला तेथे जणूं काय यदृच्छेने स्त्रिया भेटतात. कित्येक ठिकाणीं वेश्यावृत्तीची बिलकुल शंका येऊं नये म्हणून तेथील स्त्रियांना नोकरिणीचा पोषाख दिलेला असतो आणि त्या चहा वगैरे देत असतात, परंतु वाटल्यास त्यांना बाजूच्या एखाद्या खोलींत नेतां येतें. हीं गृहें दिसायला अगदीं खाजगी घरांसारखींच असतात, परंतु तेथे चहाला अतोनात किंमत पडते व यावरून गिऱ्हाईक काय तें ओळखतोच. कारण केवळ चहाकरतां एवढी किंमत देणारा म्हणजे श्रीमंत असून आणखी मूर्ख असला पाहिजे! अशा प्रकारचीं गृहें सर्व देशांत सांपडतात आणि राष्ट्रसंघापुढे मात्र हे देश वेश्यावृत्ति बंद केली आहे असें सांगतात. यांतील खालच्या दर्जाचीं पानगृहें अतिशय घाणेरडीं असतात.

वेश्यावृत्तीला सर्वत्र बंदी असल्यामुळे ती पाहिजे तेथे चालते, मात्र शिरत मोडतां नये. रस्त्यांत गिऱ्हाईक गांठणाऱ्या वेश्या इंग्लंडांत अत्यंत सभ्यतेने वागतात. म्हणजे त्या कदाचित् एखाद्याला 'माझ्या बरोबर येतां का?' असें म्हणतील, पण तो येत नाही असें दिसल्यास जास्त बोलणार नाहीत. सालार्देन् नांवाच्या फ्रेंच लेखकाने लंडनला भेट दिली त्या वेळची हकीकत त्याने दिली आहे:—त्याला रस्त्यांत एक उंच टोपी घातलेला अत्यंत सभ्य मनुष्य ऐटबाज पोषाख केलेल्या एका स्त्रीचा आदबीने निरोप घेतांना दिसला. नंतर ती बाई सालार्देनला पाहून तडक त्याच्याकडे आली आणि म्हणाली, 'माझ्याबरोबर येतां का?' अशाच प्रकारची एक बाई रस्त्यांत जाणायेणाऱ्या पुरुषांशी मधून मधून बोलत जात होती आणि नंतर कोंपऱ्यावरच्या पोलीसच्या शिपायाशीहि गप्पा मारीत होती. हल्ली लंडनमध्यें पोलिसांत कांही बायकांची नेमणूक झाली आहे आणि त्यांच्याकडे वेश्यांवर देखरेख करण्याचें काम दिलेलें असतें. हें पाहून मात्र वेश्यांचा संताप होतो. त्यांचे मतें स्त्रियांनी स्त्रियांविरुद्ध काम करणें हा विश्वासघात आहे.

इंग्लंडमधें किंवा खुद्द लंडनमधें वेश्या किती असतील हें सांगणें कठीण आहे. वेश्यांची नोंद नाही आणि परक्या माणसाने ही गोष्ट अधिकाऱ्यांस विचार-

त्यास ते नेहमीं ठरींव उत्तर देतात, की वेश्या इंग्लंडांत नाहीत, त्यांना कायद्याने बंदी आहे. परंतु खाजगी गुप्त पोलिसांचा धंदा करणाऱ्या लोकांकडून ही माहिती मिळते. त्यांचें म्हणणें असें दिसतें की लंडनमध्यें पॅरिसपेक्षां लोकसंख्येचे मानाने वेश्यांचें प्रमाण जास्त आहे. जेथे बंदी केली तेथे चोरटा धंदा वाढतो आणि एकंदर वेश्यांची संख्याहि वाढते हा सार्वत्रिक नियम आहे. बंदी केल्याने आरंभीं ती यशस्वी झाल्यासारखी दिसते, परंतु कालांतराने कायद्यांतून पळवाट कोठे आहे हें शोधून काढून त्याचा फायदा घेणारे लोक निघतात, आणि तसें इंग्लंडांत झालें आहे. कायदा ढोंगी आहे आणि खरें लोकमत कायद्याच्या विरुद्ध आहे. यामुळे कायद्याची अंमलबजावणी अत्यंत कठिण होते. चोरटा धंदा करण्यांत नेहमी धोका असतो, पण त्यांत फायदा इतका असतो की धोक्याची परवा न बाळगणारे लोक तो धंदा करतात. मुली पळवून नेणें वगैरे सर्व प्रकारचे अत्याचार व गुन्हे इंग्लंडांत अधिकाधिक वाढत आहेत, आणि मूळ कायदा करणारांना याची कल्पनाहि नव्हती. पण हें उघड कबूल केलें तर सोंवळेपणाचें ढोंग बाहेर पडेल, यामुळे या गोष्टी वर्तमानपत्रांत येत नाहीत. पण हें फार दिवस टिकणार नाही. याचे परिणाम इतके भयंकर आहेत की एक दिवस इंग्लंडलाहि डोळे उघडावे लागतील.

रोगांचा प्रसार किती झाला आहे याचेहि आंकडे मिळणें अशक्य आहे. परंतु इस्पितळांतील एकंदर रोग्यांत गुप्त रोग असलेल्या रोग्याचें प्रमाण शेंकडा ४० पर्यंत पोंचलें आहे, म्हणजे गेल्या शतकांतील अत्युच्च आंकड्यापर्यंत गेलें आहे. त्या वेळीं सैन्यांतील व आरमारांतील प्रमाण शेंकडा २५ होतें. मधें तें कमी झालें होतें, परंतु आतां पुनः शेंकडा २० पर्यंत पोंचलें आहे. खाजगी डॉक्टर सांगतात की त्यांच्या गिऱ्हाइकांत हें प्रमाण शेंकडा ५० आहे, आणि शिवाय काममूलक मानासिक विकृतींचें प्रमाण वाढत आहे. अर्थात् गरीब लोकांतच रोगाचें प्रमाण नेहमी जास्त सांपडतें, आणि इंग्लंडांत मजूर किती घाणेरड्या स्थितींत राहतात हें पाहिलें की याचें आश्चर्य वाटत नाही.

तरीपण इंग्लंडांत आरोग्याची मुळीच फिकीर केलेली नाही असेंहि म्हणतां येत नाही. कोणाहि स्त्रीवर वेश्यावृत्तीचा आरोप आला की तिची वैद्यकीय तपासणी होते. अर्थात् हा आरोप येणें अतिशय कठिण असतें, पण तो आला तर

तपासणी होते. पण तिला रोग आहे असें डॉक्टरने म्हटल्यास तिला दुसऱ्या डॉक्टराकडून तपासणी करवण्याचा हक्क आहे आणि तरीही तिला रोग आहे असें ठरल्यास तिला सांसर्गिक स्थिति नाहीशी होईपर्यंत इस्पितळांत जावें लागतें, आणि मग पुनः ती धंदा करायला मोकळी होते. तिला रोग नाही असें ठरल्यास मात्र तिच्यावरील आरोप जवळजवळ नाहीसाच होतो, आणि शिस्त मोडली असल्यास तिला थोडाबहुत दंड होतो इतकेंच. रोग नाही हें कारण जसें वेश्या-वृत्तीच्या विरुद्ध जवळजवळ पुरावा म्हणून समजलें जातें, तसेंच एखादी स्त्री कुमारी आहे असें जर वैद्यकीय तपासणींत दिसलें, तर तो पक्काच पुरावा होतो. आणि वाचकांनाहि तसेंच वाटण्याचा संभव आहे, कारण वेश्या कुमारी कशी राहणार ? पण प्रत्यक्ष समागम केल्याशिवायही इतर प्रकारांनी पैसे मिळवणाऱ्या स्त्रिया इंग्लंडांत पुष्कळ असतात. अशा स्त्रिया वर उल्लेखिलेल्या हाइड पार्क सारख्या ठिकाणीं सांपडतात, व अनेक प्रकारांनी पुरुषांचें उद्दीपन करण्याचा धंदा करतात. पुरुष वर्तमानपत्र वाचीत असल्यास त्याच्याजवळ बसून आपणहि वाचण्याचें ढोंग करतां येतें, व कोणीं आलें तर चटकन दूरहि होतां येतें. तिच्यावर भलतेच आरोप करणारा एखादा पोलीसचा शिपाई भेटलाच, तर वैद्यकीय तपासणींत ती कुमारी ठरून त्याचीच फजीति होते !

नैसर्गिक गोष्टीला पाप समजून प्रतिबंध केल्याचा परिणाम साहजिकच असा होतो की मनुष्य कामपूर्तीच्या आडमार्गांत शिरतो, किंवा न शिरला तर त्याला मानसिक विकृति होतात आणि इंग्लडांत यांचें प्रमाण अतिशय वाढलेलें आहे. याशिवाय वेश्यागृहांचे द्वारें नैसर्गिक कामपूर्तीला जो वाव मिळायचा तो न मिळाल्यामुळे जेथे पोलीसचा शिरकाव होणार नाही अशा खाजगी क्लबांत वरच्या दर्जाचे स्त्रीपुरुष वेश्यागृहांना देखील लाजवणारे प्रकार करून आपलें समाधान करून घेतात, आणि पोलिसला तें न कळलें तरी भिंतींनाहि कान व डोळे असल्यामुळे हे प्रकार कधीकधी लोकांना समजतात. असेच क्लब जर्मनींतहि सांपडतात. इंग्लंडांतील सोंवळेपणामुळे असे प्रकार वर्तमानपत्रांतून फारसे दिसत नाहीत, परंतु काममूलक गुन्हे (खून, मुली पळवणें वगैरे) यांची संख्या अतिशय वाढलेली आहे हें सर्वांना माहीत आहे. तेव्हा इंग्लंडने वेश्याबंदी केली म्हणून तें

उदाहरण इतरांनी घेण्यासारखें खास नाही.

हिंदुस्थानहि इंग्रजांच्याच ताब्यांत असल्यामुळे, आणि तेथील ख्रिस्ती नपुंसकनीतीचा इकडेहि बराच प्रसार झाला असल्यामुळे, इंग्लंडचा सोंवळेपणा हिंदुस्थानासहि बाधक होत आहे. तेथल्याप्रमाणेंच येथेहि ठिकठिकाणीं वेश्यागृहांस बंदी झाली आहे आणि चोरट्या वेश्यांचा सुकाळ झाला आहे. अर्थात् प्रत्येक वेश्येला वेगळी खोली असून तिच्या नांवाची वेगळी भाड्याची पावती असल्यावर पोलीसला त्यांत हात घालतां येत नाही आणि मर्दनगृहें वगैरेच्या सबबीवरहि वेश्यावृत्ति चालते. मुंबईतील कांही नीतिबाजांनी असेंहि सुचवलें होतें की वेश्यांना भाड्याने जागा देणें हाच गुन्हा समजावा! त्यांना इतकें देखील समजत नाही की वेश्यांना जागा देणें हा जर गुन्हा, तर त्यांना कोणत्याहि व्यापाऱ्याने कोणताहि माल पुरवणें हाहि गुन्हा समजावा लागेल, कारण जागेचा वापर हाहि एक प्रकारचा मालच आहे. पण नीतिबाजी डोक्यांत शिरली म्हणजे अकलेला जागा रहात नाही, म्हणूनच असल्या वेडगळ सूचना पुढें येतात. मुंबईत १९२३ सालीं वेश्यागृहांना बंदी झाली, आणि १९२८ सालीं गिऱ्हाईक गांठण्याबद्दल शिक्षा अधिक कडक केली. वेश्यावृत्तिवर पाळथ ठेवून पोलीसला मदत करण्याकरतां येथील नीतिबाजांनी एक संस्था काढली आहे. या लोकांची साहजिकच सोंवळेपणाबद्दल प्रसिद्धि होऊन शिवाय वेश्यांच्या ओळखी होऊन वेश्यांत वावरण्याची हौस त्यांना राजरोस पुरी करून घेतां येते. वेश्यांचा छळ केल्याने किंवा दारूबंदी केल्याने लोकांची नीति सुधारत नाही, हें या नीतिबाजांना कळणें शक्य नाही, व कोणाला कळल्यास तो तें कबूल करणार नाही, कारण छळ करण्याची हौस फेडून घ्यायला मग सबब राहणार नाही!

## अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें

हीं सोंवळेपणांत इंग्लंडशीं स्पर्धा करतात. एखादें पुस्तक इंग्लंडांत अश्लील न ठरलें तरी अमेरिकेंत ठरतें, आणि कधीकधी याच्या उलटहि होतें, तेव्हा अधिक सोंवळे कोण हें ठरवणें कठिण जाईल. पण अमेरिकेंतील संस्थानांत, डार्विनचा उत्क्रांतिवाद बायबलाशीं जुळत नाही म्हणून तो शिकवल्याबद्दल एका

शिक्षकाला काढून टाकलें होतें. या तोडीचा कांही प्रकार इंग्लंडांत झालेला माहीत नाही, तेव्हा पारंपरिक मूर्खपणाबद्दल बक्षिस कदाचित् अमेरिकेलाच द्यावें लागेल आणि वेश्याबंदी ही पारंपरिक मूर्खपणावरच आधारलेली आहे. अमेरिका कित्येक बाबतींत सर्व जगाच्या पुढे आहे आणि कित्येक बाबतींत अत्यंत मागसलेली आहे. अमेरिकेने जे दोन अत्यंत मूर्खपणाचे प्रयोग केले, त्यांपैकी दारूबंदीचा प्रयोग बंद करावा लागला व वेश्याबंदीचा अजून चालू आहे. या दोन्ही कायद्यांचे परिणाम अपेक्षेच्या बरोबर उलट झाले. दारूबंदीने दारूचा खप वाढला इतकेंच नव्हे तर दारूऐवजीं अनेक विषारी मिश्रणांचा प्रसार झाला आणि लोकांचें अतोनात नुकसान झालें आणि शेवटीं तो प्रचंड बहुमताने रद्द झाला. वेश्यावृत्ति हा गुन्हा ठरवल्याचे परिणामहि त्याच प्रकारचे झाले. चोरटी वेश्यावृत्ति आणि तीशीं संलग्न असणारे अनेक प्रकारचे गुन्हे फैलावले. ही गुन्ह्यांची प्रवृत्ति अमेरिकेंत जास्त प्रमाणांत दिसण्याचें एक महत्वाचें कारण आहे. अमेरिकेंतील सर्व नवी वस्ती स्वदेश सोडून गेलेल्या यूरोपीयांची आहे आणि स्वदेश सोडून दुसरीकडे वसाहत करणारे बहुधा पुरुषच असतात व त्यांच्याबरोबर बायका असल्या तरी फारच थोड्या असतात. यामुळे अमेरिकेंत प्रथमपासून स्त्रियांचें प्रमाण पुरुषांचे मानाने अत्यल्प होतें आणि हे लोक अर्थातच धाडसी असल्यामुळे त्यांच्यांत प्रथमपासूनच बायकांकरतां खून, मारामाऱ्या करण्याची प्रवृत्ति होती, आणि अमेरिकेने कायद्यांत कितीहि सोंवळेपणा केला तरी मवाली लोक कायद्यांना कधीच दाद देत नाहीत आणि अमेरिकेंत मवाल्यांची संख्या बेसुमार आहे. दारू ही नैसर्गिक गरज नव्हे तरी दारूबंदीनें देखील गुन्ह्यांचें प्रमाण भयंकर वाढलें. मग नैसर्गिक गरज भागवणाऱ्या वेश्यांना बंदी केल्यावर तें कसें वाढणार नाही ? एकोणिसाव्या शतकाच्या शेवटपर्यंत अमेरिकेंत स्त्रियांची टंचाई असे, आणि सोवळेपणाने कामवासना कमी होत नाही हें इंग्रजांप्रमाणेच अमेरिकन लोकही आचरणाने सिद्ध करतात. तेव्हा अलीकडेपर्यंत नैसर्गिक गरजा भागवण्याकरितां धाडसी लोकांना बायकामुली पळवणें, बळजबरी करणें, वगैरे प्रकार करावे लागत असत. अशा प्रकारची मनोवृत्ति जेथे फैलावलेली आहे तेथे वेश्याबंदी कितपत यशस्वी होईल? कायद्याची वाट न पहातां गुन्हेगारांना स्वतःच शिक्षा करण्याची अमेरिकन

लोकांची प्रवृत्ति सर्वांना माहीत आहेच. अधिकाऱ्यांना न जुमानतां कैद्याला तुरुंगांतून जबरदस्तीने बाहेर काढून त्याची शिकार करण्याची सर्रास पद्धत होती [ 'लिंच लॉ ' ]. म्हणजे सर्वच लोक अशा वेळी मवाली बनतात आणि त्यांत त्यांना कांही वावगें दिसत नाही. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या संरक्षणासाठी तेथे कायदेही कडक करावे लागले, आणि त्याचा परिणाम असा झाला की स्त्रीने जरी कोणाविरुद्ध खोटी तक्रार केली, तरी ती खरी मानली जाऊन त्याला शिक्षा होई. अमेरिकेंत हल्ली इतक्या निरानिराळ्या देशच्या लोकांचें मिश्रण आहे की तेथे अत्यंत सोंवळ्या आणि धार्मिक लोकांपासून तों अत्यंत पुढें गेलेल्या नवमतवाद्यां-पर्यंत सर्व प्रकारचे लोक सांपडतात. उदाहरणार्थ पेन्सिलव्हॅलिया संस्थानांत डच शेतकऱ्यांची बरीच वस्ती आहे. ते अत्यंत धार्मिक आहेत व हॉलंड देशांत ज्या चाली अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत चालू होत्या, त्या त्यानी आपल्याबरोबर वसाहतींत नेल्या आहेत. यांतील एक चाल अशी की एखादा परकी पाहुणा आला असतां घरच्या मालकिणीने किंवा तिच्या मुलींनी मालकाच्या परवानगीने किंवा विनंतीनेहि पाहुण्याची गरज भागवायची आणि अर्थात् हॉलंडमध्यें संततिनियमनाच्या उपायांचा प्रसार बराच झालेला असल्यामुळे त्यांत निदान अनिच्छित संतति होण्याचा धोका नसतो.

१९१७–१८ सालीं जेव्हा अमेरिकन सैन्य फ्रान्समधें गेलें, तेव्हा सैनि-कांचा पहिला उद्योग कामवासना भागवण्याचा होता, आणि त्यांनी कांही अत्या-चार करूं नये म्हणूनच अमेरिकन सेनाधिपति जनरल परशिंग यांनी ' फ्रान्स-मधील प्रत्येक स्त्री आई किंवा बहिण समजावी ' असा जाहिर उपदेश त्यांना केला होता. युद्ध संपल्यावर जे अमेरिकन लोक फ्रान्समधें राहिले त्यांची बायकां-मागे पैसा उधळण्याबद्दल कीर्ति झालेली पुष्कळांच्या लक्षांत असेल. जी स्थिति पुरुषांची, तीच स्थिति स्त्रियांची. त्यांत फरक इतकाच की परिस्थितीमुळें स्त्रियांना या गोष्टी उघड रीतीने करतां येत नाहीत. एरवीं एकाच आईबापांच्या पोटीं आलेल्या मुलांत व मुलींत स्वभावतः कांही मोटा फरक असेल हें संभवत नाही. तरुण पिढींतील मुलांमुलींची वागणूक कशी असेल, याची चांगली कल्पना जज्ज बेन लिंडसे यांच्या ग्रंथांवरून येते. अशा स्वभावाच्या लोकांना, विवाहबाह्य

समागम हें पाप आहे असें कितीहि कंठशोष करून सांगितलें तरी त्याचा विशेष परिणाम होणार नाही. अमेरिकन मुलींच्या हस्तिकेंत संततिनियमनाचीं साधनें नेहमी तयार असतात हें आता सर्वांस माहीत झालें आहे. अशा स्थितींत वेश्याबंदीचा परिणाम काय होईल हें स्पष्ट दिसतें. दहाबारा वर्षांपूर्वी पॅरिस येथे अमेरिकन विद्यार्थ्यांना चित्रकला व संगीत शिकवण्याकरतां एक शाळा काढली होती आणि पहिल्या वर्षी विद्यार्थी व विद्यार्थीनी एकाच इमारतींत रहात असत. परंतु त्यांनी तेथे जे प्रकार केले, ते पाहून पुढे तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींची राहण्याची वेगळी सोय केली.

युद्धोत्तर अमेरिकेंत वेश्यावृत्ति हा गुन्हा झाला आहे. तरीदेखील हा धंदा जवळजवळ उघडपणें करणाऱ्या स्त्रिया मुबलक आहेत. इतकेंच नव्हे तर पुष्कळ अमेरिकन स्त्रिया हा धंदा करण्याकरतां देशांतर करतात. उदाहरणार्थ शांघाय येथे पुष्कळ अमेरिकन वेश्या आहेत आणि त्यांना पुरेसे पैसे मिळाले म्हणजे त्या स्वदेशीं जाऊन लग्नहि करतात. १९३३ सालीं 'आर्जेंटाइन रिपब्लिक' मधून जर्मनखेरीज इतर परकी वेश्यांना घालवून दिलें, परंतु तेथपर्यंत तेथे इंग्रज व अमेरिकन वेश्यांत चढाओढ असे.

अशा लोकांवर सोंवळ्या कायद्यांचा परिणाम कितपत होईल याची ते कायदे करणाऱ्या सोंवळ्या लोकांना थोडीबहुत कल्पना होतीच, आणि ते होऊं नयेत म्हणून त्यांनी अत्यंत जुलमी आणि हास्यास्पद नियम करून ठेवले आहेत. असे कायदे ज्या देशांत खपतात, त्या देशांत शिरतांना, म्हणजे न्यू यॉर्क बंदराच्या तोंडाशीं, एक स्वातंत्र्यदेवीचा पुतळा आहे तो पाहून हंसूं येतें! परंतु हा पुतळा अमेरिकेला फ्रान्सने बक्षिस दिलेला आहे हें कदाचित् पुष्कळांना माहीत नसेल. वास्तविक अमेरिकेंत स्वातंत्र्य किती आहे हें पुढील नियमांवरून दिसेल.

अमेरिकेंत उतरणाऱ्या सर्व स्त्रियांना 'आपणास गर्मी आहे काय, व आपण वेश्येचा धंदा करणार आहां काय?' असे प्रश्न विचारतात. हे प्रश्न ऐकूनच कित्येक स्त्रियांना मूर्च्छा यायची! विवाहित जोडप्याला एखाद्या होटेलांत एका खोलींत रहायचें असेल, तर आपण विवाहित आहोंत याचा पुरावा द्यावा.

लागतो. मोठ्या होटेलांत विवाहबाह्य समागमास बंदी करण्याकरतां गुप्त पोलिसाचा पहारा असतो, आणि हे लोक पुष्कळ वेळां नोकरांच्या वेषांत असतात. पुरुषाने स्त्रीस किंवा स्त्रीने पुरुषास आपल्या खोलींत घेतां नये, कोणाला भेटणें असेल तर होटेलाच्या सार्वजनिक दिवाणखान्यांतच भेटलें पाहिजे. मुलगा आपल्या आईला देखील खोलींत घेऊं शकत नाही, कारण आई ही स्त्री असते. पुरुषाने नोकरिणीला बोलावल्यास किंवा इतर कांही कामाकरतां ती त्याच्या खोलींत गेल्यास तिने दार उघडें ठेवलें पाहिजे, आणि अमुक सेकंदांपेक्षा जास्त वेळ खोलींत राहतां नये. हीं सेकंदें आपोआप एका घड्याळावर दर्शविलीं जातात. अर्थात् या नियमांप्रमाणे एकदम दोनतीन किंवा अधिक स्त्रिया एका पुरुषाच्या खोलींत जाऊं शकतात. एक पुरुष आणि एक स्त्री एका खोलींत असणें भयंकर आहे, पण पुष्कळ असल्या तर चालतात! अशा नियमांचाहि लोक फायदा घेतात, आणि कां घेऊं नये? अमेरिकेंत रस्त्यांत चुंबन घेणें हा गुन्हा आहे. पोहतांना पुरुषांनी सैल चड्डी घातली पाहिजे आणि स्त्रियांनी चड्डीला एक लहंगा जोडला पाहिजे असे नियम आहेत. नियम जितके जास्त कडक करावे, तितक्या प्रमाणांत ते मोडण्याची इच्छा होते. वेश्यावृत्ति कायद्याने बंद केली, परंतु ती वास्तविक बंद झालेली नाही. अशा कायद्यांचा इतर ठिकाणीं जो परिणाम होतो, तोच अमेरिकेंत जास्त प्रमाणांत झाला आहे. याची माहिती मिळवणें असल्यास भरकन प्रवास करून ती मिळणार नाही, तेथे कांही दिवस राहिलें पाहिजे. प्येर सीझ नांवाचा प्रसिद्ध फ्रेंच लेखक न्यू यॉर्क येथे उतरला आणि तेथे दारूबंदी होती हें माहीत असतांहि 'दारू प्यायला कोठे मिळेल?' असें त्याने एका पोलीसच्या शिपायाला विचारलें. त्या शिपायानेहि ताबडतोब चोरून दारू विकणाऱ्या सर्वांत जवळच्या दुकानाचें नांव सांगितलें, इतकेंच नव्हे तर तेथे माझें नांव सांगा अशी शिफारस केली! त्याचप्रमाणें त्यांनी 'बायका कोठे मिळतील?' असें विचारलें असतें तरी त्याने जवळचें ठिकाण सांगितलें असतें आणि तेथेहि आपलें नांव सांगावें अशी शिफारस केली असती. बरें त्या ठिकाणीं जाण्याकरतां त्यांनी एखादी मोटर केली असती, तर मोटरवाला म्हणाला असता 'छे, छे! मला यापेक्षा चांगलें ठिकाण माहीत आहे' आणि

त्यानेहि आपलें नांव सांगण्यास सांगितलें असतें. तरीपण वरील लेखकानें अमेरिकेंत वेश्या नाहींत असें लिहिलें आहे हें खरोखर आश्चर्य आहे. सहज रस्त्यांत हिंडतांना देखील प्रच्छन्न वेश्यागृहांचे समोर 'येथे जगांतल्या सर्वांत सुंदर स्त्रिया आहेत!' असा पुकार करून जाणायेणारांना आंत बोलावणारीं माणसें ठेवलेलीं असतात. अर्थात् आंत कांही करमणुकीचे प्रकार चालू असतात, तेव्हा त्यांची ही जाहिरात आहे असें म्हणतां येतें, पण वस्तुतः ती वेश्यांचीच जाहिरात असते.

वेश्यावृत्तीविरुद्ध कायदा असतांना अशा गोष्टी होणें कसें शक्य आहे, असें कांही वाचकांस वाटेल, परंतु बेन राइटमन यांनी १९३१ सालीं 'जगांतील दुसरा सर्वांत जुना धंदा' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, तें वाचल्यास याचा उलगडा होईल. हे अमेरिकन डाक्तर वेश्यागृहांतच काम करणारे होते, आणि त्यांनी जें जें पाहिलें तें तें या पुस्तकांत लिहिलें आहे आणि अमेरिकन सोंवळेपणा राखण्याकरतां शेवटीं एक नीतिबाज व्याख्यानहि दिलें आहे. त्यांनी पुढील वर्णन दिलें आहेः—

"कायदा पाहिला तर वेश्यागृहें निषिद्ध आहेत, परंतु हा संयुक्त सरकारचा कायदा आहे आणि त्याची अंमलबजावणी प्रत्येक संस्थानावर आणि शहरांतील स्थानिक अधिकाऱ्यांवर सोंपवलेली आहे. अमेरिकेंत हा एक विशेष प्रामुख्याने दिसतो की वेगवेगळ्या शहरांतील व संस्थानांतील कायद्यांत एकवाक्यता मुळीच नाही. प्रत्येक संस्थानांत वेगळे कायदे. याशिवाय संयुक्त सरकारचें पोलीस आणि संस्थानांचें पोलीस यांचें मुळीच कधी पटत नाही. अमेरिकेसंबंधी ग्रंथ किंवा लेख लिहिणारांच्या लक्षांत ही गोष्ट बहुधा येत नाही. विशेषतः वेश्यांचे बाबतींत या संयुक्त संस्थानांत तीन प्रकार सांपडतात. कांही संस्थानें वेश्यांस जवळजवळ परवानगीच देतात, कांही तटस्थ राहतात आणि कांही अत्यंत सोंवळीं आहेत. शिवाय यांत शहराशहरांत फरक आहेतच. पहिल्या प्रकारच्या संस्थानांत कोणत्या तरी मिषानें चोरटा धंदा करणाऱ्या वेश्यागृहांस परवानगी असते. कोणी त्याविरुद्ध अर्जच केला तर वेश्यागृह बंद करावें लागतें, पण तें दुसरीकडे गेलेलें चालतें. या वेश्यागृहांकडून खाजगी कर

घेतला जातो आणि त्याची वांटणी सर्व प्रकारच्या अधिकाऱ्यांत होते, कारण वेश्यागृहें कायद्याने बंद असल्यामुळे हा कर सरकारी हिशोबांत दाखवतां येतच नाही. तेव्हां तो या लोकांच्या खिशांतच जातो. अधिकाराच्या जागेपासून खाजगी फायद्याचे प्रमाण अमेरिकेंत फार मोठें आहे. फ्रान्समधें वेश्यागृहांकडून घेतलेला कर म्युनिसिपालिटीकडे जमा होतो आणि लोकोपयोगी कार्याकडे खर्च होतो, तेव्हा कोणती पद्धत श्रेष्ठ हें सांगायला नको. अशा रीतीने सर्व अधिकाऱ्यांना लांच दिल्यामुळे वेश्यागृहांची वर सांगितल्याप्रमाणे उघड जाहिरात करायला भीति कोणाची?

"दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे तटस्थ राहणाऱ्या संस्थानांत जवळजवळ हीच स्थिति असते, परंतु वरीलप्रमाणें जाहिरात मात्र तेथे होत नाही. जीं माणसें दाराशीं असतील तीं वर सांगितल्याप्रमाणे ओरडून न बोलतां जाणायेणाऱ्याच्या कानांत हलकेच लांगून आंत बोलावतात. कारण कोणीं तक्रार केलीच तर पोलिसाला आणि इतर अधिकाऱ्यांना साफ सांगतां आलें पाहिजे की आम्हाला यांतलें कांही माहीत नव्हतें. केव्हा अशा तक्रारींमुळे एखादें वेश्यागृह बंद करावें लागलेंच तर मालकाला हळूच बातमी मिळते, आणि तो उठून दुसरीकडे जातो. पुष्कळ वेळां एकाच मालकाचीं दोनतीन घरें असतात आणि त्यांपैकी एकच धंद्याला चालू असतें. एखादे वेळीं पोलिसाला अकस्मात् घाला घालावा लागला, तरी एका दाराशीं पोलीस आहे तोंपर्यंत दुसऱ्या दाराने बाहेर पडून त्याच मालकाच्या दुसऱ्या घरांत जायला पोलिसाकडून वेळ मिळतो, आणि आम्हाला कांही सांपडलें नाही असें पोलिसाला राजरोस म्हणतां येतें. म्हणजे कायदा मोडला असें व्हायला नको!

"तिसऱ्या प्रकारच्या म्हणजे सोंवळ्या संस्थानांत मात्र इतका सैलपणा नसतो, अधिक संभाळून वागावें लागतें. फारशी उघड जाहिरात करतां येत नाही आणि लांच अधिक मोठे द्यावे लागतात. पण या चोरट्या धंद्यांत फायदा इतका असतो की कितीही धोका असला तरी हा धंदा करायला लोक तयार होतात. जनतेचा पाठिंबा असला म्हणजे सर्व कांही करतां येतें. जेथे कायदा विशेष कडक

रीतीने पाळला जातो, तेथे वेश्यागृहाचें स्वरूप म्हणजे एखादें श्रीमंत कुटुंब असून त्यांच्या मोठ्या घरांत मालकिणीला आणि तिच्या मुलींनां त्यांच्या मैत्रिणी भेटायला येतात, बऱ्याच नोकरिणी असतात, आणि कांही मित्र किंवा पाहुणेहि येतात, असें असतें. यांत अर्थातच कोणाला नांव ठेवण्यासारखें कांहीच नाही. एखादा अनोळखी मनुष्य प्रथमच आला, तर फार जपून वागावें लागतें, आणि त्याने चांगलीशी ओळख किंवा वशिला आणला नाही तर त्याला आपण भलत्याच ठिकाणी आलांत असें सांगून बाहेर घालवून देण्यांत येतें. ''

अशा तऱ्हेचीं गृहें ओळखणें फार कठिण असतें. यामुळेच क्लोद ब्लांशार सारखे लेखक फसतात आणि लिहितात की सबंध न्यू यॉर्क शहरांत फक्त दोन तीनच प्रच्छन्न वेश्यागृहें आहेत, आणि त्यांतील एक तर वैद्यकीय उपचारगृहाच्या मिषाने चालतें. हा लेखक फ्रेंच आहे आणि त्याला देखील पुरेशी माहिती मिळाली नाही, आणि तरी फ्रेंच लोक बाहेरख्याली असतात असा त्यांच्यावर आरोप आहे!

आणखी एक गप्प म्हणजे इंग्रज व अमेरिकन स्त्रिया देहविक्रय करीत नाहीत, आणि अमेरिकन वेश्यागृहांत फ्रेंच बायका आणाव्या लागतात! परंतु डॉ. राइटमनच्या पुस्तकावरून तसें दिसत नाही. कांही वेश्यागृहांत तर धंदा करूं इच्छिणाऱ्या स्त्रियांची इतकी गर्दी असते की त्यांच्या पाळ्या कराव्या लागतात. म्हणजे एका स्त्रीला असुक एक रकम मिळाली म्हणजे तिनें जागा खाली करून दुसरीला संधि दिली पाहिजे, असा कित्येक गृहांत नियम असतो. अमेरिकन वेश्यागृहांत स्त्रिया बहुधा रहात नाहीत, कामापुरत्या तेथे येतात. आणि या धंद्यांत धोका इतका असतो की मध्यस्थांच्या मदतीशिवाय स्त्रिया तो करूं धजत नाहीत. फ्रान्समध्यें वेश्यागृहांत राहणाऱ्या वेश्यांना दुसऱ्या कोणाचीहि मदत लागत नाही. अर्थात् त्यांपैकी कित्येक एखाद्या मित्राबरोबर राहतात, किंवा कांहींचें शास्त्रोक्त लग्नहि झालेलें असतें, आणि त्या मधूनमधून वेश्यागृहांत जाऊन पैसे मिळवतात. याला त्यांच्या मित्राची किंवा नवऱ्याची संमति असली तरी त्यांना मध्यस्थांच्या सदरांत घालतां येणार नाही, कारण ते मध्यस्थी बिलकुल करीत नाहीत. पण अमेरिकन कायद्यामुळे अमेरिकन वेश्यांना

कोणातरी मध्यस्थाची जरूर लागते. मध्यस्थांविरुद्ध अमेरिकेंतहि कडक कायदा आहे, पण कायदा आणि अंमलबजावणी यांत जमीनअस्मानाचा फरक असतो. पोलीसच्या दृष्टीने मध्यस्थाला मित्र किंवा नातेवाईक समजून त्याच्या कारवाईकडे कानाडोळा करतां येतो. पोलिसचा संबंध वेश्यांशी प्रत्यक्षपणें कधीच येत नाही, यामुळे वेश्यांशी संगनमत केल्याचा आरोप पोलीसवर कधी येऊं शकत नाही. दारूबंदीचा कायदा पाहिजे त्या मार्गाने मोडणारे मवाली आणि वेश्याबंदींतून पळवाटा काढणारे मवाली, यांत फारसा फरक नसतो, किंबहुना पुष्कळ मवाली दोन्ही धंदे करतात आणि या दोन्ही धंद्यांपासून समाजाला धोका असतो. पण सोंवळेपणाचें ढोंग करणारांना तो दिसत नाही. बंदीच्या कायद्यांमुळे चोरटे धंदे करणारांचा नेहमी फायदा होतो आणि यामुळे अशा धंद्यांत अंग असणाऱ्या कांही संभावित लोकांचा या दोन्ही बंदीच्या कायद्यांना जोराचा पाठिंबा होता, कारण कोणताहि सरळ धंदा करून तसा फायदा होत नाही. दारूबंदीचा कायदा जेव्हा रद्द झाला, तेव्हा तो रद्द होऊं नये म्हणून या लोकांची जोराची खटपट होती, पण लोकमतापुढे त्यांचा इलाज चालला नाही. त्याचप्रमाणे वेश्याबंदीचा कायदा रद्द होऊन वेश्यांवर सरकारी देखरेख राहिल्यासच या मवाल्यांच्या अत्याचारांना कांही आळा बसेल, परंतु हा कायदा जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत त्याचा परिणाम बरोबर दारूबंदीसारखाच होणार, म्हणजे लोक कायद्यामुळे अधिक नीतिमान होण्याचें बाजूलाच राहून त्यांचें नुकसान मात्र होत राहील. कायद्याची समंजसपणाशीं फारकत झाली म्हणजे त्याचे परिणाम अनिष्टच होणार. अमेरिकेंत एक महत्वाची गोष्ट कायद्याच्या आड येते, ती ही की तेथे मोटरींचें प्रमाण पांच माणसांस एक असें आहे, आणि स्त्रीपुरुषांना होटेलांतील खोल्यांत एकत्र येण्याची मनाई असल्यामुळे ही उणीव मोटरींनी भरून निघते. अशा जोडपीं बसलेल्या मोटरी निवांत जागा पाहून तेथे उभ्या राहतात, आणि शहरांत अशा निवांत जागा फारशा नसल्यामुळे कांही ठिकाणीं अशा मोटरींची गर्दी होते. पोलिसाला हें माहीतच असतें आणि एखादी मोटर एकाच ठिकाणीं फार वेळ उभी राहिली तर ते तेथे जातात आणि आंत काय चाललें आहे हें पाहण्याच्या भानगडींत न पडतां मोटरीला

पुढे जायला सांगतात. गर्दी होऊं न देणें एवढेंच अशा वेळीं पोलीसचें काम असतें. अमेरिकन लोकांना ही पद्धत पसंत दिसते. हें रुचिवैचित्र्य आहे. फ्रान्समधें खोल्याच अधिक पसंत करतात !

एकंदरींत अमेरिकन कायद्याच्या इतक्या दिवसांच्या अनुभवावरून हें स्पष्ट होतें की लोकांची कामप्रवृत्ति दडपून टाकणें अशक्य आहे, आणि जी गोष्ट उघडपणें करतां येत नाही ती चोरून करायला लोक मागेपुढे पहात नाहीत. ज्यांना तें शक्य नसेल ते आडमार्गांत शिरतात आणि परिणामीं समाजाला अनेक प्रकारचे अत्याचार भोगावे लागतात. प्रचंड लोकमतापुढे पोलीसचें व कायद्याचें कांही चालत नाही, आणि त्यांना कानाडोळा करणें भाग पडतें. दंडुकेशाहीचा विशेष उपयोग न होतां लोकांत कायद्याविषयीं बेपरवा आणि तो मोडण्याची जबरदस्त इच्छा फैलावते आणि एकंदरींत शिस्तीच्या दृष्टीने हें इष्ट नाही हें कोणीहि सांगेल. अमेरिकेला मवाल्यांच्या दंग्याबद्दल जी प्रसिद्धि मिळाली आहे, तिच्या मुळाशीं हे दोन कायदे आहेत. त्यांपैकी दारूबंदीचा कायदा आतां बंद झाला आहे. परराज्यामुळे हिंदुस्थानांतील लोक इतके निःसत्व झालेले आहेत की येथे कदाचित् अमेरिकेसारखे दंगे होणार नाहीत, पण दंडुकेशाहीने येथेहि चोरटे धंदे करणारांना उत्तेजन मिळणारच. कायदे करतांना त्यांचे दूरवर परिणाम काय होतील हें समजण्याची अक्कल कायदे करणारांना नसल्यामुळे असे कायदे होतात, आणि त्यांचे परिणाम जनतेला भोगावे लागतात. आपण नीतीचे गड्डे आहोंत आणि लोकांनाहि आपण दंडुकेशाहीने नीतिमान बनवणार, असें स्वतःचें प्रदर्शन करण्याच्या इच्छेमुळे असे कायदे होतात, पण शेवटीं ते करणारांचा मूर्खपणा मात्र लोकांना स्पष्ट दिसतो.

वेश्यावृत्तीविरुद्ध कायदे करतांना अमेरिकेंतील कायदेमंडळाला वेश्यावृत्तींत कशाचा समावेश होतो याचेंहि भान राहिलें नाही. संयुक्त संस्थानांपैकी अकरा संस्थानांत असा कायदा आहे की कोणीहि आपलें शरीर मोबदला घेऊन किंवा फुकटहि दुसऱ्याच्या ताब्यांत देतां नये. इतर ठिकाणच्या कायदेमंडळांना इतकें समजण्याची तरी अक्कल होती की मोबदला न घेतां केवळ प्रेममूलक समाग-

माला वेश्यावृत्ति म्हणतां येत नाही. परंतु दुसऱ्याच्या खाजगी भानगडींत नाक खुपसण्याची धार्मिक संवय अमेरिकेंत फार बोकाळलेली असल्यामुळें ते प्रेमत्रिम कांही ओळखीत नाहीत, आणि पतिपत्नी असल्याशिवाय कोणत्याहि स्त्रीपुरुषांचा समागम होतां नये, असा राक्षसी कायदा त्यांनी पास केला. ख्रिस्ती नपुंसकनीतीचा अशा रीतीने कायद्यांत समावेश केल्याचे परिणाम काय होतील हें त्यांना दिसलें नाही. दुसऱ्याचा छळ करण्याच्या धार्मिक वृत्तीला यामुळे किती वाव मिळतो याची कल्पना त्यांना आली नाही. परंतु न्यू यॉर्क मधें घडलेल्या पुढील हकीकतीवरून तें उत्तम रीतीनें सिद्ध झालें. १९३१ सालीं जीन नॉरिस नांवाची तेथे जी एकच स्त्री मॅजिस्ट्रेट होती, तिने १०–१२ मुलींना कायद्याविरुद्ध लहान मुलांच्या तुरुंगांत पाठविलें. इतकेंच नव्हे तर यांपैकीं एकीच्या खटल्याची तिने बनावट हकीकत लिहिली होती. तिने तें प्रथम नाकबूल केलें, परंतु जेव्हा कोर्टाच्या कारकुनाने लिहून घेतलेल्या हकीकतीचा फोटो तिला दाखवला, तेव्हा त्यांत तिनें स्वतःच्या हाताने केलेला फरक तिला कबूल करावा लागला. या बाईला नंतर बडतर्फ करणें भाग पडलें आणि त्याचें कारण तिचा खोटेपणा हें न सांगतां फाजील कडकपणा हें सांगितलें. त्याचप्रमाणें वाईट वर्तणुकीबद्दल त्याच तुरुंगांत पाठवलेल्या १५ ते २१ वयाच्या ६७ मुलींपैकी ५१ मुलींना चौकशीअंतीं निर्दोष म्हणून सोडून द्यावें लागलें. अशा धर्मवेड्यांच्या हातांत सत्ता गेल्यावर काय अनर्थ होतील हें सांगणें कठिण. स्वतःचें शरीर अश्लील असल्यामुळे तें स्वतःलाहि दिसतां नये, ही ख्रिस्ती धर्माची शिकवण आहे, आणि स्त्रियांच्या कित्येक मठांत वर्षांतून फक्त एकदोनदां स्नान करण्याची परवानगी असते, आणि तें देखील अंगावर पुरे कपडे असतांना केलें पाहिजे अशी सक्त ताकीद असते. या बाईला स्वतःचीं मतें दुसऱ्यावर लादण्याची आणि तीं न स्वीकारल्याबद्दल शिक्षा करण्याची आयतीच संधि मिळाली. असे लोक वेड्यांच्या इस्पितळांत ठेवण्यास योग्य आहेत, समाजांत राहण्यास नाहीत. असे अत्याचारी सोंवळे लोक फारसे नसतात, पण कायदेमंडळांत त्यांच्या विरुद्ध जाण्याची कोणाची छाती होत नाही. एकंदरींत या बाबतींत अमेरिकनांच्या इतका मूर्खपणा दुसऱ्या कोणींहि केलेला नाही.

## स्कँडिनेव्हिया

यांत येणारे नॉर्वे, स्वीडन व डेन्मार्क हे देशहि वेश्यानियंत्रणास विरोध करणारेच आहेत, पण येथें इंग्लंदसारखी अंदाधुंदी नाही. नॉर्वेमधें १८८८ सालीं, डेन्मार्कमधें १९०६ सालीं, आणि स्वीडनमधें १९१८ सालीं, वेश्यांच्या तपासणी-संबंधी कायदे रद्द झाले. नॉर्वेमधें वेश्यागृहांना परवानगी नाही, आणि वेश्यांनी रस्त्यांत गिऱ्हाईक गांठणें, दारू पिऊन झिंगणें, किंवा असभ्य वर्तन करणें, याबद्दल कडक शिक्षा होते. तसेंच त्यांना भटक्यांचा कायदाहि लावतात आणि कोणीं मध्यस्थीचा धंदा केल्यास त्याला दोन वर्षे तुरुंगाची शिक्षा मिळते. आरोग्या-संबंधी कायदा १८६० मधेंच केलेला होता, आणि त्याने सांसर्गिक रोग्यांची नोंद करवण्याची जबाबदारी डाक्तरांवर टाकलेली आहे. परमा, गर्मी वगैरेचा संसर्ग दुसऱ्यास देणें हा १९०२ च्या कायद्यांत गुन्हा मानला असून त्याबद्दल शिक्षा होते.

डेन्मार्कमधें १९०६ सालीं वरील धर्तीवरच कायदा झाला. या कायद्याने वेश्यांना भटक्यांचा कायदा लावतां येतो आणि शिवाय उपाहारगृहांत, वसति-गृहांत, वगैरे अनीतिमान नोकरिणी कोणीं ठेवूं नये या उद्देशाने पोलिसाला जादा अधिकार दिलेले आहेत. इंग्लंदांत व डेन्मार्कमधें कायदा जवळजवळ सारखाच आहे, पण त्याच्या अंमलबजावणींत इंग्लंदांत शिस्तीकडे लक्ष असतें व डेन्मार्कमधें नीतीकडे लक्ष असतें. यामुळे रस्त्यांत गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न शाबीत करणें इंग्लंदांत अशक्य होतें, पण डेन्मार्कमधें केवळ पोलिसाच्या साक्षीवरून शिक्षा होते. तरीदेखील वेश्यांनी तसा प्रयत्न न केल्यास त्यांना रस्त्यांत हिंडायला पूर्ण मोकळीक आहे आणि त्या खुशाल जातांयेतांना दिसतात. वेश्यांना भटक्यांचा कायदा लावण्याची पद्धत अशी की एखादी स्त्री हव्या त्या वेळीं उगाच रस्त्यांत हिंडत असते असें पोलिसाने पाहिलें, म्हणजे तिला कांही धंदा नाही असें समजून भटकी स्त्री समजण्यांत येईल, असा इषारा तिला देतात. तरी तिने ऐकलें नाही तर तिचें नांव व पत्ता उतरून घेतात आणि तिला एक छापील इषारा पाठवतात की तिने लवकर नोकरी मिळवून पोलिसाला कळवावें. अशा रीतीने

दरवर्षी सुमारें दोनतीनशें स्त्रियांना इषारा मिळतो, आणि त्यांनी न ऐकल्यास शिक्षा होते. सारांश वेश्यानियंत्रण नको म्हणणाऱ्या देशांतहि वेश्यांचे बाबतींत पोलिसाची मदत लागतेच आणि कोपनहेगन येथे वेश्यांकरतां वेगळें पोलीस आहे. वेश्यागृहांचे बाबतींत तेथेहि इंग्लंदसारखाच परिणाम झालेला आहे, म्हणजे अनेक मिषांनी गुप्त वेश्यागृहें चाललेलीं असतात. हा एकंदरींत सामान्य नियमच आहे.

स्वीडनमध्यें १९१८ च्या कायद्याप्रमाणे वेश्यांना तुरुंगांत ठेवणें, मध्यस्थांना कडक शिक्षा, आणि रोगप्रतिबंधासाठी कांही नियम, इतक्या गोष्टी अंमलांत आल्या. गुप्त रोग झालेला कोणीहि इसम डाक्तराने सांगितल्याप्रमाणे इलाज करण्यांत कुचराई करूं लागला, तर डाक्तर प्रथम त्याला इषारा देतो. तरीहि त्याने न ऐकलें तर डाक्तराने पोलीसला कळवलें पाहिजे अशी सक्ती आहे. पोलीस त्या रोग्याला उपचार करण्यास बजावतें व त्याने न ऐकलें तर त्याला जबरदस्तीने इस्पितळांत ठेवून तो बरा होईपर्यंत त्याला सोडीत नाहीत.

या कडक कायद्यांचा एक परिणाम असा झाला की नार्वेमधें १९२९ सालीं विनयभंगाबद्दल विशेष कडक कायदे करावे लागले. कामवासना कायद्यांनी दडपतां येत नाही, इतकाच त्याचा अर्थ आहे.

## हॉलंड

या देशांत १९११ सालीं केलेला कायदा अंमलांत आहे. त्या कायद्याचा उद्देश अनीति बंद करण्याचा असून त्यांत अज्ञान मुलींवर बळजबरी, व अनीतीस उत्तेजन या दोन गोष्टींस गुन्हे ठरवले आहेत. अनीतीस उत्तेजन या सदरांत वेश्यागृहें येतात व त्यांकरतां प्रादेशिक नियम वेगवेगळे आहेत. उदाहरणार्थ ॲम्स्टरडॅम् या राजधानीच्या शहरांत घरांच्या मालकांनी किंवा भाडेकऱ्यांनी अनीतीला सवलत देतां नये, असा कायदा आहे. एखाद्या घरांत अनीति चालू आहे असें समजल्यास तें बंद करण्याचा हुकूम सुटतो, आणि त्यानंतर त्या घरांत जाणें हाच गुन्हा होतो. रस्त्यांतील शिस्त राखण्यासाठी पुढील नियम आहेतः— उपहारगृहें, पानगृहें, वगैरेच्या दारांत किंवा आसपास उभें राहून स्त्रियांनी जाणायेणारांना खुणा करून त्यांचें लक्ष वेधतां नये, किंवा पोलिसाने तेथून हाल-

ण्यास सांगितल्यावर अशा ठिकाणांच्या आसपास येरझारा घालतां नये. कायद्याने वेश्यागृहें बंद केल्याचा नेहमीचा परिणाम तेथेहि झाला आहे, म्हणजे दुसऱ्या कांहीतरी धंद्याच्या निमित्ताने तीं चालतात. नियंत्रणाचा कट्टा विरोधक फ्लेक्स्नर हा रॉटरडॅम् शहरासंबंधी लिहितो की ‘ तेथे तपासणीचा कायदा जारी असतांना चार नोंदलेल्या वेश्यागृहांत मिळून वीस वेश्या होत्या. हीं गृहें नवीन कायद्याने बंद केलीं. याचा अर्थ असा नव्हे की वेश्यावृत्तीचे सर्व प्रकार बंद झाले. खालच्या दर्जाचीं पानगृहें, नृत्यगृहें वगैरे मिषांनी ती चालूच होती.’ सारांश वेश्यावृत्तीच्या इतिहासावरून जर एखादें तत्व निघत असेल तर तें हेंच की नोंदलेलीं वेश्यागृहें कायद्याने बंद केलीं की त्याऐवजीं प्रच्छन्न गृहें सुरू होतात. कायद्याने वेश्या ( किंवा कोणीहि ) नीतिमान होणें शक्य नाही. फरक इतकाच होतो की त्यांच्यावरची देखरेख नाहीशी होते आणि तपासणी बंद झाल्यामुळे रोगांचा प्रसार अधिक होतो. फ्लेक्स्नर स्वतः सांगतो की ‘ वरील कायद्याची कडक अंमलबजावणी झाल्यामुळे रस्त्यांत क्वचितच एखादी वेश्या दिसते. पण त्या पानगृहांत, नृत्यगृहांत वगैरे असतात आणि तीं बंद झाल्यावर त्या बाहेर पडतात. रॉटरडॅम शहरांत वेश्या गिऱ्हाइकांसह पानगृहांत जातात. केव्हाकेव्हा त्या जाणायेणारांस सलाम करतात, पण रात्रीं उशीरां देखील त्या रस्त्यांत दिसत नाहीत. ’ वेश्यावृत्ति गुप्त रीतीने करायला लावण्यांत काय फायदा आहे हें समजणें कठिण आहे ! हॉलंडमधें देखील १९३० सालीं विनयभंगासंबंधी कायदे करावे लागले. तथापि सरकारी अहवाल नेहमी चालू नीतीला धरून असतात. त्यांत म्हटलें आहे की ‘ १९२८ सालीं ॲम्स्टरडॅम् शहरीं ऑलिंपिक् सामने झाले, त्या वेळीं बाहेरून पुष्कळ वेश्या येतील अशी लोकांची कल्पना होती ती खोटी ठरली. कारण १९२७ सालीं ९५ परक्या स्त्रियांना घालवून द्यावें लागलें होतें, पण १९२८ सालीं फक्त ७४ स्त्रियांनाच घालवून दिलें. ’ तरीपण रॉटरडॅम् शहरांतील वेश्यावृत्ति करणाऱ्या सर्व स्त्रियांची एक यादी पोलिसाजवळ असते. तेथे नगरपालिकेचा असा नियम आहे की कोणाही स्त्रीने रस्त्यांत किंवा रस्त्याच्या आसपास किंवा घराच्या दारांत उभें राहून पुरुषांना आकर्षण करण्याचा प्रयत्न करतां नये. हा नियम मोडल्याबद्दल कोणाला शिक्षा

करणें झाल्यास ती स्त्री वेश्यावृत्ति करते असें सिद्ध करावें लागतें. पण त्या स्त्रीचें नांव पोलिसाच्या यादींत असल्यास तें सिद्ध झालें असें मानतात !

## स्वित्झर्लंड

याच्या वेगवेगळ्या विभागांत वेगवेगळे कायदे आहेत, कांहीं ठिकाणीं नोंदणीची व तपासणीची फ्रेंच पद्धत चालू आहे, कांही ठिकाणीं ती बंद केली आहे. ही पद्धत बंद असलेल्या भागांत वेश्या रस्त्यांत कोणाशीं धंद्याच्या दृष्टीने बोलल्यास तिला आठ दिवस तुरुंगांत टाकतां येतें आणि मध्यस्थांना किंवा वेश्यागृह चालवणारांना पांच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देतां येते. पण इतके कडक कायदे करूनहि वेश्या नाहीशा झाल्या काय ? फ्रेक्स्नर म्हणतो, "वेश्यागृहांचें रूपांतर सिगारच्या दुकानांत झालें आहे. झ्यूरीच शहरांत हीं दुकानें विशेष रहदारी नसलेल्या लहान गल्लयांत आहेत. यांत सिगारच्या जवळजवळ रिकाम्या पेट्या आणि नटलेल्या स्त्रिया असतात. एखाद्या गिऱ्हाइकाने एक नाणें देऊन सिगार मागितल्यास त्याला मोड मिळत नाही, पण भरपाई करण्याचे इतर मार्ग दाखवण्यांत येतात. अशीं साठ एक दुकानें या शहरांत आहेत. विक्रीच्या कामावर बहुधा नोकरीण असते, वेश्या आंतल्या खोलींत असते. वेश्या रस्त्यांत गिऱ्हाईक शोधीत नाही, आणि तेथे कोणी मध्यस्थहि नसतो, तेव्हा ती कायद्यांत येतच नाही. तेव्हा असा कायदा केल्यावर वेश्यांनी ही युक्ति काढली यांत नवल काय ?" पण यांत कोणाचा काय फायदा झाला ?

## इटली

येथे १८८८ पर्यंत फ्रान्ससारखाच नोंदणीचा कायदा होता. या सालीं नोंदणी बंद केली व यामुळे १८८९ सालीं लष्करांत गुप्त रोग्यांचें प्रमाण शेंकडा ६२ नी वाढलें. तेव्हा १८९१ सालीं पुन्हा पूर्वीचा कायदा अमलांत आला. पुढे १९०५ सालीं आणखी एक नवा कयदा केला. त्यांत वेश्यांचें स्वातंत्र्य मोठ्या मजेदार रीतीने कायम ठेवलें आहे. डॉक्टराला वेश्यागृहांत कोणत्याहि वेळीं जातां येतें, पण तेथील वेश्यांना त्यांच्या मर्जीविरुद्ध तपासतां येत नाही. तथापि

एखादीने तपासणी करूं न दिल्यास तिला रोगी समजून सक्तीने उपचार कायद्याने करतां येतात !

म्यूसोलीनीच्या अंमलांत वेश्यागृहांची पद्धत तत्वतः फ्रान्ससारखीच आहे, परंतु फ्रान्समधें ज्या सोयी आणि सवलती आहेत, त्या म्यूसोलीनीच्या सुलतानी कारभारांत नाहीत. इटलींतील वेश्यागृहें म्हणजे मोठाल्या चाळी असतात आणि कोणतीहि वेश्या एका चाळींत १५ दिवस राहिली की तिने तेथून दुसऱ्या चाळींत गेलें पाहिजे असा नियम आहे. हा नियम कडकपणें अंमलांत आणण्याचें काम पोलिसाचें असतें. वेश्येला आपल्या खोलींत स्वतःची एक मैत्रीण ठेवण्याची परवानगी असते आणि या मैत्रिणीच्या मार्फत तिला इतर जगाशीं संबंध ठेवतां येतो. याशिवाय तिला ठराविक वेळीं धंद्याव्यतिरिक्त आपल्या आवडीच्या एखाद्या पुरुषालाहि खोलींत घेतां येतें. या मैत्रिणीला किंवा अशा पुरुषाला वेश्यागृहास कांहीहि द्यावें लागत नाही.

या वेश्यागृहांची संख्या जरूर तितकी नसल्यामुळें या गृहांत नेहमी गर्दी असते, आणि वेश्यागृहांचे दाराशीं चोवीस तास गिऱ्हाइकांची रांग उभी असते. आंत जागा झाली म्हणजे दार उघडतें आणि आंत शिरण्याकरतां धकाबुकी सुरू होते, आणि त्यांना त्याची बिलकूल लाज वाटत नसल्यामुळे ते याच विषयावर मोठमोठ्यानें बोलत असतात. आतां कोणी म्हणेल की इटलींत देखील कांही लोक असे असणारच की त्यांच्या सभ्यतेच्या कल्पनेमुळे त्यांना जरूर असतांहि अशा रीतीने उघडपणें वेश्यागृहांत जायला लाज वाटेल. मग ते काय करतात ? अशा लोकांकरतां सभ्य वेश्यागृहें असतात आणि त्यांना पोलीसची तोंडी परवानगीहि असते. अर्थात् सभ्यता राखण्याचा बोजा चालकांवर असतो. या गृहांची जाहिरात थोडीबहुत पात्रांमार्फतहि होते, कारण त्यांच्या अभावीं लोक अनैसर्गिक मार्गांकडे वळतात हें त्यांना माहीत असतें.

लंडन किंवा बर्लिनप्रमाणें इटलींत रस्त्यांत वेश्या दिसत नाहीत. याचें कारण पोलिसाची कडक व्यवस्था हें मात्र नव्हे. एकदां फ्रेंच सैन्याला कांही काळ इटलींत रहावें लागलें असतां फ्रेंच सेनापतीने इटालिअन अधिकाऱ्यांस विचारलें

होतें की जनतेला त्रास होऊं नये या दृष्टीने सैन्याकरतां वेश्यागृहांची व्यवस्था कशी करावी ? यावर इटालिअन अधिकाऱ्याने उत्तर दिलें की तशी व्यवस्था करण्याचें कांही कारण दिसत नाही. येथल्या खालच्या वर्गांतील स्त्रियांस सैनिकांशी संबंध ठेवण्यांत कांहीच वैषम्य वाटणार नाही. इटालींतील कामगार वर्गांतील स्त्रियांना नीतीची विशेष परवा नसल्यामुळे तेथे धंदेवाईक वेश्या कमी असाव्या हें साहजिक आहे. म्युसोलीनीनें नीतीचें बरेंच बंड माजवलें आहे आणि सार्वजनिक स्नानगृहांत स्त्रियांनी पोहतेवेळीं अंगाला चिकटून बसणारे कपडे घालूं नये असा हुकूम काढला आहे. पण हुकुमांनी मनुष्यस्वभाव बदलत नाही. म्यूसोलीनी मूळचा शाळापंतोजी असल्यामुळे छडीने सर्व कामें होतात अशी त्याची कल्पना आहे, पण हा धंद्यामुळे झालेला गैरसमज आहे.

## रशिया

रशियासंबंधी खरी माहिती मिळणें अतिशय कठिण झालें आहे, कारण रशियांतलि व्यवस्था सर्व बाबतींत अतिशय उत्तम आहे असें दाखवण्याची रशिअन अधिकाऱ्यांची प्रवृत्ति असते, आणि वेश्यावृत्ति सर्वत्रच वाईट ठरल्यामुळे रशियांत ती बंद झाली आहे असें ते ठोकून सांगतात, परंतु वस्तुस्थिति फार वेगळी आहे. नियंत्रणाला विरोध करणाऱ्या इतर देशांप्रमाणेच रशियांतहि सोव्हिएट सरकारने पूर्वीचे नियंत्रणाचे सर्व कायदे रद्द केले आणि वेश्यावृत्ति बंद झाली असें ठरवलें. कायदे बंद झाल्यावर तेथील वेश्यांची अशीच कल्पना झाली की आपणहि कामगार वर्गांतीलच आहोंत आणि आपला धंदा अत्यंत उपयुक्त असल्यामुळे त्याला अतःपर कोणताहि अडथळा राहिला नाही ! पूर्वीचे श्रीमंत लोक गरीब झाले म्हणून कांही श्रीमंती नाहीशी झाली नाही. तोच पैसा नव्या लोकांच्या हातांत जाईल आणि ते तो पाण्यासारखा खर्च करतील, अशी त्यांची सहाजिकच कल्पना झाली. या समजुतीने इतर कामगारांप्रमाणेच वेश्याहि निशाणें घेऊन आपल्या मागण्या पुकारीत मिरवणुकींतून फिरूं लागल्या. इतरत्र स्त्रियांच्या कपड्यांच्या दुकानांत जशीं मेणाचीं चित्रें ठेवलेलीं असतात, तशा दुकानांच्या खिडक्यांत जवळजवळ नग्न स्त्रिया दिसूं लागल्या, आणि

अर्थात् दुकानांसमोर गर्दी जमूं लागली. पण वेश्यांना लवकरच प्रतिस्पर्धी उत्पन्न झाले. सर्वच भाई झाल्यामुळे पुरुषांची गरज भागवणें हें सर्व तरुण स्त्रियांचें कर्तव्य आहे अशी कल्पना अधिकाऱ्यांमार्फत स्त्रियांपुढें मांडण्यांत आली. इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणीं १८ ते ४० वर्षे वयाच्या सर्व स्त्रियांनी हें काम केलेंच पाहिजे असा नियम स्थानिक सोव्हिएटने केला. गरोदर स्त्रियांस मात्र चार महिने विश्रांति दिली होती ! इतर ठिकाणीं स्वातंत्र्याच्या नांवाने वाटेल तो धंदा करण्याची सर्व स्त्रियांस मोकळीक होती, पण पुष्कळ स्त्रियांनी एकत्र जमून धंदा करतां नये असा नियम होता, कारण मग तें वेश्यागृह होऊन भांडवलशाहीच्या वळणावर जाण्याचा संभव होता !

परंतु यांत एकच अडचण होती की अशा रीतीने स्त्रिया किती पैसे मिळवतात याचा हिशोब ठेवणें सरकारला कठिण होतें, कारण या बाबतींत देखरेख ठेवणें अशक्य, आणि खाजगी भांडवल कोणाजवळ जमूं द्यायचें नाही हें तर सोव्हिएटचें मुख्य तत्व. यामुळे शेवटीं वेश्यावृत्तीला सरकारी विरोध उत्पन्न झाला. रशियांत वेश्यावृत्ति हा गुन्हा नाही, पण सर्व धंद्यांची व्यवस्था सरकारकडे असल्यामुळे आणि इतर धंद्यांसारखी देखरेख या धंद्यावर ठेवणें शक्य नसल्यामुळे या धंद्याला परवानगी नाही. सरकारी परवान्याशिवाय रशियांत अन्न देखील मिळत नव्हतें हें लक्षांत घेतल्यास यांत विशेष आश्चर्य वाटण्याचें कारण नाही. ही स्थिति १९३५ पर्यंत चालू होती आणि या वर्षी मात्र सोव्हिएट सरकारने सर्व जगभर अभिमानाने पुकार केला की आतां रशियांत अन्नाकरतां सरकारी परवाना लागत नाही. अर्थात् हें सर्वथैव खरें नव्हतें. रशियांत सरकारी देखरेखीखालील अमुक धंद्यांत अमुक मनुष्य काम करतो अशी नोंद असल्याशिवाय त्याला जगण्याचा देखील हक्क नाही, मग इतर गोष्टी लांबच राहिल्या ! अर्थात् वेश्येला धंदा करायचा असल्यास तिला कोणत्यातरी सरकारी धंद्यांत नांव नोंदवलेंच पाहिजे, आणि मग फावल्या वेळांत हा धंदा केला पाहिजे. आणि असें करणाऱ्या वेश्या रशियांत आहेतच. परंतु कोणींहि उपद्व्यापी मनुष्याने एखाद्या स्त्रीवर वेश्यावृत्तीचा खोटा आरोप केला तरीदेखील तिला जगण्याची पंचाईत पडायची, कारण प्रत्येक बारीकसारीक बाबतींत रशियांत तिकिटें आणि पास लागतात. विशेषतः एखादी स्त्री–

मग ती वेश्या असो की नसो—एखाद्या अंमलदाराला किंवा सरकारांत वजन असलेल्या मनुष्याला वश झाली नाही, की तिच्याविरुद्ध तक्रार ठरलेलीच. आणि अशा रीतीने एखाद्या सभ्य स्त्रीने वेश्या होण्याचें नाकारल्याबद्दलच तिच्यावर वेश्यावृत्तीचा आरोप यायचा ! पण तिने जर या उपद्यापी लोकांची मर्जी पैसे किंवा शरीर देऊन संभाळली, तर मग तिला वेश्येचा धंदा करायला सदर परवानगी ! त्याला नांव निराळें दिलें म्हणजे झालें. ती आपल्या मित्रांची गरज भागवते, ती कांही वेश्या नाही.

पण सोव्हिएट रशियाचा इतर जगाशीं संबंध येऊं लागल्यापासून मात्र थोडाबहुत फरक झालेला दिसतो. व्यापाराच्या दृष्टीने इतर देशांशीं फायदेशीर करार करून घ्यायचे म्हटले कीं त्या त्या देशांच्या प्रतिनिधींना खुष केलें पाहिजे, आणि त्यांना खुष करण्याचा एक मार्ग म्हणजे वेश्या. याकरतां परदेशी लोकांना ज्या होटेलांत जागा दिलेली असते तेथे वेश्या असतात. अर्थात् या वेश्या सरकारी नोकर असतात. म्हणजे त्यांच्याकडे केवळ परदेशी लोकांना खुष करण्याचेंच काम नसून त्यांवर देखरेख करण्याचें आणि त्यांच्याकडून शक्य तितकी माहिती मिळवण्याचेंहि असतें. वेश्यांचा हा उपयोग कौटिल्याने सांगितलाच आहे.

रशियांतील वेश्यावृत्तीसंबंधी लिहिलेले सर्वच लेख विश्वसनीय नसतात. १९३३ सालीं एका फ्रेंच मासिकांत एका नियंत्रणविरोधी लेखकाने एक लेख लिहिला होता. ( त्याचा अनुवाद ‘ समाजस्वास्थ्य ’ मासिकाचे नोव्हेंबर १९३५ चे अंकांत दिला होता ). त्यांत असें एक विधान केलें आहे की ‘जुन्या रशियांत झारचे अंमलांत मॉस्को शहरांत २०००० वेश्या होत्या. आणि ही संख्या १९२८ सालापर्यंत चार हजारांवर आली, आणि १९३२ सालीं फक्त सातशें वेश्या शिल्लक राहिल्या. त्यांत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे की रशियांत वेश्यानियंत्रण नाही आणि हा फरक केवळ आर्थिक परिस्थिति बदलल्यामुळे झालेला आहे. शरीरविक्रयांत फायदा नसला म्हणजे स्त्रिया शरीरविक्रय करीत नाहीत’. झारचे वेळीं मॉस्को येथे २०००० वेश्या होत्या असें धरून चाललें तरी देखील १९३४ सालीं बर्लिन, लंडन, न्यू यॉर्क, शिकॅगो, वगैरे शहरीं लोकसंख्येच्या मानाने वेश्यांचें जें प्रमाण पडतें, त्यापेक्षा हें प्रमाण कमी आहे. शिवाय सोव्हिएट

रशियांत वेश्या किती आहेत हें समजावें कसें ? जर वेश्यांची नोंद नाही आणि नियंत्रणहि नाही, तर १९२८ सालीं ४००० आणि १९३२ सालीं ७०० हे आंकडे कोठून काढले ? वेश्यांची वेश्या म्हणून नोंद नाही आणि सभ्य स्त्रियांवरहि वेश्यावृत्तीचा आळ येतो, तर वेश्या किती आहेत हे समजण्यास कोणताहि मार्ग नाही. स्त्रियांची आर्थिक स्थिति सुधारल्यामुळें त्या शरीरविक्रय करीत नाहीत हें साफ खोटें आहे. रशियांतील वेश्या नट्टनथट्टन गिऱ्हाइकांना आकर्षण करण्याचा प्रयत्न करीत नाहीत, याचें कारण इतकेंच की त्याही गरीब असतात आणि गिऱ्हाइकहि गरीबच असतें. थाटमाट करावा इतकी त्यांची किंमत नसते. एकंदर आर्थिक परिस्थिति जेव्हां उत्तम असेल तेव्हाच वेश्यावृत्तीला उत्तेजन मिळतें. तेव्हा वेश्यावृत्ति नाहीशी करण्याचा एक मार्ग म्हणजे देशाची कधीहि भरभराट होऊं देतां नये ! जेव्हा मोठमोठीं जागतिक प्रदर्शनें भरतात, किंवा जेव्हा लोकांजवळ पुष्कळ पैसा खेळता असतो, तेव्हा स्त्रिया इतर धंदे सोडूनहि वेश्या बनतात, असा अनुभव नेहमी येतो. वेश्यांची कितीहि कींव करण्याचा आव सोंवळ्या लोकांनी आणला, तरी तो स्त्रियांचा एक सोपा धंदा आहे आणि त्या धंद्याइतके सहज पैसे दुसऱ्या कोणत्याहि धंद्यांत मिळत नाहीत. याचा फायदा स्त्रियांनी न घेतला तरच आश्चर्य.

रशियांतील वेश्यावृत्तीवर 'लुई शार्ल ऱ्हाय्ये' यांनी एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांतील सर्व अनुभव त्यांनी स्वतःच घेतले होते की नाही याची कोणाला शंका येईल, परंतु त्यांच्या खरेपणाबद्दल शंका घेण्यासारखें त्यांत कांहीच नाही. ते म्हणतात की ज्या वेळीं रशियांत कोणताहि उपयुक्त पदार्थ बाजारांत मिळणें कठिण होतें, अशा वेळीं एखादा मासा, केळें, किंवा साबणाचा तुकडा, एवढ्याच मोबदल्याने शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रिया होत्या, कारण त्या वेळी या वस्तु अतिशय दुर्मिळ होत्या.

रशियांत सर्वांचीच पोटापाण्याची व्यवस्था सरकारकडून होत असल्यामुळे येथील स्त्रियांना पोटाकरतां वेश्यावृत्ति करण्याचें कारण नाही हें खरें. तथापि तेथे समागमस्वातंत्र्य असल्यामुळे तेथे सुलभ स्त्रिया पुष्कळ असतात. आणि वेश्या नसतातच असें म्हणतां येईल का ? एका प्रवाशाने लिहिलें आहे, 'मॉस्को शहरांत मी एकदा आपल्या होटेलांत परत येत होतों तों माझ्या गालाला कांही-

तरी लागल्याचा भास झाला, आणि वळून पाहतों तों एका हंसतमुख तरुणीने माझ्या खोलीचा नंबर विचारला. तिच्या चेहऱ्यावर उल्हास होता, हलकटपणा नव्हता. प्रथम ती रशिअन भाषेंत बोलली, पण मीं न समजल्याचें ढोंग करतां ती इंग्रजींत बोलली, कारण रशियांत परकी मनुष्य बहुधा अमेरिकन असायचा! ती धंदेवाईक वेश्या नव्हती हें उघड होतें, पण कदाचित् तिला रेशमी मोजे पाहिजे असतील, किंवा केवळ वैचित्र्यहि पाहिजे असेल, कोणीं सांगावें?' दुसऱ्या एका प्रवाशाने दारूच्या दुकानांतही सुलभ स्त्रिया असल्याचें लिहिलें आहे. मात्र तेथे स्त्रियांस पैसे देणें हा गुन्हा आहे, तेव्हा पैसे न देतां एखादी वस्तुच विकत घेऊन द्यावी लागते.

## बेल्जिअम्

येथे वेश्यानियंत्रण स्थानिक अधिकाऱ्यांवर सोंपवलेलें आहे. सामान्यतः येथे फ्रान्ससारखीच पद्धत आहे, तरीपण येथेहि नियंत्रण बंद करण्याचे प्रयोग झाले, त्यांचीं हकीकत पुढें देऊं. १९२५ सालापासून येथे अनेक वेश्यांनी एकत्र राहण्याची बंदी आहे.

## स्पेन, पोर्तुगाल, रुमॅनिया, बल्गेरिया

स्पेनमधें फक्त २३ वर्षांच्या पुढच्या स्त्रियांची वेश्या म्हणून नोंद होऊं शकते. बाकी सर्व व्यवस्था फ्रान्ससारखीच होती, परंतु १९२८ सालीं तेथे वेश्यावृत्ति बंद करण्याचा प्रयत्न चालला होता. फ्रँकोच्या कारकीर्दींत काय होतें हें पाहणें आहे.

पोर्तुगालमधें १९२७ पर्यंत फ्रान्ससारखीच व्यवस्था होती, आणि पोलिसाची कडक देखरेख होती.

बल्गेरिआ व रूमनिया येथे १९२७ सालींच वेश्याबंदी करण्याकरतां नवीन कायदे झाले.

## आर्जेंटाइन रिपब्लिक

वेश्यावृत्तीचे बाबतींत या लोकसत्ताक राज्याचा आणि त्याची राजधानी ब्यूनॉस एरिस शहराचा बराच बोलबाला झाला आहे. तेथील कायदा पुढीलप्रमाणे

आहे. वेश्यांसंबंधी नियंम नगरपालिकांनी करायचे असतात. या नियमांनुसार वेश्यावृत्ति करणाऱ्या २२ वर्षांपुढील स्त्रीची नोंद केली जाते. वेश्यागृहांची संख्या मर्यादित आहे. दोन रस्त्यांच्या मधील गृहसमुदायांत एकच वेश्यागृह असूं शकतें, आणि एका गृहांत एकच वेश्या राहूं शकते. हीं गृहें शाळांच्या किंवा देवळांच्या जवळ असतां नये. प्रत्येक वेश्येला एक नोकरीण ठेवतां येते, पण तिचें वय ४५ चे आंत नसावें, आणि तिचीहि नोंद केलेली असते. या शहरांत १९२२ सालीं ४९७ वेश्यागृहें होतीं व १९२३ सालीं ५८५ होतीं. वेश्येने वेगळ्या घरांतच राहिलें पाहिजे आणि या घरांतील कोणतीहि खोली शेजाऱ्यांना दिसेल अशी नसावी आणि तेथे कोणत्याहि इतर स्त्रिया येतां नये. अमुक घर वेश्यागृह आहे हें ओळखतां येईल असें कोणतेंहि चिन्ह बाहेर असतां नये.

## मेक्सिको

वेश्येने नोंद केल्याशिवाय धंदा करतां नये आणि तिचें वय १८ पेक्षा जास्त आणि ५० पेक्षा कमी असलें पाहिजे असा कायदा आहे.

## ग्रीस

वेश्यांकरतां वेगळी जागा आहे, तिला व्हूर्ला म्हणतात. या आवारांत खालच्या दर्जाच्या ९६ वेश्या राहतात (१९२७), आणि आवाराभोंवतीं एक उंच भिंत असून तिला एकच दरवाजा आहे व त्यावर पोलिसचा पहारा असतो. पोलीसच्या परवानगीशिवाय वेश्यांना घर बदलतां येत नाही आणि रात्रीं ९ वाजल्यावर आवाराबाहेर जातां येत नाही.

## यूगोस्लाव्हिया

वेश्यावृत्तीसंबंधी विशेष कायदे नाहीत. १९२१ सालीं तेथे कायद्याने बरींच चिकित्सालयें स्थापन झालीं. प्रांतभेदाने कोठे वेश्यावृत्तीला उघड परवानगी आहे, कोठे नाही. परंतु एकंदरींत नोंदणीची प्रवृत्ति नाही. बेल्ग्रेड शहरांत वेश्यांवर कोणतेहि निर्बंध नाहीत, पण अमुक वेश्येपासून मला रोग झाला अशी कोणीं तक्रार केल्यास तिची चौकशी होते.

## छेकोस्लोव्हॅकिया

येथे १९२२ सालीं रोगप्रतिबंधक कायद्याने नवीन व्यवस्था अंमलांत आली. यांत [१] रोगप्रतिबंधक उपाय, [२] वेश्यावृत्ति, [३] शिक्षा, [४] सामान्य नियम, इतक्या गोष्टींचा समावेश होतो. पहिल्या भागाप्रमाणे गर्मी, परमा किंवा मृदुव्रण झालेल्या कोणत्याहि रोग्याने विशिष्ट डाक्तरांकडून उपचार करून घेतले पाहिजेत. गरीबांस हे उपचार सरकारी खर्चाने फुकट मिळतात. दुसऱ्याला रोगाचा संसर्ग दिल्याचा आरोप कोणावरहि आल्यास त्याची सक्तीने तपासणी होऊन जरूर तर कांहीं दिवस सक्तीने इस्पितळांत ठेवण्यांत येतें. डाक्तराच्या उपदेशाप्रमाणे न वागल्यामुळे कोणापासून संसर्गाचा धोका आहे असें वाटल्यास त्यालाहि इस्पितळांत ठेवण्यांत येतें. सर्व रोग्यांची वेळोवेळीं सक्तीने तपासणी होते. डाक्तरांनी रोग्यांसंबंधी लेखी माहिती सरकारी अधिकाऱ्यांस दिली पाहिजे. अर्थात् याव्यतिरिक्त त्यांनी रोग्यांचीं नांवें गुप्त राखलीं पाहिजेत. रोगांवर उपचार पत्राने करतां नये असाहि कायदा आहे, आणि रोगांसंबंधी सामान्य जनतेला माहिती देण्याची व्यवस्थाहि कायद्यांत आहे.

कायद्याच्या दुसऱ्या भागाने सर्व वेश्यागृहें बंद केलीं आहेत आणि अशा गृहांतील वेश्यांना तात्पुरता आश्रय देऊन सुधारण्याची संधी देण्याकरतां वेगळीं गृहें काढण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. नोंदणी व तपासणीसंबंधी सर्व नियम याच कायद्याने रद्द केले आहेत. शिवाय १८ वर्षांचे आंतील मुलांमुलींची वागणूक अनीतीची आहे असें पोलिसास आढळल्यास त्यांना सुधारण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार पोलिसाला दिलेला आहे.

तिसऱ्या भागांत वरील नियम मोडणारांना कोर्टाने शिक्षा न केल्यास एक महिनापर्यंत तुरुंग आणि दहाहजार क्राउनपर्यंत दंड करण्याचा अधिकार पोलीसला दिलेला आहे. कोणीं हलगर्जीपणानें दुसऱ्याला रोगसंसर्ग दिल्यास दहापासून दहाहजार क्राउनपर्यंत दंड आणि एक महिनापर्यंत तुरुंग अशी शिक्षा आहे, आणि कोणीं जाणूनबुजून संसर्ग केल्यास एक ते आठ महिने तुरुंगवासाची शिक्षा आहे. अंगावर पिणाऱ्या मुलांना दायांनी संसर्ग

केल्याबद्दलहि दंड आहे. याशिवाय सार्वजनिक ठिकाणीं कोणींहि गैरशिस्त किंवा असभ्य रीतीने स्त्रीला किंवा पुरुषाला वेश्यावृत्तीकरतां आव्हान केल्यास किंवा १६ वर्षांच्या आंतील मुलांना फुसलावण्याचा प्रयत्न केल्यास अशा लोकांवर खटला होऊन दहा ते दहाहजार क्राऊनपर्यंत दंड आणि १५ दिवस पासून सहा महिनेपर्यंत तुरुंग अशी शिक्षा होते. शेजाऱ्यांची नीति विघडेल अशा रीतीने कोणीं वेश्यावृत्ति आचरल्यास किंवा मुद्दाम अशा तऱ्हेचा कांही देखावा दिसू दिल्यास १५ दिवस ते तीन महिने तुरुंगाची शिक्षा आहे.

चौथ्या भागाप्रमाणे, कोर्टाने शिक्षा केल्यास त्यावर अपील करून त्याचा निकाल होईपर्यंत शिक्षा तहकूब करतां येते, परंतु पोलिसाने दिलेली शिक्षा तहकूब होत नाही.

वरील कायद्याचा विचार करतां त्यांतून पुढील गोष्टी स्पष्ट होतात. वेश्यावृत्ति हा गुन्हा नाही इतकेंच नाही तर सार्वजनिक ठिकाणीं देखील शिस्त किंवा सभ्यता न विघडतां गिऱ्हाईक मिळवणें हाहि गुन्हा नाही. फक्त सोळा वर्षांचे आंतील मुलांस फुसलावणें हा गुन्हा आहे. वेश्यांवरील नियंत्रण काढूं पाहणाऱ्या लोकांची सर्व तत्वें येथें अंमलांत आलीं आहेत, परंतु कोर्टापेक्षा पोलीसला जास्त अधिकार देणें कोणालाहि इष्ट वाटणार नाही. पोलीसच्या अरेरावीने लोकांच्या स्वातंत्र्याला धोका पोहोंचतो. [ हें लिहून झाल्यावर हा देश हिटलरच्या ताब्यांत गेला आहे ].

## जपान

ख्रिस्ती जीवनीतीचा फारसा पगडा न बसल्यामुळे या बाबतींत स्वतंत्र विचार करणारें आज एवढें एकच राष्ट्र शिल्लक आहे. येथेहि हल्ली वेश्यावृत्तीविरुद्ध चळवळ चालू आहे, परंतु पूर्वींची पद्धत पुढे दिली आहे, ती अजून अजीबात नाहीशी झालेली नाही. त्यांतील मुख्य मुद्दा म्हणजे वेश्यांना सर्वत्र वावरूं न देतां एका वेगळ्या मोहल्ल्यांत ठेवणें. टोकिओ येथील वेश्यांच्या मोहल्ल्याचें नांव 'योशिवारा' हें जगभर प्रसिद्धि पावलेलें आहे. फिओ या फ्रेंच लेखकाने आपल्या ग्रंथांत पुढील माहिती दिलेली आहे:—

जपानच्या राज्याचे फोर्मोसा सोडून ४७ प्रांत केलेले आहेत, आणि प्रत्येक प्रांतांत १ ते ५९ पर्यंत वेश्यांचे मोहल्ले आहेत. तेथील गृहमंत्र्याने १८९८ सालीं ब्रुसेल्स येथे भरलेल्या परिषदेंत अशी माहिती दिली होती की अशा मोहल्ल्यांची एकंदर संख्या ५४६ होती, आणि त्यांत १०७२ घरें आणि ४९२०८ वेश्या होत्या. आणि याशिवाय सुमारें तीस हजार नर्तिका आणि दहा हजार रखेल्या होत्या. टोकिओ येथील योशिवारा हें प्रथम १६१७ सालीं स्थापिलें. हा मोहल्ला शहरापासून लांब असून तेथपर्यंत एक ट्रॅमवेचा फांटा नेलेला आहे. या मोहल्ल्यांत वेश्या, नोकरचाकर व व्यापारी मिळून सुमारें १५००० लोक राहतात. तेथे वेगळी पोलीसची व्यवस्था आहे आणि त्यांचें काम म्हणजे वेश्यांना घरांबाहेर फिरूं न देणें, लोकांनी माहिती विचारल्यास देणें, आणि विशेष कामाशिवाय स्त्रिया किंवा मुलें यांना आंत जाऊं न देणें. वेश्यांच्या वागणुकीविषयी १८९६ साली नवीन नियम केले. त्यांअन्वयें वेश्यांनी वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे, अंतर्व्यवस्थेकरतां त्यांनीच कमिटी नेमून नियम केले पाहिजेत, आणि त्यांना पोलिसची अनुमति मिळवली पाहिजे.त्यांना वैद्यकीय तपासणीचीहि सक्ती असते. कोणत्याहि वेश्येला अशा गृहांत राहण्यास जाण्यापूर्वी त्या गृहाच्या चालकाशीं कायदेशीर करार करावा लागतो, आणि या सर्व मोहल्ल्यावर पोलीसची सक्त देखरेख असते. तें एक सरकारी खातें आहे आणि इतर देशांप्रमाणे जपानी सरकारला त्याची मुळीच लाज वाटत नाही. यामुळे तेथील व्यवस्था अधिक चांगली राहते आणि तपासणीची व्यवस्था उत्तम ठेवल्यामुळे तेथे गुप्त रोगांचें प्रमाण अतिशय कमी आहे. टोकिओ येथील पोलीसचा डाक्तर कुरीमोटो याने लिहिलें आहे की त्या शहरांत वेश्यागृहांत ५००० पेक्षा जास्त वेश्या होत्या, आणि त्यांत १९०० ते १९०४ पर्यंत रोग्यांचें प्रमाण शेंकडा ३.६३ पासून ४.५४ पर्यंत असे. परंतु चोरून वेश्यावृत्ति करण्याबद्दल पकडून आणलेल्या स्त्रियांत हें प्रमाण शेंकडा १३.५ पासून १९ पर्यंत होतें. या वेश्यागृहांत तरुण स्त्रिया खुषीने जात असत आणि पैसे मिळवून कुटुंबाला मदत करून, स्त्रीधनहि जमवून नंतर लग्न करीत असत, आणि त्यांची किंमत कोणीहि कमी समजत नसे. १९२६ सालीं राष्ट्रसंघापुढें जपानने मांडलेली सरकारी माहिती पुढीलप्रमाणे आहे:—

" नोंदलेल्या वेश्यांकरतां आणि वेश्यागृहांकरतां वेगवेगळे कायदे आहेत, आणि त्यांचा उद्देश सभ्यता आणि आरोग्य राखण्याचा असल्यामुळे वेश्यांना शहराच्या वेगळ्या भागांत ठेवणेंच सामान्यतः सोयीचें पडतें. त्यांना शहरभर राहूं दिल्याने सभ्यता बिघडण्याचा संभव असतो, कारण जपानी घरांच्या खिडक्या आणि दारें नेहमी उघडीं ठेवण्याची वहिवाट आहे. त्यांच्याकरतां राखून ठेवलेल्या शहराच्या भागांत कोटेहि राहण्याची त्यांना मोकळीक असते, परंतु वेश्यागृहाबाहेर त्यांनी धंदा मात्र करतां नये असा निर्बंध आहे. परंतु पाहिजे तेथे राहण्याच्या स्वातंत्र्याचा फायदा फारशा वेश्या घेत नाहीत, कारण वेश्यागृहाबाहेर राहण्याने त्यांना खर्चहि जास्त येतो, आणि त्यांची सोयहि तितकी चांगली होत नाही. परंतु हल्ली बाहेर राहण्याची प्रवृत्ति वाढत आहे असें दिसतें.

" वेश्यानियंत्रणाची पद्धत जपानमधें कित्येक शतकें चालत आलेली आहे आणि ती एकदम बदलणें म्हणजे वेश्यावृत्तीला अजीबात बंदी करण्यासारखेंच होईल. जपानच्या पद्धतीमुळे वेश्यांचा **व्यापार** कोणालाहि करतां येत नाही. गुमा नांवाच्या प्रांतांत १८९३ सालीं कांही जपानी ख्रिस्ती लोकांच्या आग्रहामुळे वेश्यांची नोंद बंद केली, पण त्याच्या परिणामीं उपहारगृहांच्या स्वरूपांत प्रच्छन्न वेश्यागृहें सुरू झालीं आणि १९१२ सालीं अशा उपहारगृहांतील नोकरिणींकरतां आणि गैशांकरतां वेगळा कायदा करावा लागला. या कायद्याने नोकरिणींना महिन्यांतून तीनदां सक्तीची वैद्यकीय तपासणी लागू केली आणि त्यांच्या येण्याजाण्यावर सक्त देखरेख सुरू झाली, आणि या प्रच्छन्न वेश्यांवर नोंदलेल्या वेश्यांपेक्षाहि कडक देखरेख ठेवल्यामुळेच गुप्त रोगांचे बाबतींत कांही व्यवस्था करतां आली.

" नोंदलेल्या वेश्यांना धंदा करण्याची सक्ती नसते, आणि तो सोडण्याची त्यांची इच्छा असल्यास त्यांना कोणत्याहि कारणाने अडवतां येत नाही. यामुळे नोंदलेल्या वेश्या कैदी असतात हें म्हणणें बरोबर नाही. गेल्या कांही वर्षांत स्वेच्छेने धंदा सोडणाऱ्या वेश्यांची संख्या वाढलेली आहे. जपानी सरकार केवळ शिस्तीच्या दृष्टीनेच नव्हे तर सामाजिक आरोग्याच्या दृष्टीनेहि शक्य ती सुधारणा

करण्याची खटपट करीत आहे. वेश्या नांव नोंदण्यास येईल तेव्हा तिला रोग असल्यास नांव नोंदीत नाहीत. आणि शिवाय नोंदलेल्या सर्व वेश्यांची निदान आठवड्यांतून एकदां तपासणी होते आणि संसर्गाचें बिलकुल चिन्ह दिसलें नाही तरच तिला धंदा करण्याची परवानगी मिळते. वेश्यागृहांतहि स्वच्छतेची अत्यंत खबरदारी घेतली जाते. ही देखरेख वेश्यागृहांतच ठेवतां येते, हा वेश्यागृहांचा एक फायदा आहे. एरवी तितकी स्वच्छता राहणार नाही; कारण खालच्या वर्गांत आधुनिक स्वच्छतेच्या कल्पना फारशा पसरलेल्या नाहीत.

"नोंदलेल्या वेश्यांना शक्य तितकें स्वातंत्र्य देण्याची आम्ही खटपट करतों आणि त्यांना पत्रलेखन, वाचन, इष्टमित्रांस भेटणें, वगैरे बाबतींत कोणताहि अडथळा होत नाही. वेश्यागृहांच्या चालकांकडून त्यांना कोणत्याहि प्रकारचा त्रास होऊं नये याबद्दल आम्ही खबरदारी घेतों, व १९२१ ते १९२३ या दोन वर्षांत याबद्दल १२७ खटले झाले. त्यांना शहराच्या राखीव भागांत रहावें लागते म्हणून त्यांच्या करमणुकीचीहि सोय केलेली आहे. एक विश्रांतीचा दिवस ठेवून त्या दिवशीं सर्व वेश्यांनीं एकत्र जमावें, कांहीं खेळ खेळावे, सिनेमा पहावा, किंवा कोठे बाहेरहि जावें अशी व्यवस्था आहे. वेश्यागृहांतून बाहेर पडल्यावर त्यांना अडचण पडूं नये, म्हणून त्यांना वेगवेगळे धंदे शिकवण्याकरतां तज्ञ नेमलेले असतात आणि ते तेथे जाऊन त्यांना धडे देतात.

"हल्लीच्या पद्धतींत सर्व व्यवस्था सरकारने केल्यामुळे वेश्यागृहांच्या चालकांशी वेश्यांचा करार होत नाही. यामुळे वेश्यांवर त्यांचा कोणताही हक्क नसतो आणि त्यांना राखीव भागांत कोठेहि राहतां येतें, मात्र वेश्यागृहाशिवाय इतरत्र धंदा करतां येत नाही. इतकाच काय तो वेश्यांवर निर्बंध असतो."

जपानांतील वेश्यावृत्तीचें वर्णन गैशांशिवाय पुरें होणार नाही. ज्या वेळीं लोकांजवळ पैसा आणि वेळहि मुबलक होता, तेव्हा गैशांची संस्था अस्तित्वांत आली आहे. त्यांचा धंदा केवळ नर्तकीचा नसून संभाषणचातुर्याने सुशिक्षितांची देखील करमणूक करण्याइतकें त्यांचें शिक्षण झालेलें असतें. हल्ली जपानी लोक परदेशांतून अनेक ढंग शिकून येतात आणि त्यांच्या बायकाहि आतां त्यांचेबरोबर बाहेर पडतात, तेव्हा गैशांचें नृत्यगायन आणि संभाषण ऐकण्यास त्यांना वेळ

कोठे असतो ? तथापि गैशा आपलें महत्व कायम राखण्याची शक्य ती खटपट करीत आहेत. त्यांना परकी भाषा आणि रंगढंग शिकवण्याकरतां कालेजें निघालीं आहेत. सर्वांत उच्च प्रतीच्या गैशांना वेश्या म्हणतांच येणार नाही. उच्च दर्जाच्या गोव्याच्या कलावंतिणींप्रमाणेच त्यांचा धंदा नृत्यगायनाचा असून त्या एखाद्या श्रीमंत मनुष्याच्या तैनातींत असतात. हॅवलॉक एलिसने म्हटलें आहे की 'त्या बहुधा खालच्या वर्गांतल्याच असतात, पण त्यांच्या शिक्षणावर अतिशय खर्च झालेला असतो, आणि त्यांना युरोपांतील नटींइतके पगार मिळतात. तरी देखील त्यांना लहर असते आणि मनांत आलें तरच त्या नाचतात. खरी उच्च प्रतीची गैशा पाश्चात्यांना पहायला देखील मिळत नाही, खुद्द बादशहानेंच हुकूम केला तर गोष्ट वेगळी, इतका त्या आपला दर्जा उच्च समजतात.' सारांश प्राचीन ग्रीसमधें जशा सुशिक्षित गणिका ( हेटायरा ) असत आणि केवळ त्यांच्या संभाषणाकरितां लोक त्यांच्याकडे जात, तशी गैशांची स्थिति होती. ग्रीक लोक म्हणत असत कीं बौद्धिक समाधानाकरतां उच्च दर्जाच्या सुशिक्षित हेटायरा, शारीरिक सुखाकरतां साध्या वेश्या, आणि संततीकरतां लग्नाच्या बायका. हेच तीन प्रकार जपानांतही आहेत, गैशा, वेश्या आणि लग्नाच्या बायका.

## चीन

येथेहि मिशनऱ्यांचें वजन अजून फारसें पडलें नसल्यामुळे वेश्या ही एक सार्वजनिक संस्था आहे आणि चिनी लोकांना याची मुळीच लाज वाटत नाही. इंग्रजांच्या चिनी वसाहतींत मात्र त्यांनी वेश्यागृहें बंद केलीं आहेत आणि याचा परिणाम शिस्त आणि आरोग्य या दोन्ही दृष्टींनी हितावह नाही. चिनी लोकांना एकटें राहणें आवडत नाही, ते सामान्यतः गट करून राहतात. त्याचप्रमाणें वेश्यांनाहि एकटें राहणें पसंत नसतें, यामुळे त्यांना वेश्यागृहें पसंत असतात आणि यांत त्यांचें कांही नुकसानहि नसतें. चिनी वेश्या पुष्कळ वेळां वयाने लहान असतात आणि वेश्यागृहांच्या मालकिणी त्यांच्या सोयींकडे उत्तम लक्ष देतात. कँटन शहरांत त्या फुलांनी शृंगारलेल्या होड्यांत राहतात, किंवा निदान रहात असत. परंतु आतां ख्रिस्ती सोंवळेपणा तेथेहि त्यांना बाधला आहे.

डॉ. श्लेगेल यांनी त्यांचें वर्णन दिलें आहे की त्या अत्यंत सभ्य रीतीने राहतात, आणि त्यांच्या वागणुकींत किंवा पोषाखांत त्यांचा धंदा ओळखण्यासारखें असें कांही परक्या मनुष्याला तरी दिसत नाही. चीनमधें बरेच दिवस राहिल्यावर मग हें समजूं लागतें. त्यांच्या धंद्यामुळे त्यांना डाग लागला असें कोणी मानीत नाही, कारण एखाद्या बड्या मनुष्याने त्यांना रखेली म्हणून ठेवल्यास त्यांना समाजांत मान मिळतो. वर सांगितलेल्या होड्यांशिवाय आणखी शहर-भर कोठेहि रहायला त्यांना मोकळीक असते.

## सयाम

सयामांतील इतर स्त्रियांप्रमाणे तेथील वेश्याहि स्वातंत्र्याला अतिशय महत्व देतात, आणि त्या स्वतःच्या मर्जीप्रमाणे आपली व्यवस्था पाहतात. त्या मध्यस्थाच्या ताब्यांत कधीहि सांपडत नाहीत, यामुळे तेथे वेश्यागृहें क्वचितच असतात. अत्यंत तरुण वेश्येला देखील स्वतंत्रपणें धंदा करायला बिलकुल भीति वाटत नाही. अर्थात् मध्यस्थी करणाऱ्या कांही स्त्रिया असतात, पण त्यांना विशेष महत्व नसतें. एखादी वेश्या आपल्या एखाद्या किंवा अनेक मैत्रिणींबरोबर देखील राहील, पण ही केवळ तिच्या खुशीची गोष्ट आहे. तसेंच घरकामाला तिच्याकडे एखादी वयस्क बाईहि असेल, पण ती केवळ कामापुरती, किंवा एखादे वेळीं सल्ला विचारण्यापुरती. तिला कोणताही अधिकार नसतो. एखादी वेश्या कामापुरती संकेतगृहांत जाईल आणि एरवीं स्वतंत्र राहील. ती नेहमी नीटनेटकी असते, अधाशी नसते, आपण कमनीय आहोंत आणि लोकांना सुख देऊं शकतों यांतच तिला आनंद वाटतो, आणि आपण कांहीं वाईट गोष्ट करीत आहों असें त्यांना स्वप्नांतहि वाटत नाही.

## तुर्कस्तान

मुसलमानी धर्म यहुदी धर्मांतूनच निघाला असल्यामुळे आणि शिवाय मुसलमान यहुदी धर्माचा द्वेष करीत असल्यामुळे त्यांनी समागमस्वातंत्र्याची पुरुषांपुरती सोय केली आहे. यामुळे ते चैनीकरतां वेश्यांकडे जाऊनहि त्यांचा तिरस्कार करतात. या बाबतींत मंगोलिअन लोकांइतका समंजसपणा मुसलमानांत

दिसत नाही आणि ख्रिस्त्यांइतका हेकेखोरपणाहि नाही. तुर्कस्तानांतील व्यवस्था त्यांनी राष्ट्रसंघाला कळवली आहे ती अशी (१९२७). "चोरून धंदा करणारी वेश्या पोलीसला सांपडल्यास तिची प्रथम वैद्यकीय तपासणी करून तिला रोग असल्यास इस्पितळांत पाठवतात, आणि तिला परत आपल्या नवऱ्याकडे, आई-बापांकडे, किंवा पालकांकडे पाठवतात. ती पुनः पोलीसाला सांपडल्यास तिचा फोटो घेतात आणि पुनः वैद्यकीय तपासणी करतात. ती तिसऱ्यांदा सांपडल्यास आणि तिचें वय १८ पेक्षा जास्त असल्यास, तिची वेश्या म्हणून नोंद करतात, आणि वय कमी असल्यास तिच्या पालकांना बोलावून आणून त्यांना इषारा देतात की तिच्या वागणुकीबद्दल तुम्हाला जबाबदार धरलें जाईल. अठरा वर्षांपुढील स्त्रीला खुशीने वेश्या होणें असेल तर तिने पोलीसच्या कचेरींत जाऊन तसें सांगावें, म्हणजे तिचा फोटो व बोटांचा छाप घेतात, वैद्यकीय तपासणी करतात आणि तिला परवाना देतात.

## ईजिप्त

अलेक्झांड्रिया शहरांत, वेश्यावृत्ति कोठेकोठे चालते हें गांवभर हिंडून शोधून काढण्याकरतां दोन यूरोपीय स्त्रिया नेमलेल्या आहेत. ही बातमी त्या गव्हर्नरच्या आफिसांत देतात आणि नंतर या प्रच्छन्न गृहांच्या चालकांना शिक्षा होते.

## अरबस्तान

यहुदी लोकांप्रमाणेच अरबी लोकहि वेश्यांचा तिरस्कार करतात, आणि एखादी स्त्री वेश्येचा धंदा करते असें समजल्यास तिच्या नातलगांपैकी कोणीतरी आपल्या कुटुंबाला लागलेला कलंक धुवून काढण्याकरतां तिचा खून करतो. यामुळे ज्यांना कुटुंब नसतें अशाच स्त्रिया वेश्या होतात.

## इराण, इराक

वेश्यावृत्ति धर्मविरुद्ध असल्यामुळे तिला कायदेशीर परवानगी नाही. तथापि बसरा येथे शहराला लागून एक वेश्यांचें बंद आवार आहे व तेथे दरवाजावर पोलीसचा पाहरा असतो.

## अल्जीरिया

हा उत्तर आफ्रिकेंतील प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यांत आहे, यामुळे तेथे फ्रान्स-सारखीच व्यवस्था आहे. येथील लोक मुसलमान आहेत. दक्षिणेकडील एका गटांत विवाहापूर्वी मुलींनी वेश्यावृत्तीने हुंड्याकरतां पैसे मिळवण्याची पद्धत आहे. हें करतांनाहि त्या आईबापांच्या देखरेखीखालीच असतात आणि त्यांत कोणालाहि कमीपणा वाटत नाही. या उत्तम नर्तिका असतात. अल्जीरियांत इतक्या लहान मुली वेश्येचा धंदा करतात की येथे १४ वर्षांच्या मुलीची देखील नोंद करणें भाग पडतें, परंतु त्यांना ताबडतोब वेश्यांचें तांबडें तिकीट न देतां हिरवें देतात, व त्याचा अर्थ असा की ती पक्की वेश्या नव्हे. पण ती जर हट्टाने धंदा चालू ठेवील तर तिलाहि शेवटीं तांबडें तिकीट देतात. परदेशांतील वेश्यांस मात्र हिरवें तिकीट देतच नाहीत, तावडतोब तांबडेंच देतात. तेथे नोंद न केलेल्या वेश्याहि असतात, पण त्या बहुधा पानगृहांत असतात. इतर वेश्या सकाळीं अकरा वाजल्या-पासून रात्रीं उशीरपर्यंत रस्त्यांत हिंडत असतात.

## मोरोक्को

कॅसाब्लांका बंदरांत वेश्यांकरतां एक वेगळें आवार आहे, व त्याचे भोंवतीं एक उंच भिंत आहे. तिला एकच दरवाजा, आणि दरवाज्याशीं एक पोलिसचा आणि एक लष्करी असे दोन शिपाई असतात. या आवारांत शेंकडों लहानलहान घरें आहेत आणि त्यांत सर्व देशांतल्या सर्व जातीच्या वेश्या राहतात. हें एक लहानसें गांवच आहे. तेथे दुकानें आहेत, सिनेमा आहे, एक हमामखाना आहे. येथे एका पाशाचें राज्य आहे आणि वेश्यांना धंदा करण्याची पूर्ण परवा-नगी आहे. एखाद्या गिऱ्हाइकाने पैसे न दिल्यास ती त्याला ताबडतोब पाशापुढे खेंचते आणि पाशाचे हुकुमाने त्याला पैसे द्यावे लागतात.

## कोचीन चायना

हें फ्रेंचांचे ताब्यांत आहे. याची राजधानी सायगांव येथें १९३२ सालीं हुकूम काढला की वेश्यांना होटेलांत जागा देऊं नये आणि चहाच्या दुकानांतहि जायची त्यांना परवानगी नाही.

## ब्रिटिश हिंदुस्थान

मुंबई व मद्रास येथे सोंवळ्या लोकांनी संस्था स्थापन करून राष्ट्रसंघाला वेश्यांसंबंधी चौकशी करण्याची विनंति केली. कलकत्ता येथे १९२३ सालीं केलेल्या नवीन कायद्याप्रमाणे शाळा, देवळें, किंवा कांही मोठे रस्ते, यांजवळ एखाद्या घरांत वेश्यावृत्ति चालत आहे असें समजल्यास ती बंद करण्याचा अधिकार पोलीसला दिलेला आहे. मुंबईलाहि १९२३ सालींच वेश्यावृत्तीविरुद्ध एक कायदा झाला आणि नंतर त्यांत फरक करून कायदा अधिक कडक केला. त्याचा नेहमीचा परिणाम म्हणजे प्रच्छन्न वेश्यावृत्ति वाढली आहे, आणि मर्दन-गृहें, स्नानगृहें वगैरे निमित्तांनी वेश्यावृत्तीला ऊत आला आहे. पोलिसाने असें एक गृह बंद केलें तर दुसरीकडे नवीन उघडतें, व पोलीसला लांच खायलाहि चांगली सवड मिळते.

## ब्रिटिश वसाहती

दक्षिण आफ्रिकेंतील संयुक्त संस्थानांत वेश्यागृह चालवणें हा गुन्हा आहे. ट्रानस्व्हालमधेंहि वेश्यागृहांविरुद्ध कायदा आहे आणि विशेष म्हणजे तेथे एकटी स्त्री रहात असेल तरी तें वेश्यागृह होतें. याबद्दल घराचा मालक, किंवा भाडे-करी, किंवा जो कोणी आपल्या जागेंत वेश्यावृत्ति करूं देईल तो जबाबदार असतो. त्या घरांत कोणीहि पुरुष रहात असल्यास किंवा वेश्यागृह चालवणाऱ्या बाईला नवरा असल्यास तो वेश्यागृहावर उपजीविका करतो असें समजून त्याला शिक्षा होते. अर्थात् जेथे पांढऱ्या आणि काळ्या लोकांचा संबंध येतो तेथे बहुधा पांढऱ्या स्त्रीचा काळ्या माणसाशीं समागम हें भयंकर पाप समजलें जातें, व हीच स्थिति अमेरिकेप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेंतही आहे.

## कानडा

येथेहि वेश्यागृहें बंद केलीं आहेत आणि ज्या जुन्या वेश्या आहेत त्या म्हातारपणाने मरण्याची वाट पोलीस पहात आहे.

## हाँगकाँग

हें इंग्रजांच्या ताब्यांत आहे, परंतु बहुतेक रहिवासी चिनी असल्यामुळे वेश्यांना अजीबात बंदी केली तर परिणाम वाईट होतील असें वाटल्यामुळे येथे वेश्यांची नोंद व तपासणी आहे.

## स्ट्रेट्स् सेटलमेंट्स् व फेडरेटेड् मॅले स्टेट्स्

यांपैकी पहिली इंग्रजी वसाहत आहे आणि दुसरीं संस्थानें इंग्रजांच्या ताब्यांत आहेत. येथे वेश्यागृहें बंद केलीं आहेत आणि वेश्यागृहाची व्याख्या म्हणजे जेथे दोन किंवा अधिक वेश्या राहतात असें गृह. यामुळे दोन वेश्या एकत्र राहिल्या आणि त्यांवर कोणाचीहि देखरेख नसून त्या स्वतंत्रपणें धंदा करीत असल्या, तरीहि एकत्र राहणें हा गुन्हा होतो. कोणत्याहि स्त्रीसंबंधी मध्यस्थी केल्याचा आरोप कोणावर आल्यास त्यावर खटला होऊन त्याचा निकाल होईपर्यंत त्या स्त्रीलाहि 'सुरक्षित' ठिकाणीं ठेवतात, म्हणजे तिचें स्वातंत्र्य तेथ-पर्यंत नष्ट होतें. बाहेरून देशांत येणाऱ्या किंवा देश सोडून बाहेर जाणाऱ्या लोकां-वर देखरेख ठेवण्याकरतां एक 'संरक्षक अधिकारी' सरकारने नेमलेला असतो, आणि त्याचे मतें १८ वर्षांचे आंतील मुलींची नैतिक परिस्थिति चांगली नस-ल्यास तिची चौकशी होईपर्यंत, किंवा तिला १९ वर्षें पुरीं होईपर्यंत, 'सुरक्षित' ठिकाणीं ठेवतात. हें सुरक्षित ठिकाण तुरुंगवजा असतें, म्हणजे निरपराधी मुलींना शिक्षा करण्याचा अधिकार या अधिकाऱ्याला दिलेला आहे. अशा तऱ्हेने कोंडून ठेवलेल्या एका चिनी मुलीने तेथून पळून जाण्याचा यत्न केला आणि याबद्दल तिला शिक्षा झाल्यामुळे तिने गळयाला फांस लावून घेतला, अशी हकी-कत १९२७ सालीं वर्तमानपत्रांत आली होती. यावरून हा अधिकारी किती दयाळू असेल याची कल्पना येईल.

कोणतीहि बोट आली की हा अधिकारी तेथे हजर असतो आणि त्यांतून उतरणारी कोणतीहि मुलगी किंवा स्त्री वेश्यावृत्तीच्या उद्देशाने आली किंवा आणली आहे असा त्याला संशय आल्यास तिची चौकशी होईपर्यंत तो तिला सुरक्षित ठिकाणीं ठेवतो, आणि जरूर वाटल्यास तिला परत आपल्या देशीं पाठवून देतो.

फेडरेटेड् मॅले स्टेट्समधें १९२० सालीं केलेला कायदा १९२३ सालीं अधिक कडक करून हॉटेलांत वेश्या राहूं दिल्याबद्दलची शिक्षा वाढवली. येथील अधिकारी दरवर्षी वेश्यांसंबंधी तपशीलवार अहवाल तयार करून तो राष्ट्रसंघाकडे पाठवतात. ख्रिस्ती नीतीचें खूळ या अधिकाऱ्यांना किती लागलें आहे याची यावरून कल्पना येईल. १९२८ सालीं अहवालांत पुढील प्रकारच्या गोष्टी लिहिलेल्या आहेतः—

" १२ जानेवारी १९२८ रोजीं एक ४५ वर्षांची चिनी स्त्री चीनहून पेनँग येथे आली आणि तिच्याबरोबर २० व २२ वर्षांच्या दोन मुली होत्या त्यांच्या बरोबरच्या दोन पुरुषांनी त्या आपल्या बायका असल्याचें सांगितल्यामुळे त्या सर्वांना आंत जाऊं दिलें. परंतु कांपार येथे त्या दोन स्त्रियांनी वेश्यागृहांत जाण्याची इच्छा दर्शवल्यावरून त्यांना अटक करून सुरक्षित गृहांत ठेवलें. त्या ४५ वर्षांच्या बाईवर खटला केला. तिने दोन स्त्रिया वेश्यावृत्तीकरतां विकल्या असें सिद्ध होऊन तिला एकंदर १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्या दोन मुली पुढे लग्न करण्याकरतां निघून गेल्या.

" १९२६ ते १९२८ पर्यंत अशा तऱ्हेच्या व्यवस्थेमुळे वेश्यागृहांची संख्या २३१ पासून १७६ झाली आहे, आणि त्यांत राहणाऱ्या वेश्यांची संख्या १८६४ वरून ११८९ वर आली आहे. अशा तऱ्हेने १९२९ अखेर हीं वेश्यागृहें अजीबात नाहीशीं होतील असें वाटतें. हीं बंद केल्यास त्यांतील वेश्यांचें पुढें काय होईल ही अडचण असते, परंतु हल्ली आपण होऊन वेश्यागृहें सोडून जाण्याची वेश्यांची प्रवृत्ति दिसते, तेव्हां ही अडचण आपोआप नाहीशी होईल आणि वेश्यांकरतां मागणीहि बंद केल्यामुळे (!) वेश्यावृत्ति नाहीशी होण्याला कोणतीहि अडचण राहणार नाही. "

## ब्रह्मदेश

येथेहि अशाच प्रकारचे कायदे लावलेले आहेत. मात्र यामुळे आरोग्याचे दृष्टीने फायदा झालेला नाही हें पाहून स्थानिक आंकडेपंडितांना सखेदाश्चर्य वाटतें ! रंगूनसारख्या मोठ्या शहरांतील वेश्या अनेक युक्त्या शोधून काढतात, उदाहरणार्थ

पडदे ओढलेली मोटर. तेथील चिनी वेश्यांना मात्र अधिकाऱ्यांनी सतावलें आहे. त्यांना नैतिक व्याख्याने ऐकावीं लागतात, आणि तेथील 'चायनीज ॲडव्हायजरी बोर्ड' च्या खटपटीमुळे ८३ वेश्यांनी धंदा सोडून दिला. त्यांचें मन वळवलें असें अहवालांत म्हटलें आहे, त्याचा अर्थ काय हें समजून घ्यावें! त्यांपैकी कांहींचीं लग्नें लावून दिलीं आणि बाकीच्या दुसरीकडे निघून गेल्या.

हाँगकाँग किंवा सिंगापूर येथील वेश्यांच्या उटाठेवी करणाऱ्या कांही उपद्व्यापी इंग्रज स्त्रिया पार्लमेंटांत आहेत आणि त्या आपली नीतिबाजी सर्व देशांवर लादूं पाहतात. लेडी ॲस्टर यांनी कॉमन्सच्या सभेंत कलोनिअल सेक्रेटरीला प्रश्न विचारला की हाँगकाँग येथे वेश्यागृहें किती आहेत आणि तेथे वेश्या घेण्याची किंवा नोंद करण्याची काय व्यवस्था आहे? आणि अशा प्रश्नांचा निकाल ज्यांना स्थानिक माहिती बिलकुल नाही अशा लंडनमधील लोकांची एक समिति नेमून करण्यांत येतो, आणि साहजिकच लंडनमधील या सोंवळ्या लोकांचे उपद्व्याप स्थानिक अधिकाऱ्यांना पसंत पडत नाहीत, कारण त्यामुळे अधिक अडचणी उत्पन्न होतात.

## डच इंडीज

डच सरकारला मात्र वेश्यांचे हाल करणें हें आपलें कर्तव्य वाटत नाही. अर्थात् राष्ट्रसंघांत पास झालेले आंतरराष्ट्रीय करार पाळण्यासाठी त्यांनी परकी, आणि विशेषतः चिनी व जपानी वेश्यांस बंदी केली आहे, आणि वेश्यागृहेंहि बंद केलीं आहेत. पण तेथील स्थानिक रहिवाशांना समागम हें पाप वाटत नाही, आणि त्यांना तें जबरदस्तीने पाप समजायला लावून त्यांचा छळ करण्याची खटपट डच सरकारने केलेली नाही. या बाबतींत त्यांनी माणुसकी दाखवली आहे आणि शिस्तीचा आणि नीतिबाजीचा घोटाळा केलेला नाही. डच लोकांनी धार्मिक आणि नैतिक बाबतींत पुष्कळच समंजसपणा दाखवलेला आहे, आणि छळ करण्याची त्यांची प्रवृत्ति नसते. तसेंच इंग्रजांप्रमाणे ते काळ्या लोकांचा तिरस्कार न करतां फ्रेंच किंवा जर्मन लोकांप्रमाणे ते काळ्या लोकांनाहि सभ्यतेने आणि प्रेमाने वागवतात. काळा मनुष्य हा कोणी हलक्या जातीचा प्राणि आहे अशी त्यांची

कल्पना नसते, आणि त्यांचीं स्थानिक रहिवाशांशीं कायदेशीर लग्नेंहि पुष्कळ होतात आणि त्यांपासून झालेल्या मिश्र संततींत कोणताहि कमीपणा दिसून येत नाही.

## हवाई

हें व आसपासचीं सर्व बेटें अमेरिकेच्या ताब्यांत आहेत आणि तेथील लोकांना अमेरिकेचा सोंवळेपणा चांगलाच भोंवला आहे. येथील नग्न लोकांना त्यांनी कपडे घालायला लावून त्यांचें आरोग्य नष्ट केलें, नृत्य बंद केलें आणि समागमावर निर्बंध घातले. हे लोक आतां जवळजवळ नाहीसे झाले आहेत आणि त्यांचा स्वतंत्र देश अमेरिकन, जपानी आणि फिलिपाइन लोकांनी व्यापला आहे. येथील लोक स्वभावाने गरीब असल्यामुळे अमेरिकनांना येथे युद्धहि करावें लागलें नाही. युद्धाशिवायच त्यांनी हा भयंकर अत्याचार केलेला आहे.

## फिलिपाइन

येथेहि अमेरिकन नीतिबाजी चालू आहे आणि येथे वेश्यांची नोंदहि नाही आणि त्यांना धंदा करण्याची परवानगीहि नाही. यामुळे जर तेथे वेश्या असली तर तिला चोरून धंदा करावा लागतो. धंद्याचा कांही पुरावा मिळाल्यास त्यांना भटक्या समजतात. या शब्दांत येथे केवळ वेश्यांचाच नव्हे, तर त्यांच्या धंद्याला मदत करणाऱ्या कोणत्याहि मनुष्याचा समावेश होतो.

चीन, जपान, सयाम या स्वतंत्र देशांत आणि त्यांच्याच शेजारच्या यूरोपीय किंवा अमेरिकन वसाहतींत हा मोठा विरोध दिसतो की या वसाहतींत वेश्यांचा शक्य तितका छळ होतो आणि यामुळे यूरोपीय वेश्यांप्रमाणेच त्या हलक्या आणि हलकट होतात, आणि त्यांच्याच जातींच्या स्वतंत्र देशांतील वेश्या हंसतमुख, आनंदी, आणि सुस्वभावी असतात. यूरोपीयांच्या नीतिबाजी-मुळे वेश्या हलकट बनतात, त्या मूळच्या हलकट नसतात.

या बाबतींत राष्ट्रसंघापुढे फ्रेंच प्रतिनिधीने असें सांगितलें की ज्यांची आपल्याला बिलकुल माहिती नाही, आणि ज्यांत पृथ्वीवरील लोकसंख्येच्या आठ दशांशाचा समावेश होतो, अशा लोकांसंबंधी आपण येथे बसून कायदे करणें

समंजस नाही. असें करण्याने आपल्याबद्दल लोकांना बिलकुल आदर वाटत नाहीसा होतो आणि आपलें वजन त्यामुळे कमी होतें.

पण हें नीतिबाजांना समजणार कसें ? हे नीतिबाज पुष्कळ वेळां असें सांगतात की आम्हीं सुचवलेल्या व्यवस्थेला पौर्वात्य लोक विरोध करीत नाहीत. हें अत्यंत हास्यास्पद आहे. ही व्यवस्था यूरोपीय लोकांनी आपआपसांत ठरवलेली असते, त्यांत पौर्वात्यांचें मतहि घेतलेलें नसतें, किंवा ती त्यांना कितपत रुचेल किंवा शक्य होईल याचाहि विचार केलेला नसतो. अशा प्रकारची व्यवस्था मुक्रर करून नंतर ती स्थानिक संस्थांना पास करायला सांगितलें आणि त्यांनी ती पास केली, तरी त्याचा फारसा अर्थ होत नाही. यामुळेच डच इंडिजविषयी १९११ सालीं राष्ट्रसंघाकडे गेलेल्या अहवालांत पुढील वाक्यें आहेत. " येथील वेश्यागृहें बंद केलीं तेव्हा त्यांत पुष्कळ जपानी अज्ञान मुली होत्या आणि त्यांना सरकारच्या खर्चानें जपानमधें परत पाठवलें. " यूरोपीय पद्धतीप्रमाणे 'अज्ञान' या ऐवजी 'निरपराधी' हा शब्द त्यांत वापरला आहे. हा यूरोपीय नीतिबाजींतलि शद्ब आहे, तो वेश्यावृत्ति करणाऱ्या मुलींना लावणें हास्यास्पद आहे. या लहान वेश्यांना देखील आपण काय करीत आहों याचें पूर्ण ज्ञान असतें. त्या अज्ञान नसतात आणि त्यांना त्यांत कांही चूक दिसत नाही. आणि यूरोपीयांनी स्वतःच्या नीतिबाज दृष्टीने जी व्यवस्था केली, ती वास्तविक अत्यंत जुलमाची होती आणि जबरदस्तापुढे इलाज नाही म्हणून ती पौर्वात्यांनी कबूल केली. यामुळे ती समर्थनीय मात्र ठरत नाही. अर्थात् या मुली अज्ञान नव्हत्या, पण त्यांच्या मताने त्या निरपराध मात्र होत्या, आणि यूरोपीयांना त्यांत ढवळाढवळ करण्याचें बिलकुल कारण नव्हतें. स्वतःची नीति दुसऱ्यावर लादणें हा जुलूम आहे, अत्याचार आहे.

# ४

# वेश्याबंदीची मोहीम

अलीकडे सर्वत्र वेश्यांचे नियंत्रणाविरुद्ध, म्हणजे वेश्यांची सक्तीची नोंदणी व तपासणी यांविरुद्ध, मतप्रचार जारी आहे. त्याचीं तत्वें व इतिहास सांगण्यापूर्वी तेथपर्यंतचा इतिहास थोडक्यांत पाहूं. नोंदणी व तपासणीची पद्धत प्रथम फ्रान्समधें १८०२ सालीं सुरू झाली, आणि तेथून ती जवळजवळ सर्व पाश्चात्य देशांत पसरली. ही पद्धत अंमलांत आणण्यास सभ्यतेचा किंवा नीतितत्वांचा विचार प्रामुख्याने कारण झाला नसून गुप्त रोगांच्या प्रसाराच्या भीतीचाच तो परिणाम होता यांत शंका नाही. या दृष्टीने त्या वेळच्या डाक्तरांनीं नोंदणीच्या पद्धतीचा पुरस्कार केला. १८२५ सालीं बेल्जिअम् मधें डाक्तरांची व इतर शास्त्रज्ञांची एक संस्था निघून त्यांनी फ्रान्सच्या धर्तीची नोंदणीपद्धत सर्व यूरोपभर अंमलांत आणण्याची खटपट करण्याचा आपला उद्देश जाहीर केला, आणि १८३५ सालीं ब्रुसेल्स येथे एका डाक्तरांच्या परिषदेने अशाच अर्थाचा एक ठराव मंजूर केला. १८४१ सालीं मार्सेल्स येथील आरोग्यमंडळाने तसाच ठराव केला. १८४३ सालीं बेल्जिअम् मधील ‘ ॲकॅडेमी ऑफ मेडिसीन ’ने याला अनुमोदन दिलें. १८५२ सालीं ब्रुसेल्स येथे एका आंतरराष्ट्रीय परिषदेने तसाच ठराव केला आणि १८५६ सालीं बेल्जिअममधें अशा प्रकारचा कायदा झाला. १८६४–६६ सालीं इंग्लंडवरहि याचा परिणाम होऊन तेथे याच उद्देशाने ‘ सांसर्गिक रोगांसंबंधी कायदे ’ झाले.

१८६७ सालीं पॅरिस येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली, आणि नोंदणी-संबंधी एक जागतिक कायद्याचा मसुदा तयार करून तो सर्व सुधारलेल्या राष्ट्रांकडे पाठवून तसा कायदा करून घेण्याची खटपट करण्याकरता एक कमिटी नेमली. नंतर १८६९ सालीं फ्लॉरेन्स, १८७१ सालीं रोम, आणि १८७३ सालीं बॉर्डो येथे परिषदा भरून असेच ठराव सर्वत्र झाले आणि या शेवटच्या परिषदांनी असा कायदा सर्वत्र तावडतोब अमलांत यावा असा ठराव केला.

पण याच सुमारास इंग्लंडांत प्रथम नोंदणीविरुद्ध चळवळ सुरू झाली. इंग्लंडांत १८६४–६६ सालीं जे कायदे झाल्याचें वर सांगितलें आहे ( काँटेजिअस् डिझीजेस ॲक्ट्स् ) त्यांनी वेश्यांची नोंदणी, त्यांवर देखरेख, सक्तीची तपासणी आणि जरूर तर रुग्णालयांत ठेवण्याची व्यवस्थाही केली होती. असे कायदे करण्याविषयी जिकडे तिकडे चळवळ चालू होती आणि यामुळेच ते पास झाले. परंतु हे कायदे इंग्लंडांतील स्वातंत्र्याच्या कल्पनांविरुद्ध असल्यामुळे त्यांविरुद्ध चळवळ ताबडतोब सुरू झाली आणि त्यांत रेव्हरंड बटलर यांची पत्नी मिसेस् जोजेफीन बटलर यांनी पुढाकार घेतला आणि याचे परिणामीं १८७५ सालीं हे कायदे रद्द करून घेण्याकरतां एक स्त्रियांची संस्था स्थापन झाली. पुढे या संस्थेचें नांव बदलून ती यूरोपीय संस्था झाली आणि 'वेश्यांची नोंदणी करून वेश्यावृत्तीला कायदेशीर स्वरूप देणारे कायदे रद्द करवणें' हा त्यांचा उद्देश ठरला. यानंतरच्या दोन वर्षांत या लोकांच्या उद्योगानें एकंदर सुमारें वीस लक्ष सह्यांचे ८१९० अर्ज इंग्लंडांतील पार्लमेंटपुढे आले.

नंतर २२ सप्टेंबर १८७७ रोजीं या लोकांची एक परिषद् जिनीव्हा येथे भरली आणि त्या वेळीं इटली, बेल्जिअम, स्वित्झर्लंड, जर्मनी आणि फ्रान्स इतक्या देशांत या संस्थेच्या शाखा निघाल्या, आणि नंतर या शाखा सर्व जगभर पसरल्या. या संस्थेच्या खटपटीने इंग्लंडांत वरील कायदे १८८४ सालीं तहकूब झाले आणि १८८६ सालीं रद्द झाले. तेच कायदे हिंदुस्थानालाही लागू झाले होते, परंतु ते १८८८ सालीं रद्द केले. याचा एक परिणाम असा झाला की आतांपर्यंत इतक्या वैद्यकीय परिषदांतून नोंदणीच्या कायद्यांतर्फे पास झालेले ठराव तसेच राहिले. तरीदेखील १८८८ सालीं पॅरिस येथील 'ॲकॅडेमी ऑफ् मेडिसीन्'ने नोंदणीतर्फे जोराचा ठराव पास केला.

यानंतर १८९९ सालीं एक वैद्यकीय परिषद् ब्रुसेल्स येथे भरली, तेथें रोगप्रतिबंध हा विषय होता आणि नोंदणीसंबंधी दोन पक्षांत कडाक्याचा वाद होऊन त्या परिषदेंत नोंदणीचा प्रसार करण्याचा ठराव आला नाही. १९०२ सालीं त्याच ठिकाणीं आणखी एक वैद्यकीय परिषद् भरली, तेथेंही वाद होऊन पॅरिसमधील डॉ. लांदूझी यांनी असा ठराव मांडला की हल्लीच्या नोंदणीच्या

पद्धतीचा कांही उपयोग होत नसल्यामुळे ती रद्द करून या बाबतींत पुरुषांस व स्त्रियांस सारखेच कायदे असावे. हा ठराव पास झाला नाही, आणि शेवटीं बहुमताने असें ठरलें की रोगांचा प्रसार आणि वेश्यावृत्तीचे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी योजायचे उपाय कायद्याने ठरवावे. या ठरावाच्या बाजूने ६५ मतें, बहुतेक डाक्तरांचीं, आणि विरुद्ध २६, बहुतेक स्त्रियांचीं आणि परोपकारी लोकांचीं पडलीं. या परिषदेची हकीकत वाचल्यास कायद्याविरुद्ध मताचा प्रसार जोराने झाला होता असें दिसतें.

यानंतर जेव्हा जेव्हा यासंबंधी परिषदा भरल्या तेव्हा तेव्हा कडाक्याचा वाद होऊन अनेक पंथ निर्माण झाले. तेव्हा प्रथम ह्या कायदेबंदीवाल्या लोकांचीं तत्वें काय, उद्देश काय, आणि मार्ग कोणते आहेत, याचा थोडा अधिक विचार करणें जरूर आहे.

कायदेबंदीसंबंधी एक आंतरराष्ट्रीय संघ आहे, व त्याच्या प्रचारपुस्तकांत पुढील मजकूर आहे. "आंतरराष्ट्रीय संघ फक्त पुढील तत्वें ठरवीत आहे, आणि तीं अंमलांत आणण्याची जबाबदारी आणि तपशील राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक समित्यांवर सोंपवीत आहे.

१. हा संघ नीतीचे बाबतींत स्वायत्ततेचें तत्व पुकारीत आहे व अर्थात् स्वातंत्र्याबरोबर व्यक्तीवर जबाबदारीही येते.

२. या बाबतींत कायद्याने व्यक्तींव्यक्तींत फरक करतां नये.

३. शिवाय पुरुषांना मात्र अनीतीपासून धोका राहूं नये व त्यांजवर कोणतीही जबाबदारी असूं नये म्हणून वेश्यांचे नोंदणीसंबंधी कायदे केल्याने नीतीच्या मुळाशीं असलेलें जबाबदारीचें तत्वच नाहीसें होतें.

४. दोघांच्या कृत्याचे कायदेशीर परिणाम फक्त स्त्रियांनाच कायद्याने भोगायला लावल्यामुळे स्त्रियांना व पुरुषांना वेगवेगळे नीतिनियम लावण्याच्या अश्लाघ्य तत्वाचा सरकार पुरस्कार करतें.

५. खाजगी रीतीने व्यक्तिशः वेश्यावृत्ति करणें हा संघाचे मताने केवळ वैयक्तिक नीतीचा प्रश्न असून गुन्हा नसल्यामुळे कायद्याला फक्त पुढील मुद्यांवर वेश्यावृत्तीस अडथळा करतां येईल.

६. वयांत न आलेलीं मुलें, किंवा ज्यांना कांही कारणाने मुलांप्रमाणेच वागवणें जरूर आहे अशीं माणसें, यांना फुसलावण्याचा प्रयत्न केल्यास शिक्षा केली पाहिजे. अशीं माणसें कोणतीं हें कायद्याने ठरवावें.

७. कोणत्याही वयाच्या माणसाला फसवण्याचा किंवा त्यावर सक्तीचा प्रयत्न झाल्यास त्याबद्दल शिक्षा व्हावी.

८. सार्वजनिक रीतीने सभ्यतेचा भंग केल्यास शिक्षा व्हावी.

९. सार्वजनिक रीतीने समागमास आव्हान देणें किंवा तिऱ्हाइताने वेश्यावृत्तीवर उपजीविका करणें, हे गुन्हे समजावे, परंतु याचा पुरावा पाहिजे. याकरतां नोंदणीसंबंधांतील पोलीसची व्यवस्था मात्र या नाही त्या रीतीने पुनः अंमलांत येतां नये.

१०. यासंबंधी कायदे पुरुषांना व स्त्रियांना सारखेच लागू असले पाहिजेत.

११. वेश्यावृत्तीवर उपजीविका करण्याबद्दल मध्यस्थांना जेव्हा शिक्षा होईल तेव्हा जे या मध्यस्थांच्या उद्योगाचा फायदा घेतील त्यांना (म्हणजे वेश्यांचे गिऱ्हाइकांना) त्यांचे साथीदार समजावे.

१२. सरकारने वेश्यांना तपासणीची सक्ती कोणत्याही सबबीवर करतां नये, आणि कोणत्याही बाबतींत त्यांना अपवादात्मक रीतीने वागवतां नये. "

या तत्वांसंबंधी वरील प्रचारपुस्तकांत पुढील खुलासा केलेला आहे. " नोंदणी, तपासणी वगैरेमुळे वेश्यावृत्ति ही एक सार्वजनिक संस्था सरकारने मान्य केल्यासारखी होते. नोंदणीचा उद्देश कधीही वेश्यावृत्ति बंद करण्याचा नसून फक्त नियंत्रण घालण्याचा असतो आणि आरोग्याच्या, न्यायाच्या आणि नीतीच्या दृष्टीने ही मोटी चूक आहे. कायदा कोणताही असला तरी तो सर्वांना सारखा असला पाहिजे. कोणत्याही विशिष्ट व्यक्तींना किंवा समूहालाच तो लागतां नये." पोलिसाच्या व्यवस्थेसंबंधी त्यांत फ्रान्सचें उदाहरण देऊन सांगितलें आहे की " तेथील व्यवस्थेंत पुढील तत्व आहे. ' वेश्यावृत्ति नाहीशी करणें अशक्य आहे, ती वाईट असली तरी तिची जरूरी आहे, तेव्हा तिचें नियंत्रण करणें एवढेंच शक्य आहे, आणि असें केल्याने ती मर्यादित राहून तिच्यापासून नुकसान कमी होईल. ' हें नियंत्रण म्हणजे वेश्यांना वेगळ्या काढणें, त्यांपैकी शक्य तितक्यांना

नोंदलेल्या वेश्यागृहांत ठेवणें आणि त्यांची वेळोवेळीं सक्तीने तपासणी करून गुप्त रोगांचा नायनाट करणें. या व्यवस्थेमुळे त्यांचें स्वातंत्र्य जाऊन त्यांना त्याच्या मोबदल्यांत सरकारी परवानगीने सुरक्षितपणें धंदा करतां येतो आणि आरोग्यास विघातक अशा धंद्यांत वेश्यावृत्तीचा समावेश होतो. या व्यवस्थेने वेश्यावृत्ति हें एक सरकारी खातें होतें, आणि सरकार एक प्रकारें लोकांस वेश्या पुरवतें आणि त्यांना विशिष्ट गृहांत कोंडून ठेवल्यामुळे त्या केवळ गुलाम बनतात, आणि त्यांना जन्मभर वेश्यावृत्तिच करावी लागते. फ्रान्समधें यासंबंधी कायदा न करतां पोलिसालाच सर्व अधिकार दिलेला आहे, परंतु जेथे ही व्यवस्था कायद्याने केलेली आहे तेथेही तो जुलूमच आहे. कायदेशीर जुलूम आहे इतकेंच. इंग्लंडांत कायदेच केले होते, पण तेथे या कायद्यांविरुद्धच प्रथम कायदेबंदीची चळवळ सुरू झाली."

या लोकांचें म्हणणें असें की वेश्यावृत्ति ही आरोग्यविघातक धंद्यांत येत नाही. वेश्यावृत्ति हा व्यापार नाही, धंदा नाही, वेश्या कोणताही माल उत्पन्न करीत नाही व विकीतही नाही. ती शरीराचा विक्रय करते असें म्हणतात, पण तो केवळ एक भाषेचा प्रकार आहे, वस्तुतः वेश्यावृत्ति हा एक प्रकाराचा करार आहे. वेश्या आपलें शरीर कांही वेळ वापरूं देते आणि पुरुष तिला पैसे देतो. दोघेंही स्वतंत्रपणे करार करतात आणि दोघेंही सारखींच जबाबदार आहेत. रोगसंसर्ग टाळण्याकरतां काय करायचें, हा दोघांचाही वैयक्तिक प्रश्न आहे, आणि पुरुषांचें संरक्षण करण्याची जबाबदारी तेवढीच सरकारने घेण्याचें कारण नाही.

वेश्यावृत्ति अपरिहार्य आहे काय? याचें उत्तर ते असें देतात की कोणतीही गोष्ट केवळ अस्तित्वांत आहे म्हणून अपरिहार्य होत नाही. अपरिहार्य म्हणजे कोणत्याही मानवसमाजांत जी असलीच पाहिजे अशी गोष्ट. वेश्यावृत्ति अपरिहार्य म्हणणें म्हणजे मनुष्याला नैतिक स्वातंत्र्य नसतें असें म्हणण्यासारखें आहे. शिवाय वाईट गोष्टीचा परिणाम चांगला होणें कधीही शक्य नाही, आणि वेश्यावृत्ति अनिष्ट असल्यामुळे ती नाहींशी करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे.

तपासणीसंबंधी त्यांचें म्हणणें असें आहे की सक्तीची तपासणी हा मनुष्याचा उपमर्द आहे, अत्याचार आहे, बळजवरी आहे आणि तपासणी नैतिक दृष्ट्या गर्ह्य असूनही तिचा आरोग्याच्या दृष्टीने उपयोग नाही तो नाहीच. वेश्यांना सुधारण्यास पोलिसाची मदत होते हें ते खरें मानीत नाहीत. पण अशीं कांही थोडीं उदाहरणें असलींच, तरी देखील वेश्यावृत्तीला सरकारी मान्यता दिल्याचे एकंदर समाजावर परिणाम वाईटच होतात, आणि बदफैलीपणा वाईट आहे ही कल्पनाच नाहीशी होते.

शिवाय हे पोलीसचे लोक स्वतः फारसे नीतिमान नसल्यामुळे ते स्वतःच पुष्कळ वेळां वेश्यांची मध्यस्थी करतात आणि वेश्यांचीं घरें लोकांना दाखवून देतात. रस्त्यावर गिऱ्हाईक गांठण्याचा प्रयत्न करणाऱ्या वेश्यांस पोलीस अडथळा करतात हें खरें नाही, कारण अमुक वेळीं वेश्यांनी रस्त्यावर हिंडूं नये असा नियम केल्याने बाकीच्या वेळीं हिंडण्यास त्यांना परवानगी दिल्यासारखी होते. रस्त्यांत वेश्यांची रहदारी पोलिसांवर अवलंबून नसून ती समाजाच्या नैतिक स्थितीवर अवलंबते.

वेश्यांवर सरकारी नियंत्रण ठेवल्याने समाजांत सभ्यता आणि गतीं स्त्रियांची अब्रू राखण्यास मदत होत नाही काय ? याला ते उत्तर देतात की वेश्यावृत्ति सरकारी झाल्याने बदफैली लोकांची संख्या वाढते आणि नंतर त्यांचें केवळ वेश्यांनी समाधान न होतां हे लोक पुढे बळजवरीसारखे अत्याचार करूं लागतात आणि यामुळे एकंदर नीति बिघडते. वेश्यांची, पोलिसाची आणि एकंदर समाजाची नीति नोंदणीच्या पद्धतीने खालावतेच.

आरोग्यासंबंधी त्यांचे मताने नोंदणीचा कांही उपयोग झालेला नाही आणि याबद्दल ते कित्येक परिषदांत सांगितलेलीं डाक्तरांचीं मतें देतात, आणि शिवाय इंग्लंडांत नोंदणीसंबंधी कायदे प्रथम १८६४ मधें केले, त्या वर्षी लष्करांतील अशा प्रकारच्या रोग्यांचें प्रमाण हजारीं २६५ होतें; हे कायदे १८८४ सालीं रद्द केले, त्या वर्षी हें प्रमाण २७१ होतें, आणि १९१० सालीं हें प्रमाण ६५.५ झालें, असें ते म्हणतात. याशिवाय हॉलंडसंबंधी ते एका गणिती प्रोफेसराचें मत

देतात की नोंदणीची पद्धत सुरु झाल्यानंतर एकंदर रोगांचें प्रमाण कमी झालें खरें, पण जेथे नोंदणी नाही अशा शहरांत तें अधिक प्रमाणांत कमी झालें आहे. तेव्हा तें नोंदणीने कमी झालें असें म्हणतां येत नाही.

पण निदान कांही रोगी वेश्यांना धंदा करूं न दिल्यामुळे त्यांच्यापासून तरी कोणाला संसर्ग होणार नाही हें खरें की नाही? यावर ते उत्तरतात की हें सकृद्दर्शनीं जरी खरें दिसलें तरी वास्तविक खरें नाही, कारण सर्वच वेश्यांवर देखरेख ठेवतां येत नाही, आणि तपासणीने सर्वच रोगी वेश्यांना बाजूला काढतां येतें असें नाही. वेश्यांचा पुरवठा मागणीवर अवलंबून असल्यामुळे कांही वेश्यांना कोंडून ठेवल्या की त्यांची जागा तावडतोब दुसऱ्या वेश्या भरून काढतात. गर्मीचा रोग तपासणीने सहज समजण्यासारखा नाही, यामुळे गिऱ्हाइकांना तपासलेल्या वेश्यांबद्दल खोटा विश्वास उत्पन्न होतो आणि वेश्यांकडे जाणारांची संख्या वाढते. ही संख्या वाढली म्हणजे वेश्यांची संख्याही वाढते. तपासणीसंबंधी त्यांनी कांही डाक्तरांचींही आपल्या बाजूचीं मतें दिलीं आहेत की तपासणींत रोग हटकून ओळखतोच असें नाही. याशिवाय त्यांचें असेंही म्हणणें आहे की वेश्या एकदा गर्मीच्या रोगांतून बरी झाली म्हणजे तिला पुनः गर्मी होत नाही, पण तिच्या मार्फत इतरांना मात्र संसर्ग होतो. तेव्हा तपासणीचा बिलकुल उपयोग नसून नुकसानच होतें.

वेश्यावृत्ति सरकारमान्य झाल्यामुळे तिला उत्तेजन मिळतें आणि प्रच्छन्न वेश्यांची संख्या त्यामुळे वाढते, यामुळे काम करून पोट भरणाऱ्या पुष्कळ स्त्रियांना या मार्गाने आपली मिळकत वाढवतां येते, आणि यामुळे त्या कमी पगार घेण्यास तयार होतात आणि मजुरीच्या बाजारांत सर्वच स्त्रियांची किंमत कमी होते, असा एक आर्थिक मुद्दाही हे लोक पुढे करतात. अर्थात् स्त्रियांना यामुळे पगार कमी मिळतो आणि पुष्कळांना वेश्यावृत्ति करणें भाग पडतें, व या एकंदर प्रकारामुळे समाजांत बदफैलीपणा वाढतो, असें ते म्हणतात.

सामाजिक दृष्ट्या विचार करतां एखाद्या शहरांत पुरेशा वेश्या नसल्यास कांही लोक अतृप्त कामवासनेमुळे उन्मत्त होऊन त्यामुळें सभ्य स्त्रियांना धोका उत्पन्न होईल की नाही? या प्रश्नाचें ते असें उत्तर देतात की वेश्यांना ज्या मानाने

मागणी असेल त्या मानाने वेश्यावृत्ति चालू राहील हें खरें, परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की त्यांत सरकारने मध्यें पडून तिला सरकारी मान्यता दिली पाहिजे. वैयक्तिक वेश्यावृत्तीचा दोष व्यक्तींकडे येईल, पण नियंत्रित वेश्यावृत्तीचा दोष सरकारवर म्हणजे सर्व समाजावर येतो आणि हें भयंकर आहे.

सरकारी नियंत्रण नको, तर वेश्यांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावें काय ? या प्रश्नाचें उत्तर एका शब्दांत दिलेलें नाही. ते म्हणतात, वेश्यावृत्तीचीं कारणें नाहीशीं झालीं नाहीत तेथपर्यंत वेश्यावृत्ति चालू रहाणार हें खरें, परंतु खाजगी गोष्टींत हात घालून सरकारने वेश्यांचें नियंत्रण करूं नये असें म्हणणें, म्हणजे वेश्यावृत्ति नैतिक दृष्ट्या इष्ट आहे, किंवा अनिष्ट नाही असें होत नाही, परंतु सरकारी नियंत्रणाने वेश्यावृत्तीचीं कारणें कमी होत नसून वेश्यावृत्तीला उत्तेजन मात्र मिळतें, कारण तिला सरकारी मान्यता मिळते.

तरमग वेश्यावृत्ति हा कायद्याने गुन्हा ठरवून ती नाहीशी करण्याचा प्रयत्न कां करूं नये ? यावर ते म्हणतात की तसें आमचें म्हणणें नाही इतकेंच नव्हे तर आमचें मतें वेश्यावृत्ति हा नीतीचा प्रश्न आहे, कायद्याचा नव्हे. अर्थात् त्यामुळे कोणाला त्रास झाल्यास त्याबद्दल कायद्याने शिक्षा झाली पाहिजे, परंतु हा कायदा स्त्रियांप्रमाणे पुरुषांनाही लागला पाहिजे. वेश्यावृत्तींत स्त्रियांप्रमाणे पुरुषांचाही संबंध असतो, तेव्हा या बाबतींत केवळ स्त्रियांपुरतेच कायदे करणें हा न्याय नाही.

वेश्यावृत्ति नाहीशी करण्याकरतां काय करावें ? याकरतां ते दोन प्रकारचे उपाय सुचवतात. एक उपाय म्हणजे कायदा सर्वांना सारखा लागू करणें. सभ्यतेच्या व शिस्तीच्या दृष्टीने जे काय कायदे करायचे असतील ते स्त्रियांप्रमाणेच पुरुषांनाही लावले पाहिजेत. वेश्यावृत्तीवर उपजीविका करणें, वेश्यांचा व्यापार करणें, वगैरेबद्दल पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षा झाली पाहिजे. दुसरा उपाय म्हणजे नैतिक दृष्ट्या देखील पुरुषांना व स्त्रियांना एकच नियम लावला पाहिजे. शिवाय सार्वजनिक व खाजगी इस्पितळांत इतर रोगांप्रमाणेच गर्मी, परमा वगैरे रोगांवरही उपचार होतील अशी खटपट केली पाहिजे.

या कल्पना व्यवहार्य नाहीत असें कोणीं म्हटल्यास त्यांनी आजपर्यंत घडवून आणलेल्या सुधारणांकडे ते बोट दाखवतात. फ्रान्समध्यें देखील त्यांच्या तर्फेने खटपटी चालू आहेत.

त्यांनी आपल्या प्रचारपुस्तकांत शेवटीं आपलें म्हणणें थोडक्यांत दिलें आहे तें असें:—वेश्यांकरतां पोलीसाकडून विशेष व्यवस्था केल्याने वेश्यावृत्तीला सरकारी मान्यता दिल्यासारखी होते आणि यामुळे समाजाची व विशेषतः तरुणांची नीति बिघडते. पुरुषांना बाहेरख्यालीची संवय होते आणि यामुळे वेश्यांची संख्या वाढते. वेश्यावृत्तीमुळे पुरुष अविवाहित राहूं शकतात आणि यामुळे कुटुंबसंस्थेला धोका पोंचतो आणि कुटुंबसंस्था हा समाजाचा पाया आहे. आरोग्यदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, नैतिक दृष्ट्या आणि न्यायदृष्ट्या ही भयंकर चूक आहे.

वेश्यावृत्तीचा नायनाट करण्यास मदत म्हणून निराधार व बेकार स्त्रियांकरतां आश्रयस्थानें स्थापून तेथे त्यांना घरकाम, शिवणकाम वगैरे शिकवण्याची व्यवस्था करावी.

येथपर्यंत कायदेबंदीचा पुरस्कार करणारांची बाजू काय आहे हें त्यांच्याच शब्दांत सांगितलें. आतां त्यांच्या म्हणण्याचा सविस्तर विचार करूं.

५

# कायदेबंदीचा सविस्तर विचार

कायदेबंदी पक्षाने पुरस्कारलेलें एकेक तत्व घेऊन त्याचा आतां विचार करूं.

१. **व्यक्तिस्वातंत्र्य.** हें तत्व सामान्यतः सर्व सुधारलेल्या देशांत मान्य झालेलें आहे, तेव्हा यासंबंधी तात्विक वाद उपस्थितच होत नाही. वेश्यांसंबंधी पोलीसच्या व्यवस्थेने त्याला बाध येतो असें वरील पक्षाचें म्हणणें आहे, तें कितपत खरें आहे याचा विचार आतांच करण्याची आवश्यकता नाही. पोलीसच्या व्यवस्थेविरुद्ध तक्रारी काय आहेत, हें पाहतांना त्याचा विचार आपोआप होईल.

२. " सभ्यतेच्या सबबीवर कायद्यांत कोणताही अपवाद करणें योग्य नाही. " हें टीकच आहे. कायद्यांत कोणाचाही अपवाद करणें म्हणजे अन्यायच आहे, परंतु कायदा ज्या समूहाला लागू असतो, त्यांत एखाद्या व्यक्तीला अपवाद समजणें, याला अपवाद म्हणतां येईल. तसा अपवाद नोंदणीव्यवस्थेंत होतो की काय हें पुढे पाहूं.

३. " नोंदणीने पुरुषाला सुरक्षितता दिल्यामुळे पुरुषावरील नैतिक जबाबदारी नाहीशी होते आणि जबाबदारी हा तर नीतीचा पायाच आहे. " याला उत्तर इतकेंच की पुरुषांना सुरक्षितता देणें हा कायद्याचा उद्देश नाही. आरोग्याच्या दृष्टीने सरकारचें कांही कर्तव्य असतें आणि नोंदणीच्या पद्धतींत आरोग्याचेंच तत्व मुख्य आहे, आणि सक्तीची तपासणी त्याच उद्देशाने ठेवलेली असते. अनैतिक आचरणाबद्दल रोग ही शिक्षा आहे आणि त्यांस प्रतिबंध केल्याने सरकार अनीतीला उत्तेजन देतें असेंही एकवेळ म्हणतां आलें असतें, पण तें केव्हा? हे रोग जर केवळ अनैतिक आचरण करणारांनाच होत असते, आणि इतर कोणाला

त्यांपासून धोका नसता, तर वरील म्हणणें कितीही दुष्टपणाचें असलें तरीही सयुक्तिक म्हणतां येईल. पण अशी वस्तुस्थिति नाही. या रोगांचा संसर्ग शेंकडा दहा वेळां समागमाशिवायही होतो आणि तो झाला म्हणजे इतरांना धोका असतो इतकेंच नव्हे तर गर्मी आनुवंशिक रोग असल्यामुळे निरपराधी मुलांना देखील तो जन्मापासूनच असूं शकतो आणि याला कधीही न्याय म्हणतां येणार नाही. या निरपराधी लोकांचा बचाव करणें हा कायद्याचा उद्देश असतो. नोंदणीमुळे आणि तपासणीमुळे पुरुषांना वेश्यांकडे जाणें सुरक्षित वाटलें तर तो फारतर कायद्याचा एक अनिष्ट परिणाम म्हणतां येईल, पण त्यामुळे कायद्याला नांवें ठेवतां येणार नाहीत. कायद्याचा मुख्य उद्देश अत्यंत स्तुत्य आहे, हें नीतिबाजांना देखील कबूल करावें लागेल. निरपराध्याला शिक्षा होण्यापेक्षा दहा अपराधी सुटले तरी चालतील, हें न्यायाचें सर्वमान्य तत्व आहे, आणि या तत्वाप्रमाणेच नोंदणीच्या कायद्याची अत्यंत जरूरी आहे.

४. "दोघांच्या कृत्याचे परिणाम फक्त स्त्रियांनाच भोगायला लावून स्त्रियांना व पुरुषांना नीतीचे नियम वेगवेगळे आहेत असे कायद्यांत गृहीत धरलें जातें." हें म्हणणें नोंदणीच्या कायद्याला लागूच होत नाही. दोघांचें कृत्य म्हणजे समागम. तो पुरुषांप्रमाणेच स्त्रियांच्याही बाबतींत गुन्हा समजलेला नाही. कोणावरही जुलूम होत असेल तरच त्याबद्दल शिक्षा होते, आणि अशा बळजबरीच्या वेळीं शिक्षा होते ती बहुधा पुरुषांनाच. पण कदाचित् हे लोक वेश्यावृत्तीलाच दोघांचें समाईक कृत्य समजत असतील तर अर्थातच ती त्यांची चूक आहे. वेश्यावृत्तीची सर्वमान्य व्याख्या पूर्वी दिलीच आहे. वेश्यावृत्तींत मुख्यतः समागम पैशाकरतां असतो, त्यांत आवडनिवड फारशी नसते. ही व्याख्या वेश्येकडे जाणाऱ्या पुरुषाला मुळीच लागत नाही. पुरुषाचा समागम शारीरिक गरज भागवण्याकरतां असतो आणि वेश्येची त्यावर उपजीविका असते. या बाबतींत पुरुषाची वागणूक नैतिक दृष्ट्या नीतिबाज लोक वाईट समजोत, पण व्यावहारिक दृष्टीने पाहतां हें सहज समजण्यासारखें आहे की पुरुष सामान्यतः एका दिवसांत एका किंवा फारतर दोन वेश्यांकडे जाईल, पण धंदेवाईक वेश्या एका दिवसांत ३० ते ४५ पुरुषांना रोगसंसर्ग देऊं शकते असें प्रो. राइस यांनी लिहिलें आहे.

समागम हें जें दोघांचें समाईक कृत्य आहे, त्याचे कायद्याच्या दृष्टीने परिणाम कोणतेच होत नाहीत, कारण जेथे नोंदणीची पद्धत आहे तेथे वेश्यावृत्ति हा गुन्हा नाही. उलट कायदेबंदीवाल्या देशांत मात्र तो गुन्हा आहे. कारण कायद्यांत जरी तसें लिहिलेलें नसलें, तरी अशा देशांत वेश्यांना भटक्यांचा कायदा लावतात. हाच वास्तविक अन्याय आहे, कारण भटक्या याची व्याख्या 'ज्याला कोठेही रहायची जागा नाही असा मनुष्य.' पण वेश्येची भाड्याची रहायची जागा असली तरीही तिला भटक्यांचा कायदा लावतात हें रास्त आहे काय ? आणि हेच लोक नोंदणीने वेश्यांना अन्याय होतो म्हणून ओरड करतात !

ह्या लोकांची अशी कल्पना दिसते की नोंदणी आणि सक्तीची तपासणी ही वेश्यावृत्ति करण्याबद्दल शिक्षा आहे, पण ही त्यांची चूक आहे. ही शिक्षा नाही. परंतु वेश्या आपल्या धंद्याच्या योगाने दररोज अनेक पुरुषांना प्रत्यक्षपणें आणि इतर असंख्य माणसांना अप्रत्यक्षपणें संसर्गाचा धोका उत्पन्न करते. तेव्हा पुरुषांवर देखरेख न ठेवतां फक्त स्त्रियांवरच देखरेख ठेवणें हा दोघांच्या समाईक कृत्याचा परिणाम नव्हे, आणि समाईक कृत्याबद्दल एकाला केलेली शिक्षाही नव्हे. परंतु वेश्येच्या धंद्यापासून समाजाला जो धोका उत्पन्न होतो, त्यापासून समाजाचा बचाव करण्याकरतां स्त्रियांवरच देखरेख ठेवणें भाग पडतें. तेव्हा हा मुद्दा गैरलागू आहे.

५. "वेश्यावृत्ति करणें हा वैयक्तिक नीतीचा प्रश्न आहे, गुन्हा नाही." याबद्दल मतभेद नाही, आणि नोंदणीच्या देशांत तो बिलकुल गुन्हा समजलेला नाही. परंतु तो गुन्हा नाही म्हणून त्या धंद्यासुळे समाजाला धोका उत्पन्न होत असल्यास त्यासंबंधी स्वतःचा बचाव करण्याकरतां समाजाने कांही निर्बंध घालतां नये, हें मात्र कोणी कबूल करणार नाही. गुन्हा नसलेल्या कृत्यांत सुद्धां व्यक्तिस्वातंत्र्याला अडथळा आणणारे असंख्य नियम कायद्यांत असतात, आणि असणें जरूरच आहे. समाजांत राहणाऱ्या मनुष्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याला थोडा-बहुत बाध येणें अपरिहार्य आहे, आणि अशा प्रकारचे निर्बंध उच्च प्रकारच्या धंद्यांत किंवा व्यापारांत देखील असतात. मग वेश्यावृत्तीलाच तेवढे कोणतेही निर्बंध असूं नयेत म्हटल्यास त्याला कोण भीक घालील ? व्यक्तिस्वातंत्र्य याचा

अर्थच सामाजिक दृष्ट्या असा होतो की ज्यापासून दुसऱ्याचें नुकसान होणार नाही अशा गोष्टी करण्याचें स्वातंत्र्य. पण त्रास होऊं लागला की तेथे निर्बंध आलेच.

समाजाला स्वतःचें रोगांपासून संरक्षण करण्याचा हक्क नाही असें कोण म्हणेल ? जेथे एक वेश्या दररोज ४५ पर्यंत पुरुषांना संसर्ग करूं शकते, तेथे तिच्यावर कोणताही निर्बंध घालूं नये म्हणणें मूर्खपणा नव्हे काय ? कायदेबन्दीवाल्या लोकांना ज्या मुद्यांवर वेश्यावृत्तीस अडथळा करणें योग्य वाटतें ते आतां पाहूं.

६. "जेव्हा अज्ञान मुलांमुलींस किंवा अज्ञानांच्याच सदरांत येणाऱ्या स्त्रीपुरुषांस फुसलावण्याचा प्रयत्न होईल तेव्हा त्यांस शिक्षा केली पाहिजे." नोंदणी असते तेथे देखील अशा प्रकारचा कायदा असतोच, तेव्हा याबद्दल बिलकुल मतभेद नाही. या कलमांत असेंही म्हटलेलें आहे की अज्ञान मुलांच्या सदरांत कोणास घालावें हें स्थानिक कायद्याने ठरवावें. उदाहरणार्थ हिंदुस्थानसारख्या देशांत विवाहित स्त्रीला लहान मुलांप्रमाणेच शिक्षा करण्याचा अधिकार नवऱ्याला असतो, तेव्हा कदाचित् येथे विवाहित स्त्रियाही अज्ञान मुलांच्या सदरांत जातील, नव्हे जातातच, कारण 'स्त्रियांना फुसलावणें' असा एक गुन्हा आहेच ! खाऊ देऊं करून लहान मुलांना फुसलावतां येतें, तसेंच स्त्रियांना देखील फुसलावतां येतें, त्यांना विचार करण्याची ताकद नसते, असें कायद्यांत गृहीत धरलेलें असतें ! हा उघडउघड कायद्याचा मूर्खपणा आणि स्त्रियांचा उपमर्द आहे, पण हें अजून स्त्रियांनाच कळूं लागलेलें नाही, तोंपर्यंत त्याला इलाज नाही. हिंदुस्थानांतील स्त्रियांना कांही स्वाभिमान असेल तर त्यांनी हा कायदा बदलण्याची खटपट केली पाहिजे. त्याऐवजी त्या नवऱ्याला दुसरी बायको करूं न देण्याच्या खटपटींत आहेत. ज्यांना आपल्या पायांवर उभें राहतां येत नाही, त्यांना स्वाभिमान येणार कसा ? हिंदुस्थानांतच काय, पण इंग्लंदांतही विवाहित स्त्री ही नवऱ्याची मलमत्ता समजतात. तिने कोणाशीं व्यभिचार केल्यास त्या मनुष्यावर फिर्याद होते, आणि ती नवऱ्याची मालमत्ता त्याच्या परवानगीशिवाय वापरल्याबद्दल ! सुधारलेले म्हणवणाऱ्या पाश्चात्य देशांत ही स्थिति आहे, आणि म्हणूनच या कायदेबंदीवाल्या लोकांनी अज्ञान कोण हें स्वतः ठरवण्याच्या भान-

गर्डीत न पडतां तें ज्या त्या देशाने ठरवावें असें म्हटलें आहे. आणि हे व्यक्ति-
स्वातंत्र्याच्या गप्पा मारतात !

७. "कोणत्याही वयाच्या कोणत्याही स्त्रीला किंवा पुरुषाला फसवून
किंवा बळजबरीने समागमाचा प्रयत्न झाल्यास त्याबद्दल शिक्षा व्हावी." अर्थात्
यांत कोणताच मतभेद नाही.

८. "सार्वजनिक ठिकाणीं कोणाच्या सभ्यतेला धक्का बसेल अशा वागणु-
कीबद्दल शिक्षा व्हावी." यांतही मतभेद नाही.

९. "सार्वजनिक रीतीने कोणाही व्यक्तीला समागमाकरतां आव्हान
करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याबद्दल शिक्षा व्हावी आणि वेश्यावृत्तीवर उपजीविका
करणाऱ्या तिऱ्हाइतासही शिक्षा व्हावी, परंतु या गोष्टीचा पुरावा मात्र पाहिजे,
आणि नोंदणीच्या देशांतील पोलिसास हल्ली जो फाजील अधिकार आहे तोच
दुसऱ्या स्वरूपांत येतां नये." हा कायदा पुरुषांस व स्त्रियांस सारखाच लागावा
असा उद्देश आहे व त्यांत वावगें कांहीच नाही. नोंदणीवाल्या देशांतही अशा
गुन्ह्याला पुरावा लागतो, आणि पोलिसाला वाटेल त्याला किंवा तिला शिक्षा
करतां येत नाही. तेव्हा या बाबतींत पोलिसाला फाजील अधिकार असतो या
म्हणण्यांत अर्थ नाही. पोलिसाने पकडलेल्या कोणत्याही मनुष्याला न्यायासनापुढे
आणावें लागतें, तेव्हा यांत विशेष कांहीच नाही. फ्रान्समधेंही पॅरिसशिवाय इतरत्र
असाच कायदा आहे. पॅरिस शहरांतील कायदा मात्र वेगळा आहे आणि त्या-
विरुद्धच बहुधा ही ओरड आहे. आणि ती बरोबर आहे, पॅरिसमधें पोलि-
साला फाजील अधिकार आहे आणि तो असतां नये, हें खरें. वेश्यावृत्तीवर
उपजीविका करणारांविरुद्ध सर्वत्र कायदे आहेत आणि नोंदणीवाल्या देशांतही ते
तसेच आहेत. तेव्हा या बाबतींत कोणताही फरक नाही. परंतु असे कायदे असावे
की काय, हा महत्वाचा प्रश्न आहे आणि त्याचा थोडा विचार करणें जरूर आहे.

वेश्यांचे नोंदणीसंबंधीं कायदे असोत किंवा नसोत, सर्वच ख्रिस्ती देशांत
वेश्यावृत्ति हा नीच धंदा समजलेला आहे. नोंदणीवाले देश असें समजतात की
आपण वेश्यावृत्ति मर्यादित करीत आहोंत. नोंदणीविरुद्ध देशांत वेश्यांना

केवळ नांवाचें स्वातंत्र्य असतें, परंतु तेथे त्यांना भलभलते कायदे लावून शिक्षा करण्याची प्रवृत्ति असते. उदाहरणार्थ पुष्कळ देशांत त्यांना भटक्यांचा कायदा लावतात. एकंदरींत वेश्यांचा छळ करण्याची बुद्धि दोन्ही प्रकारच्या देशांत दिसते, कारण नोंदणीवाल्या देशांत नोंदणी केलेल्या वेश्यांना देखील अनेक प्रकारचे कडक नियम लागू असतात, आणि शिवाय सक्तीच्या तपासणीच्या वेळीं जर त्यांपैकी कोणास रोग आहे असें दिसलें, तर त्या बऱ्या होईपर्यंत त्यांना उपचार करण्याकरतां वास्तविक इस्पितळांत ठेवून रोग्यांप्रमाणे वागलें पाहिजे, तसें न वागवतां कैद्यांप्रमाणे वागवतात. म्हणजे त्यांना केवळ उपचारच न करतां त्यांचा शक्य तितक्या प्रकारांनी उपमर्द करतात. इतरांना नीच समजून त्यांचा छळ करण्यांत स्वतःकडे मोठेपणा घेऊन त्यापासून जें एक प्रकारचें सात्विक (!) समाधान मिळतें, तें याच्या मुळाशीं असतें. ज्यू लोकांना छळण्याची हिटलरची प्रवृत्ति याच दर्जाची आहे. तेव्हा वेश्यांना नीच कां मानावें याचा कोणीही विचार करीत नाही. त्या नीच म्हणून एकदां सामाजिक संकेत ठरला, म्हणजे त्यांचा छळ करणें ओघानेच येतें. वेश्यावृत्ति नीच ठरवायला सामाजिक नीतीच्या प्रचलित कल्पना साहजिकच उपयोगी पडतात, आणि मग वेश्यांचा छळ करणें हें पुण्यकर्म होऊन बसतें आणि तो करण्याकरतां नीतिबाज शिष्ट पाहिजे तो हलकटपणा करायला तयार होतात. यामुळेच मध्यस्थी करून वेश्यांना गिऱ्हाईक मिळवून देणें हा सर्वत्र गुन्हा मानलेला आहे. इतर कोणत्याही धंद्याची मध्यस्थी करणें हा गुन्हा होत नाही, इतकेंच नव्हे तर मध्यस्थी हा प्रतिष्ठित धंदा समजतात. अर्थात् जो धंदाच गुन्हा समजलेला असेल, उदाहरणार्थ चोरीचा, तेथे मध्यस्थी हाही गुन्हा समजतात आणि तें सयुक्तिक आहे. पण वेश्यावृत्ति हा बहुतेक देशांत गुन्हा मानलेला नाही, आणि तरीदेखील वेश्यांची मध्यस्थी हा गुन्हा मानलेला आहे. वेश्यांनी मिळवलेल्या पैशावर तिऱ्हाइताने उपजीविका करतां नये असा कायदा आहे. जो धंदा गुन्हा नाही, त्याला मदत करणें हा गुन्हा कां मानावा, हें कायदेपंडितच जाणोत! आमचे मतें ही केवळ अरेरावी आहे आणि वेश्यांना त्रास देण्याची एक युक्ति आहे. याच धर्तीवर कित्येक नीतिबाजांचा असाही

आग्रह असतो की वेश्यांना भाड्याने जागा देणें हाही गुन्हा समजावा. या प्रश्नाचा सरळ विचारच फारशा लोकांना करतां येत नाही. वेश्यांना भाड्याने जागा देणें हा जर गुन्हा, तर त्यांना अन्नवस्त्र किंवा इतर कोणत्याही वस्तु विकत देणें हाही गुन्हा समजला पाहिजे. यांत केवळ वेश्यांचा छळ करण्याची बुद्धि आहे, यापलीकडे दुसरें कांही नाही. याला अनेक कारणें सांगण्याची पद्धत आहे, परंतु तीं खरीं वाटणें कठिण आहे. हे मध्यस्थ कोठून तरी मुलींना फसवून पळवून आणतात आणि त्यांचें मर्जीविरुद्ध त्यांना वेश्यावृत्ति करायला लावतात, अशी एक सबब सांगतात. परंतु हें जर खरें असेल तर अशा माणसांना इतर कायद्यांखाली शिक्षा करतां येतेच, तेव्हा त्याकरतां प्रामाणिकपणें मध्यस्थी करणाराला गुन्हेगार कां समजावा? जुलूमजबरदस्तीला केव्हाही शिक्षा करतां येतेच. हे नीतिवाज लोक इतके ढोंगी असतात की एका बाजूनें ते वेश्यांबद्दल मोठी सहानुभूति दाखवतात आणि दुसऱ्या बाजूने त्यांना शक्य तितका त्रास देतात. वेश्यावृत्तीचा नैतिक विचार पुढें करूं. परंतु स्वतःचे नैतिक विचार जबरदस्तीने दुसऱ्यावर लादूं पाहणें हाही जुलूमच आहे आणि त्याबद्दलही शिक्षा कां करूं नये? या बाबतींत सध्या बहुतेक सर्वच देश सारखे आहेत, परंतु जोंपर्यंत विवाहसंस्था अस्तित्वांत आहे तोंपर्यंत वेश्यांचा उपयोग आहे असें डॉ. रॉबिनसनसारख्या प्रमुख डाक्तराने लिहिलेलें आहे, तेव्हा वेश्यांच्या मध्यस्थांविरुद्ध कायदे ह्मणजे केवळ नीतिवाजी आहे, समंजसपणा नाही.

या बाबतींत विशेषतः स्त्रियांचा व्यापार करणारांसंबंधी राष्ट्रसंघानें दोन भागांचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यासंबंधी त्याच धंद्यांतील एका दर्दी मनुष्यानें पुढील मत दिलें आहे. "ते दोन ग्रंथ मीं वाचले आहेत आणि ते लिहिणारांना त्यांतील बिलकुल माहिती नाही हें स्पष्ट दिसतें. ज्या स्त्रिया परदेशीं वेश्याव्यवसाय करायला जातात, त्या अगोदरच वेश्या असतात आणि आपण कोठे जात आहों आणि तेथे काय करायचें आहे हें त्यांना बरोबर माहीत असतें. त्यांतील कांही कायद्याने 'अज्ञान' असतात हें खरें, परंतु त्यांनाही हें माहीत असतें. त्यांना वेश्यावृत्तींतच आनंद वाटतो आणि त्यांना स्वदेशीं परत येण्याची बिलकुल इच्छा नसते, इतकेंच नव्हे तर इच्छा असेल तितक्या

सर्वांना जर देशाबाहेर पाठवतां आलें तर हल्लीच्या वीसपट वेश्या बाहेर जातील. मुली विकत घेण्याकरतां दक्षिण आफ्रिकेंतून मध्यस्थ यूरोपांत येतात हें साफ खोटें आहे हें मी निश्चयाने सांगतों. अशा मनुष्याचें पोट भरणार नाही. आतां हें खरें की कांही स्त्रिया परदेशी मनुष्याकडून स्वतःला पळवून नेववतात, पण ते लोक कधी पैसे देत नाहीत. 'रिओ डि जानेरो' येथील वेश्यागृहांच्या मालकांना मुली विकत घेण्याची बिलकुल जरूरी नसते. त्यांच्याकडे आपण होऊन इतक्या मुली येतात की त्यांना त्या सर्व घेतां येत नाहीत. राष्ट्रसंघाच्या पुस्तकांतील बऱ्याच गोष्टी साफ खोट्या आहेत. जे मध्यस्थीचा धंदा करतात, ते मादक पदार्थ किंवा अश्लील चित्रें विकीत नाहीत. एक धंदा त्यांना पुरेसा असतो. त्याचप्रमाणे मध्यस्थांचा आंतरराष्ट्रीय संघही नसतो आणि त्यांना जगांतील वेश्याव्यवसायासंबंधी माहिती पुरवणारीं पत्रेंही नसतात. या नुसत्या गप्पा आहेत." वेश्यावृत्ति नाहीशी करायला उपाय काय? असें त्याला विचारतां तो म्हणाला तें मला सांगतां येणार नाही, पण इतकें मात्र खरें की सर्वच श्रीमंत असते तर वेश्या कमी असत्या, कारण घरकाम करण्यापेक्षा वेश्येच्या धंद्यांत केव्हाही जास्त फायदा असतो.

ज्यांना मोठेपणा पाहिजे असतो त्यांना नीतिबाजी केल्याशिवाय गत्यंतर नसतें. तेव्हां राष्ट्रसंघांतील प्रतिनिधि नीतिबाज असल्यास नवल नाही आणि त्यांनी मध्यस्थांबद्दल आरडाओरडा करावा हें ठीकच आहे. परंतु प्रत्यक्ष जिनीव्हा येथे एका महत्वाच्या परिषदेच्या वेळीं त्या शहरांत वेश्यागृहांना बंदी असल्यामुळे सभासदांच्या सोयीकरतां पॅरिसहून एक वेश्यागृह जसेंच्यातसें उचलून नेण्यांत आलें होतें, आणि ही बातमी एका इंग्रज बातमीदाराने प्रसिद्ध केल्यामुळे त्यासंबंधी बराच गवगवा झाला होता. नीतिबाजींत इंग्रज व अमेरिकन यांची नेहमी स्पर्धा चाललेली असते आणि स्वदेशीं नीतिबाजींत प्रमुख दिसणारे इंग्रज व अमेरिकन लोक पॅरिसला जाऊन मनसोक्त चैन करतात हें जगप्रसिद्ध आहे. इतर राष्ट्रें नीतिबाजींत मागें आहेत, पण त्यांच्या प्रतिनिधींना देखील राष्ट्रसंघाच्या सभेंत नीतिबाजीविरुद्ध ब्र काढण्याची छाती होत नाही. यामुळे अश्लील चित्रें, वेश्यावृत्ति वगैरे बाबतींत सर्व जगभर राष्ट्रसंघाने नीतिबाजीचा प्रसार जारीने चालवला आहे.

राजकीय बाबतींत राष्ट्रसंघाचें काम शून्य आहे, तेव्हा असे प्रकार करून आपण कांही करीत आहोंत असें भासवणें त्यांना भाग पडतें आणि ठिकठिकाणचे नीतिबाज लोक त्यांना साथ द्यायला तयार असतातच. ही नीतिबाजीच मध्यस्थांविरुद्ध कायद्यांच्या मुळाशीं आहे आणि आम्हीही वेश्यावृत्ति वाईटच म्हणतों असें सर्व पक्षांना दाखवायचें असल्यामुळे हे कायदे सर्व देशांत सांपडतात.

१० " यासंबंधी जे कायदे असतील ते स्त्रियांना व पुरुषांना सारखेच लागले पाहिजेत. " यांत मतभेद असण्याचें कारण नाही, परंतु कांही ठिकाणीं पुरुषांनी मध्यस्थी करणें हा गुन्हा असतो आणि बायकांनी केलेली चालते. फ्रान्समधील वेश्यागृहांवर देखरेख स्त्रीचीच असली पाहिजे असा निर्बंध आहे आणि मुंबईतही कांही दिवसापूर्वी स्त्रियांना मध्यस्थी करण्याची परवानगी असे, परंतु आतां ती नाही.

११. " जेव्हाजेव्हा मध्यस्थांना कायद्याने शिक्षा होईल तेव्हातेव्हा त्यांचा उपयोग करून घेणारांना ( म्हणजे गिऱ्हाइकांना ) देखील गुन्ह्यांत मदत केल्याबद्दल शिक्षा झाली पाहिजे. " मध्यस्थी दोन प्रकारची असूं शकेल. अगोदरच धंदा करीत असलेल्या वेश्यांना गिऱ्हाईक मिळवून देणें हा एक प्रकार, आणि वेश्यागृहांच्या मालकांना वेश्या मिळवून देणें हा दुसरा प्रकार, पहिल्या प्रकारांत आमचे मतें कांहीच गैर नाही. दुसऱ्या प्रकारांत मात्र कोणीं एखाद्या स्त्रीला फसवून आणून वेश्यागृहाच्या ताब्यांत दिल्यास त्याला शिक्षा झाली पाहिजे, याबद्दल मतभेद होण्याचें कारण नाही. कोणा स्त्रीस फसवण्यांत गिऱ्हाईक सामील असेल तर त्यास शिक्षा करणें योग्य होईल, एरवी नाहीं.

१२. या शेवटच्या कलमांत कायदेबंदी संघ असें स्पष्ट सांगतो की शिस्तीच्या किंवा सभ्यतेच्या मिषाने कोणत्याही स्त्रीवर सक्तीची तपासणी लादतां नये आणि वेश्यांकरतां कोणतेही वेगळे कायदे करतां नये. याचा विचार पांचव्या कलमाखाली केलाच आहे, तेव्हां याला वेगळें उत्तर देण्याचें कारण नाही.

या बारा कलमांचा त्यांच्या प्रचारपुस्तकांत जो खुलासा केला आहे त्याचा आतां थोडा विचार करूं. त्यांत एक मुख्य मुद्दा असा आहे की वेश्यांसंबंधी

वेगळी पोलीसची व्यवस्था केल्याने वेश्यावृत्तीस विरोध न होतां उलट वेश्यांची कायदेशीर व्यवस्था होते. त्यांचें मतें ही अनीति आणि अन्याय आहे. पोलीसच्या व्यवस्थेसंबंधी पुढे सविस्तर लिहायचें आहे, त्यावेळी याचा विचार होईल.

दुसरा महत्वाचा मुद्दा असा की कायदा सर्वांना सारखा असला पाहिजे या तत्वाला बाध येतां नये. हें तत्व बरोबर आहे, परंतु तें या ठिकाणीं लागू पडत नाही. वेश्या स्त्रिया आहेत म्हणून त्यांना वेगळा कायदा आहे असें नाही, तर त्यांच्या धंद्यामुळे समाजाला जो धोका उत्पन्न होतो, त्याकरतां कायदा करावा लागतो. पुरुष जर हा धंदा करीत असते तर त्यांनाही अर्थातच असाच कायदा लावावा लागला असता. आणि इतर धंद्यांना अशाच प्रकारचे कायदे लागत नाहीत काय ? पुष्कळ देशांत खाण्याचे पदार्थ विकणाऱ्या दुकानांवर पोलीसची देखरेख व तपासणी असते. बाजारांत कोणी सडका माल विकूं लागला तर चालत नाही. औषधांच्या दुकानांवर देखरेख असते. नोंदणी व परवाना फ्रान्समधें वेश्यांनाच लागतो असें नाही, वकिलीची परीक्षा पास झाली तरीही वकिलाला स्वतःची नोंद करवून परवाना घ्यावा लागतो, एरवीं धंदा करतां येत नाही; आणि वकिलीचा धंदा तर मोटा प्रतिष्ठित समजतात. वकिलांची नोंद येथेही करावी लागते. ते जर म्हणूं लागले की हा अपवादात्मक कायदा आम्हालाच काय म्हणून ? तर त्याचें उत्तर काय ? हे नियम वेगवेगळ्या धंद्यांकरता वेगवेगळे करावे लागतात, त्यांनी कायद्याच्या समानतेच्या तत्वाला बाध येत नाही. अशा स्थितींत वेश्यांच्या धंद्यापासून समाजाला रोगसंसर्गाचा धोका आहे हें माहीत असूनही त्यांचेकरतां कायदा करूं नये असें कसें म्हणतां येईल ? असें म्हणण्याचें धाडस करणारे कांही लोक भेटतात हेंच आश्चर्य आहे. सामाजिक जीवनाचीं सामान्य तत्वें देखील या लोकांना कळूं नयेत ? व्यक्तिस्वातंत्र्याला अतिशय महत्व आहे आणि म्हणून समाजाने कोणतेही निष्कारण निर्बंध व्यक्तींवर लादूं नयेत हें खरें, पण जेथे कारण असेल तेथे निर्बंध घातलाच पाहिजे हें उघड आहे.

हे लोक नोंदणीवर एक खोटा आरोप करीत असतात की नोंदणीचा व तपासणीचा उद्देश वेश्यावृत्ति सुरक्षित करण्याचा आहे. हा जाणूनबुजून केलेला

खोटा आरोप आहे. तपासणीने संसर्गाचा संभव अजीबात नाहीसा होतो असें कोणीही म्हणत नाही, परंतु तो संभव निःसंशय कमी होतो आणि हे रोग किती भयंकर आहेत हें ज्यांना माहीत आहे त्यांना तो कमी करण्याचें महत्व समजेल. एखादा रोग अजीबात नाहीसा होत नाही म्हणून तो कमी करण्याचाही प्रयत्न करूं नये हा कोठला न्याय ?

ते आणखी असेंही म्हणतात की नोंदणीने वेश्यांना धंदा करण्याचा हक्क मिळतो. हें खोटें आहे, कारण तो हक्क अगोदरच असतो. कायदे नको म्हणणारे लोक तर या बाबतींत व्यक्तिस्वातंत्र्य मागतात. मग नोंदणीनेच तो हक्क येतो असें कसें म्हणतां येईल ? वेश्यावृत्ति हा जोंपर्यंत गुन्हा मानलेला नाही तोंपर्यंत तो हक्क कोठेही आहेच, पण त्या हक्काच्या अंमलबजावणीवर नोंदणीमुळें देखरेख होते, म्हणजे तो हक्क नोंदणीने उत्पन्न होण्याऐवजी त्याला थोडाबहुत अडथळा होतो. तेव्हा हा आरोप निखालस खोटा आहे.

नोंदणीची पद्धत प्रथम फ्रान्समध्येंच सुरू होऊन नंतर इतरत्र पसरल्यामुळे या पद्धतीवर टीका करतांना पॅरिस येथील पद्धतीवरच लोक आक्षेप घेतात हें साहजिक आहे. परंतु पॅरिस येथील पद्धत आदर्श आणि सर्वतोपरी चांगली आहे आणि तींत कांही सुधारणा करतां येणार नाही, असें नोंदणीचे पुरस्कर्तेंही म्हणत नाहीत. पॅरिसमधील पद्धतींत अनेक दोष आहेत, पण ते अपरिहार्य नाहींत. ते सहज काढून टाकतां येतील. उदाहरणार्थ तेथील पोलिसाच्या हातांत या बाबतींत फाजील सत्ता दिलेली आहे आणि रोगी वेश्यांना तुरुंगांत कोंडून ठेवणें बरोबर नाही. त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नसतो हें एक, आणि त्यांना अशा रीतीने वागवल्यामुळे त्या तपासणी चुकवायला पाहतात हें दुसरें. त्याऐवजी त्यांना खरोखर रोग्यांप्रमाणे वागवल्यास त्या खुषीने तपासणीला तयार होतील आणि मग तपासणीच्या पद्धतीचा जास्त उपयोग होईल. पण वेश्यांना नीच समजण्याच्या पद्धतीमुळेच हा दोष उत्पन्न झालेला आहे, आणि ही मनोवृत्ति बदलल्यासच सुधारणा शक्य आहे.

प्रच्छन्न वेश्यांपासून समाजाला जास्त धोका आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे. तेव्हा चोरून धंदा करणाऱ्या वेश्या सांपडल्यास पोलिसाला त्यांचें नांव

जबरदस्तीने नोंदण्याचा हक्क आहे यांत कांहीच वावगें नाहीं, कारण त्यांची नोंद झाल्याशिवाय तपासणी होत नाही. विरुद्ध पक्षाचें म्हणणें असें की त्यांची नोंद केल्यामुळे त्या पक्क्या वेश्या बनतात आति जन्मभर त्याच धंद्यांत त्यांना रहावें लागतें. परंतु हें खरें नाही. वेश्येला धंदा सोडायचा असेल तर तिला कोण-त्याही प्रकारचा अडथळा पोलिसाकडून होत नाही. अर्थात् ती खरोखर धंदा सोडते की केवळ पोलीसचा ससेमिरा चुकवण्याकरतां तसें ढोंग करून फिरून चोरटा धंदा करते, हें पाहण्याकरतां कांही दिवस तिच्यावर देखरेख राहणारच.

वेश्यांना पोलीसकडून एक तिकिट मिळतें, परवाना मिळतो, म्हणजे त्यांना रस्त्यांत उजळ माथ्याने धंदा करतां येतो, हें खोटें आहे. वेश्यांना जें तिकीट मिळतें तें एवढ्याकरतांच की त्या वेळेवर तपासणीस हजर राहतात की नाही तें समजावें म्हणून त्या तिकिटावर तपासणीच्या तारखा लिहिलेल्या असतात. तो अर्थातच परवाना नव्हे, आणि सार्वजनिक ठिकाणीं किंवा भर रस्त्यावर त्यांना गिऱ्हाईक गांठण्याचा प्रयत्न करण्याची परवानगी नाही. हा तर पोलीसचा मुख्य नियम आहे.

आणखी असाही एक आक्षेप आहे की वेश्यागृहांना पोलिसाचें संरक्षण असतें आणि सरकारच त्या गृहांना वेश्या पुरवतें. हाही विपर्यास आहे. तपासणीच्या दृष्टीने स्वतंत्र वेश्यांपेक्षा वेश्यागृहें अधिक सोयीचीं पडतात हें उघड आहे, आणि एका शतकापूर्वी एकदां असा कायदाही एका पोलिसच्या अधिकाऱ्याने केला होता की वेश्यांनी वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे. परंतु तो फार दिवस टिकला नाहीं, आणि एवढ्यावरून वेश्यागृहांना पोलीसचें संरक्षण असतें आणि त्यांना पोलीस वेश्या पुरवतें असें म्हणणें रास्त नाही. पोलिसाचें संरक्षण सर्वांनाच असतें आणि वेश्यागृहांना किती कडक नियम लावले जातात हें पाहिलें म्हणजे त्यांना संरक्षण काय असतें याची कल्पना येईल.

वेश्यागृहांत वेश्यांना जबरदस्तीने ठेवतात आणि त्या एक प्रकारच्या गुलामच आहेत, या म्हणण्यांतही विशेष अर्थ नाही. वेश्येच्या मर्जीविरुद्ध तिला कधीहि जबरदस्तीने वेश्यागृहांत ठेवतां नये, असा पोलीसचा नियम आहे. वेश्यागृहांचे मालक असा जुलूम कधीच करीत नाहीत असे नाही, परंतु तें

कायद्याविरुद्ध आहे आणि तें पोलीसच्या नजरेस आल्यास त्यांना शिक्षा होते. वेश्या एक प्रकारें गुलामच असतात हेंही खोटें. वेश्यागृहांतील वेश्यांची स्थिति इतर धंद्यांतील गरीब स्त्रियांपेक्षा कितीतरी चांगली असते. त्यांना अन्न वगैरे चांगलें मिळतें इतकेंच नव्हे तर त्यांना थोडेबहुत पैसेही सांठवतां येतात आणि नैतिक दृष्ट्या कांही म्हटलें तरी त्यांची इतर बाबतींत स्थिति वाईट असते असें कोणीही म्हणणार नाही. पुष्कळ स्त्रिया वेश्यावृत्ति पसंत करतात याचें कारणच हें आहे की दुसऱ्या धंद्यांत इतक्या थोड्या श्रमाने इतके पैसे कधींच मिळत नाहीत.

नोंदणीच्या पद्धतीने वेश्यांवर जुलूम होतो हें म्हणणें कितपत खरें आहे हें पाहूं. जी वेश्या खुषीने नांव नोंदवण्याकरतां येते ती नांव नोंदवतांना ज्या कागदावर सही करते, त्यांत पोलीसचे सर्व नियम पाळण्याबद्दल कबुली दिलेली असते. पण सर्वच वेश्या खुषीने नांव नोंदवीत नाहीत, व चोरून धंदा करणाऱ्या वेश्यांना पोलीस जबरदस्तीनें नांव नोंदवण्यास लावतें हें खरें. पण अशी नोंदणी इतर धंद्यांतही लागते हें आपण वर पाहिलेंच आहे आणि नोंदणीबरोबर सर्व नियम येतातच. पुष्कळ वरच्या दर्जाच्या वेश्या पोलीसच्या जाळ्यांत सांपडत नाहीत ही गोष्ट खरी आहे. पुष्कळ वरच्या दर्जाचे चोर देखील पोलिसाला पकडतां येत नाहीत. परंतु रस्त्यांत गिऱ्हाईक गांठणाऱ्या वेश्यांपासूनच समाजाला जास्त धोका असतो, कारण वरच्या दर्जाच्या वेश्यांचें गिऱ्हाईक संख्येनें अत्यल्प असतें. तेव्हा सर्वांना पकडतां येत नाही म्हणून कोणालाच पकडूं नये हें म्हणणें बरोबर नाही. ज्यांना पोलीस पकडतें त्यांपासूनच जास्त धोका असतो, तेव्हा पोलीसच्या व्यवस्थेचा अत्यंत उपयोग असतो हें उघड आहे.

नोंदणीविरुद्ध पक्षाचें आणखी असें म्हणणें आहे की सडका माल विकणारावर निर्बंध घालणें रास्त असलें तरी वेश्यांवर तसे निर्बंध घालतां नये, कारण वेश्या कोणताही माल उत्पन्न करीत नाहीत किंवा विकीतही नाहीत. तनुविक्रय हा शब्द या धंद्याबद्दल वापरतात हें खरें, परंतु ती केवळ अलंकारिक भाषा आहे इतकेंच. वेश्या माल विकते असें पाहिजे तर म्हणूं नये, तो भाषेचा प्रश्न आहे. पण वेश्येच्या धंद्यापासून समाजाला धोका आहे हें कोणाला नाकबूल

करतां येणार नाही. आणि हें जर खरें, तर समाजाला स्वसंरक्षणाचा हक्क त्याबरोबरच येतो. वेश्यावृत्तींत दोन माणसांचा संबंध असतो आणि रोगांसंबंधी काळजी घेणें ही त्या दोन व्यक्तींची खाजगी गोष्ट आहे, कायद्याने त्यांत हात घालतां नये, हें म्हणणें राक्षसी आहे. रोग होण्याचा संभव त्या दोन माणसांपुरताच नसून निरपराधी माणसांना आणि पुढील पिढ्यांना देखील संसर्गापासून धोका असतो हें लक्षांत घेतलें म्हणजे हा केवळ शब्दच्छल करण्याचा विषय नसून समाजाच्या संरक्षणाचा यांत मुख्य प्रश्न आहे आणि बाकी सर्व गोष्टी त्यापुढे गौण आहेत हें कोणाही समंजस माणसाला कबूल करावें लागेल.

वेश्यांची समाजाला जरूरी आहे काय ? या प्रश्नाचा त्यांनी विचार करून वेश्यावृत्ति अपरिहार्य नाही असा निर्णय दिला आहे. वेश्यावृत्ति अजीबात बंद करण्याचे प्रयत्न आजपर्यंत ज्याज्या वेळीं झाले, त्यात्या वेळीं असे कायदे पुनः पुनः रद्द करावे लागलेले आहेत, असें आपण ऐतिहासिक भागांत पाहिलें. जर्मनीला वेश्यांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न करावे लागले. व्हेनिस येथील घालवून दिलेल्या वेश्यांचीं आर्जवें करून त्यांना सरकारांतून वेतन देऊं करून परत बोलावावें लागलें. कायदेबंदीवाल्या पक्षाचें म्हणणें असें की ‘ लोकांना आपलें मन आवरून धरण्याऐवजी कामवासनेला मोकाट सोडायला पाहिजे असतें, म्हणून वेश्यांची जरूर लागते. मग चोरांना चोरी करायला पाहिजे असते म्हणून चोरी देखील अपरिहार्य आहे असें म्हणावें !’ हें म्हणणें अगदीच फोल आहे. कामवासना ही नैसर्गिक प्रेरणा आहे आणि तिच्या मुळाशीं शारीरिक गरज आहे. केवळ भूक शमवण्याकरतां चोरी करणाराची गोष्ट सोडली तर चोरीची गोष्ट तशी नाही. धार्मिक लोकांनी कामवासनेविरुद्ध कितीही लिहिलें आणि ब्रह्मचर्याची कितीही तारीफ केली, तरी तें सामान्य जनतेला व्यवहार्य नाही हें समंजस लोकांना कबूल करणें भाग आहे. तेव्हा तात्विक दृष्ट्या कोणी कांहीही म्हणो, जोंपर्यंत विवाहसंस्था हल्लीच्या स्थितींत चालू आहे, म्हणजे जोंपर्यंत व्यभिचाराला समाजाची परवानगी नाही आणि सर्वांना विवाहही करतां येत नाहीत, तोंपर्यंत नैसर्गिक गरजा भागवण्याकरतां वेश्यांची अत्यंत जरूरी आहे, असेंच व्यावहारिकं दृष्ट्या म्हणणें भाग आहे. या नैसर्गिक गरजा दाबून टाक-

ण्याचा जर समाजाने प्रयत्न केला तर तो यशस्वी न होतां सभ्य म्हणवणाऱ्या स्त्रियांच्या तथाकथित अब्रूवर धाड येईल. याच दृष्टीने विवाहसंस्था हा वेश्या-वृत्तीचा पाया आहे हें कोणासही नाकबूल करतां येणार नाही.

विरोधी पक्षाचें म्हणणें असें की ' वेश्यांची जरूरी आहे असें म्हणूं लागलें म्हणजे वेश्यावृत्ति हा आपला एक संभावित धंदाच झाला !' वकिलांनी आपली अक्कल भाड्याने देणें हा जर संभावित धंदा होतो, तर वेश्येने आपलें शरीर भाड्याने देणें हा धंदा हलकट कसा ? असें एच्. जी. वेल्स यांनी म्हटलें आहे. शिवाय याला त्यांच्याच पद्धतीने उत्तर द्यायचें असलें तर असें म्हणतां येईल की गांवांत भंग्यांची जरूर आहे असें म्हटलें तरमग संभावित माणसांना भंग्याचा धंदा करायला मुळीच हरकत नाही ! वकिलीप्रमाणेच भंग्याचा किंवा वेश्येचाही धंदा प्रामाणिकच आहे. फक्त नीतिबाज लोकांना स्वतःला मोठेपणा मिळवायचा असतो म्हणून ते वेश्यांना हलकट समजतात.

पोलिसाला ज्या स्त्रियांची जबरदस्तीने नोंद करण्याचा अधिकार असतो, त्या अगोदरच वेश्येचा धंदा करीत असतात तरमग त्यांत बिघडलें कोठें ? याला विरुद्ध पक्ष उत्तरतो की त्या पाहिजे तें करतील, त्या नीतीने वागतात की नाही यांत पोलिसाचा काय संबंध ? परंतु केवळ अनीतीमुळे पोलीस कोणाला पकडीत नाही. जी स्त्री वेश्येचा धंदा करते आणि जिच्या वागणुकीमुळे समाजाला संसर्गाचा धोका उत्पन्न होतो, तिलाच पकडून तिचें नांव नोंदण्याचा अधिकार पोलीसला आहे. पोलीसचे हातूनही एखादे वेळीं चूक होईल. परंतु तो कायद्याचा दोष नाही.

ते म्हणतात, ' पण तिला वेश्यागृहांत कोंडून ठेवल्यावर तर ती पक्की वेश्या होते आणि तिला दुसरा मार्गच रहात नाही. ' वास्तविक पोलीसने जरी नांव नोंदलें तरी तिला वेश्यागृहांत नेऊन ठेवण्याचा अधिकार पोलीसला नाही. तिला स्वतंत्रपणें राहण्याचा पूर्ण अधिकार आहे. फक्त नियमित वेळीं तिला तपासणीकरतां जावें लागतें, यापलीकडे तिच्यावर सक्ती नाही. ती स्वखुषीने वेश्यागृहांत गेली तरीही तिला मर्जीस येईल तेव्हा बाहेर पडण्याचा हक्क असतो. इतकेंच नाही तर वेश्यागृहाचे मालकिणीने तिला अडथळा केल्यास पोलीसच तिच्या मदतीला जातें.

तपासणीबद्दल त्यांचें म्हणणें असें आहे की सक्तीची तपासणी अपमानकारक आहे, आरोग्याच्या दृष्टीने तिचा परिणाम होत नाही आणि ती नैतिक दृष्ट्या गर्ह्य आहे. प्रकृतीकरतां अनेक संभावित स्त्रिया जर डाक्तरांकडून तपासून घेतात, तर भयंकर रोगांपासून समाजाच्या संरक्षणाकरतां वेश्यांना तपासण्याने त्यांचा उपमर्द कसा होतो? अर्थात् या तपासणीने त्यांनाही आरोग्य राखण्यास मदत होते हें वेगळेंच. तपासणीचा आरोग्याचे दृष्टीने उपयोग होतो की नाही याचा विचार पुढे येईल. पण वेश्यावृत्ति करीत असलेल्या स्त्रीची तपासणी करण्यांत नैतिक दृष्ट्या काय वाईट आहे हें समजणें कठिण आहे. कायद्याने वेश्यांची अशी व्यवस्था केल्याने ही संस्था कायदेशीर आहे असा समज लोकांत पसरतो आणि बदफैलीपणा वाईट आहे ही कल्पनाच नाहीशी होते, असें विरोधी पक्षाचें म्हणणें आहे. पण वेश्यावृत्ति वाईट असली तरी तो गुन्हा समजूं नये असेंच जर लोकमत आहे (तें तसें नसतें तर तो गुन्हा समजावा असा कायदा करतां आला असता), तरमग संसर्गाचा धोका असतांही वेश्यावृत्तीकडे डोळेझांक करणें योग्य होईल काय? संसर्गाचा धोका शक्य तितका कमी करणें ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे आणि यांतच समाजाचें हित आहे. तिकडे लक्ष न देतां तात्विक चर्चा करीत बसणें घातक आहे. त्यांत पोलिसाकडून कांही चुका होत असतील, किंवा कायद्याच्या व्यवस्थेंत कांही कमीपणा असेल, तर त्यांत सुधारणा करण्याऐवजी ही पद्धतच वाईट आहे म्हणून ओरड करणें समंजस नाही, आणि पोलिसाने चुकून एखाद्या सभ्य स्त्रीला वेश्यावृत्तीच्या आरोपावरून पकडली तर त्याबद्दल इतका गवगवा होतो की या बाबतींत पोलिसाला अत्यंत दक्षता बाळगावी लागते आणि अशी चूक क्वचितच होते. अशी चूक पॅरिसमधें १९०३ सालीं एकदां झाली होती आणि सबंध गेल्या शतकांत अशा दोनतीन चुका झाल्या होत्या. तेव्हा अशा चुका क्वचितच होतात हें उघड आहे, आणि अशा चुकांवरून कोणतीही पद्धत चूक ठरवतां येणार नाही.

कायदेबंदीवाले लोक आणखीही कांही खोटे आरोप या पद्धतीविरुद्ध करीत असतात. ते असे की पॅरिसमधे सायंकाळीं दिवे लागण्यापूर्वी आणि मध्यरात्रीनंतर, कोणाचें लक्ष जाईल अशा रीतीने रस्त्यांत फिरण्याची वेश्यांना बंदी आहे.

याचा अर्थ ते असा करतात की दिवे लागल्यावर त्यांना भर रस्त्यांत गिऱ्हाईक गांठण्याची मोकळीक आहे. हें खोटें आहे. त्यांना रस्त्यांत गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करण्याची मोकळीक केव्हांच नाही. अर्थात् सार्वजनिक रस्त्यांचा त्यांनी मुळीच उपयोग करतां नये असा कायदा करणें शक्य नाही. रस्ते सर्वांच्या उपयोगाकरतां आहेत आणि त्यांना धंद्याशिवायही कांही कारणाकरतां रस्त्यांचा उपयोग करावा लागेल, आणि कोणत्याही वेळीं धंद्याविरहित इतर कारणाकरतां वेश्येलाही रस्त्यांत जाऊं देणें भागच आहे, आणि बंदी असलेल्या वेळीं देखील रस्त्यांत गेल्याबद्दल त्यांना कोर्टांत हें कारण सांगतां येतें. कायदेबंदीवाले लोक स्वतःला सोयीला पडेल तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्यावर जोर देतात. मग याच बाबतींत वेश्यांचें स्वातंत्र्य कसें हिरावून घेतां येईल ? तेव्हा त्यांनी पोलिसावर केलेला आरोप सर्वथैव खोटा आहे.

या लोकांचा आणखी एक आरोप असा आहे की वेश्यांचे नियंत्रणामुळे लोकांच्या कामुकतेला फाजील उत्तेजन मिळतें आणि नियंत्रित शहरांत अनौरस मुलें, बलात्कार, अनैसर्गिक संभोग, वगैरे गोष्टींचा फैलाव होतो. इतिहासाचे साक्षीवरून हें विधान सर्वस्वी खोटें ठरतें, हें ऐतिहासिक भागांत पूर्वी दिसलेंच आहे. वरील विधानाला ते पुढील युक्तिवाद जोडतात. ‘ नियंत्रणामुळे वेश्या सहज उपलब्ध होतात आणि या सहज मिळणाऱ्या सुखाची लोकांना किंमत वाटत नाहीशी होऊन त्यांना यापेक्षा कांही विशेष पाहिजे असें वाटूं लागतें, आणि अल्पवयस्क मुलांवर अत्याचार करणारे लोक बहुधा वेश्यागृहांच्या गिऱ्हाइकांतूनच निघतात. ही निव्वळ थाप आहे आणि ती सहज पचण्यासारखी नाही. ज्या शहरांत नियंत्रण नसतें तेथे वेश्यागृहांना बंदी असते हें खरें, परंतु जेथेजेथे ही बंदी केलेली आहे, तेथेतेथे तींच गृहें इतर स्वरूपांत पुनः उत्पन्न झालेलीं आहेत आणि त्यांवर कोणतीहि देखरेख नसल्यामुळे आरोग्याचे दृष्टीने तीं फारच भयंकर होत इतकेंच नव्हे तर तेथेच अनैसर्गिक गोष्टी होण्याचा संभव जास्त, कारण तेथे कोणाचीहि भीति नाही. तेव्हा अशा बेकायदा गृहांपेक्षा नियंत्रित गृहांत कांही अधिक धोका असणें अशक्य आहे. या वेश्यांना उघडपणें गिऱ्हाईक गांठण्याची बंदी असते असें पाहिजे तर म्हणावें, पण ही बंदी फक्त

कायद्यांत असते, ती प्रत्यक्ष अमलांत आणणें कठिण असतें. तेव्हा नियंत्रणाविरुद्ध वरील विधान म्हणजे एक थाप आहे.

यानंतर त्यांचें म्हणणें असें की वेश्यांची तपासणी आरोग्याचे दृष्टीने निरुपयोगी आहे. परंतु एक तर हें विधान करणारें हें चोपडें १९१२ सालचें म्हणजे बरेंच जुनें आहे, आणि या पुस्तकांत कांही डॉक्टरांनी १८७३ व ७५ सालीं केलेलीं कांही विधानें आधार म्हणून दिलेलीं आहेत. गर्मीवरील उपचारांची सर्व प्रगति १९१२ नंतरच झालेली आहे, तेव्हा आतां तसल्या विधानांत कांही जोर राहिलेला नाही.

त्यांनी आपलें म्हणणें सिद्ध करण्याकरतां इंग्लंडचें उदाहरण दिलें आहे की ब्रिटिश सैन्यांतील गुप्त रोगांचें प्रमाण १८८४ सालीं हजारीं २७१ होतें, तें नियंत्रण काढून टाकल्यावर १८९० सालीं हजारीं ६५ पर्यंत उतरलें. नियंत्रण काढल्यामुळे इंग्लंडांतील वेश्यावृत्ति कमी झालेली नाही, हें लक्षांत घेतलें तर केवळ नियंत्रण काढल्यामुळे रोगांचें प्रमाण इतकें कमी होणें अशक्य आहे, आणि या आंकड्यांत कोणीतरी घोटाळा केलेला आहे हें उघड दिसतें. तपासणी नसलेल्या वेश्या जास्त निरोगी असतात हें कोण खरें मानील ? आंकड्यांनी पाहिजे तें सिद्ध करतां येतें म्हणतात, तें हें असें. शिवाय १९०४ सालीं हेंच प्रमाण दरहजारीं १७४ होतें म्हणजे यूरोपांतील इतर कोणत्याहि देशापेक्षा जास्त होतें. हें इतकें कसें वाढलें ? याच सालीं इतर देशांच्या सैन्यांतील प्रमाण पाहिलें तर तें नियंत्रण जारी असलेल्या फ्रान्समध्यें हजारीं ३७.५ होतें. हा फरक कां झाला ? फक्त गर्मीचे आंकडे घेतले तर १९०४ सालीं ब्रिटिश सैन्यांत हजारीं ३४.९ आणि फ्रान्समध्यें ७.८ असे आंकडे सांपडतात. हें असें कां ? यावरून नियंत्रणाचा उपयोगच सिद्ध होतो.

या शिवाय ते प्रो. मूनिये यांचा हवाला देतात की नियंत्रण केल्यापासून रोगग्रस्तांचे आंकडे किंचित् कमी झाले आहेत, परंतु नियंत्रण नसलेल्या देशांत ते त्याहीपेक्षा कमी झालेले आहेत, आणि म्हणून नियंत्रण वाईट ठरवतात. परंतु तेच प्रो. मूनिये असेंहि म्हणतात की ज्या आंकड्यांवरून त्यांनी हा हिशोब

केला ते आंकडे कोठेहि पद्धतशीर रीतीने ठेवलेले नसल्यामुळे ते कुचकामाचे आहेत. अशा स्थितींत त्यांच्या म्हणण्याचा असा अर्थ होऊं शकत नाही.

या चोपड्यांत आणखीहि एक युक्तिवाद दिलेला आहे. रोगी वेश्यांना कांही काळ तरी धंदा न करूं देण्यांत जनतेचा आरोग्याच्या दृष्टीने फायदा उघड दिसतो असें कोणीहि म्हणेल.. पण हे लोक उलट म्हणतात की वेश्यांची संख्या ठरलेली नसते आणि त्या सर्वच पोलिसाला माहित नसतात, तेव्हा असें अनुमान काढणें बरोबर नाही. जणूं काय सर्वच वेश्या पोलिसाला माहीत नसल्यामुळे त्यांतल्या कांही रोगी म्हणून बाजूला काढल्या म्हणजे वेश्यांची संख्या वाढते! हा केवळ बेअकलीपणा आहे आणि कोणत्याहि वेड्यावांकड्या मार्गाने आपलेंच म्हणणें खरें करण्याची वृत्ति आहे. प्रच्छन्न वेश्या कितीहि असल्या तरी कांही रोगी वेश्या बाजूला काढल्या म्हणजे रोगी वेश्यांची संख्या कमी झालीच पाहिजे. हें सरळ अंकगणित आहे आणि तें कोणत्याहि लपंडावाने खोटें ठरण्यासारखें नाहीं. लटपटी करून हें खोटें ठरवूं पाहणें म्हणजे आपली बाजू लंगडी आहे हें कबूल करण्यासारखेंच आहे.

पुढे ते म्हणतात की लक्षपूर्वक तपासणी करून देखील गुप्त रोग पुष्कळ वेळां समजत नाहीत. हें विधान हल्ली खरें नाही. १९१२ सालीं तसें म्हणतां आलें असतें, परंतु हल्ली रोगांचें निदान करण्याच्या पद्धतींत सुधारणा झालेली आहे व यासंबंधी डाक्तरांचा पुरावा पुढे देऊं.

त्यांनी आणखी एक महत्वाचा मुद्दा काढला आहे की तपासणीमुळे गिऱ्हाइकांच्या मनांत खोटा विश्वास उत्पन्न होतो आणि यामुळे त्यांत अधिक धोका आहे. तपासणीच नसली म्हणजे लोकांना रोगांची भीति जास्त वाटेल आणि ते वेश्यांकडे जाणार नाहीत किंवा कमी प्रमाणांत जातील. परंतु हा विश्वास खरोखरच उत्पन्न होतो काय, हा एक महत्वाचा प्रश्न आहे. फ्रान्समधें स्वतंत्र वेश्यांच्या गिऱ्हाइकांत वेश्येला तपासणीचें कार्ड दाखवायला लावणारा मनुष्य हजारांत एक सांपडत नाही हा अनुभव आहे. इतकेंच काय पण वेश्या पुष्कळ वेळां आपण धंदेवाईक वेश्या आहोंत असें दाखवीतच नाहीत, कारण

वेश्या नसलेली स्त्री तात्पुरत्या अडचणींत सांपडल्यामुळे आपणास मिळते आहे, हेंच लोकांना अधिक बरें वाटतें. वेश्यागृहांत जाणाऱ्या लोकांना मात्र थोडाबहुत विश्वास वाटेल, परंतु एकंदरींत असा पुरा विश्वास बाळगणारे लोक फारच क्वचित् असतात. हल्ली वेश्यागृहांचे मानाने स्वतंत्र वेश्यांची संख्याच जास्त आहे, आणि त्यांना हें लागू नाही.

वर सांगितलेंच आहे की तपासणी निरुपयोगी आहे हें जें या लोकांचें म्हणणें आहे, त्यांत आतां फारसा जोर राहिलेला नाही. त्यांनी कांही डॉक्टरांचीं मतें दिलीं आहेत ही गोष्ट खरी, पण या विषयावर अनेक तज्ञांचीं पुस्तकें झालेलीं आहेत आणि त्यांतून असा सारांश निघतो की पूर्वी गर्मीच्या संसर्गापासून तीन महिनेपर्यंत रोगाचीं फारशीं चिन्हें दिसत नसत, यामुळे ताजा संसर्ग ओळखण्यास साधन नव्हतें. परंतु आतां प्रथम व्रण दिसूं लागतांच अतिसूक्ष्मदर्शक यंत्राने त्यांतील रोगजंतु दिसतात. शिवाय आतां सोमलाच्या नवीन औषधांनी रोग्याची सांसर्गिक स्थिति तावडतोब नाहीशी करतां येते. म्हणजे रोगाचा सांसर्गिक काल आतां पूर्वीच्या एक चतुर्थांश किंवा पंचमांश इतकाच राहिलेला आहे. त्यानंतर बिस्मथ्सारखीं आणखीहि औषधें या रोगावर सांपडलेलीं आहेत. शिवाय तपासणीमधेंहि पूर्वीपेक्षा सुधारणा झाली आहे व वेश्यांची आठवड्यांतून दोनदां, व कांही शहरांत याहीपेक्षा जास्त वेळां, तपासणी करण्याची व्यवस्था केलेली आहे. यासंबंधी ‘ नांसी ’ शहराच्या आरोग्यखात्याचे डॉक्टर पॅरिझो म्हणतात की पूर्वीच्या पद्धतीची हल्लीच्या पद्धतीशीं बिलकुल तुलना करतां येणार नाही.

या बाबतींत एकंदर तीन पक्ष दिसतात. एक पक्ष नियंत्रणास विरोध करणाऱ्या लोकांचा. ते म्हणतात नियंत्रण आणि सक्तीची तपासणी काढून टाकल्यास आणि फुकट उपचारांची व्यवस्था केल्यास वेश्या आपण होऊन खुषीने तपासून घेऊन उपचार करून घेतील. परंतु ब्रुसेल्स शहरांतील अनुभव याच्या बरोबर उलट आहे. दुसरा पक्ष नॉर्वे, डेन्मार्क, स्वीडन, वगैरे देशांतील पद्धतीचा पुरस्कार करणारा. या देशांत नियंत्रण काढून टाकलें आहे, परंतु रोग्यांची नोंद करून आरोग्यखात्याला कळवण्याची सक्ती डाक्तरांवर आहे. रोग्यांवर उप-

चारांची सक्ती आहे आणि जे ऐकणार नाहीत त्यांना जबरीने इस्पितळांत ठेवतात. अशा तऱ्हेचे रोगी फ्रान्समध्यें ४० लक्ष आहेत. इतक्या सर्वांची अशी व्यवस्था करणें जवळजवळ अशक्य आहे. तिसरा पक्ष म्हणजे नियंत्रण व सक्तीची तपासणी यांचा पुरस्कार करणारा. या पक्षाचें म्हणणें असें की अशा रोग्यांकरतां शक्य तितकीं जास्त चिकित्सालयें उघडावीं, फुकट उपचारांची व्यवस्था करावी, परंतु याशिवाय हल्लीच्या स्थितींत वेश्यांवर नियंत्रण आणि त्यांची सक्तीची तपासणी या दोहोंचाहि समाजाला आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोग आहे. आतां तपासणीचे उत्तम मार्ग व उपचार आणि याकरतां योग्य शिक्षण दिलेले डाक्तर आहेत आणि तपासणीचा उपयोग नाही या म्हणण्यांत आतां अर्थ नाही.

यानंतर हे लोक शारीरशास्त्राचा आधार घेऊं पाहतात. ते म्हणतात की आरोग्याकरतां समागमाची जरूरच असते असें नाही. तेव्हा ज्यांना लग्न करणें शक्य नाही, त्यांनाहि वेश्यांची जरूरीच असते असें नाही. त्यांनी समागम केलाच नाही म्हणजे झालें. हा युक्तिवाद पोरकट आणि अज्ञानमूलक आहे. मनुष्याला समागमाची अनिवार इच्छा असते आणि ती ज्यांना कायमची आवरून धरतां येईल अशा लोकांना कितीहि उच्च समजलें तरी सामान्य जनतेला तें शक्य नसतें आणि तशी इच्छाहि नसते. इच्छा नसतांना त्यांना कामवासना आवरून धरायला कोण आणि कसें भाग पाडणार? तेव्हा समागमाची आरोग्याला जरूरी नाही असें घटकाभर धरून चाललें तरी त्याचा उपयोग काय? हें केवळ पुस्तकी तत्वच राहणार. वेश्यावृत्ति नाहीशी करण्यास त्याचा उपयोग नाही. वेश्यावृत्ति हा विवाहसंस्थेचा पाया आहे. वेश्या अजीबात नाहीशा झाल्यास ही गरज कुलीन स्त्रियांस भागवावी लागणार, अर्थात् ती त्यांनी खुषीने न भागवल्यास बलात्कार वगैरे गुन्हे होऊं लागतील आणि त्यांना शिक्षा करूनही ते बंद होणार नाहीत.

इतक्या आडमार्गांनी जाण्यापेक्षा हे लोक वेश्यावृत्ति हा गुन्हाच समजून त्याला शिक्षा करण्याचा मार्ग कां पत्करीत नाहीत? याला ते उत्तर देतात की यासंबंधी कायदा करणें योग्य नाही, नैतिक मतप्रचारानेच वेश्यावृत्ति नाहीशी केली पाहिजे. अर्थात् वेश्यांनी स्वखुषीने धंदा करणें हा गुन्हा नाही आणि स्त्री-

पुरुषांच्या समानहक्कांच्या दृष्टीने वेश्यांसंबंधी कोणतेही वेगळे कायदे करतां नये, आणि म्हणून नियंत्रण ठेवतां नये असें त्यांचें म्हणणें आहे. समान हक्कांचें हें तत्व आम्हासही मान्य आहे. नियंत्रणांत देखील वेश्यावृत्ति हा गुन्हा नाही, परंतु यांत समान हक्कांचा प्रश्न येत नाही. अर्थात् वेश्यावृत्ति करणारे कांही पुरुष असल्यास त्यांनाही वेश्यांवरील नियंत्रण लावावें हें उघड आहे. हें नियंत्रण समाजाला धोका उत्पन्न करणाऱ्या एका धंद्याला लावलेलें आहे, आणि तें योग्यच आहे. त्यांत समान हक्कांचा संबंध नाही. स्त्रियांना रस्त्यांत गिऱ्हाईक गांठण्याबद्दल शिक्षा असेल तर तशीच शिक्षा पुरुषांनी रस्त्यांत स्त्रियांना फुसलावण्याचा प्रयत्न केल्यास त्यांनाही केली पाहिजे. अशा प्रकारचे जे जे कायदे पुरुषांना लावतां येण्यासारखे आहेत ते लावले पाहिजेत, किंवा रद्द केले पाहिजेत.

कायद्याच्या दृष्टीने ज्या कांही सुधारणा करतां येण्यासारख्या असतील, त्या अर्थातच केल्या पाहिजेत. पॅरिस येथील व्यवस्था या दृष्टीने योग्य नाही, परंतु फ्रान्समधे इतर ठिकाणची योग्य आहे. अर्थात् सक्तीने इस्पितळांत ठेवण्याचा हक्क नगरपालिकांना असत नाही आणि तरी रोगी वेश्यांना इस्पितळांत ठेवतात, हा दोष आहे.

वेश्यागृहांना फ्रान्समधें बंदी नाही. फक्त त्यांच्या चालकांनी अमुक वयाच्या आंतील मुलींना तेथे आणल्यास किंवा त्या वयाच्या पुढील स्त्रियांनाहि जबरीने किंवा फसवून आणल्यास त्यांना शिक्षा होते, आणि याकरतां पोलीसच्या अधिकाऱ्यांना वेश्यागृहांत पाहिजे तेव्हा शिरण्याची परवानगी असते. परंतु वेश्यागृहांविरुद्ध कायदा नसतांही म्युनिसिपालिटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला कोणतेंहि वेश्यागृह बंद करण्याचा अधिकार दिलेला आहे आणि हा अधिकार अर्थातच योग्य नाही. या अरेरावीने कदाचित् एखादे वेळीं लोकहित साधणें शक्य आहे, परंतु कायद्याच्या दृष्टीने ती चूक आहे. अर्थात् या प्रकारचे सर्व कायदे सुधारून घेतले पाहिजेत आणि त्यांत अरेरावी बिलकुल राहतां नये हें खरें, परंतु मुळीच कायदे असूं नयेत असें मात्र यावरून सिद्ध होत नाही.

तपासणी नको तर मग गुप्त रोगांपासून संरक्षण कसें करावें ? याचें उत्तर कायदेबंदीवाले लोक इतकेंच देतात की या रोगांची इतर रोगांप्रमाणेंच इस्पित-

ळांत व्यवस्था व्हावी. पण असल्या गप्पांनी काम होत नाही. या लोकांनी प्रत्यक्ष काय केलें आहे हें पाहूं गेलें तर असें दिसतें की खुद्द इंग्लंडमधें गुप्तरोगांवर उपचारांची योग्य सोय बिलकुल केलेली नाही. खाजगी इस्पितळांतही नाही आणि वैद्यकीय शिक्षणाकरतां कॉलेजांना जोडलेल्या सरकारी इस्पितळांतही नाही. इंग्लंडांत लोकमत असें आहे की स्वतःच्या दुष्कृत्यांचीं फळें ज्याचीं त्याने सोसावीं. लंडन येथील एका इस्पितळांत तर गुप्त रोग झालेल्या अविवाहित स्त्रियांस उपचार करण्याची बंदी आहे, परंतु अविवाहित पुरुषां-विषयी मात्र असा नियम नाही. गुप्त रोगांवर सक्तीने उपचार करूं नये असें स्पष्ट मत या लोकांच्या एका पुढारी बाईने दिलेलें आहे. तिचें म्हणणें असें की सक्तीच्या उपचारांचा उपयोग होत नाही, तेव्हा शिक्षण देऊन उपचार करून घेण्याची इच्छा लोकांत उत्पन्न केली पाहिजे, म्हणजे ते खुषीने उपचार करून घेतील. परंतु हाच युक्तिवाद कोणत्याही संसर्गजन्य रोगाला लावतां येईल, हें या बाईच्या लक्षांत आलें नाहीं. हल्ली अनेक सांसर्गिक रोगांबद्दल उपचा-रांची सक्ती आहे, ती तरी कां असावी ? लोक सुशिक्षित होईपर्यंत वाट पाहि-ल्याने भयंकर अनर्थ होईल, याकरतांच ही सक्ती असते आणि हीच सक्ती गुप्त रोगांसंबंधी करणें जरूर आहे, इतकें देखील या लोकांना समजत नाही.

या लोकांची तात्त्विक दृष्टि तर ही अशी आहे, परंतु प्रत्यक्ष पाहूं गेलें तर त्यांना अनुसरणाऱ्या बऱ्याच देशांत उपचारांची सक्ती केलेली आहे. या लोकांचें तत्वज्ञान जिकडेतिकडे पसरत आहे आणि फ्रान्समधेंही त्याला अनुसरून कायदा करण्याचें पुष्कळ लोकांच्या मनांत आहे, तेव्हा या तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष परिणाम काय होतो हें पाहणें जरूर आहे.

---

# ६.

# कायदेबंदीचे प्रत्यक्ष परिणाम

कायदेबंदीसंबंधी तात्विक विवेचन आतांपर्यंत केलें. परंतु तात्विक विवेचनाचा निष्कर्ष प्रत्यक्ष प्रयोगांतीं खरा ठरेल तरच तो खरा समजतां येईल, एरवी त्या विवेचनांत कोठेतरी चूक असली पाहिजे असेंच मानावें लागेल. तेव्हा कायदेबंदीचे प्रत्यक्ष प्रयोग जेथजेथे झाले आहेत तेथे काय परिणाम झाले हें आतां पाहूं.

आंतरराष्ट्रीय संघाने कायदेबंदीचीं तत्वेंच फक्त नमूद केलीं आहेत आणि तीं अंमलांत कशीं आणायचीं याचा तपशील ज्या त्या देशावर सोंपवला आहे. तेव्हा हा प्रयोग करणाऱ्या प्रत्येक देशांत कायदे जरी वेगळे असले, तरी आपणास त्यांत मुख्य मुद्दा इतकाच पहायचा आहे की या संघाचीं मुख्य तत्वें त्यांनी पाळलीं आहेत की नाही ? हे वेगवेगळे कायदे तपासून पाहतां असें दिसतें की वेश्यांची सक्तीची नोंद व तपासणी रद्द करणें, वेश्यागृहें बंद करणें, वगैरे बाबतींत तत्वें पाळलीं आहेत. पुरुषांना व स्त्रियांना सारखेच कायदे असावेत हेंही तत्व पाळलें आहे. परंतु या संघाने वैयक्तिक स्वातंत्र्याचेंहि एक तत्व प्रतिपादलें आहे, तें मात्र पाळलेलें नाही. कारण गुप्त रोगांसंबंधी कांहीतरी व्यवस्था करणें इतकें जरूरीचें भासलें की गुप्त रोगांवर सक्तीचे उपचार स्त्रियांवर आणि पुरुषांवरहि लादण्यांत आले. याशिवाय छेकोस्लोव्हाकिआमधें एखाद्या वेश्येवर कोणीं रोगसंसर्गाचा आरोप केल्यास तिला कायद्याने गिरफदार करतां येतें. याशिवाय वेश्यांकरतां पोलीसची विशेष शाखा अशा कित्येक देशांत ठेवलेली आहे आणि वेश्यांसंबंधी त्यांना विशेष अधिकारहि दिलेले आहेत. तेव्हा वेश्यांसंबंधी विशेष कायदे असूं नये म्हणणारांना हें कितपत शोभतें ? तसेंच वेश्यांना कांही देशांत भटक्यांचा कायदा लावतात, म्हणजे त्यांना घरदार असूनहि घरा-

दारांशिवाय भटकणाऱ्या लोकांप्रमाणेच त्यांना शिक्षा करतात. हा काय न्याय्य आहे ? कायदेबंदीचे प्रत्यक्ष परिणाम पाहणें असेल तर पुढील उदाहरणांवरून तें स्पष्ट दिसतील.

१. **इंग्लंडमधें काय झालें ?** आपण पूर्वीच पाहिलें आहे की तेथे वेश्यावृत्ति बिलकुल कमी झालेली नाही. फक्त तिचें स्वरूप बदललेलें आहे. सैन्यांत रोग्यांचें प्रमाण कमी आहे असें म्हणतात, पण ही थाप पचण्यासारखी नाही. ब्रिटिश सैन्यांतील रोगांचें प्रमाण इतर कोणत्याहि यूरोपीय देशांपेक्षां जास्त आहे, आणि विशेषतः वेश्यानियंत्रण करणाऱ्या फ्रान्सपेक्षा जास्त आहे. आणि ज्या देशांत वेश्यागृहें बंद झालीं तरी स्वतंत्र वेश्यांचा सुळसुळाट आहे, जेथे कायद्याने बंदी असली तरी रस्त्यांतहि वेश्या गिऱ्हाईक गांठतांना दिसतात, जेथे सक्तीचे उपचार तर राहोतच पण सार्वजनिक इस्पितळांत गुप्त रोगांनी पछाडलेल्यांना जागा नाही, आणि आरोग्यासंबंधी कोणत्याहि प्रकारची काळजी घेतलेली नाही, अशा देशांत रोगांचें प्रमाण कमी होणें कसें शक्य आहे ?

२. गेल्या युद्धांत जर्मनीकडून फ्रान्सने घेतलेल्या अलसास् प्रांतांत **कोलमार** नांवाचें एक लहानसें शहर आहे. त्याचें नांव कायदेबंदीवाले लोक नेहमी घेत असतात. तेथे काय झालें तें पाहूं. येथे १८८१ सालीं एका मॅजिस्ट्रेटच्या हुकुमाने सर्व वेश्यागृहें बंद केलीं आणि त्याच्या देखरेखीखाली तेथील वेश्यावृत्ति जवळजवळ अजीबात बंद झाली. यावरून कायदेबंदीवाले म्हणतात की हा आमचा विजय आहे. परंतु या बारीकशा शहरांत जें करतां आलें तें मोठ्या प्रमाणावर करणें शक्य आहे काय ? इतकें कोणालाहि समजेल की कोलमारसारख्या लहान शहरांत वेश्यांच्या हात धुवून मागें लागणारा एक मॅजिस्ट्रेट निघाला, तर त्या साहजिकच त्या शहरांतून निघून कांही अंतरावरच्या एखाद्या शहरांत जाऊन धंदा करूं लागतील. जेथे वेश्यांना त्रास होतो तेथून त्या निघून जातात यांत आश्चर्य नाही. म्हणून त्या वेश्यावृत्ति सोडून देतात असें नाही. यासंबंधी प्रशंसामय पुस्तक स्ट्रासबूर येथील प्रो. स्ट्रोल यांनी लिहिलें आहे. त्यांत त्यांनीहि कबूल केलें आहे की अशा लहानशा प्रयोगावरून सार्वत्रिक अनुमान काढतां येणार नाही, आणि शिवाय कोलमार येथेहि कांही विशिष्ट परिस्थिती-

मुळेच हा प्रयोग यशस्वी झाला. कोलमार हें त्या वेळीं जर्मनीच्या ताब्यांत असल्यामुळे तेथें सरकारी परवान्याशिवाय वेश्यावृत्ति करणें हाच गुन्हा होता. आणि त्याबद्दल दोन वर्षं सक्त मजुरीची शिक्षा देतां येत असे. यामुळे कोलमार येथे ही गोष्ट सहज करतां आली. परंतु जेथे वेश्यावृत्ति हा गुन्हा मानलेला नाही, तेथे स्वतंत्र वेश्यांना कोणी कांही करूं शकत नाही. हा प्रदेश गेल्या महायुद्धानंतर फ्रान्सच्या ताब्यांत आला. परंतु फ्रेंच सरकारने वेश्यागृहांसंबंधी कायदा कायम ठेवला. हल्ली तेथे जरी वेश्यागृहें नाहीत, तरी स्वतंत्र वेश्या आहेत आणि सक्तीची तपासणीहि आहे. तेव्हा या प्रयोगावरून कोणतेंहि अनुकूल अनुमान काढतां येणार नाही.

**३. स्ट्रासबूर येथील प्रयोग**—हें शहर वर सांगितलेल्या अलसास प्रांतांतच आहे आणि हें जर्मनीकडून फ्रान्सकडे आलें असल्यामुळे तेथे जर्मनीच्या बाजूचा एक गट आहे आणि तेथेहि जर्मनीसारखेच कायदे असावे अशाबद्दल या गटाची खटपट असते, आणि कोणत्याही बाजूने फ्रेंच सरकारची फजीति करण्याची त्यांची इच्छा असते. हा गट आणि कांही इतर गटांतील कायदेबंदीवाले, यांनी १९२५ सालीं या शहरांत बरीच गडबड उडवून दिली. या वर्षी तेथे कांही व्यायामाच्या खेळांच्या चढाओढी झाल्या, आणि त्या प्रसंगीं तेथील वेश्यागृहांत कांही अनन्वित प्रकार घडले अशी ओरड करून या लोकांनी तेथील वेश्यानियंत्रण अजीबात बंद करावें अशी मागणी केली. यांतील बऱ्याच लोकांची प्रवृत्ति फ्रान्सपासून वेगळें होण्याची असल्यामुळे त्यांच्या मागणीकडे अगदींच लक्ष न देणें फ्रेंच सरकारला बरें वाटलें नाही आणि या मागणीचा विचार करण्याकरता त्यांनी एक कमिशन नेमलें. यांत कांही डाक्तर, वकील, प्रोफेसर व कांही सरकारी अधिकारी मिळून एकंदर ९ सभासद होते. या कमिशनने विचारांतीं वेश्यागृहें चालू ठेवावीं असें मत दिलें. तरी देखील हें मत हिशेबांत न धरतां केवळ चळवळ्या लोकांना कांही दिलें असें दाखवण्याकरतां आणि वेश्यागृहांत कांही विलक्षण प्रकार घडल्याचा बिलकुल पुरावा नसतां आणि त्याचे परिणाम काय होतील याबद्दल शंका दाखवूनहि, तेथील मेयरने वेश्यागृहें बंद करण्याचा हुकूम सोडला, आणि बदफैली फ्रान्स शेवटीं जर्मन नीतीच्या

मार्गावर आला म्हणून कित्येकांनी उघड आनंद मानला. परंतु वर सांगितलेल्या कमिशनला जी भीति वाटत होती तसेंच घडून आलें. प्रच्छन्न वेश्यागृहांत नेहमी फायदा जास्त असतो. हें माहीत असल्यामुळें आणि आतां कायदेशीर वेश्यागृहांशी चढाओढ करण्याचें कारण नसल्यामुळे अनेक धूर्तांनी त्याचा फायदा घेतला. १९३३ च्या जानेवारींत पॅरिस येथील 'सूरीर' नामक साप्ताहिकाने स्ट्रासबूर येथे कायकाय गमती चालतात आणि त्या कशा पहाव्या याचें दोन अंकांत रसभरित वर्णन दिलें होतें. तेथील वेश्या नाहीशा तर झाल्या नाहीतच, पण चोरटी वेश्यावृत्ति अतिशय वाढली आणि त्यांवर कोणतेंहि नियंत्रण नसल्यामुळे रोगांचें प्रमाणहि वाढलें. सैन्यांतहि अर्थात् रोगांचें प्रमाण वाढलें आणि सैन्याच्या डाक्तरांच्या तें लक्षांत आल्याबरोबर या प्रच्छन्न वेश्यागृहांत जाण्याची लष्करी शिपायांना बंदी करण्यांत आली. ही बंदी केल्याबरोबर कामवासना नाहीशी होत नाही; आणि याचा परिणाम गतीं स्त्रियांस भोगावा लागून विनयभंगाचे खटले वाढू लागले. हें पाहून, आणि निरोगी मनुष्याची कामवासना प्रबल असते, तिला वाव नसल्यामुळे हे प्रकार होतात हें ओळखून, सैन्यावरील अधिकाऱ्यांनी शिपायांच्या अन्नांत 'ब्रोमाइड' घालण्यास सुरवात केली. विशेषतः सैन्याचे बाबतींत हा अत्यंत मूर्खपणा होता, कारण ब्रोमाइडने एकंदर प्रकृति खालावते आणि लष्करी कामाला मनुष्य नालायक होतो. याबद्दल शिपायांनी अनेक तक्रारी केल्या आणि शेवटीं वैद्यकीय आणि इतर अधिकाऱ्यांची खात्री झाली की नियंत्रणपद्धति पुनः सुरू केल्याशिवाय आतां धडगत नाही.

याचा परिणाम असा झाला की वेश्यागृहें बंद करण्याचा हुकूम परत न घेतां पूर्वीची व्यवस्था पुनः अंमलांत आली. म्हणजे उघडपणें सरकारी नियंत्रण पुनः सुरू न करतां वेश्यागृहांच्या चालकांना खाजगी रीतीने बजावून नियंत्रणाचे सर्व नियम त्यांना पाळायला भाग पाडलें. यामुळे उघड फजीति कोणाचीच झाली नाही, परंतु नियंत्रणाचें तत्व मात्र पुनः अंमलांत आलें.

**४. नांसी येथील प्रयोग.** स्ट्रासबूरनंतर सहा वर्षांनी **नांसी** येथेहि अशाच प्रकारचा प्रयोग करण्यांत आला. नांसी येथे वास्तविक जर्मन लोकांचा

कांही संबंध नव्हता, परंतु कायदेबंदीवाला एक पक्ष फ्रान्समधेंहि उपस्थित झालेला आहे, आणि मेयरच्या निवडणुकीला उभा राहिलेल्या एका गृहस्थाला या पक्षाची मदत मागण्याची बुद्धि झाली. तो यशस्वी झाल्यास त्याने वेश्यागृहें बंद करावीं, या अटीवर या पक्षाने मदत केली आणि तो यशस्वी झाल्यावर त्याला तसा हुकूम काढावा लागला. पॅरिसशिवाय इतर शहरांत मेयरला हा अधिकार असतो, त्यामुळें अडचण कोणतीच नव्हती. या शहरांत ११५००० माणसांची वस्ती होती आणि तेथे दहा नियंत्रित वेशागृहें होतीं. या सर्व गृहांत मिळून सुमारें साठ वेश्या असत. याशिवाय स्वतंत्र वेश्याहि होत्या, परंतु फारच थोड्या. वेश्यागृहें बंद केल्यावर सुमारें तीनशें स्त्रियांनी स्वतंत्र वेश्यांच्या तिकिटांची मागणी केली, आणि तीं दिल्यावरहि विनयभंगाचे खटले वाढले ते वाढलेच. आणि तरी प्रच्छन्न वेश्याहि पुष्कळ होत्या. याचें कारण असें की स्वतंत्र वेश्यांवर निर्बंध पुष्कळ असतात आणि प्रच्छन्न वेश्यांना परवानगीच नसते. अशा स्थितींत ज्यांना जरूर असेल त्यांना वेश्या सांपडणें कठिण होतें आणि त्याचा परिणाम म्हणजे विनयभंगाचे खटले. या शहरांतील पोलीसची व्यवस्था कडक होती, ती नसती तर वेश्या सहज रस्त्यांत सांपडल्या असत्या, परंतु कडक व्यवस्थेचा परिणाम अनिष्ट झाला. दोन वर्षें अशी स्थिति राहिल्यावर त्यांत धोका आहे असें ठरलें आणि अडीच वर्षांनी म्हणजे १९३४ च्या जानेवारींत पूर्वीची व्यवस्था पुनः अंमलांत आणतांना अनेक डाक्तरांकडून व अधिकाऱ्यांकडून आलेल्या तक्रारींचा उल्लेख केला होता.

५. **ग्रनॉब्ल येथील प्रयोग.** या शहरांत १ आगस्ट १९३० रोजीं आगाऊ इषारा देऊन १ जानेवारी १९३१ सालीं वेश्यागृहें बंद केलीं. हें फ्रेंच शहर नांसीपेक्षा लहान आहे आणि कायदेबंदीवाल्या लोकांनी येथील प्रयोगावर बरेंच पांडित्य केलें आहे, कारण येथील हुकूम बरोबर त्यांच्या तत्वांना धरून काढला होता. म्हणजे वेश्यागृहें बंद करून वेश्यांवरील नियंत्रण पूर्णपणें काढून टाकलें. या हुकुमासंबंधी प्रथम इषारा दिल्यापासूनच या शहरांत प्रच्छन्न वेश्यावृत्तीची जय्यत तयारी दिसूं लागली, आणि सुलभ नोकरिणी असलेल्या उपाहारगृहांचा आणि पानगृहांचा सुळसुळाट झाला. यासंबंधी तेथील पोली-

सच्या डाक्तराने एका वैद्यकीय मासिकांत १५ मार्च १९३१ रोजीं एक लेख लिहिला होता. अर्थात् अशा गृहांच्या मालकांच्या संघाने या लेखाविरुद्ध तक्रार केली आणि अशा मासिकांवर फिर्याद करण्यास मेयरला विनंती केली, कारण अशाने शहराची बदनामी होते. वास्तविक जी गोष्ट कोणाही प्रवाशाला सहज दिसण्यासारखी होती ती कोणीं प्रसिद्ध करूं नये हें कसें शक्य आहे?

ग्रनॉब्ल येथे रोग्यांना फुकट उपचार करण्याची व्यवस्था केली होती खरी पण सार्वत्रिक अनुभव असा आहे की रोगी तेथे जात नाहीत, आणि यावरून कायदेबंदीवाले लोक अनुमान काढतात की रोगी नाहीतच, आणि वेश्याबंदी केल्यावरोबर रोगही नाहीसे झाले. याने त्यांच्या मतप्रचारला पुष्टि येते, पण ही खरी स्थिति मात्र नव्हे.

याच सुमाराला तेथील सोंवळ्या लोकांनी दुसऱ्या एका बाबतींत आपली पुरी फजीति करून घेतली. एका नग्नसंघांतील लोकांनी नग्न स्थितींत केलेले व्यायाम व व्यायामाचे खेळ दाखवणारा एक चित्रपट तेथील एका सिनेमाने दाखवला. हा चित्रपट फ्रान्समधें सर्वत्र सरकारी परवानगीने दाखवलेला होता, तरीपण ग्रनॉब्ल येथील सोंवळ्या लोकांच्या तक्रारीवरून तेथील मेयरने तो बंद करण्याचा हुकूम दिला. तेव्हा सिनेमाच्या मालकाने तशाच जातीचा एक जर्मन चित्रपट दाखवण्यास सुरवात केली. तेव्हा मालकावर फिर्याद झाली, परंतु कोर्टाने मालकातर्फे निकाल दिला आणि मेयरला असा हुकूम काढतां येत नाही असें सांगितलें.

या लोकांची वेश्याबंदीचे बाबतींतहि शेवटीं फजीतिच झाली. रोगप्रसारासंबंधी इतक्या तक्रारी प्रसिद्ध झाल्या की तेथील मुख्य मॅजिस्ट्रेटाने मेयरचा हुकूम रद्द करून पुनः नियंत्रणपद्धति सुरू केली. मात्र वेश्यागृहें सुरू करण्याऐवजी स्वतंत्र वेश्यांपुरतीच परवानगी दिली, आणि त्या शहराच्या बाहेर उपनगरांत वेश्यागृहेंहि सुरू झालीं.

६. **ब्रुसेल्स येथील प्रयोग.** येथे १ जून १९२४ पासून वेश्यांची नोंदणी व तपासणी बंद केली, व गुप्त रोगांविषयी अशी व्यवस्था केली की ज्यांनी

अशा रोगांवर अर्धवट उपाय केले असतील त्यांना शोधून काढून उपचार पूर्ण करण्याविषयी त्यांचें मन वळवणें, आणि ज्यांना धंद्यामुळे या रोगांचा संसर्ग होण्याचा किंवा ज्यांच्यापासून इतरांना संसर्ग होण्याचा संभव विशेष, अशा व्यक्तींना शोधून काढणें, हें काम पोलीसाकडे दिलें. अर्थात् या वर्गांत विशेषतः वेश्याच येत असल्यामुळे त्यांची यादी करणें भागच होतें. पॅरिस येथील प्रख्यात गुप्तरोगतज्ञ डॉ. गूजरो यांनीं जुलै १९२५ मधें या प्रयोगासंबंधी पुढील मजकूर लिहिला आहेः—" बेल्जिअममधील तज्ञ डाक्तर या प्रयोगाच्या विरुद्ध होते हें मीं पूर्वीच कळवलें होतें, व त्याचा परिणामहि ते भीत होते तसाच झाला. लोक खुषीने उपचार करून घेतील ही कल्पना इतकी खोटी ठरली की हा प्रयोग बंद करून जुनी व्यवस्था पुनः अंमलांत आणणें भाग पडलें. कायदेबंदीवाले लोक सांगत असतात की कायदेबंदीचे परिणाम चांगले झालेच पाहिजेत. पण ब्रुसेल्स येथील अधिकाऱ्यांची सहा महिन्यांतच पुरी खात्री झाली. " या लेखाचें विशेष महत्व असें की हा प्रयोग जेव्हा सुरू केला तेव्हा याच डॉ. गूजरोनी ब्रुसेल्स येथील अधिकाऱ्यांचें अभिनंदन केलें होतें. म्हणजे ते याच्या विरुद्ध तर नव्हतेच, आणि तरी देखील त्यांनी वरील लेख लिहिला आहे. यासंबंधी तेथीलच एका अधिकाऱ्याने पुढील मत दिलें आहे. "नैतिक शिक्षण, मतप्रचार वगैरेचा निःसंशय उपयोग आहे. परंतु हल्लीच्या स्थितींत तरी वेश्यांना पूर्ण स्वातंत्र्य देणें शक्य नाही. अमुक वेश्येला रोग आहे आणि तिच्यापासून लोकांना संसर्ग होण्याच संभव आहे आणि आधुनिक उपायांनी तिला लवकरच बरी करतां येईल, हें माहीत असतांना केवळ स्वातंत्र्याच्या तत्वाला मान देऊन आम्हीं म्हणावें की रोगांचा फैलाव कितीहि होवो, कायदेबंदीच्या उच्च तत्वाप्रमाणे आपण चाललें पाहिजे, हें समंजस आहे काय ? हें समंजस तर नाहीच, पण अक्षम्य आहे." तेथील एका डाक्तराने लिहिलें आहे की कायदेबंदी केल्याबरोबर तेथील प्रमुख रस्त्यांत जिकडेतिकडे वेश्याच वेश्या दिसूं लागल्या.

वरील हकीकतींवरून हें सहज दिसेल की तात्विक दृष्ट्या कायदेबंदी कितीहि उच्च मानली तरी प्रत्यक्ष प्रयोगांत मात्र तिचे परिणाम भयंकर झालेले आहेत. स्वातंत्र्याचें तत्व कोणीही मान्य करील. कायद्याने कोणालाहि

अन्याय होऊं नये हेंहि खरें, परंतु सर्वांत महत्त्वाचा प्रश्न समाजहिताचा आहे आणि तो केवळ तत्वांनी साध्य होत नाही. इतर पुष्कळ धंद्यांच्या बाबतींत नियंत्रण घालणें भाग पडतें, मग वेश्यांवरच नियंत्रण कां घालूं नये ?

अर्थात् कोणावरहि निष्कारण नियंत्रण घालूं नये हेंही खरें, आणि रोग-प्रतिबंधक उपायांची माहिती सर्वांस होऊन प्रतिबंध ही मामुली गोष्ट झाल्यास नियंत्रणाचें कारण राहणार नाही. परंतु तशी स्थिति येण्यास लोकशिक्षणाची जरूर आहे आणि कित्येक ठिकाणीं तर-उदाहरणार्थ इंग्लंडमधें-रोगप्रतिबंधाचीं साधनें विकण्याची देखील मनाई आहे. तेव्हा अडाणी माणसांचेंच नव्हे तर अडाणी सरकारांचेंहि शिक्षण अजून व्हायचें आहे. तेव्हा सध्यांच्या स्थितींत वेश्यांवर नियंत्रण घातल्याशिवाय धडगत नाही. तें कशा प्रकारचें असावें हें पुढील प्रकरणांत पाहूं.

# ७

# नियंत्रण कसें असावें ?

सद्यःस्थितींत समाजहिताकरतां वेश्यांवर नियंत्रण ठेवणें भाग आहे असें निश्चित झाल्यावर आतां तें नियंत्रण कशा स्वरूपाचें असावें हें पाहूं. आतांपर्यंत ठिकठिकाणीं झालेल्या नियंत्रणाच्या प्रयत्नांचा इतिहास वर दिलाच आहे. त्यांतील दोष काढून टाकून आपणांस नवीन पद्धत बसवतां येईल.

वेश्यांसंबंधी विशेष नियम करण्याचे मुख्यतः दोन उद्देश मानलेले आहेत. एक जनतेच्या आरोग्याचें संरक्षण आणि दुसरा शहराची शिस्त. हे दोन्ही उद्देश आतांपर्यंत चांगलेसे साध्य झालेले नाहीत. पहिला साध्य न होण्याचें कारण असें की अधिकाऱ्यांच्याच मनावर आरोग्याचें महत्व नीट बिंबलेलें नाही, यामुळे मूळ उद्देश बाजूलाच राहून ते अरेरावीने वेश्यांवर पोलिशी अधिकार चालवण्यांतच धन्यता मानतात. याकरतां आरोग्याच्या दृष्टीने प्रथम काय व्यवस्था केली पाहिजे हें पाहूं. वेश्येला कांही सांसर्गिक रोग असेल तरच तिजपासून लोकांच्या आरोग्याला धोका असतो, आणि वेश्यांपासून ज्यांचा संसर्ग होतो असे रोग म्हणजे मुख्यतः गर्मी, परमा व मृदुव्रण हे होत. हे रोग वेश्येला आहेत की काय हें डाक्तरी तपासणीशिवाय तिला स्वतःलाहि पुष्कळ वेळां कळत नाही, तेव्हा तें तिच्या गिऱ्हाइकांना कळणें अधिकच कठिण आहे. परंतु हें कळणें आरोग्याच्या दृष्टीने अवश्य आहे, कारण तें कळल्यासच या रोगांचा संसर्ग होऊं नये अशी व्यवस्था करतां येईल. याकरतां वेश्यांना वेळोवेळीं डाक्तरांनी तपासून रोग आढळल्यास त्यांवर उपचार केले पाहिजेत, आणि रोग बरा होईपर्यंत त्यांना धंदा करूं देतां नये. यांत वेश्यांवर सक्ती होते, परंतु समाजहिताकरतां ती केल्याशिवाय गत्यंतर नाही हें मागें सिद्ध झालें आहे. तसें न करणें म्हणजे सध्यांच्या समाजाचेंच नव्हे तर भावी पिढ्यांचेंहि आरोग्य धोक्यांत टाकणें होय.

या दृष्टीने वेश्यांवर नियंत्रण म्हणजे आठवड्यांतून दोनदां त्यांची सक्तीने तपासणी केली पाहिजे, आणि हें सुकर व्हावें म्हणून त्यांची सक्तीने नोंद केली पाहिजे. तपासणीचे वेळीं रोग आढळल्यास डाक्तराने तिला इषारा दिला पाहिजे, आणि तज्ञ डाक्तरांच्या यादींतून तिने वाटल्यास आपल्या पसंतीच्या डाक्तराकडून उपचार करून घ्यावे अशी सवलत दिली पाहिजे. ती चुकारपणा करील तर मात्र तिला सक्तीने इस्पितळांत ठेवली पाहिजे, व रोग बरा होईपर्यंत तिला तेथून सोडतां नये. या इस्पितळांत तिची रोग्यासारखी शुश्रूषा झाली पाहिजे, व तिला कोणत्याहि रीतीने त्रास होतां नये. पॅरिस येथे ज्या इस्पितळांत रोगी वेश्यांना ठेवतात त्याला इस्पितळापेक्षा तुरुंग म्हटलेलें अधिक शोभेल. तेथे त्यांना गुन्हेगारांप्रमाणेच वागवतात, आणि धार्मिक जुलूम करून प्रार्थना देखील करायला लावतात ! यामुळे रोग आहे अशी वेश्येला शंका आल्यास ती तपासणी चुकवते, कारण सांपडल्यास या तुरुंगांत जाण्याची भीति असते. तशी भीति नसल्यास वेश्या तपासणीला आनंदाने कबूल होतात, तेव्हा अशा तपासणीला जुलूम म्हणतां येणार नाही. मुंबईत तपासणीची सक्ती नाही इतकेंच नव्हे तर तपासणीची व्यवस्थाच नाही, तरीदेखील कित्येक वेश्या स्वतःच्या खर्चाने डाक्तरांकडून तपासून घेऊन आरोग्याचा दाखला घेऊन ठेवतात, तेव्हा वेश्या तपासणी चुकवतात हा आरोप खोटा आहे, किंवा खरा असला तर ती अधिकाऱ्यांची चूक आहे. उपचार करून घेण्यांतहि त्यांचें नुकसान नसतें. धंद्याच्या दृष्टीनेहि त्यांत फायदाच असतो. हें न कळण्या इतक्या अर्धवट ज्या वेश्या असतील त्यांवरच सक्तीने उपचार करण्याचा प्रसंग येईल, परंतु तो मात्र अपरिहार्य आहे.

वरील नियम केल्याने नियंत्रणाचा मुख्य उद्देश साध्य होईल. परंतु हें नियंत्रण देखील पुढेमागें काढून टाकतां यावें, म्हणून लोकांना रोगप्रतिबंधाची माहिती करून देण्याकरतां सरकारी आरोग्यखात्याने अशा माहितीचें एक पत्रक काढून तें प्रत्येक वेश्येच्या शय्यागृहांत प्रमुख स्थानीं भिंतीवर लावलें पाहिजे अशीहि सक्ती करणें जरूर आहे. प्रतिबंधाचे मार्ग पुरुषांनाच विशेष सोयीचे असतात आणि अत्यंत सोपे असतात ('गुप्त रोगांपासून बचाव' हें पुस्तक पहा). ही माहिती वेश्यांच्या गिऱ्हाइकांना जरूर मिळाली पाहिजे, आणि ही माहिती

सार्वत्रिक झाल्यावर वेश्यांवरील नियंत्रणाची जरूर राहणार नाही, या दृष्टीने ही सक्ती करणें हाच उत्तम मार्ग आहे. रोगप्रतिबंधाची माहिती देणें म्हणजे दुर्वर्तनाला उत्तेजन देणें आहे, असें इंग्लंडांतील सोंवळ्या लोकांचें म्हणणें आहे, व तेथे प्रतिबंधाचे उपाय विकण्यास परवानगी नाही. दुर्वर्तनाबद्दल शिक्षा करण्याकरतांच हे रोग ईश्वराने उत्पन्न केलेले आहेत असेंहि तेथील धर्ममार्तंड सांगतात, परंतु हें खरें असेल तर रोगांवर उपचारहि करतां नये, कारण तेंहि ईश्वराच्या मर्जीविरुद्ध जाणें होईल आणि त्यानेहि दुर्वर्तनाला उत्तेजन मिळेल. परंतु अशा मूर्खांच्या नादीं समंजस माणसांनी लागतां नये, आणि समाजहिताचेंच धोरण राखलें पाहिजे.

दुसरी बाब म्हणजे शहरांतील शिस्त किंवा सुव्यवस्था. याकरतां वेश्यांच्या हालचालींवर कडक नियंत्रण घातलें पाहिजे असें कांही लोकांचें म्हणणें आहे, आणि राष्ट्रसंघाने या मताला दुजोरा दिला आहे. राष्ट्रसंघाची अवस्था रिकाम्या न्हाव्यासारखी झालेली आहे आणि राजकीय बाबतींत कांही करतां येत नाही तर निदान आपण आरोग्याकरतां तरी कांही करीत आहों असें भासवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. राष्ट्रसंघांतहि इंग्रजांचें वजन फार, यामुळे तेथेहि सोंवळेपणा माजला आहे यांत नवल नाही, आणि इंग्लंडांतील कायदेबंदीची मोहीम राष्ट्रसंघालाहि बाधली आहे. यामुळे वेश्यांचा कसा अनन्वित छळ बहुतेक देशांत होत आहे हें वर पाहिलेंच आहे. वस्तुतः वेश्यांना माणसांप्रमाणे वागवलें तर त्याहि माणुसकीने आणि सभ्यतेने वागतात, असा कांही ठिकाणचा अनुभव वर दिलाच आहे. तेव्हा या बाबतींत वेश्यांकरतां कांही विशेष नियम करण्याचें कारण दिसत नाही. गैरशिस्त वर्तनाविरुद्ध नियम सर्वत्र असतातच, आणि ते इतरांप्रमाणेच वेश्यांनाहि लागू होतील, परंतु इतरांप्रमाणेच त्यांना पाहिजे तेथे राहण्याची आणि फिरण्याची परवानगी देणें जरूर आहे. याऐवजी कायदेबंदीच्या नांवाखाली वेश्यांच्या स्वातंत्र्यावर आज मोठीच धाड आलेली आहे. त्यांनी अमुक भागांतच राहिलें पाहिजे, अमुक वेळेशिवाय रस्त्यांत कोठेहि दिसतां नये, वगैरे अनेक प्रकारचे नियम त्यांना लावलेले आहेत, आणि तेहि वेश्यांवर नियंत्रण नको म्हणणाऱ्या लोकांनी ! हा निर्ल-

जपणाचा कळस आहे. कायदेबंदीच्या पुरस्कर्त्यांना तपासणी किंवा नोंद म्हणजे मात्र जुलूम वाटतो, परंतु भलभलते कायदे ओढून ताणून वेश्यांना लावून त्यांचा छळ करण्यास मात्र त्यांना लाज वाटत नाही. यावरून त्यांचा पुरस्कार न्याय-बुद्धीने केलेला नसून तें केवळ नीतिबाजांचें एक ढोंग आहे इतकेंच सिद्ध होतें. या लोकांचा नैतिक दर्जा यावरूनच दिसतो. त्यांचे हातांत आज सत्ता आहे आणि ते याचा अवास्तव फायदा घेत आहेत इतकेंच. पण नीतिबाजांकडून न्यायबुद्धीची अपेक्षाच करणें कदाचित् चुकीचें ठरेल !

आज वेश्यांची अशी स्थिति झाली आहे की सभ्य समाजांत त्यांना कोणी विचारीत नाही, त्यांचा फायदा घेणारे पुरुष देखील त्यांना हलकट समजतात, मग त्यांना प्रतिस्पर्धी समजणाऱ्या गर्ती स्त्रियांनी त्यांचेविरुद्ध ओरड केल्यास नवल काय ? पोलिसाची त्यांना नेहमीच भीति असते, आणि पोलिसाचा जुलूम त्यांना मुकाट्याने सहन करावा लागतो. याचा परिणाम असा होतो की सभ्य समाजांत कोणीच वाली नसल्यामुळे त्यांना हलकट मवाल्यांचाच आश्रय घ्यावा लागतो, आणि अशा संगतीने त्यांच्यांतहि थोडासा हलकटपणा कसा येणार नाही ? याऐवजी त्यांना इतर नागरिकांप्रमाणेच वागवलें आणि इतरांप्रमाणेच त्यांनाहि कायद्याचा पाठिंबा मिळाला, तर त्याही आपली नागरिक या नात्याने जबाबदारी ओळखतील. परंतु जेथे मवाल्यांशिवाय त्यांना कोणी वालीच नाही, तेथे त्यांनी तरी काय करावें ?

वेश्यावृत्ति हा कोठेही गुन्हा मानलेला नाही. तरीदेखील बहुतेक देशांत त्यांना गुन्हेगारांप्रमाणेच लपून रहावें लागतें. तेव्हा इतर गुन्हेगारांशीं त्यांना संगनमत करावेंच लागतें. गुन्हेगार पकडण्याच्या दृष्टीने त्या पोलिसाच्या उपयोगीहि पडतात, कारण गुन्हेगारांचा नक्की तपास तेथेच लागायचा. वेश्यांना सभ्य समजल्यास कदाचित् त्यांचा हा उपयोग होणार नाही. परंतु एवढ्या-करतां त्यांना माणुसकी सोडायला लावावी असें कोणीहि म्हणणार नाही. गुन्हे-गारांच्या संगतीने त्याहि गुन्ह्यांत मदत करतात, म्हणजे अशा रीतीने गुन्हे-गारांची संख्या मात्र वाढते. यांत समाजाचा कोणत्याहि प्रकारचा फायदा

नाही, त्यांना माणुसकीने वागवल्यास त्यापासून अनेक फायदे होणार आहेत. त्यांचा विचार पुढे करूं.

येथे आणखीहि एक मुद्दा सांगणें भाग आहे. अलीकडे सर्व देशांत वेश्यांना एकएकटें रहायला लावण्याचा प्रघात आहे आणि याचें कारण असें सांगतात की तिच्यावर देखरेख करणारें कोणी असल्यास तिची सर्व प्राप्ति तिला न मिळतां इतरांच्या ताब्यांत जाते. हा उद्देश साध्य होत नाहीच, कारण ती एकटी राहिल्यामुळे दिसायला स्वतंत्र असली तरी वस्तुतः असतेच असें नाही. तेव्हा वेश्यांना माणुसकीने वागवायचें म्हणजे त्यांना एकएकटें रहायला न लावतां समुदायाने राहण्यास परवानगी देणें जरूर आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणि आहे आणि तुरुंगांतील कैद्याला देखील एकटा ठेवणें ही भयंकर मोठी शिक्षा समजतात. अशी शिक्षा वेश्यांना करण्याचें कारण काय ? त्या समुदायाने राहिल्यास एकमेकींना आधार देऊं शकतात आणि त्यांची खाण्यापिण्याचीहि व्यवस्था अधिक चांगली होऊं शकते. परंतु वेश्यांना गुन्हेगार समजण्याचीच पद्धत जिकडे तिकडे चालू आहे आणि वेश्यांचे कैवारी म्हणवणारे ढोंगी लोक अशा कायद्यांना पाठिंबा देतात. हे लोक स्वतःचा बडेजाव वाढवण्याकडे वेश्यांचा उपयोग करतात आणि त्यांना वेश्यांबद्दल खरी सहानुभूति मुळीच नसते हें कोणालाहि उघड दिसतें. मात्र हें त्यांना सांगण्याची कोणाची छाती होत नाही.

---

# ८

# वेश्यावृत्तीचा नैतिक विचार

वेश्यावृत्तीचा नैतिक विचार करण्यापूर्वी अर्थात् प्रथमतः नीति म्हणजे काय याचाच विचार करणें भाग आहे. आणि याचा विचार करतांना प्रथम एक महत्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे, ती ही की नीति म्हणजे धर्म नव्हे. बहुतेक धर्मांत ऐहिक सुख तुच्छ मानलेलें असतें, आणि मरणोत्तर सुख व्हावें असा धर्माचा उद्देश असतो. जगांतील आयुष्य ही मनुष्याची शाश्वत अवस्था नव्हे, थोडा काल टिकणारी आहे, तेव्हा चिरकाल टिकणारें सुख मिळवण्याकरतां या आयुष्यांत दुःख झालें तरी चिंता नाही, किंबहुना या जगांत दुःख भोगणें हाच शाश्वत सुख मिळवण्याचा मार्ग, अशी धर्माची भूमिका असते. धर्म हा मुळांत निसर्गाची ठेवण न कळल्यामुळें आणि नैसर्गिक घटनांची भीति वाटल्यामुळें उत्पन्न झालेला आहे. या घटना ईश्वर नांवाच्या एका अदृश्य प्राण्याच्या करामतीमुळे होतात आणि त्याला आपण थोडें बहुत सुख अर्पण केल्यास तो प्रसन्न होऊन आपल्याला फारसा त्रास देणार नाही, या भोळसट कल्पनेंतून धर्म उत्पन्न झालेला आहे. त्याचा मूळचा हेतु ऐहिक सुखाचाच होता, कारण त्या वेळीं स्वर्गाची आणि नरकाची कल्पना नव्हती. या कल्पना पुढे उत्पन्न झाल्या, आणि थोडें दुःख सोसल्यानें पुष्कळ सुख होतें ही कल्पना अगोदरच रूढ झालेली असल्यामुळे सर्व आयुष्यभर दुःख सोसलें तर मेल्यावर सुख मिळेल असें मानणें ओघानेच आले. मूळपासून हा सर्व कल्पनेचाच खेळ असल्यामुळे त्याला कोणत्याहि पुराव्याची जरूर नव्हती. परंतु पुरावा असेल तरच खरें मानणारे कांही लोक पूर्वीपासूनच होत आले आहेत, उदाहरणार्थ अनेक नास्तिक पुरातन काळीं झालेले आहेत. त्यांनी धर्माविरुद्ध काढलेल्या शंकांतूनच शास्त्रीय ज्ञानाची उत्पत्ति झालेली आहे, आणि त्याला प्रत्यक्ष पुराव्याचा आधार असल्यामुळे त्यापुढे केवळ डोक्यांतून काढलेल्या धार्मिक कल्पनांची

एकसारखी पीछेहाट होत आली आहे. यामुळे ज्याला म्हणून थोडीशी बुद्धि आणि धैर्य आहे, तो मरणोत्तर काय होईल या धार्मिक भीतीला मुळीच भीक घालीत नाही, आणि ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, वगैरे सगळ्या गोष्टी केवळ काल्पनिक असल्यामुळे तो त्या सर्व गुंडाळून ठेवून ऐहिक सुखालाच महत्व देतो. येथेहि आपण असाच विचार केला पाहिजे.

धर्म आणि नीति यांचा बिलकुल संबंध नाही, हें थोड्या विचारांतीं सहज दिसून येतें. धर्माचा उद्देश केवळ स्वतःला सुख मिळवण्याचा असतो, मग तें सुख म्हणजे स्वर्गसुख असो, की मोक्ष असो. त्यांत इतरांचा विचार बिलकुल केलेला नसतो. देवांना खुष करण्याकरतां यज्ञ करून त्यांत इतर प्राण्यांचेच नव्हे तर मनुष्यांचेहि बळी देण्याची चाल होती. देवांना स्वतःचीं मुलें अर्पण केल्याच्या किंवा अतिथीला खुष करण्याकरतां स्वतःचें मूल त्याला शिजवून घातल्याच्या गोष्टी पुराणांतरीं सांपडतात. यांतला उद्देश अर्थातच स्वतःला पुण्य लागावें किंवा पाप लागूं नये, इतकाच असतो. इतरांचें पाहिजे तें झालें तरी चालेल. नीति याचा अर्थ याच्या बरोबर उलट आहे. स्वतःचें थोडेंबहुत नुकसान झालें तरी हरकत नाही, पण दुसऱ्याचें बरें करावें, या प्रवृत्तीला नीति म्हणतात. 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनं' ही नीतीची खरी कल्पना. परंतु पापपुण्याची ही कल्पना आतां जरी धार्मिक लोकांनी मान्य केली तरी ती मूळची धार्मिक कल्पना नव्हे. या कल्पनेचा धर्माशीं कांही संबंध नाही. मनुष्य हा सामाजिक प्राणि आहे, समाज करून राहिल्याने एकमेकांना मदत करतां येते हाच समाजाचा उपयोग, आणि आपण दुसऱ्याच्या उपयोगीं पडलें तर प्रसंगीं लोकहि आपल्या उपयोगीं पडतील, यांतून नीतीची कल्पना निघालेली आहे. सर्वच चांगल्या गोष्टी आपल्या म्हणण्याच्या धार्मिक लोकांच्या संवयीमुळे हीहि कल्पना आतां त्यांनी धर्मांत घुसडली आहे. परंतु मोक्ष किंवा स्वर्ग मिळवण्याकरतां याचा बिलकुल उपयोग नाही हें उघड आहे, कारण एरवीं अरण्यांत जाऊन तपश्चर्या करण्याची मुळीच जरूर नव्हती. वास्तविक दुसऱ्यावर उपकार करणें ही कल्पनाच धर्माशीं विसंगत आहे. उपकार कशाकरतां करायचा असतो? अर्थात् दुसऱ्याला ऐहिक सुख मिळवून देण्याकरतां. धर्मांत जर ऐहिक सुख तुच्छ मानलेलें आहे,

आणि या जगांत दुःख झाल्याने मरणोत्तर सुख होतें ही जर धार्मिक कल्पना आहे, तर दुसऱ्याला तरी ऐहिक सुख कशाला मिळवून द्यायचें ? त्यांत त्याचाहि फायदा नाही आणि आपलाहि नाही. नीतींतील मुख्य कल्पना परोपकार आणि धर्मांतील मुख्य कल्पना पुण्य, या दोन कल्पना इतक्या विसंगत आहेत, तरी देखील धर्मांत ही कल्पना कां घुसडली ? याचें कारण असें की धार्मिक लोकांनी वास्तविक जरी पुण्याकडेच विशेष लक्ष दिलें पाहिजे—आणि ज्यांची धर्मावर खरी श्रद्धा असते ते त्याप्रमाणे देतातहि-तरीपण बहुतेक लोकांची श्रद्धा कची असल्यामुळे ते वरपांगीं जरी स्वतःला धार्मिक म्हणवीत असले तरी वास्तविक त्यांना ऐहिक वर्चस्व पाहिजे असतें. यामुळे ते धर्म आणि नीति यांचा गोंधळ उडवून धर्म म्हणजेच नीति, आणि नीति म्हणजे काय हें धार्मिक लोकांनीच ठरवायचें, असें प्रतिपादन करीत असतात. अशाने आपल्याला स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साधतील अशी त्यांची कल्पना असते, परंतु समंजस लोकांनी हा धार्मिक लोकांचा कावा ओळखून त्यांना ऐहिक गोष्टींत ढवळाढवळ करूं देतां नये, आणि नीति म्हणजे काय हें ठरवण्याचा आपला हक्क गमावतां नये.

इतकें ठरल्यावर नीति कशास म्हणावें हें ठरवणें सोपें आहे. ऐहिक सुख ज्या योगाने सर्वांत जास्त मिळेल ती नीति. अर्थात् याचा विचार केवळ व्यक्तीच्या दृष्टीने न करतां समाजाच्या दृष्टीने केला पाहिजे, कारण मनुष्य समाजांत राहणारा प्राणि आहे. याकरतांच वर आपण परोपकराचा नीतींत समावेश केला आहे. परंतु समाजाच्या ऐहिक सुखाचा विचार करतांना वेडगळ धार्मिक कल्पनांना मात्र अजीबात फांटा दिला पाहिजे, आणि असें न केल्यामुळेच पुष्कळ लोकांना नीति म्हणजे काय हें कळणें कठिण होतें. वास्तविक त्यांत कठिण कांहीच नाही. हें कांही उदाहरणांनी स्पष्ट होईल. चोरी करणें ही अनीति आहे याबद्दल मतभेद नाही. कां ? तर ती अनीति न मानली तर समाजांत कोणालाहि सुरक्षितता वाटणार नाही आणि सुरक्षितता हें सुखाचें एक मुख्य अंग आहे. अर्थात् याचा अधिक खोल विचार करतां येईल, आणि चोराला भूक लागली असल्यामुळे त्याने चोरी केली असें आढळल्यास ती क्षम्य मानावी लागेल, व समाजांत सर्वांना पुरेसें अन्न मिळावें हें समाजाचें कर्तव्य ठरेल. पण तसें झाल्यावर मात्र चोरी ही

अनीतिच मानावी लागेल. समाजवाद अंमलांत आल्यावर देखील खाजगी मालमत्ता अजीबात नाहीशी होणार नाही, आणि ती जोंपर्यंत आहे तोंपर्यंत चोरीची शक्यता आहे, आणि ती अनीति होईल.

याच तत्त्वावर विलायतेंत व्यभिचार हा गुन्हा मानलेला आहे. एखाद्याचें पाळलेलें कुत्रें ही जशी त्याची मालमत्ता असते आणि तें कोणीं नेलें तर ती चोरी होते, किंवा एखाद्याच्या मालकीची कोणतीहि वस्तु त्याच्या परवानगीशिवाय वापरणें हा जसा चोरीचाच एक प्रकार होतो, त्याचप्रमाणे एखाद्याची बायको पळवणें किंवा तिच्याशीं शरीरसंबंध ठेवणें हीहि विलायतेंत चोरी होते. म्हणजे बायको ही मालकीची वस्तु परवानगीशिवाय वापरल्याबद्दल त्या मनुष्यावर फिर्याद होते आणि त्याला शिक्षा होते. मालकाची, म्हणजे नवऱ्याची परवानगी असल्यास तो गुन्हा होत नाही. स्त्रियांना उपभोग्य वस्तु समजणें हा स्त्रियांचा उपमर्द आहे, परंतु इंग्लंडांतील स्त्रिया तो सहन करीत आहेत. या बाबतींत हिंदुस्थानांतील कायदा थोडा वेगळा आहे. येथे व्यभिचार हा फौजदारी गुन्हा होतो आणि त्याबद्दल पोलिसाकडून खटला होतो. विलायतेंत तो फौजदारी गुन्हा नाही, तेव्हा नवऱ्याला केवळ नुकसानभरपाई मागतां येते. परंतु येथेहि नवऱ्याची परवानगी असल्यास व्यभिचार हा गुन्हा होत नाही, म्हणजे येथे देखील स्त्री ही मालमत्ताच मानलेली आहे. फक्त गुन्ह्याचें स्वरूप कायद्याने वेगळें मानलें आहे इतकेंच. एका मनुष्यप्राण्यावर दुसऱ्याची मालकी असणें ही गुलामगिरीची व्याख्या आहे आणि आपण गुलामगिरी ही संस्था बंद केली आहे अशी घमेंड जरी इंग्रज लोक मारतात, तरी स्त्रियांचे बाबतींत ती येथेच नव्हे तर इंग्लंडांतहि शिल्लक आहे. अर्थात् जोंपर्यंत स्त्री ही मालमत्ता आहे, तोंपर्यंत व्यभिचार ही आपणांसहि अनीति मानावी लागेल, कारण आपण चोरी ही अनीति मानली आहे. प्रश्न इतकाच की कायद्याने स्त्री ही मालमत्ता मानलेली असली, तरी समंजस लोकांनी देखील ती मालमत्ता मानावी की काय ? ती जर मालमत्ता मानायची नसेल तर तात्विक दृष्ट्या व्यभिचार हा गुन्हा असला तरी अनीति होणार नाही. कारण स्त्री मालमत्ता नसली म्हणजे तिचा स्वतःच्या शरीरावर हक्क असतो हें कबूल करावें लागेल,

आणि मग संभोगास तिची संमति पुरे होईल, नवऱ्याच्या संमतीची गरज राहणार नाही.

अनीतीचें किंवा नीतीचें सामान्य स्वरूप समजण्याकरतां समाजांत सर्वांना समान हक्क असतात असें मानलें पाहिजे, आणि स्वतःची वागणूक ठरवतांना इतरांनाहि तसेंच वागण्याचा हक्क आहे, आणि ते तसे वागले तर परिणाम काय होईल, याचा विचार केला पाहिजे. म्हणजे तसें वागण्याने कोणाचें निष्कारण नुकसान होतें की काय हें पाहिलें पाहिजे. नुकसान होत नसेल तर ती अनीति नाही, अशी व्याख्या करण्यास हरकत नाही.

आतां हीं तत्वें लक्षांत ठेवून वेश्यावृत्तीचा विचार करूं. वेश्यावृत्तीला अनेक लोक शरीरविक्रय म्हणतात, परंतु हा शब्द चुकीचा आहे हें उघड आहे. वेश्या आपलें शरीर भाड्याने देतें, विकीत नाही. गिऱ्हाइकाला तिच्या शरीराचा विशिष्ट तऱ्हेने कांही वेळ उपयोग करतां येतो, त्याची त्या शरीरावर मालकी होत नाही. कुत्रा एखाद्याच्या मालकीचा असला तर तो त्याला ठार मारूं शकतो आणि त्याला जाब विचारण्याचा अधिकार कोणालाहि नसतो. ही मालकी झाली. तशी मालकी वेश्येच्या शरीरावर कोणालाहि मिळत नाही, तेव्हा देहविक्रय हा शब्द चुकीचा आहे. आतां वर असें म्हटलें की स्त्री ही कायद्याने नवऱ्याची मालमत्ता समजलेली आहे. परंतु तेथे देखील मालमत्ता याचा असा अर्थ घेतां येत नाही, कारण बायकोला ठार मारण्याचा हक्क नवऱ्याला नाही. प्राचीन रोमन लोकांत पुरुषाचा सर्व कुटुंबावर अशा प्रकारचा मालकीहक्क असे, परंतु आतां तो हक्क कोठेहि-निदान सुधारलेल्या देशांत-नाही. तेव्हा कदाचित् त्याला मालकीहक्क म्हणण्याऐवजी निदान संभोगापुरता मक्ता नवऱ्याकडे असतो असें म्हणणें अधिक बरोबर होईल. अर्थात मक्तेदाराला आपले प्रतिनिधि नेमतां येतात, आणि याच तत्वावर हिंदु धर्मांत नियोगाची पद्धत होती.

वेश्यावृत्ति हा कोठेहि गुन्हा मानलेला नाही, परंतु तो गुन्हा न मानतां आडमार्गाने वेश्यांना छळण्याची खटपट मात्र धर्मबाजांनी आणि नीतिबाजांनी जगभर चालवलेली आहे. हे लोक इतके खवळावे असें वेश्यांच्या धंद्यांत काय

आहे ? वेश्यांच्या धंद्यापासून कोणाचें नुकसान होतें ? खरें नुकसान कोणाचें होत असेल तर त्या धंद्याला अनीति मानावी लागेल. परंतु नुकसान कोणाचें होतें ? खरें म्हटलें तर कोणाचेंच होत नाही. वेश्यांपासून रोग होण्याची भीति असते, त्या बाबतींत काय करावें हें आपण वर पाहिलेंच आहे. अविवाहित पुरुष वेश्यांकडे गेले तर कोणाचें काय बिघडतें ? अर्थात् येथे आपणास धार्मिक समजुतींचा विचार करण्याचें कारण नाही, त्यांचा आपण पूर्वीच निकाल लावला आहे. यामुळे आपण समागम हें पाप समजत नाही, आणि त्यांत कांही अनीतिहि नाही, कारण त्याने कोणाचेंच नुकसान होत नाही. उलट चालू समाजनीतींत अविवाहित पुरुषांनी वेश्येशिवाय इतर कोणत्याहि स्त्रीशीं समागमाचा प्रयत्न करणें हें भयंकर पाप मानलें असल्यामुळे त्याबद्दल समाजाकडून अतिशय त्रास होण्याचा संभव असतो. अशा स्थितींत अविवाहित पुरुषांना वेश्यांकडे जाण्याशिवाय गत्यंतरच नसतें. तेव्हा त्याने कोणाचें नुकसान तर होत नाहीच, पण कांही लोकांची सोय मात्र होते. याच दृष्टीने अनेक जगन्मान्य लेखकांनी असें मत व्यक्त केलें आहे की स्त्रियांचें पावित्र्य आणि पातिव्रत्य हीं वेश्यांच्या धंद्यावर उभारलेलीं आहेत. वेश्या नसल्या तर अविवाहित पुरुषांनी ब्रह्मचर्य पाळावें असें म्हणणें सोपें आहे, परंतु तें किती लोक करतील ? अर्थात् कांही घाबरट लोक इतर स्त्रियांच्या वाटेला जाणार नाहीत, परंतु कामतृप्तीच्या आडमार्गांत शिरतील. हे आडमार्ग किंवा ब्रह्मचर्य देखील आरोग्याच्या दृष्टीने कोणालाहि हितावह नाहीत, असें आधुनिक तज्ञांचें ठाम मत आहे. तेव्हा अविवाहित पुरुषांना तरी वेश्यांचा उपयोग आहे हें कबूल करणें भाग आहे. वेश्या नसल्या तर ते इतर स्त्रियांना वश करण्याचा प्रयत्न करतील आणि हे प्रयत्न पुष्कळ वेळां यशस्वी होतात. यामुळे चालू समाजनीतीच्या दृष्टीने हा धोका आहे. तेव्हा समाजनीति जोंपर्यंत बदलली नाही तोंपर्यंत तरी वेश्यांचा धंदा पारंपरिक नीतीला उपकारक आहे असें त्या नीतीच्या पुरस्कर्त्यांना कबूल करावें लागेल. पारंपरिक नीति ज्यांना मान्य नाही, त्यांनाहि समाजाच्या चालीरीती एकदम बदलतां येत नाहीत. तेव्हा त्यांनाही त्या नीतींतून फारशी सुटका नसते. तेव्हा तेहि वेश्यावृत्तीला विरोध करणार नाहीत.

येथपर्यंत फक्त अविवाहित पुरुषांचाच विचार केला, परंतु सर्व तज्ञांचें म्हणणें असें आहे की वेश्यांचें निमेपेक्षा जास्त गिऱ्हाईक विवाहित पुरुषांतून येतें. याचें कदाचित् कोणाला आश्चर्य वाटेल, पण यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांही नाही. समागमाचे बाबतींत बहुतेक पुरुषांना आणि स्त्रियांनाहि वैचित्र्याची प्रबल इच्छा असते. अर्थात् हें कबूल करणाऱ्या स्त्रिया सामाजिक परिस्थितीमुळे फारच थोड्या निघतील, आणि पुष्कळ पुरुष देखील हें कबूल करायला घाबरतील. परंतु हें पुरुषांच्या तरी वर्तणुकीवरून सिद्ध होतें आणि हें तज्ञांनी मान्य केलेलें आहे. हें दुर्वर्तन आहे असें कांहीना वाटतें, परंतु ही साहजिक प्रवृत्ति आहे. पुष्कळ लोक आपल्या घरांत सुंदर चित्रें लावून ठेवतात, परंतु तीं नवीं असतील तोंपर्यंतच ते त्यांच्याकडे पाहतात. तीं जुनीं झालीं म्हणजे त्यांच्यावर धूळ बसली नाही तर नशीब! स्वतःची बायको कितीहि सुंदर असली तरी देखील लोक वेश्यांकडे जातात, इतकेंच नव्हे तर अत्यंत कुरूप स्त्रियांच्या देखील ते नादीं लागतात, यांतलें इंगित हेंच आहे. त्यांतून विवाहित पुरुषांना समागमाची संवय झालेली असते आणि ते नवशिक्यांप्रमाणे स्त्रियांना बुजत नाहीत. नवशिक्या तरुणांची कामवासना कितीहि तीव्र असली तरी ते स्त्रियांना बुजतात, आणि वेश्यांचा तो धंदा आहे हें माहीत असूनहि पुष्कळ तरुण वेश्येकडे जाण्यास धजत नाहीत. यामुळेच वर सांगितल्याप्रमाणे वेश्यांचे गिऱ्हाइकांत विवाहित पुरुषच पुष्कळ असतात. विवाहित पुरुष वेश्यांकडे गेले तर तेथे मात्र इतरांचे हितसंबंध येतात, आणि त्यांचा विचार करणें जरूर आहे.

विवाहित पुरुष वेश्यांकडे गेल्याने त्यांच्या स्वतःच्या स्त्रियांचें नुकसान होतें, असें कोणास वाटण्याचा संभव आहे, तेव्हा याचा अधिक खोल विचार करणें जरूर आहे. हें नुकसान दोन प्रकारचें मानतां येईल. एक संभोगशक्तीचा व्यय, आणि दुसरा पैशाचा व्यय. या दोन्हींचा उपयोग करण्याचा हक्क फक्त पत्नीला आहे असें मानलें, तर तिचें त्यांत नुकसान होतें असें म्हणणें भाग आहे. परंतु हा मक्ता तिला परंपरेने दिला आहे काय, आणि परंपरेने दिला नसला तरी तो तसा देणें न्याय्य होईल काय, असे दोन प्रश्न येथे उपस्थित होतात. प्रथम पहिल्या प्रश्नाचा विचार करूं. जेथे एकेरी विवाहपद्धति चालू असेल,

म्हणजे जेथे स्त्रियांप्रमाणेच पुरुषांवरहि एकनिष्ठा लादलेली असेल, तेथे संभोगाचा मक्ता पत्नीलाच आहे असें म्हणतां येईल. हिंदु समाजांत अशी स्थिति नाही आणि जेथे असेल तेथे तरी ती न्याय्य आहे की काय हा विचार आहेच. अशा प्रकारचा मक्ता देणें ही एक प्रकारची गुलामगिरीच आहे हें उघड आहे, परंतु अशा गुलामगिरीने पत्नीचा संभोगाचे बाबतींत खरोखर फायदा होतो काय ? तसा फायदा निःसंशय होत नाही, असें थोड्या विचारांतीं कबूल करावें लागेल. अन्नांत वैचित्र्य नसेल तर त्याच त्या अन्नाचा जसा कंटाळा येतो, तसेंच पत्नीचे बाबतींत पुष्कळ पुरुषांचें होतें, आणि एकतर त्यांची संभोगशक्ति अत्यंत क्षीण होते, किंवा ते पत्नीचे बाबतींत मात्र पूर्ण नपुंसक बनतात, व त्यांना वैचित्र्याची संधि आल्यास ते नपुंसक नाहीत असें सिद्ध होतें. आणि सामान्यतः ज्यांना वैचित्र्य मिळतें त्यांची संभोगशक्ति अधिक टिकते असा अनुभव आहे. तेव्हा पत्नीला मक्ता दिल्याने तिला जरी तेवढें मानसिक समाधान लाभलें, तरी तिला त्यापासून प्रत्यक्ष सुख फारसें होत नाही, आणि या दृष्टीने पतीला वैचित्र्याची परवानगी देण्यांतच त्यांचें खरें हित असतें. नपेक्षा स्वतःचें नाक कापून दुसऱ्याला अपशकून केल्यासारखीच त्यांची स्थिति होते.

दुसरा प्रश्न पशाचा राहिला. जो मनुष्य आपला ससार संभाळून कधीकधी वेश्यांकडे जातो, तो वेश्यांवर विशेष पैसा खर्च करील हें संभवत नाही. परंतु मनुष्य एखाद्याच वेश्येच्या नादीं लागला तर मात्र त्याला कांही तारतम्य राहणार नाही, आणि तो तिच्यावर फाजील खर्च करील, आणि त्याच्या कुटुंबाला त्यामुळे धोका उत्पन्न होईल. परंतु हा धोका केवळ धंदेवाईक वेश्यांमुळेच उत्पन्न होतो असें नाही. वेश्यांच्या अभावीं देखील एखादा मनुष्य पत्नीव्यतिरिक्त एखाद्या स्त्रीच्या प्रेमामुळे वेडा होईल आणि पैसा उधळील. इतकेंच नव्हे तर तो स्त्रियांचे बाबतींत अगदीं शुकाचार्य असला तरी पैसे उधळण्याचे इतर मार्गहि कांही कमी नाहीत. शर्यती, जुगार, फार काय सिनेमावरहि ऐपतीपेक्षा जास्त पैसा खर्च करणारे लोक पुष्कळ असतात. तेव्हा हा पैशासंबंधी धोका केवळ वेश्यांमुळेच उत्पन्न होतो असें नाही. तो धोका मनुष्यस्वभावांतच आहे आणि ज्याला आपल्या मनाचा तोल संभाळतां येत नाही, अशा पुरुषांना व पर्यायाने त्यांच्या कुटुंबांना हा धोका

कांही केलें तरी राहणारच. कारण वेश्या मुळीच नाहीशा झाल्या असें धरून चाललें तरी पैसे उधळण्याचे सर्व मार्ग बंद करतां येणारच नाहीत. तेव्हा हा मुद्दा फोल आहे. शिवाय वेश्या बंद झाल्या तरी हिंदु धर्मांत अनेक बायका करतां येतातच, आणि त्यामुळेहि पहिल्या पत्नीचें नुकसान होतेंच. हल्ली एक बायको असतांना दुसरी करूं देऊं नये अशी एक टूम निघाली आहे, परंतु तसें झालें तरी पैसे उधळण्याचे मार्ग राहतीलच.

खरें पाहिलें तर धंदेवाईक वेश्यांमुळे पैशाचें नुकसान फारसें होणेंच शक्य नसतें. वैचित्र्याची आवड पुरी करण्याकरतां जो मनुष्य वेश्येकडे जातो, तो एकाच वेश्येच्या नादीं लागण्याचा संभव फारच कमी असतो. वेश्यांकडे जाण्याची पुरुषाना बंदी केली तरच ते एखाद्या स्त्रीच्या नादीं लागण्याचा संभव जास्त. शिवाय पुरुषांचा सर्वच खर्च बायकांच्या परवागीने होत नसतो, तेव्हा हाहि खर्च मर्यादेबाहेर न झाल्यास त्यासंबंधी ओरड करण्याचें कारण नाही. स्त्रियांना समान हक्क असावे असें म्हणणारे लोक कधीकधी असें म्हणतात की पुरुषाने लग्न केल्याबरोबर त्याच्या सर्व मिळकतीवर त्याच्याइतकाच पत्नीचाहि हक्क उत्पन्न होतो. हा कसा उत्पन्न होतो हें समजणें कठीण आहे. विवाह ही एक प्रकारची सोडत आहे हें खरें, पण नवऱ्याला शंभर रुपये पगार असला तर लग्नाने पत्नीला महिना पन्नास मिळावे व चार हजार रुपये असला तर तिला केवळ लग्न केल्यामुळे महिना दोन हजार मिळावे, हें न्यायबुद्धीला पटण्यासारखें नाही. समाजांत स्त्रीला नवऱ्याबरोबरची मानाची जागा मिळते, ती मिळण्याइतकीहि तिची पुष्कळ वेळां वैयक्तिक किंमत नसते. हें एक असो, पण त्याचबरोबर तिला अक्कल असो की नसो, नवऱ्याची निंमी मिळकत तिची व्हावी हें योग्य दिसत नाही. तिच्या पोषणाची व इतर सामान्य गरजांची जबाबदारी नवऱ्याने पार पडली की त्याच्या इतर खर्चावर तिला देखरेख ठेवण्याचा हक्क असतां नये. स्त्रियांना परावलंबी राहण्याची संवय झाल्यामुळे त्यांना तो आपला हक्क वाटूं लागला आहे. वस्तुतः समान हक्क याचा हा अर्थ चुकीचा आहे. स्त्रियांना स्वतःचें पोट भरण्याचें शिक्षण न मिळाल्यामुळे परावलंबन ही एक आपत्ति त्यांच्यावर येते. पुरुषांप्रमाणेच स्वतःचें पोट

भरून स्वतंत्रपणें राहणें हा त्यांचा हक्क आहे. पुरुषांइतकें काम केल्यास त्यांच्या इतकाच पगार मिळणें हा त्यांचा हक्क आहे, इतकेंच नव्हे तर त्यांच्यांतील नैसर्गिक फरकांमुळे विशिष्ट प्रसंगीं भरपगारी रजा मिळणें हाहि त्यांचा हक्क आहे. पण दुसऱ्याच्या जिवावर जगून शिवाय त्या त्याच्या निम्या मिळकतीवर हक्क सांगूं लागल्या तर तो मात्र कोणी कबूल करणार नाही. वैचित्र्याची परवानगी पुरुषांना दिली तर ती आम्हांलाहि पाहिजे, असें त्यांनी म्हटल्यास त्यालाहि समान हक्क म्हणतां येईल. पण पुरुषांच्या शरीरावर आणि मिळकतीवर त्यांचा केवळ जरूरीपुरता हक्क सद्यःस्थितींत कबूल केला, तरी यापलीकडे त्यांना जातां येणार नाही.

अशा स्थितींत विवाहित स्त्रियांना वेश्यांपासून जें आपलें नुकसान होतेंसें वाटतें तें केवळ असूयामूलक आहे, म्हणजे नवऱ्याच्या शरीरावर आपला हक्क आहे या कल्पनेमुळे उपत्न्न झालेलें आहे, आणि या कल्पनेला कोणताहि आधार नाही आणि तिला कोणी उदात्तहि म्हणणार नाही. एकनिष्ठा हा एक मोठा सद्गुण आहे असें कांही लोक म्हणतात, पण हीहि कल्पना निराधार आहे. एकनिष्ठेने कोणाचाहि फायदा होत नाही आणि वर पाहिल्याप्रमाणे पुष्कळ वेळां नुकसानच होतें. तेव्हा एकनिष्ठा ही नीति नव्हे, ही केवळ धार्मिक लोकांनी मानलेली नीति आहे, परंतु आपण जी नीतीची कसोटी ठरवली ती लावल्यास एकनिष्ठतेचा समावेश नीतींत होत नाही. तेव्हा वेश्यांमुळे कोणाचेंहि कोणतेंहि नुकसान होत नाही हें उघड आहे.

मग वेश्यांविरुद्ध जगभर एवढी ओरड चालली आहे ती कशाकरतां? तिचें मुख्य कारण म्हणजे यहुदी आणि ख्रिस्ती धर्मांतील क्लीबनीतीचें सर्व जगावर आक्रमण. या दोन्ही धर्मांचा पाया एकच आहे. तो म्हणजे ईश्वराने प्रथम आदम व ईव्ह नांवाचीं दोन माणसें उत्पन्न करून त्यांना ईडन नांवाच्या बागेंत ठेवलें होतें, व अमुक झाडाचें फळ खाऊं नका असें सांगितलें होतें. परंतु सैतानाने सर्पाच्या रूपाने बागेंत शिरून ईव्हला त्या झाडाचें फळ खाण्याचा उपदेश केला व तिने तें स्वतः खाऊन आदमलाहि खायला लावलें. तें खाल्ल्यामुळे त्या दोघांच्या मनांत कामवासना उत्पन्न झाली आणि त्यांना आपल्या नग्न शरीराची

लाज वाटूं लागली, आणि तीं तें झांकण्याचा प्रयत्न करूं लागलीं. आज्ञा मोडल्या-बद्दल रागावून ईश्वराने त्यांना बागेंतून हांकून देऊन शाप दिला. प्रसववेदना हा त्या शापाचा एक परिणाम आहे. या खुळ्या काल्पनिक गोष्टीवरून नम्रता, काम-वासना व तिची पूर्तता करणारीं इंद्रियें, हीं सर्व पापाने दूषित झालीं. हें जें ईश्वराची आज्ञा मोडल्यामुळे झालेलें मनुष्याचें काल्पनिक अधःपतन, तें आजपर्यंत या लोकांच्या डोक्यांत आहे इतकेंच नव्हे, तर त्या धर्मांची उभारणीच या पापावर केलेली आहे. कारण या पापांतून मानवजातीला मुक्त करण्याकरतां ईश्वराचा एक अवतार होईल असें त्या धर्मांत सांगितलेलें आहे. या दोन धर्मांत फरक इतकाच की हा जो अवतार व्हायचा होता, तोच येशू ख्रिस्त असें ख्रिस्ती लोक मानतात, आणि यहुदी लोकांचे मतें तो अवतार अजून व्हायचा आहे. परंतु वर सांगित-लेल्या मूळच्या पापाची कल्पना दोन्ही धर्मांत आहे आणि याच धर्मांचें— विशेषतः ख्रिस्ती धर्मांचें—आज जगांत प्राबल्य असल्यामुळे त्यांनी सर्व जगावर आपली काल्पनिक धार्मिक नीति लादण्याचा प्रयत्न चालवला आहे. ज्या ज्या प्रदेशांवर ते आक्रमण करतात, त्या त्या देशांत ते हा अत्याचार सुधारणेच्या नांवाखाली करतात. तेथील मूळचे लोक प्राथमिक नग्न स्थितींत राहणारे असले तर ते त्यांना जबरदस्तीने वस्त्रें वापरायला लावतात, कारण मिशनरी लोक नम्रतेविरुद्ध ओरड करतात, आणि अशा रीतीने पुष्कळ प्राथमिक लोकांचें आरोग्य विघडून ते मरणाच्या पंथाला लागलेले आहेत. जेथे त्यांना जबरदस्ती करतां आली नाही, तेथेहि त्यांच्या वर्चस्वाचा परिणाम होऊन स्वदेशाचा अभिमान बाळगणारे लोक देखील नीतीच्या कल्पना मात्र यूरोपांतून उसन्या घेण्यांत धन्यता मानतात. चीन व जपान देशांत वेश्यांना मोकळीक होती इतकेंच नव्हे तर त्यांचा गौरव होत असे. परंतु हे देश यूरोपी-यांच्या ताब्यांत नसतांहि तेथे वेश्यांविरुद्ध कायदे होऊं लागले आहेत. हिंदु-स्थान तर यूरोपीयांच्याच ताब्यांत आहे. तेव्हा येथे देशभक्त म्हणवणारे लोक देखील त्यांच्याच तंत्राने वागतात यांत नवल काय ? आपलें हित कशांत आहे हें कोणी पहातच नाही. गांधी तर ख्रिस्ताळलेलेच आहेत, त्यांनी त्या तंत्राचा पुरस्कार करणें स्वाभाविक आहे, आणि त्यांचे अनुयायी स्त्रियांवर

लादलेली एकनिष्ठता पुरुषांवरहि लादावी असा प्रयत्न करीत आहेत.

ख्रिस्ती नीतीचा मुद्दा असा की सर्वांनी ब्रह्मचर्य पाळणें शक्य नाहीं म्हणूनच केवळ गौण मार्ग म्हणून विवाहास परवानगी आहे. परंतु एकंदरींत समागम हें पाप आहे ही मूळची कल्पना असल्यामुळे त्यांत जितके अडथळे आणतां येतील तितके आणले पाहिजेत, या धोरणाने त्या नीतीचीं तत्त्वें बसवलेलीं आहेत. परंतु ज्यांचा या दोन्ही धर्मांवर विश्वास नाही, त्यांनी इतका वेडगळपणा करण्याचें कारण काय ? समागम ही खाण्यापिण्यासारखीच एक नैसर्गिक गोष्ट आहे. तींत धार्मिक लोकांना कदाचित् प्रसंगीं पापपुण्य दिसेल, परंतु आपल्या कसोटीने तींत नीतिहि नाही आणि अनीतिही नाही. ख्रिस्ती लोकांचा वेश्यांना विरोध एवढ्याकरतांच, की त्यांच्यामुळे समागमांची संख्या वाढते, म्हणजे पाप वाढतें. परंतु इतरांना तें पाप वाटण्याचें कारण नाही. ज्या नैसर्गिक वासनेवर प्राणिमात्राची उत्पत्ति अवलंबून आहे, तेंच पाप मानण्याइतका अचरटपणा इतरांनी काय म्हणून करावा ?

वेश्यावृत्ति हा धंदा हलकटपणाचा आहे, आणि म्हणून वेश्या म्हणजे हलकट असा एक समज आहे. परंतु हा समज समंजस आहे काय ? हा धंदा हलकट कसा ? तो हलकट असला तर त्याचा फायदा घेणारे पुरुष देखील हलकटच असतात काय ? पुष्कळ उच्च समजलेले लोक देखील हा फायदा लपूनछपून घेत असतात हें काय कोणाला माहीत नाही ? तें एक असो, पण हा धंदा हलकट मानण्यास खरोखरच कांही कारण आहे काय ? यांत एक सकृद्दर्शनीं बरोबर वाटणारा मुद्दा पुढे येतो की स्त्रीपुरुषांचा शरीरसंबंध प्रेमावरच अधिष्ठित असला पाहिजे, तो तसा नसणें हा कमीपणा आहे, हलकटपणा आहे. हें जर खरें असेल तर हाच नियम विवाहालाहि लागू होईल, आणि आईबापांनी जुळवलेल्या सर्व विवाहांतील वधूवरें हलकट ठरतील. इतकेंच नाही तर वधूवरांनी स्वतः ठरवलेलीं लग्नें देखील शेंकडा ८० वेळां प्रेमावर अधिष्ठित नसतात, त्यांत अवांतर गोष्टींचाच अधिक विचार केलेला असतो, तेव्हा अशा प्रकारच्या सर्व विवाहित लोकांना वेश्यांबरोबरच हलकट मानायचें काय ? शरीरसंबंध प्रेमावर अधिष्ठित असावा हें सुखाच्या दृष्टीनेहि इष्टच आहे आणि त्याबद्दल वादच नाही. परंतु तो तसा नसणें हा

जर हलकटपणा मानायचा असेल, तर पुष्कळशा प्रतिष्ठित आणि सोंवळ्या लोकांना हलकट मानावें लागेल, आणि तसें कोणीहि मानीत नाही. प्रेमाशिवाय लग्न करणारी कुलवधू जर हलकट नव्हे, तर वेश्या तरी हलकट कशी ? वेश्येपेक्षाहि अशा वधूची स्थिति पुष्कळ वेळां शोचनीय असते. वेश्येला निदान आपलें गिऱ्हाईक निवडतां येतें, किंवा आलें पाहिजे. परंतु विवाहित स्त्रीला निवड शक्य नसते. तिच्या मनांत असो की नसो, पतीशीं त्याच्या इच्छेस येईल तेव्हा समागम हें तिचें कर्तव्य होऊन बसतें. तेव्हा अधिक उच्च दर्जा कोणाचा ? वेश्यांप्रमाणेच बहुतेक विवाहित स्त्रियांचें उपजीविकेचें साधन समागम हेंच असतें. त्यांत फरक इतकाच की वेश्येचा करार कांही वेळापुरताच असतो, विवाहित स्त्रीचा करार जन्माचा, म्हणजे दोहोंपैकी एक मरेपर्यंत, असतो. परंतु या दोहोंत तात्विक फरक नाही.

समागम प्रेमावर अधिष्ठित असला पाहिजे असे म्हणणारे लोक गृहीत धरून चालतात की पतिपत्नींचें एकमेकांवर प्रेम असतें. पैशाच्या दृष्टीने केलेल्या विवाहांत तें नसतें, आणि आईबापांनी जुळवलेल्या विवाहांत तें निदान प्रारंभीं तरी नसतें. शिवाय प्रेम म्हणजे तरी काय ? शाश्वत टिकणारें प्रेम ही एक कविकल्पना आहे. व्यवहारांत तें अपवादात्मक होय. शिवाय प्रेम कसें असावें हें कोण ठरवणार ? व्यक्तीच्या स्वाभावाप्रमाणे प्रेमाचा दर्जा कमीअधिक असणें स्वाभाविक आहे, व कित्येकांच्या स्वभावाला कवींचें प्रेम अशक्य होईल. अशा लोकांना जन्मांत कधीहि समागमसुख मिळूं नये म्हणणें न्याय्य आहे काय ? ही शारीरिक गरज शेंकडा नव्वद लोकांस कमीअधिक प्रमाणांत भासते. प्रेम त्यांच्या वांट्याला सुदैवाने आलें तर ठीक, नाहीतर त्यांनी काय करावें ? शिवाय ही गरज कमीअधिक प्रमाणांत भासत असल्यामुळे, आणि पतिपत्नी या दृष्टीने एकमेकांस अनुरूप असतीलच अशी कांहीच खात्री नसल्यामुळे, त्यांना या बाबतींत एकमेकांवर अवलंबून रहायला लावणें हा त्यांच्यावर जुलूम आहे. दोघांच्या गरजा पुष्कळ वेळां सारख्या नसतात, इतकेंच नव्हे तर कधीकधी सारख्या असल्या तरीहि आजारांत किंवा इतर कांही कारणांनी त्यांना एकमेकांच्या गरजा भागवणें अशक्य होतें. अशा स्थितींत त्यांच्यावर हा जुलूम

करण्याचा समाजाला बिलकुल हक्क पोंचत नाही, आणि जोंपर्यंत सभ्य समजलेल्या समाजांतील स्त्रिया अशा वेळीं गरज पुरवूं शकत नाहीत, तोंपर्यंत हें काम सहजच वेश्यांकडे येतें. अर्थात् वेश्यांनी फक्त पुरुषांचीच सोय होते, स्त्रियांची होत नाही, हें खरें. असा अन्याय असूं नये, परंतु सध्यां तो आहे, आणि समाजाचीं बंधनें या बाबतींत मोडायला फारशा स्त्रिया तयार नसतात, निदान उघडपणें नसतात. परंतु स्त्रियांवर अन्याय होत आहे म्हणून तसाच अन्याय पुरुषांवर करावा काय ? समान हक्क देण्याचा हा मार्ग समंजस नव्हे आणि तसा अन्याय पुरुषांवर करायचा नसेल तर त्याला वेश्यांशिवाय काय मार्ग आहे ? अशा तऱ्हेने वेश्यांची गरज शाबीत होते आणि तो एक उपयुक्त धंदा ठरतो.

वेश्यांचा दर्जा ठरवण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे त्यांची इतर धंदेवाइकांशीं तुलना करणें. डाक्तरी आणि वकिली हे धंदे विशेष प्रतिष्ठित समजण्याची वहिवाट आहे आणि या धंद्यांतील लोक स्वतंत्र असून बरेच पैसे मिळवीत असल्यामुळे ते इतरांना तुच्छ लेखतात. वेश्यांविरुद्ध जो नेहमीचा आक्षेप आहे की जें काम आवडीने केलें पाहिजे तें त्या पैशाकरतां करतात, तोच आक्षेप या धंद्यांना लागू नाही काय ? विशेषतः वकिलीचा धंदा घेतल्यास त्यांत प्रामाणिकपणा तरी असतो काय ? आपला अशील सोदा आहे हें माहीत असतांना तो उत्तम मनुष्य आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करणें, किंवा त्याने एखादा गुन्हा केला आहे हें माहीत असूनहि तो निर्दोष आहे असें शाबीत करणें, ही मोठी उच्च आणि उदात्त गोष्ट आहे काय ? ही अत्यंत प्रामाणिक वकिलांची गोष्ट झाली. अर्थात् सर्वच वकील प्रामाणिक नसतात हें वेगळें. डॉक्टरांना देखील अत्यंत घाणरेडीं कामें पुष्कळ वेळां करावीं लागतात, तीं ते केवळ भूतदयेने करतात काय ? अप्रिय किंवा अप्रामाणिक कामें करून पैसा मिळवणारे वकील आणि डाक्तर हे जर प्रतिष्ठित, तर तसाच प्रकार करणाऱ्या वेश्याच तेवढ्या हलकट कशा ? कांही वेश्या गिऱ्हाइकांना लुबाडतात. पण कांहीं वकील अशिलांना लुबाडीत नाहीत काय ? कांही चांगले, कांही वाईट, हें कोणत्याही धंद्यांत असतेंच, पण त्यामुळें धंदा हलकट ठरत नाही. शिक्षकाचा धंदा निदान

त्या धंद्यांतले लोक तरी अत्यंत उच्च समजतात. परंतु खरोखर आवडीने धंदा करणारे किती शिक्षक असतात ? दुसऱ्या कोठे कांही मिळत नाही म्हणून शिक्षक झालेल्यांचीच संख्या अधिक नसते काय ?

बरें, हे धंदे सोडून कलावंतांचे धंदे घेतले, तर त्यांतहि हा प्रकार दिसत नाही काय ? संगीतासारखी कला घेतली तर ती पैशाकरतां करणें हा कमीपणा नव्हे काय ? खरोखर ज्यांना कलेची चाड असते असे गवई किती असतात ? बहुतेक पोटभरूच असतात की नाही ? खरोखर हिंदुस्थानीं संगीत शिकल्या-नंतर, पेटी हें हत्यार त्याला योग्य नाही हें वास्तविक कळावें. पण या बाबतींत शिकणारांची फसवणूक करून पेटीवर पोट भरणाऱ्या शिक्षकांचें कलाप्रेम काय दर्जाचें समजावें ? खऱ्या गवयाने ज्या वेळीं जें गावें अशी लहर लागेल तेंच त्या वेळीं गाइलें पाहिजे. परंतु एखाद्या महाराजाने हुकूम दिल्यास तें गात नाही असें म्हणणारे किती गवई सांपडतील ? चित्रकला घेतली तर केवळ आपल्या आवडी-प्रमाणे काम करणारे किती चित्रकार आहेत ? कोणतेंहि काम स्वतःच्या आवडी-प्रमाणे न करतां दुसऱ्याच्या आवडीप्रमाणे पैशाकरितां करणें, ही एक प्रकारची वेश्यावृत्तीच आहे, आणि हा प्रकार सर्व धंद्यांत सांपडतो. याबद्दल कोणालाहि दोष देतां येत नाही. सर्वांना पोट भरावें लागतें आणि दुसऱ्याच्या उपयोगी पडून तें भरणें यांत बिलकुल कमीपणा नाही. वेश्यांच्या धंद्यालाहि याने कमीपणा येत नाही.

समागमाचे बाबतींत इतके पूर्वग्रह लोकांच्या मनांत खिळलेले असतात, की त्याबद्दल समंजस विचार करणें पुष्कळांना अशक्य होतें. कोणी म्हणतात की हें सगळें खरें, पण शरीर अशा रीतीने भाड्याने देणे बरें नव्हे, प्रेमाशिवाय शरीराची घसट बरी वाटत नाही. डाक्तरांचा आणि नर्सांचा शरीराशींच संबंध येत नाही काय ? न्हावी किंवा मर्दन करणारे लोक, यांचाहि शरीराशींच संबंध येतो. तेव्हा हे सर्व हलकट समजायचे काय ? आणि शरीराला हें फाजील महत्व कां ? आपल्या सोयीप्रमाणें एखाद्यावेळीं शरीराला आणि एखाद्या वेळीं मनाला महत्व द्यायचें, हा कोठला न्याय ? शरीर भाड्याने देणें हा हलकटपणा, मग मन भाड्यानें देणें हा त्याहिपेक्षा हलकटपणा नव्हे काय ? आणि डोक्याचीं कामें कर-

णारे सर्व लोक मन भाड्याने देत नाहीत काय? शिवाय वेश्येला पाहिजे त्याशीं समागम करण्याची सक्ती नसते. अर्थात् क्षुल्लक कारणावरून गिऱ्हाईक घालवून देणें परवडणार नाही, परंतु तिलाहि निवड करतां येते.

वरील विवेचनावरून हें उघड होतें की वेश्यांना हलकट लेखण्यास समंजस लोकांना पटण्यासारखें कोणतेंहि कारण नाही, इतकेंच नव्हे तर तो एक उपयुक्त धंदा आहे, आणि हें ओळखून त्यांना सभ्यतेने वागवल्यास त्यांत सर्वांचाच फायदा आहे. डॉ. रॉबिनसनसारख्या जबाबदार लेखकाने असें मत दिलें आहे की त्यांचा धंदा नर्सांच्या धंद्यासारखाच आहे आणि त्यांचा दर्जाहि तसाच समजावा. नर्स शरीराची शुश्रूषा करते, तर वेश्या केवळ शरीराचीच नव्हे मन मनाचीहि शुश्रूषा करते. कारण समागम ही कित्येकांस जरी केवळ शारीरिक बाब वाटली, तरी मन प्रसन्न राखण्यास त्याचा उपयोग होतो, आणि या दृष्टीने त्याचें महत्व केवळ शारीरिक शुश्रूषेपेक्षा जास्त आहे.

हें मान्य केल्यास वेश्यांची विशेष कींव करण्याचेंही कांही कारण राहणार नाही. वेश्यावृत्तीविरुद्ध प्रचार करणारे लोक त्यांच्याविषयीं जो फाजील कळवळा दाखवतात, तो अस्थानीं आहे. अर्थात् कोणत्याहि स्त्रीला आपल्या मनाविरुद्ध वेश्यावृत्ति करण्याचा प्रसंग येऊं नये हें खरें, कारण कित्येकांचे त्या धंद्यांत अत्यंत मानासिक हाल होणें शक्य आहे. तथापि ज्यांना नाइलाज म्हणून पोट भरण्याकरतां हा धंदा करावा लागतो, अशा वेश्या फारच थोड्या असतात, आणि म्हणूनच त्यांना वेश्यावृत्तीपासून परावृत्त करून इतर धंदे करायला लावूं पाहणाऱ्या नीतिबाजांचे प्रयत्न बहुधा व्यर्थ होतात. याबाबत अनेकांनी अनेक प्रकारचे आंकडे दिले आहेत, परंतु त्यांत अत्यंत दारिद्यामुळे किंवा कोणीतरी फुसलावून फसवल्यामुळे या धंद्यांत पडलेल्या फारच थोड्या असतात याबद्दल एकमत आहे. डॉ. जॉर्ज पोल बोंकूर या फ्रेंच डॉक्टरांने वेश्याव्यवसायाचीं पुढील कारणें दिलीं आहेत:—

अत्यंत दारिद्य, शेंकडा १०; कमी पगार व बेकारी, शेंकडा ४०; आळस, २०; दारुचें व्यसन १२; फुसलावलेल्या ११; चैन करण्याची इच्छा ५२;

वाईट शिक्षण व कुसंगति, ८४. अर्थात् या शेंकडेवारींत दिलेल्या आंकड्यांची बेरीज शंभर होत नाही, यावरून कांही वेश्या यांपैकी दोन किंवा अधिक वर्गांत पडतील हें लक्षांत येईल. त्याचप्रमाणें त्यांच्या मानसिक दर्जासंबंधीहि त्यांनी सांगितलें आहे की त्यांत विशेष बुद्धिमान स्त्रिया फारच कमी असतात, अर्ध्याअधिक मंदबुद्धि असतात, आणि शेंकडा दहाबारा तरी वेडगळ असतात. अर्थात् बुद्धिमान स्त्रिया वेश्यांच्या सदरांत नोंदल्या जाणें कठिण आहे हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

पारंपरिक नीतिकल्पनांमुळे इतर कोणत्याही स्त्रियांना समागमवैचित्र्य मिळत नाही–निदान उघड मिळत नाही–यामुळेही कांही स्त्रिया या धंद्यांत पडतात, परंतु सामान्यतः वेश्यांची कामप्रकृति मंदच असते, म्हणजे त्यांचें उत्तेजन व समाधान होण्यास वेळ लागतो, म्हणूनच त्यांच्या मज्जातंतूंवर ताण न पडतां त्यांना धंदा करतां येतो.

यावरून हें लक्षांत येईल कीं बऱ्याच स्त्रिया या धंद्यांत पडतात त्या दारिद्र्यामुळे नव्हे, तर या धंद्यांत पोटाला मिळवणें अधिक सोपें असतें म्हणून, आणि म्हणूनच तो धंदा सोडून एखादा 'प्रामाणिक' धंदा करायला जेव्हा त्यांना कोणी सांगतो, तेव्हा त्या मनापासून तयार नसतात आणि त्यांनी भिडेखातर कदाचित् ऐकलेंच तर त्या लवकरच पुनः याच धंद्यांत परत येतात. कारण सामान्यतः बुद्धीने कमी असलेल्या स्त्रियांना जे धंदे मोकळे असतात, त्यांत काबाडकष्ट करून जेमतेम पोट भरतें, परंतु या धंद्यांत त्यापेक्षा सहज कमी श्रमाने अधिक पैसे मिळतात. हें या धंद्यांत शिरण्याचें मुख्य कारण आहे. मठ्ठ नीतिबाजांना हें कळत नाही आणि ते वेश्यांना नीतीवर व्याख्यानें देतात. त्यांचा उपयोग काय होणार ?

कोणावरहि सक्ती होतां नये हें उघड आहे, आणि जिला खरोखर स्वतः–च्या स्फूर्तीने वेश्यावृत्ति सोडून दुसरा धंदा करावासा वाटेल, तिला जरूर मदत करावी, परंतु त्यांच्यावर धर्मपर आणि नीतिपर व्याख्यानें लादण्यांत अर्थ नाही. परंतु कांही लोकांना आपण कांही समाजकार्य करतों असें स्वतःला किंवा इतरांना भासवायला पाहिजे असतें, म्हणून ते कुडाला तुंबड्या लावीत

बसतात. असें केल्याने त्यांना समाधान वाटत असेल आणि मोठेपणाहि मिळत असेल, परंतु त्यांत कोणाचाहि वास्तविक फायदा नाही.

डॉ. रॉबिनसन यांनी वेश्यांचे आणखीहि उपयोग सांगितले आहेत. पुष्कळ लोकांना एका जागीं स्थिर होतां येत नाही आणि एकसारखें फिरतीवर रहावें लागतें. अशांना विवाह करणें शक्यं असलें तरीहि पत्नीजवळ राहतां येत नाही. मुंबईसारख्या मोठ्या शहरांत अनेकांना विवाह अशक्य होतो, आणि विवाहितांना देखील बायका जवळ बाळगतां येत नाहीत. यामुळे अविवाहितांची प्रचंड संख्या मोठ्या शहरांत असते, त्यांनी काय करावें? वेश्यांशिवाय त्यांना गत्यंतर नाही. त्यांनी अशीहि एक गोष्ट दिली आहे की एक धार्मिक इसम बरेच दिवसपर्यंत अविवाहित राहून कडक ब्रह्मचर्य पाळीत असे, परंतु नंतर त्याला जेव्हा लग्न करण्याची इच्छा झाली, तेव्हा त्याची आपल्या पौरुषाबद्दल खात्री नव्हती, आणि ती खात्री झाल्याशिवाय मुलीला मागणी घालणें त्याला बरें वाटेना. तेव्हा तो डॉ. रॉबिनसन यांजकडे तपासून घेण्याकरतां आला, आणि त्यांनी त्याला सांगितलें की ही तपासून समजण्यासारखी गोष्ट नाही, याला प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे, आणि अर्थात् असा अनुभव वेश्येशिवाय कोण देणार? तथापि तो मनुष्य धार्मिक असल्यामुळे विवाहबाह्य समागम करण्यास तयार नव्हता. त्याने शेवटीं खात्री करून घेतल्याशिवायच लग्न केलें आणि लग्नानंतर तो पूर्ण नपुंसक ठरला, आणि त्याची तरुण बायको मात्र संकटांत पडली.

तेव्हा कोणत्याहि प्रकारचा निर्बंध न मानतां केवळ दोन माणसांच्या मर्जीप्रमाणे समागम व्हावा हें नवमत ज्यांना पसंत असेल, त्यांना कदाचित् वेश्यांची गरज वाटणार नाही, तरीपण त्यांनाहि आपलें मत अंमलांत आणणें कठिण जाईल. शिवाय वरील नवमत जरी कबूल केलें तरी एखाद्या कुरूप पुरुषाला असें वाटणें शक्य आहे की कोणाहि स्त्रीला समागमाचें संकट घालणें बरें नव्हे, आणि यामुळे त्याला आमरण ब्रह्मचारी रहावें लागेल. अशा स्थितींत वेश्येचा धंदा करणारी स्त्रीच त्याला बरी वाटेल, कारण तेथे संकोचाचें कारण नाही. असा मनुष्य कोणाला फाजील भित्रा वाटला, तरी त्याचा मानसिक दर्जा अत्यंत उच्च आहे असें कबूल करावें लागेल, आणि त्याला त्याबद्दल शिक्षा करणें योग्य होणार नाही.

वेश्यावृत्तीविरुद्ध कोणतेंहि समर्पक कारण सांपडत नाही, आणि त्या धंद्याचा अनेक लोकांना अत्यंत उपयोग होण्यासारखा आहे हें येथपर्यंत दाखवलें. यांत कोणावरहि जुलूम नाही, कारण अनेक स्त्रिया तो धंदा करायला आपखुषीने तयार असतात. अशा धंद्याविरुद्ध विनाकारण ओरड करण्यांत काय फायदा ? तो उपयुक्त धंदा आहे हें ओळखून, तो करणाऱ्या स्त्रियांना मोठ्या सन्मानाची जागा न दिली तरी वेश्यावृत्तीला इतर प्रामाणिक धंद्यांप्रमाणेच मानणें रास्त होईल. त्याला हलकट समजण्याचें बिलकुल कारण नाही हें वर पाहिलेंच आहे. जोंपर्यंत नवनीति अंमलांत आली नाही, तोंपर्यंत त्यांची निःसंशय गरज आहे व ती अंमलांत आल्यावरहि कांही लोकांची गरज त्यांनी भागेल. तेव्हा त्यांना बंदी करण्याचें कारण नाही. मागणी कमी झाल्यास ती आपोआपच कमी होईल, परंतु ती मागणी नीतिवाजांच्या व्याख्यानांनी कमी होईल असें कांही लोकांस वाटतें, तें मात्र अत्यंत हास्यास्पद आहे. अन्नाइतकीच ही मागणी स्वाभाविक आहे आणि ती पुरी झालीच पाहिजे. ती नैसर्गिक मार्गांनी न झाली तर अनैसर्गिक मार्गांनी होणार, हें लक्षांत ठेवून काय करायचें तें केलें पाहिजे. पारंपरिक ' पावित्र्य ' आणि पातिव्रत्य जर पाहिजे असेल, तर वेश्यांना अडथळा करतां नये, कारण वेश्या नसल्यास ' पावित्र्य ' राहणार नाही. वेश्यावृत्ति नको असेल तर अनियंत्रित समागमाला मुभा देणें हा एकच मार्ग आहे, म्हणजे मागणी कमी झाल्यामुळे वेश्यावृत्ति आपोआप कमी होईल. तरीपण वेश्यावृत्ति कायद्याने बंद करणें न्याय्य होणार नाही, कारण इतर कोणत्याहि धंद्याइतकाच तोहि धंदा प्रामाणिक आहे आणि इतर धंद्यांना जशी परवानगी असते तशीच त्यालाहि दिली पाहिजे, हा सरळ न्याय आहे. मागणी नाहीशी झाल्यामुळे धंदा आमोआप बसल्यास इलाज नाही.

वेश्यावृत्तीचा सरळपणाने विचार करण्याऐवजी वेश्यांविरुद्ध जी निष्कारण ओरड ऐकूं येते, तिचीं कारणें मनोविश्लेषणाने सहज दिसण्यासारखीं आहेत. ज्यांना वेश्यांचा खरोखर उपयोग होतो, आणि जे त्यांचा उपयोग करून घ्यायला कचरत नाहीत, ते अशी ओरड करणार नाहीत. परंतु वेश्यांकडे जाण्यांत आपण पाप करतों अशी ज्यांची भावना असते, आणि तरी देखील गेल्याशिवाय ज्यांना राहवत नाही, असे लोक साहजिकच वरकरणी वेश्यावृत्तीच्या विरुद्ध असतात.

दारूबाज मनुष्याने दारूविरुद्ध नाटक लिहावें, तशी त्यांची स्थिति असते. कांही शिष्ट लोकांना मनांतून वेश्यांकडे जाण्याची इच्छा असते, परंतु जनलज्जेमुळे ज्यांना जातां येत नाही, अशांच्या सुप्त मनांत अशी भावना असते की जें आपल्याला मिळत नाही तें दुसऱ्याला तरी कां मिळावें? तेव्हा वेश्या अजीबात नसलेल्या बऱ्या. असे शिष्ट जर कोणीहि ओळखणार नाही अशा एखाद्या अनोळखी ठिकाणीं गेले, तर ते वेश्यांकडे जायला कमी करीत नाहीत. उदाहरणार्थ इंग्लंडांतील विशेष सोवळे लोक पॅरिसला गेले की पाहिजे तें करतात, कारण तेथे त्यांना कोणी ओळखीत नाही. वर्ड्स्वर्थ नांवाच्या प्रसिद्ध कवीला फ्रान्समधें एक अनौरस मूलहि झालें होतें, पण तो इंग्लंडांत परत गेल्यानंतर मात्र पक्का सोंवळा होऊन इतरांवर अनीतीचे आरोप करून त्यांना तुच्छ लेखीत असे. हे सगळे ढोंगी लोक झाले. याशिवाय अर्थात् कांही खरे सोंवळे लोक असतातच. त्यांना स्वतःच्या नीतीच्या कल्पना दुसऱ्यांवर लादण्याची इच्छा असते आणि म्हणून ते वेश्यांचा नायनाट करायला पहात असतात. असे लोक विशेषतः ख्रिस्ती क्लीबनीतीच्या प्रसाराने वाढले आहेत, आणि अमेरिकेंत त्यांचा विशेष उपद्रव आहे. हे लोक ढोंगी नव्हत, परंतु अत्याचारी आहेत आणि अशा लोकांच्या हातांत सत्ता गेल्यास जनतेला धोका असतो. हे ढोंगी लोकांपेक्षा अडाणी असतात आणि त्यांची समजूत घालणें शक्य नसतें.

ही पुरुषांची गोष्ट झाली. स्त्रियांचे बाबतींतहि अनेक वर्ग करतां येतील. समागमस्वातंत्र्य असावें असें म्हणणाऱ्या स्त्रिया फारच थोड्या असतात, आणि ज्या असतात त्या देखील स्वतःच्या मालकीच्या पुरुषांना स्वातंत्र्य द्यायला तयार नसतात. त्या अर्थातच वेश्यांना प्रतिस्पर्धी मानतात आणि वेश्यांच्या विरुद्ध असतात यांत नवल नाही. इतर कांहींना असें वाटतें की आपल्याला समागमस्वातंत्र्य नाही आणि वेश्यांना मात्र असतें. हें काय म्हणून सहन करावें? इतकेंच नव्हे तर यूरोपांत पुष्कळ स्त्रियांना लग्न करणें देखील अशक्य असतें. तेव्हा त्यांना अधिकच हेवा वाटावा यांत आश्चर्य नाही. अर्थात् वर सांगितलेल्या भावना सुप्त मनांत खोल दडलेल्या असतात, आणि त्या ज्याच्या त्याला देखील पुष्कळ वेळां माहीत नसतात, पण त्यांचा परिणाम मात्र होतो. वेश्यांचा उद्धार

करायला निघालेल्या लोकांत हे सर्व प्रकार सांपडतात. शिवाय आपण महत्वाचें समाजकार्य करीत आहों असेंहि त्यांना वाटत असतें.

वेश्यांचा उद्धार करण्याकरतां कांही शिष्ट एखादी संस्था काढून आपलें औदार्य दाखवतात, पण वेश्या अशा ठिकाणीं कधीहि टिकणें शक्य नाही. कांही दिवस राहून त्या पळून जातात. पुष्कळ वेळां त्या इतर कोणताहि धंदा करायला लायक नसतात, पण त्यांना फुकट खायला घातलें तरीहि त्या संस्थांत राहणार नाहीत, कारण अशा संस्थांत त्यांना तुरुंगांतल्या कैद्यांप्रमाणे वागवतात. मरण पुरवलें पण अशा ठिकाणीं राहणें नको, असें त्यांना वाटल्यास आश्चर्य काय?

स्वतःचा शिष्टपणा आणि औदार्य दाखवायला या लोकांना वेश्यांचा मोठा उपयोग असतो. वेश्या खरोखरच नाहीशा झाल्या तर या लोकांची काय स्थिति होईल? धर्म करून पुण्य संपादन करण्याची संधि सुखवस्तु लोकांना देण्याकरतांच ईश्वर भिकारी उत्पन्न करतो असें म्हणतात. तशा या लोकांकरतां तर ईश्वराने वेश्या उत्पन्न केल्या नसतील? पण मग त्यांचा नायनाट करून कसें चालेल? इतकाहि विचार या लोकांना येत नाही.

एकंदरींत धार्मिक अत्याचार, ख्रिस्ती क्लीबनीति, समाजकार्याच्या खोट्या कल्पना, आणि समागमस्वातंत्र्याच्या अभावीं वेश्यांबद्दल किंवा त्यांच्या गिऱ्हाइकांबद्दल वाटणारा हेवा, हीं सर्व कारणें वेश्यांच्या छळाच्या मुळाशीं आहेत. तीं स्पष्टपणें वाचकांपुढे मांडावीं एवढाच या पुस्तकाचा उद्देश आहे. या सर्व विषयाचा समंजसपणें विचार करण्याची सुबुद्धि कधी कोणाला होईल काय?

**समाप्त**

# संदर्भग्रंथांची यादी.


1. *Sexual Reform Congress, 1929* ( Report edited by Dr. Norman Haire ).
2. *History of Prostitution in India*, by S. N. Sinha & N. K. Basu.
3. *Marriage & Morals*, by Bertrand Russell.
4. *Studies in the Psychology of Sex* ( French edition Vol. IX. ), by Dr. Havelock Ellis.
5. *Etudes d'Ethique Sexuelle* Vol. VI ), by Rene Guyon.
6. *La Prostitution*, by Dr. N. M. Boiron.
7. *La Prostitution* á *Paris*, by Emile Richard.
8. *La Prostitution en Europe*, by A. Flexner.
9. *Moeurs & Prostitution*, by Marcel Rogeat.
10. *Questions d'Actualite*, by Dr. Abel Lahille.

## पुरवणी

# खऱ्या आणि खोट्या वेश्या

वेश्या या शब्दाच्या व्याख्येची चर्चा पूर्वी केलीच आहे, परंतु हा शब्द लोकांच्या वापरांत फार सैल अर्थाने येत असतो आणि पुष्कळ लोक असेंच समजतात की विवाहबाह्य संबंध ठेवणारी ती वेश्या, किंवा निदान अशा स्त्रियांसंबंधी हा शब्द शिवी म्हणून वापरण्याचा प्रघात आहे. महाराष्ट्र-शब्दकोशांत वेश्या या शब्दाची प्रथम व्याख्या ' द्रव्याकरतां वाटेल त्याला आपल्या शरीराचा विक्रय करणारी स्त्री ' अशी देऊन नंतर या शब्दाला प्रतिशब्द रांड, कसबीण, कलावंतीण, नायकीण, नर्तकी, असे दिले आहेत. तसेंच कलावंतीण या शब्दाला प्रतिशब्द गायिका, वेश्या, नर्तकी, असे दिले आहेत. वरील व्याख्येंतील दोष पूर्वीच दाखवला आहे की वेश्या शरीराचा विक्रय करीत नाहीत, शरीर भाड्याने देतात. त्याचप्रमाणे प्रतिशब्द म्हणून वर दिलेले सर्व शब्द समानार्थी नाहीत. कलावंतीण हा शब्द फक्त गायन व नर्तनाचा धंदा करणाऱ्या स्त्रीला लावतां येईल. खऱ्या कलावंतिणी वेश्यांचा धंदा करीत नाहीत. म्हणजे त्या एखाद्या पुरुषाजवळ रहात नाहीत असें नाही, किंवा त्याजकडून त्या पैसे घेत नाहीत असेंहि नाही, परंतु तो त्यांचा धंदा नव्हे. विवाहित स्त्री ज्याप्रमाणे नवऱ्याजवळ राहते आणि त्याचा मोबदलाहि तिला नवऱ्याच्या ऐपतीप्रमाणे मिळतो, परंतु तिला कोणी वेश्या म्हणत नाही, त्याचप्रमाणे कलावंतीण एखाद्या पुरुषाजवळ राहिली तरी तिला वेश्या म्हणतां नये. विवाहित स्त्रियांप्रमाणे त्या एकाच पुरुषाजवळ राहतात व तो मेल्यास कुंकू पुसून विधवांप्रमाणेही राहतात. त्यांचा शास्त्रोक्त विवाहविधि होत नाही इतकेंच. अशा स्थितींत त्यांना वेश्यांच्या सदरांत घालणें योग्य नव्हे हें कोणीहि कबूल करील. तत्वतः त्यांना समागमस्वातंत्र्य असतें, परंतु त्याचा त्या उपयोग करीत नाहीत.

श्री. मामा वरेरकरांच्या ‘ कुलदैवत ’ कादंबरींत अशा प्रकारची एक स्त्री एका पुरुषाजवळ राहिल्यानंतर त्याला कांही कारणाने दारिद्र्य आल्यामुळे ती मुंबईला जाऊन खरी वेश्यावृत्ति करून त्याला पैशाची मदत करते अशी हकीकत दिली आहे, यावरून तत्वतः त्यांना समागमस्वातंत्र्य असतें असेंच दिसतें. परंतु एवढ्यावरून त्यांना वेश्या म्हणतां येत नाही, कारण त्यांची मनःप्रवृत्ति वेश्यांची नसते हेंच खरें. हें प्रथमपासूनच असें असावें असें दिसत नाही, परंतु सभ्य समाजांत अधिक मान्यता मिळवण्याचा हा एक मार्ग त्यांना सुचला असावा, किंवा त्या समाजांत पातिव्रत्याला महत्व असल्यामुळे त्यांत खरोखरच कांही पावित्र्य किंवा मोठेपणा आहे अशी कल्पना आली असावी. एरवीं तत्वतः तरी समागमस्वातंत्र्य त्यांना कां असावें अशी शंका उत्पन्न होते, तेव्हा हें स्वातंत्र्य पूर्वी त्या अंमलांत आणीत असाव्या, परंतु समाजाच्या सोंवळेपणाचा त्यांच्यावरहि परिणाम होऊन त्यांनी तें गमावलें असावें असें दिसतें. या कल्पना फैलावल्यामुळे हा कलावंतिणींचा वर्ग नाहींसा होण्याच्या मार्गाला लागलेला आहे, कारण त्यांच्या संततीला आधुनिक शिक्षण मिळाल्यामुळे त्यांच्यावर क्लीबनीतीचा पगडा बसून पिढीजाद धंदा त्यांना कमीपणाचा वाटूं लागला आहे आणि हा धंदा हळूहळू नाहीसा करण्याकरतां कांही संस्थाहि निघाल्या आहेत. कलावंतिणींच्या मुलींनीहि शास्त्रोक्त विवाहच करावा हें मत अंमलांत आलें की हा वर्ग संपल्यासारखाच आहे, कारण विवाहित स्त्रीला गायन व नर्तनाचा धंदा करणें शक्य होणार नाही, कारण ती नवऱ्याच्या मालकीची स्त्री झाली. ज्यांना गायननर्तनापेक्षा चूल व मूल हाच धंदा बरा वाटत असेल त्यांनी तो केल्यास त्यांची मर्जी. त्यांत एकच समाधानाची गोष्ट दिसते की या धंद्यापैकी ज्यांना विशेष रूप किंवा कला नसते, त्याच विशेषतः विवाह करण्याची इच्छा धरतात. सर्वच विवाह करूं लागल्यास त्यांत क्लीबनीतीचा विजय आहे, परंतु कलेची मात्र हानि आहे यांत शंका नाही. हल्लीच्या स्थितींत तरी विवाहित स्त्रियांकडून कलेची जोपासना होणें शक्य नाही.

कलावंतिणींच्या कुटुंबांतले जे पुरुष असतील त्यांना ‘ गुणिजन ’ म्हणतात आणि त्यांचें काम बजवय्यांचें असतें, म्हणजे त्यांचीहि कलावंतिणींच्या धंद्याला मदतच होते. अर्थात् कलावंतिणींबरोबर हाहि वर्ग आपोआप नाहीसा होईल.

कलावंतिणीचें काम देवापुढे उत्सवाचे वेळीं गायननर्तन करण्याचें असतें. त्याचप्रमाणे देवळांत झाडलोट, दिवाबत्ती वगैरे काम करणाऱ्या स्त्रीला भावीण म्हणतात व तिच्या संततीला देवळी म्हणतात. कलावंतिणींचा सोंवळेपणा या जातींत शिरलेला नाही आणि या वेश्यांचा धंदा करतात.

भावीण देवळांत काम करते, त्याचप्रमाणें गृहस्थांकडे काम करून रखेली म्हणूनहि उपयोगी पडणारी असते तिला कुणवीण म्हणतात. कोंकणांत कुणबीण ठेवण्याची चाल बरीच जुनी आहे. कुणबिणीच्या मुलांना बंदे म्हणतात आणि ते बापाचें आडनांव लावतात. यांच्यांतहि अर्थात् विशेष सोंवळेपणा नसतो.

सभ्य कुटुंबांतील स्त्री रखेलीचा धंदा करूं लागल्यास तिला शिंदळ म्हण- तात व तिच्या मुलाला शिंदा म्हणतात. शिंदे हें आडनांव अशा रीतीने आलेलें आहे असें म्हणतात.

इतर देशांकडे पाहिल्यास कलावंतिणींच्याच दर्जाची प्राचीन ग्रीसमधें हेटायरा नांवाची एक जात असे. त्या अत्यंत सुशिक्षित असून कलांचीहि जोपासना करीत असत. परंतु त्या एकाच पुरुषाला चिकटून राहण्यांत भूषण मानीत नसत. अर्थात् त्यांना पैशाच्या दृष्टीने वेश्यांचा धंदा करण्याची जरूरी नव्हती, तरीपण त्या एका पुरुषाला बांधलेल्या नसत आणि आपल्या आवडी- प्रमाणे वाटेल त्या पुरुषाशीं संबंध ठेवीत असत.

विवाहाशिवायहि विवाहित स्त्रियांप्रमाणेच राहणाऱ्या स्त्रिया इतर देशांतहि सांपडतात. उदाहरणार्थ पॅरिस युनिव्हर्सिटींतील अविवाहित विद्यार्थ्यांबरोबर बिऱ्हाड करून राहणाऱ्या तरुण स्त्रिया एके काळीं प्रख्यात होत्या. त्या इतक्या काटकसरीने संसार करीत असत की विद्यार्थ्यांना घरून येणाऱ्या पैशांत त्या दोघांचाहि निर्वाह करूं शकत असत. हाहि वर्ग आतां जवळ जवळ नाहीसाच झाला आहे. कोणीं कसें वागावें हा वैयक्तिक प्रश्न आहे, परंतु या सर्वांना वेश्या म्हणणें योग्य होणार नाही इतकेंच येथे सांगायचें आहे.

अर्थात् विवाहित स्त्रियांप्रमाणे राहणाऱ्या रखेल्यांना कायद्याची कोणतीच अडचण नसते इतकेंच नव्हे तर विवाहित स्त्रियांची नक्कल करण्यापासून त्यांना

थोडाबहुत फायदाहि होतो, कारण हिंदू कायद्याप्रमाणें रखेलीचा व तिच्या मुलांचा मिळकतीवरहि हक्क कायद्याने मानलेला आहे. अर्थात् ती एकाच पुरुषाजवळ राहिलेली होती हें सिद्ध करावें लागतें.

कायद्याचा त्रास होतो काय तो खऱ्या वेश्यांना, आणि या पुस्तकांत मुख्यतः त्यांचाच विचार केलेला आहे. त्यांचेबद्दल कोणासहि सहानुभूति वाटत नाही आणि ती वाटल्याचें ढोंग जे सोंवळे लोक करीत असतात, त्यांचा मुख्य उद्देश वेश्या नाहींसा करण्याचाच असतो. हा उद्देश सफल झाल्यास विवाहसंस्थेला अत्यंत धोका आहे हें अशा लोकांस कळत नाही. प्रस्तुत लेखकाला विवाहसंस्थेबद्दल मोठासा आदर नाहीं, परंतु वेश्या आणि विवाहसंस्था यांचा अत्यंत निकट संबंध आहे ही गोष्ट बाजूला ठेवली, तरी वेश्यांना धंदा करण्याचा हक्क आहे आणि तो कायद्याने सरळपणाने कबूल केला पाहिजे आणि वेगवेगळ्या मिषांनी त्यांना त्रास देणें हा अन्याय आहे, हें समजण्याइतकी न्यायबुद्धि लोकांत उत्पन्न झाली तरी पुष्कळ आहे. लोकांत न्यायबुद्धि नसते असें नाही, परंतु पारंपरिक बुरसटपणामुळे ती लुप्त झालेली असते, आणि तिचा कांही उपयोग होत नाही ही गोष्ट लोकांच्या नजरेस आल्यास ती कदाचित् जागृत होईल.

13622
अक्षरस्पर्श ग्रंथालय
40/1 B, भोंडे कॉलनी, कर्वे रोड,
पुणे-411 004. Ph. 254249
मो. 8007144040

# समाजस्वास्थ्य मासिक

संपादक : र. धों. कर्वे एम्. ए.

दिप्लोम् द एत्युद् स्युपेरिअर् ( पॅरिस )

सर्व सामाजिक विषयांची व विशेषतः कामशास्त्राची निर्भीड चर्चा करणारें व दर महिन्याचे १५ तारखेला नियमितपणें प्रसिद्ध होणारें अशी या मासिकाची ख्याति आहे. जुलै १९४० पासून १४ वें वर्ष सुरू होईल.

वार्षिक वर्गणी रु. १॥, व्ही. पी. ने १॥।, हिंदुस्थानाबाहेर रु. २ किंवा शिलिंग ३.

कोणत्याही महिन्यापासून सुरू करतां येतें. नमुन्याकरतां आम्हास वाटेल तो अंक फुकट पाठवूं.

**राइट एजन्सी,**

१३ नवी भटवाडी, मुंबई-४.

# संततिनियमनाची सोय

स्त्रियांना तपासून, योग्य आकाराची टोपी निवडून ती त्यांना स्वतःला बसवण्यास शिकवून इतर संपूर्ण माहिती देऊं. उपकरणांचे किंमतीशिवाय ५ रु. फी पडेल. भेटण्याची वेळ सकाळीं ९ ते १० व दुपारीं ३ ते ४.

**मालतीबाई कर्वे,**

**१३ नवी भटवाडी, गिरगांव,**

**मुंबई—४.**

13622
अक्षरस्पर्श ग्रंथ
40
पुणे-411 004.
मो. 8007144040

अक्षरस्पर्श ग्रंथालय
40/1 B, भोंडे कॉलनी, कर्वे रोड,
पुणे-411 004. Ph. 25424915
मो. 8007144040

13622

अक्षरस्पर्श ग्रंथालय 13622
40/1 B, भोंडे कॉलनी, कर्वे रोड,
पुणे-411 004. Ph.

0155,6-KAR
0 13622


# राइट एजन्सी

१३, नवी भटवाडी,

मुंबई ४.

( स्थापना १९२१ )

आमचेकडे संततिनियमनाची व गुप्तरोगप्रतिबंधाची आजतागायत माहिती व सामग्री माफक दरांत मिळते.

कामविषयक अडचणींत योग्य सल्ला मिळेल.

( फी. रु. १० )

# संततिनियमनाची

## माहिती व साधनें.

## शकुंतला परांजपे

रँग्लर परांजपे रोड, पुणें ४.

स्त्रियांना स्वतः **तपासून** साधनें कशीं वापरावीं हें

## शिकवितात.

भेटण्याची वेळः—दुपारीं २ ते ५

परगांवच्या स्त्रियांनीं आठ दिवस आगाऊ लिहावें.

